म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. 3034



3034

# सावरकरांचे साहित्य-चिंतन

REFBK-0024193



संपादक
डॉ. प्र. ल. गावडे

संदर्भ निबंध [साहित्यसमीक्षा]

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

**सूचना :**—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

20 FEB 1985

( क्र. मा. प. )
५०००-१२-८२

संदर्भ [साहित्यसमीक्षा]
निबंध
३०३४
२४९९३
७।६।८४

# सावरकरांचे साहित्य-चिंतन

: संपादक :

**डॉ. प्र. ल. गावडे**

REFBK-0024193

माझा मराठाचि बोलु कौतुकें। परि अमृतातेंहि पैजा जिंके। ऐसीं अक्षरें रसिकें। मेळवीन।
संजय
प्रकाशन, पुणे ४

संजय प्रकाशन : दोनशे छप्पन

प्रकाशक :
अभय शंकर भावे
संजय प्रकाशन,
९१७/२२, फर्ग्युसन कॉलेज रोड,
पुणे ४११ ००४.

मुद्रक :
श्री. प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स,
१०१९, सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ,
पुणे ४११ ०३०.

मुखपृष्ठ : अनिल उपळेकर

प्रथमावृत्ती : २६ जानेवारी १९८४

© सर्व हक्क स्वाधीन

किंमत तीस रुपये

२०३४

माहूरगडवासिनी कुलदेवता
श्री रेणुकामाता
हीस
श्रद्धापूर्वक समर्पण

# अनुक्रमणिका

...गुरुऋण ५
...संपादकाचे मनोगत ७
...प्रस्तावना ११

## लेखसंहिता

१) आत्मचरित्राचा साहित्यिक संदर्भ ३३
२) 'आठवणी'मागील वाङमयीन दृष्टिकोन ४०
३) कविता आणि तत्त्वज्ञान ४४
४) 'मरणोन्मुख शय्ये'वरील चिंतन ४९
५) वैनायक वृत्ताचा विशेष ५७
६) नाटचलेखनामागील हेतू ६७
७) साहित्यातील कार्यात्मक सुधारणा ७१
८) लिपिशुद्धी आणि भाषाशुद्धी ७८
९) प्रा. क्षीरसागर आणि भाषाशुद्धी ९२
१०) साहित्याचे ध्येय काय असावे ? १०२
११) साधुसंतांचे बोलपट कसे पाहावेत ? १११

## परिशिष्टे

अ) 'मरणोन्मुख शय्येवर' —काव्यसंहित १२७
आ) सावरकरांचा जीवनपट १३५
इ) सावरकरांचे साहित्य १४०
ई) संपादक परिचय १४१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३०३४
दा. क्र. २४९९३
निबंधवाङ्मय
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# गुरुऋण :

स्वा. सावरकरांचे शरीररक्षक व त्यांचे निकटचे सहकारी श्री. अप्पा कासार यांची स्वा. सावरकरांच्या आठवणींविषयी दूरदर्शनवरील मुलाखत पाहून, या जाज्वल्य आठवणी पुस्तकरूपाने छापल्यास त्यांच्या अनेक नव्या हकिगती वाचकांसमोर येतील, त्यांच्या जीवनातील काही नवे पैलू कळतील असा विचार मनात बळावत असतानाच दुसऱ्या दिवशी डॉ. हे. वि. इनामदार घरी आले, ते 'सावरकरांचे साहित्यचिंतन' या पुस्तकाचा आराखडा घेऊनच.

"सावरकरविषयक निरनिराळे विचार आत्तापर्यंत अनेकांनी मांडले आहेत. सावरकरांचे साहित्यविषयक चिंतन हा त्यांच्या विचारांचा आणखी एक पैलू. त्यावरही अनेकांनी अभ्यास केला आहे. पण त्या दृष्टिकोनातून त्यांचे लेख एकत्रित करून त्याला विवेचक अशी प्रस्तावना असणारा एकही ग्रंथ माझ्या माहितीत नाही. तुमचे शिक्षक डॉ. प्र. ल. गावडे यांनी ते काम केले आहे. हे पुस्तक प्रकाशित करणार का ?" असे डॉ. इनामदारांनी विचारताच या पुस्तकाच्या निमित्ताने, आपल्या आवडत्या शिक्षकांनी लिहिलेले एखादे पुस्तक प्रकाशित करावे, अशी गेली काही वर्षं मनात असलेली इच्छा पूर्ण होत आहे असे वाटले; आणि तीही 'सावरकर' या आपल्या आवडत्या विषयावरील पुस्तकामुळे, हा एक योगायोगच.

रससिद्ध ललित वाङ्मय, उत्तमोत्तम कुमारवाङ्मय, निवडक समीक्षा व संशोधन ग्रंथ प्रकाशित करताना 'संजय प्रकाशन'ने आपला एक विशिष्ट दर्जा कायम ठेवला आहे. हे पुस्तक देखील त्याच परंपरेचे व उद्दिष्टाचे पुढचे पाऊल आहे.

अत्यंत यशस्वी मुख्याध्यापक म्हणून मान्यता पावलेले डॉ. प्र. ल. गावडे यांचा 'सावरकर: एक चिकित्सक अभ्यास' हा पीएच. डी. चा विषय. त्यामुळे सावरकर साहित्य त्यांनी अत्यंत सखोलपणे अभ्यासले आहे. त्याच विचारधारेतून तयार झालेले हे पुस्तक साहित्याभ्यासक, सावरकर-भक्त व इतर जाणकार वाचक यांच्यासाठी उपयुक्त ठरेल.

या पुस्तकामधील सावरकरांचे निरनिराळे लेख समाविष्ट करण्यासाठी श्री. बाळाराव सावरकरांनी तात्काळ संमती दिल्यानेच हे पुस्तक अत्यंत वेगाने पूर्ण होऊ शकले. त्याबद्दल 'संजय प्रकाशन' त्यांचे अत्यंत आभारी आहे.

या पुस्तकाच्या घडणीत डॉ. हे. वि. इनामदार यांचा फार मोठा वाटा आहे. त्यांच्या ऋणातच मी राहू इच्छितो.

डॉ. प्र. ल. गावडे हे माझे शिक्षक. गुरुऋणात या पुस्तकाच्या निमित्ताने आणखीन भर पडली आहे.

प्रस्तुत ग्रंथप्रकल्पाचे वाचक स्वागत करतील अशी खात्री आहे.

**प्रकाशक**

# संपादकाचे मनोगत

'मी स्वतंत्र हिंदुस्थानात जन्माला आलो असतो तर माझ्या साहित्याच्या कल्पनेचा अर्थ तुम्हांस अधिक पटवून देता आला असता!' असे उद्गार स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी १९३७ साली बडोदे साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून भाषण करताना काढले होते. या उद्गारावरून साहित्यविषयक त्यांनी काही वेगळे विचारमंथन केले होते, पण हिंदुस्थानाच्या परतंत्र अवस्थेत त्यांना सहित्याच्या ध्येयाबद्दल, हेतूबद्दल व साहित्यातील विविध प्रकारांबद्दल मूळ विचारापेक्षा काही भिन्न, वेगळे विचार मांडणे क्रमप्राप्त झाले होते, असे ध्यानात येते. तथापि सावरकरांनी केलेल्या साहित्यचिंतनाचे काही विरळ, विस्कळित, विखुरलेले धागे त्यांच्या लेखनातून, भाषणांतून चमकताना दिसतात. ते धागे पकडून त्यांच्या साहित्यविषयक चिंतनाचे सलग वस्त्र विणता येते का हे पाहण्याचा प्रयत्न या पुस्तकातून केला आहे.

सावरकर जन्मशताब्दीचे हे वर्ष सर्वत्र विविध स्वरूपात साजरे केले जात आहे. सावरकरांनी सांगितलेल्या सामाजिक विचारांचा मागोवा सद्यःकालीन परिस्थितीच्या संदर्भात घेण्याचा प्रयत्न होत आहे. 'धर्मांतर म्हणजे राष्ट्रान्तर' या सावरकरांनी केलेल्या घोषणेचा नेमका अर्थ आता ध्यानी येऊ लागल्याने त्यासंबंधी जाणकारांत वैचारिक मंथन सुरू झाले आहे. सावरकरांनी केलेल्या अस्पृश्योद्धाराच्या कार्याचे, त्यांनी सांगितलेल्या जातिभेदाच्या इष्टानिष्टत्वाच्या मूलगामी विचाराचे पुनर्मूल्यमापन केले जात आहे. त्यांनी सांगितलेला 'हिंदुत्वविचार' पुन्हा तपासून पाहाण्याचा प्रयत्न होत आहे. सावरकरांचे कवित्व, त्यांचे वक्तृत्व, त्यांची नाटके व नाट्यगीते, द्रष्ट्याच्या भूमिकेवरून त्यांनी व्यक्तविलेली भविष्ये इत्यादी विविध विषयांच्या सर्वत्र चर्चा होत आहेत. अशा वेळी सावरकरांनी केलेल्या साहित्यचिंतनाचा शोध घेण्याचा प्रयत्न केल्यास व तो एकत्रित शब्दांकित केल्यास, हाही एक नवोपाहार या जन्मशताब्दीच्या निमित्ताने सावरकरांच्या स्मृतीस समर्पण करता येईल, या भूमिकेतून त्यांच्या साहित्य-विचारांचा हा संग्रह प्रसिद्ध करण्यात येत आहे.

हा संग्रह प्रसिद्ध करण्याच्या दृष्टीने माझे स्नेही प्राचार्य डॉ. हे. वि. इनामदार यांनी दिलेले प्रोत्साहन व केलेले सहकार्य कृतज्ञभावाने मी येथे नमूद करीत आहे. ' संजय प्रकाशन 'चे श्री. अभय शंकर भावे यांनी हे पुस्तक आकर्षक स्वरूपात व अतिशय गतीने प्रकाशित करण्यासाठी जे प्रयत्न केले, त्याबद्दल त्यांचे आभार कोणत्या शब्दांत मानावेत, हेच कळत नाही. श्री. बाळाराव सावरकर यांनी सावरकर साहित्यातील उतारे या पुस्तकात पुनर्मुद्रित करण्यास अत्यंत आपुलकीने संमती दिली, याबद्दल मी त्यांचा अतिशय ऋणी आहे. तसेच ' स्वाध्याय महाविद्यालया 'चे संचालक डॉ. वि. प. महाजन व प्रा. कृष्ण अर्जुनवाडकर यांच्या सहकार्याबद्दल मी कृतज्ञ आहे.

प्रस्तुत ग्रंथाने सावरकरांच्या साहित्यविषयक विचाराच्या सखोल मंथनाला अधिक चालना मिळेल, असा विश्वास वाटतो.

**प्र. ल. गावडे**

**पुणे**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ..........
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# प्रस्तावना

माहूरगडवासिनी कुलदेवता
श्री रेणुकामाता
हीस
श्रद्धापूर्वक समर्पण

# प्रस्तावना

'थोर मनुष्य हा त्याच्या व्यक्तित्वातील कमी महत्त्वाच्या बाजूने जगाला परिचित असतो' असे प्रसिद्ध लेखक डीन इंग यांनी म्हटले आहे. स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या संदर्भात हे विधान विशेष लक्षणीय आहे. कारण सावरकर 'स्वातंत्र्यवीर' म्हणून जितके परिचित आहेत, 'क्रांतिकारक' म्हणून त्यांचा जितका अधिक लौकिक आहे, 'हिंदुत्वनिष्ठ राजकीय नेते' म्हणून त्यांची जितकी अधिक ओळख सर्वसामान्यांना आहे, तितकी 'साहित्यिक' म्हणून त्यांची प्रतिमा जनसामान्यांपुढे नाही. सावरकर स्वतः तर असे म्हणत की, 'मी वृत्तीने कवी आणि कलावंत आहे, पण परिस्थितीने मला राजकारणी पुरुष केले आहे.' तेव्हा डीन इंग यांच्या म्हणण्याप्रमाणे सावरकर हे 'राजकारणी पुरुष' या त्यांच्या कमी महत्त्वाच्या बाजूनेच जगाला जास्त परिचित आहेत असे दिसून येते.

तसे पाहिले तर सावरकरांनी मराठी साहित्यात 'सात-आठ सहस्र पृष्ठांची' भर घातली आहे. याशिवाय त्यांची अनेक भाषणे, मुलाखती, विस्मृतीत गेलेले साहित्य आणि क्रांतीच्या वणव्यात भस्मसात झालेले वाङमय यांची कल्पनेने मोजदाद केली तर त्यांचे वाङ्मयीन कर्तृत्वातील श्रेष्ठपण ध्यानी येते. त्यांनी साहित्याच्या एक-दोन प्रकारांपुरतेच हे कर्तृत्व गाजविलेले नसून साहित्याच्या सर्वच क्षेत्रांत त्यांनी यशस्वीपणे संचार केला आहे. 'माझी जन्मठेप', 'माझ्या आठवणी' व 'शत्रूच्या शिबिरात' हे आत्मचरित्रपर ग्रंथ लिहून सावरकरांनी मराठी वाचकांची इतकी प्रशंसा मिळविली की, टीककारांना 'हे तीन ग्रंथ मिळून सावरकरांच्या महान जीवनाचे महाकाव्यच मराठी वाङ्मयात अवतरले आहे' असे प्रशस्तिपत्र द्यावे लागले. त्यांनी लिहिलेल्या 'जोसेफ-मॅझिनी' या चरित्रग्रंथाला तर इतकी लोकप्रियता मिळाली की, 'हरि-विजय', 'रामविजय', 'पांडव-प्रताप' इत्यादी धार्मिक ग्रंथांप्रमाणे या ग्रंथास पालखीतून मिरविण्यात आले. 'अठराशे सत्तावनचे स्वातंत्र्ययुद्ध' हा त्यांचा ग्रंथ भारतीय क्रांतिकारकांची गीता ठरावी इतका मान्यता पावला. अंदमानच्या कारागृहात निस्साहाय्य, निस्साधन अशा अवस्थेत खितपत पडण्यात तारुण्यातील उमेदीचा काळ गेला असताही सुमारे तेरा हजारां-

वर चरणसंख्या भरेल इतकी विपुल काव्यरचना सावरकरांनी केली. त्यातही महाकाव्यसदृश अशी 'कमला,' 'गोमांतक', 'विरच्छ्वास', 'महासागर' अशा चार खंडकाव्यांची निर्मिती करून विशाल महाकाव्य-प्रासादाचे चार घाटदार चवुतरे त्यांनी उभे केले. हिंदुसमाजातील देवभोळेपणा, पोथीनिष्ठा, शब्दप्रामाण्य इत्यादी दोषांवर आपल्या निबंधांतून 'क्ष– किरणां'चा प्रकाश टाकून, त्यांनी मराठी निबंधवाङ्मयात एक नवे बळ, नवे ओज ओतले. 'हिंदुत्व', 'हिंदुपदपादशाही', 'सहा सोनेरी पाने' यांसारख्या इतिहासपर ग्रंथांतून त्यांनी भारतीय इतिहासावर नवा प्रकाशझोत टाकला.

सावरकरांनी कथा–कादंबऱ्याही लिहिल्या. 'काळे पाणी' ही त्यांनी लिहिलेली कादंबरी त्यांच्या आत्मवृत्ताची ललितकथात्मक विस्तृत आवृत्ती वाटावी इतकी सामर्थ्याने युक्त आहे. 'उःशाप', 'संन्यस्त खड्ग' व 'उत्तरक्रिया' या तीनच नाटकांनी सावरकरांची नाट्यसृष्टी सजलेली असली तरी कै. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांच्यासारख्या नाट्याचार्यांनाही सावरकरांच्या नाट्यप्रतिभेला अश्रूंचा अभिषेक करावासा वाटला. सावरकरांनी लिपीशुद्धी आणि भाषाशुद्धी यांसाठी केलेले तत्त्वशुद्ध लेखन आणि घणाघाती प्रचार पाहून श्री. कृ. कोल्हटकरांनी 'अत्यंत बुद्धिमान, तेजस्वी व उत्साही लेखक' अशा शब्दांत सावरकरांचा गौरव केला. सावरकरांना 'भाषाशुद्धीचे खरे वैरी' असे संबोधूनही कै. प्रा. श्री. के. क्षीरसागर यांनी असे म्हटले की, 'फक्त वाङ्मयासंबंधीच बोलावयाचे झाल्यास त्यांच्याएवढी प्रखर व तेजस्वी प्रतिभा अर्वाचीन वाङमयात कोणाच्याच वाट्यास आलेली नाही.'

अतएव, सावरकरांचे साहित्य हा एक महोदधी आहे. त्या महोदधीतून त्यांनी ठायीठायी व्यक्त केलेले विचारमोती शोधून काढून व त्या मोत्यांची हारीने मांडामांड करून, त्यांचे आतापर्यंत प्रकर्षाने दृष्टोत्पत्तीस न आलेले सौंदर्य रसिक अभ्यासूंना दाखविण्याचा प्रयत्न या ग्रंथात करण्यात आला आहे.

सावरकरांनी आपले साहित्यविषयक चिंतन समग्रपणे का मांडले नाही किंवा त्या चिंतनाला समीक्षास्वरूपात ग्रंथनिविष्टही का केलेले नाही याला काही कारणेही संभवतात. एक प्रमुख कारण असे सांगता येईल की, सावरकरांचे एकूण जीवन इतके धकाधकीचे, गतिमान आणि कार्यव्याप्त होते की, साहित्यनिर्मितीबरोबर साहित्यविषयक चिंतन ग्रंथरूपाने प्रकट करण्यास आवश्यक ती सवड वा स्वास्थ्य त्यांना त्र्याऐंशी वर्षांचे दीर्घ आयुष्य लाभूनही मिळू शकले नाही.

नाशिक जिल्ह्यातील भगूर हे सावरकरांचे जन्मग्राम. २८ मे १८८३ या दिवशी सावरकरांचा जन्म झाला. वयाची पहिली तेरा-चौदा वर्षे सावरकरांचे वास्तव्य प्रामुख्याने भगूर येथेच होते. पुढे इंग्रजी शिक्षणाच्या निमित्ताने सावर-

करांची निवासभूमी व कर्मभूमी नाशिक हीच होती. त्यानंतर पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयातूनच त्यांनी आपले महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. सावरकरांच्या जीवनाचा हा पहिला कालखंड. या कालखंडात ते मित्रमेळ्याचे अध्वर्यू म्हणून कार्य करीत होते. या काळातील त्यांची कविता ही कवनांच्या व पदाच्या स्वरूपाची होती. मराठ्यांच्या पराक्रमी इतिहासावर स्फुटलेखन याच काळात त्यांनी केले.

सावरकरांच्या जीवनातील दुसरा कालखंड इंग्लंडमधील क्रांतिकार्याचा. ' शिवाजी शिष्यवृत्ती ' मिळवून ते इंग्लंडला गेले. हा कालखंड तारुण्याचा होता, क्रांतीच्या ऐन बहराचा होता. स्वातंत्र्ययुद्धासाठी भारतीयांनी संघटित उठाव करावा म्हणून ' सत्तावनच्या स्वातंत्र्यसमरा 'सारखे ग्रंथ ते लिहीत होते. स्वातंत्र्य-पर भावोत्कट कविता लिहिताना त्यांच्या भावनेचा वेग शिगेला पोहोचला होता.

तिसरा कालखंड अंदमानच्या यातनामय कारावासाचा. या कालखंडात खंडकाव्यात्मक प्रदीर्घ काव्यरचनेसाठी काहीशी उसंत, त्या निस्साधन व निस्साहाय्य अवस्थेतही, त्यांना मिळाली होती. बंदिशाळेत अंतर्मुख झालेल्या वृत्तीतून काही चिंतनपर कविताही त्यांनी लिहिली.

रत्नागिरी येथील स्थानबद्धतेचा कालखंड हा सावरकरांच्या गद्यमय लेखनाचा कालखंड होय. नाट्य, निबंध, चरित्र–आत्मचरित्र, कथा–कादंबरी, भाषा–लिपी-शुद्धी इत्यादी गद्यलेखनाने हा कालखंड विशेष गाजला. या अवधीत सावरकरांनी लिहिलेली कविता प्रचारात्मक होती. स्थानबद्धतेच्या या काळात सावरकरांची लेखणी, राजकीय विषय सोडून, जणू बंधमुक्त झाली होती. परंतु स्थानबद्धतेतून मुक्तता होताच सावरकरांच्या राजकीय जीवनाला गती मिळाली, आणि त्यांची कविता बव्हंशी मूक झाली. ' भारतीय इतिहासातील सहा सोनेरी पाने ', ' शत्रूच्या शिबिरात ' यांसारख्या काही गद्य ग्रंथांतून सावरकरांच्या गद्यशैलीचे दर्शन रसिकांना झाले तेवढेच. परंतु या काळातील धकाधकीच्या राजकीय जीवनात, साहित्यिक सावरकरांवर राजकारणी सावरकरांनी मात केल्याचे दृश्य दिसून येते. जीवनाच्या अगदी अंतकाळी ' आत्महत्या की आत्मार्पण ' हा सावरकरांचा लेख, त्यांच्या मनाने मृत्यूच्या स्वागताची सर्वतोपरी तयारी केल्याची साक्ष देऊन गेला. ३ फेब्रुवारी १९६६ पासून प्राणांतिक प्रायोपवेशनाला प्रारंभ केला आणि २६ फेब्रुवारी १९६६ रोजी त्यांचा पार्थिव देह काळाच्या जवनिकेत अंतर्धान पावला.

सावरकरांच्या जीवनाचा व त्यांच्या साहित्यनिर्मितीचा अशा समांतर आलेखांच्या साहाय्याने विचार केला असता हे ध्यानी येते की, थोर साहित्यिकाला आवश्यक असणारी मूलद्रव्ये सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वात उत्कटत्वाने असूनही

साहित्यिक सावरकरांपेक्षा राजकारणी सावरकर हेच सर्वसामान्यांच्या स्मृतीत अधिकत्वाने स्थिरावले आहेत. काव्यात्म जीवन, प्रबल कवित्वशक्ती आणि महाकवीची विशाल प्रतिभा या गुणांनी सावरकरांचे व्यक्तिमत्त्व संपन्न असूनही त्यांचे ' राजकीय जीवन ' आणि ' काव्यसाधनेपेक्षा कार्यसाधनेला त्यांनी दिलेले अधिक महत्त्व ' यामुळे सावरकरांची राजकीय प्रतिमा जनमानसात दृढ झाली आहे. तथापि सावरकरांच्या साहित्याचा अभ्यास करताना निखळ साहित्यिक दृष्टी ठेवली तर त्यांनी साहित्यविषयक फार सखोल चिंतन केले होते, साहित्यविषयक काही नवीन प्रयोग केले होते आणि मराठी साहित्याच्या भाषा–लिपी सुधारणेच्या प्रश्नापासून ते विविध साहित्य–प्रकारांचा विचार आणि वापर त्यांनी केला होता हे ध्यानी येते.

' सावरकरांचे साहित्यचिंतन ' या पुस्तकात निवडलेल्या उताऱ्यांमागे प्रामुख्याने हा साहित्यविषयक दृष्टिकोण ठेवण्यात आलेला आहे. ' माझ्या आठवणी ' आणि ' माझी जन्मठेप ' या सावरकरांनी लिहिलेल्या दोन आत्मचरित्रपर ग्रंथांना त्यांनी स्वत:च ज्या दोन प्रस्तावना जोडल्या आहेत, त्या, आत्मचरित्रपर लेखनप्रकाराबद्दल सावरकरांनी केलेले सखोल चिंतन प्रकट करतात. आत्मचरित्र हा वाङमयप्रकार म्हणजे मानवी आयुष्यातील घटनांच्या केवळ रुक्ष नोंदी नव्हेत, तर व्यक्तीच्या आत्माविष्काराचा तो एक कलात्मक प्रकार आहे, याची जाणीव सावरकरांच्या ठायी जागती होती. आर्थर मेलाव्हिली क्लार्क यांनी आत्मचरित्रासंबंधी म्हटले आहे की, " It is not a scientific record but a work of art, an expression of personality–" सावरकरांना आपल्या काही आकस्मिक, काही अद्भुत, काही उत्क्षोभक विद्युत तंतूंनी विणलेल्या चरित्राची मांडामांड करताना ती मनोवेधक व्हावी व त्या चरित्राच्या ' नुसत्या उद्दीपक मनोवेधकपणासाठी देखील साहित्यात त्याची भर ' पडावी– याची पूर्ण जाणीव होती.

आत्मचरित्रात प्रांजळ सत्यकथनाला फार महत्त्व असते. ' प्रियजनापाशी आपली सुख-दु:खे मन मोकळे करून सांगण्याची स्वाभाविक वृत्ती ' आत्मचरित्रलेखनासाठी आवश्यक असते. आत्मचरित्र लिहिण्यामागे जे अनेक हेतू असतात, त्यात मुख्यत: आत्मानुभवाचे दान पुढील पिढीला देणे, ' आपल्या आकांक्षा आणि ध्येय, प्रयत्न आणि पराक्रम, न्यूनता आणि सांगता यांच्या माहितीची ठेव ' पुढील पिढीच्या हितार्थ तिच्या हाती सोपविणे हा एक प्रधान हेतू असतो. सावरकरांनी या हेतूने आत्मानुभवाचे हे योगदान केले आहे.

' Paint me as I am ' हे क्रॉम्वेलने आपल्या चित्रकाराला सांगितलेले वाक्य आत्मचरित्रपर लेखनाचे सूत्र होय. उनोक्ती, अतिशयोक्ती, आत्मस्तुती, आत्मश्लाघा, आत्मगौरव, लोकछंदानुवर्तित्व इत्यादी सर्व दोषांपासून आत्मचरित्रकाराने जाणीव-

पूर्वक दूर राहावयास हवे. आत्मचरित्र लिहिताना प्रारंभीच्या प्रस्तावनेतच सावरकरांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. सावरकर लिहितात–

" सार्वजनिक उपयुक्ततेस्तव आठवणी प्रसिद्ध करावयाच्या, तर त्या मनुष्याच्या जीवनात जशा घडल्या आणि ज्या ज्या घडल्या, त्या त्या समग्र प्रसिद्ध करणे हेच प्रामाणिक लेखकाचे कर्तव्य होय. केवळ लोकांत प्रौढी वाढेल तितकाच भाग प्रसिद्ध करणे हा मिथ्याचार, ते लोकप्रियतेचे दास्य; लोकहिततत्परतेचे खरे गमक नव्हे... (मनुष्याच्या) घडावाची घडण कशी होत गेली हे जर खरोखर समजून घ्यावयाचे असेल, तर त्याच्या, लोकांस थोर वाटणाऱ्या किंवा उचित भासणाऱ्या जीवनस्मृतीच प्रसिद्ध करून भागावयाचे नाही, तर तो जसा होता तशाचा तसाच नखशिखान्त आपल्यापुढे उभा केला पाहिजे... म्हणूनच क्रॉम्वेलने आपल्या चित्रकारास निक्षून सांगितले की, 'मी आहे तसा काढ, एक सुरकुतीदेखील सोडू नकोस !' कारण सूक्ष्मत: पाहिले असता क्रॉम्वेलच्या घडावात–त्याच्या तजेल्याप्रमाणेच त्याच्या सुरकुत्यांचे अंग होते... आम्ही ह्या आठवणी लिहिण्याच्या आधी इतकीच प्रतिज्ञा करू इच्छितो की, आम्ही ज्या सांगू त्या आठवणी तरी अगदी जशा आठवतात तशाच सांगू; केवळ लोकच्छंदानुवर्तित्वास्तव त्यात नसती रंगरंगोटी करणार नाही."

प्रांजळपणा व सत्यकथन हा भूमिकेमुळेच सावरकरांना 'आत्मस्मृतिकथनास आत्मश्लाघेचा अनिवार्यपणे लागणारा गंध' संकोचित करतो. सावरकरांच्या या विवेचनावरून सावरकरांनी आत्मचरित्र या वाङ्मयप्रकाराचा किती सूक्ष्म विचार केला होता हे ध्यानी येते.

आत्मचरित्रलेखनाच्या पद्धतीबद्दल सावरकरांनी जसा सूक्ष्म विचार केला होता, तशीच चरित्रलेखनपद्धतीबद्दलही त्यांची काही ठाम मते बनली होती, हे त्यांनी लिहिलेल्या 'साधुसंतांचे बोलपट कसे पहावेत ?' या निबंधावरून दिसून येते. चरित्र विषय झालेल्या व्यक्तीच्या व्यक्तित्वाचे प्रामाणिक चित्रण करण्याचा प्रयत्न चरित्रातून केला जातो. चरित्रलेखनाच्या हेतूसंबंधी प्रसिद्ध लेखक आंद्रे मोर्वा यांनी म्हटले आहे की, 'The aim of a biography is the truthful transmission of personality.' चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचे यथातथ्य चित्रण करणे हा चरित्रलेखनामागील खरा हेतू असतो. असे चित्रण करताना जी साधने लेखक वापरतो, त्यांमध्ये प्रामुख्याने चरित्र-नायकाने स्वत: लिहून ठेवलेली कागदपत्रे, आठवणी, दैनंदिनी, पत्रव्यवहार इत्यादींचा उपयोग चरित्र-नायकाच्या चरित्राची विश्वासार्हता वाढावी म्हणून लेखक करीत असतो. चरित्र-नायक असलेली व्यक्ती जर ऐतिहासिक दृष्टया महत्त्वाची असेल, तर त्या व्यक्तीसंबंधी परकीय लोकांनी आपल्या इतिहासात कोणत्या नोंदी करून ठेवल्या आहेत, याचा शोध घेणे

चरित्र-लेखकाचे कर्तव्य ठरते. तसेच चरित्र-नायकासंबंधी जी विस्कळित माहिती उपलब्ध असेल, त्या माहितीच्या आधारे अंतर्गत पुराव्याची संगती–विसंगती पडताळून, त्याचे चरित्र अधिक सुसंगत, सत्य, विश्वासार्ह कसे होईल, याचाही प्रयत्न चरित्र-लेखकाने करणे आवश्यक ठरते.

उत्कृष्ट चरित्रलेखनाच्या उपरिनिर्दिष्ट निकषांचा विचार सावरकरांनी केला होता, असे वरील निबंधात त्यांनी संतचरित्राचे समीक्षण करताना जे विवेचन केले आहे, त्यावरून ध्यानी येते. संतचरित्रे ऐतिहासिक कशी नाहीत याचे विवेचन करताना सावरकरांनी लिहिले आहे–

"संतांचे स्वतःचे ऐहिक पत्रव्यवहार वा लिखाण आणि त्यांच्याविषयीचे परकीय शत्रुमित्रांचे उल्लेख ही दोन्ही ऐतिहासिक साधने अगदी विरळ असल्याच्या अशा अडचणीत तिसरी अत्यंत महत्त्वाची अडचण, जी त्या प्रकरणी इतिहास संशोधकास पडते, ती त्यांच्या असलेल्या महिपतीप्रभृती चरित्रकारांच्या चरित्रातील अंतर्गत, सुसंगती–विसंगती तुलनेची. इतर पुरुषांच्या, ऐहिक दृष्टचा लिहिलेल्या चरित्रातील पुष्कळ गोष्टी त्यांच्या वर्णनातील विसंगतीवरून केव्हा केव्हा तत्काळ खोटचा-खऱ्या ठरविता येतात... त्या विसंगतीतही अंतर्गत पुराव्याच्या रूपाने जे सत्य असते ते पाखडून काढता येते. कारण ती चरित्रे बोलून चालून ऐहिक बुद्धिवादाचा, मानुषीय तर्काचा विषय हे सर्वांनी गृहितच धरलेले असते. पण संत चरित्राचे मूळ गृहित (axiomatic assumption) आध्यात्मिक, दैविक, अतिमानुष असते. जी घटना जितकी विसंगत, तितकी त्यात संग्राह्य. 'चमत्कार' नसला तर ते संतचरित्र सांगण्यासारखेच नव्हे. त्यामुळे त्यातील घटना दैविक वा आध्यात्मिक भाषेत तर्कातीत, म्हणजेच ऐहिक वा आध्यात्मिक भाषेत तर्कशून्यच असणार! ही संत-चरित्रे म्हणजे बोलून चालून असंभव अलंकाराची उदाहरणे."

संतांची चरित्रे अशी 'चमत्कारिक' व 'असंभव' असली तरी ती कशी वाचावीत आणि त्यांच्यावरील बोलपट कसे काढावेत, याचे विवेचन मात्र सावरकरांनी बुद्धिनिष्ठ दृष्टीने केले आहे. सावरकर लिहितात–

"आज उपलब्ध असलेली संतचरित्रे शब्दन् शब्द यथार्थ असलेले ऐतिहासिक सत्य नव्हे, फार फार तर एक ऐतिहासिक काव्य आहे असे समजूनच ती वाचली पाहिजेत. त्यांचे बोलपट तर ते एक निव्वळ 'चमत्कारिक' नाटक आहे, ह्या एकाच भावनेने पाहिले पाहिजेत." चित्रपटातून संतांचे दर्शन घडविताना त्या संतांना अद्ययावत बनवून त्यांचे विडंबन करू नये, त्यांच्या चरित्रातील चमत्कारांच्या वातावरणाने निर्माण होणाऱ्या अद्भुत रसाचा परिषोष चित्रपटातून होऊ द्यावा आणि जोपर्यंत संतांच्याबद्दलचा आदर व पूज्यता त्यांच्या उदात्त चारित्र्यामुळे उणावण्याची भीती नाही, तोपर्यंत सध्याच्या बोलपटात संतचरित्रे आहेत तशीच,

नि त्यांच्या काळच्या, बऱ्या-वाईट पण खऱ्याखुऱ्या वातावरणातच 'चित्रपटविली' जातील, असे आपले सुस्पष्ट मत सावरकरांनी व्यक्त केले आहे.

संतचरित्रे वाचण्याचा ऐहिक दृष्टिकोन एकदा आला की, मग बोलपटातून संतांच्या भाकडकथा बोकाळण्याचा संभव उरणार नाही, असा सावरकरांच्या या चिंतनाचा थोडक्यात निष्कर्ष होय.

**'कविता आणि तत्त्वज्ञान' व 'मरणोन्मुख शय्येवरील चिंतन'** हे, या पुस्तकातील सावरकरांचे दोन उतारे त्यांनी काव्यविषयक जे चिंतन केले होते, त्याचे दर्शन घडविणारे आहेत. सावरकर कवितेकडे साध्यापेक्षा साधन म्हणून पाहात होते. परिस्थित्यनुकूल असे मनोधर्म जागृत करणारी व जीवन सह्य होण्यास साहाय्यक ठरणारी शक्ती म्हणजे कविता, अशा हेतूने ते काव्यनिर्मिती करीत होते. कविता ही कर्तव्याला अनुसरून तिच्या भक्ताचे रक्षण करते, म्हणून कर्तव्यानुसार तिला भिन्न भिन्न अशा दोन मूर्ती आहेत असा त्यांचा विश्वास होता. डॉ. मधुकर अष्टीकर यांनी 'स्वातंत्र्यवीर सावरकरांचे काव्यशास्त्र' या लेखात ('प्रज्वलंत,' दिवाळी अंक, १९७६) सावरकरांच्या काव्यशास्त्राचे स्पष्टीकरण करताना असे म्हटले की, "काव्याला वारसा लाभला आहे दोन रूपांचा. लास्य आणि तांडव, ललित आणि भीषण. म्हणूनच भावही दोन : भावुक आणि भीषण. प्रवृत्तीही दोनच : क्रिया आणि प्रतिक्रिया. स्थायीभावही म्हणून दोनच : रती आणि विरती. स्वातंत्र्यवीरांनीही म्हणूनच कवितेची रूपे मानलीत ती दोनच : मधुर आणि भयंकर."

'मूर्ति दुजीचि! मूर्ति मधुर ना परंतु भयंकरा
दावि ती मला'
कारण की, 'मूर्ती तिच्या असती दोन'

कवितेच्या मानलेल्या या भयंकरा मूर्तीने प्रतिकूल परिस्थितीत सावरकरांना धैर्याचा पुरवठा केला होता. म्हणूनच 'श्रीबंदावीर' या कवितेत सावरकरांनी म्हटले आहे–

'त्या सुरात कविते। तनुतंतुवाद्य हे
माझेही बांधा: राग तो निराश गा, धैर्याच्या परम तशा:'

प्रसंगी धैर्याचा पुरवठा करणारी कवितेची दुजी मूर्ती भयंकरा असली तरी तिचे दुसरे रूप अतिशय मधुर आहे असे सावरकर सांगतात. आणि त्या मधुर रूपाचे वर्णन करताना ते लिहितात–

'भावनांसि मोहन घालून ती करी
लोण्याहुनि कोमलशा–कोमला अशा
की जाव्या चांदण्यामधेहि वितळुनी।'

–कवितेचे हे सौंदर्य सावरकरांना विशेष जाणवले, ते तिच्यातून व्यक्त होणाऱ्या तत्त्वज्ञानामुळे! सावरकरांची काव्यसृष्टी जशी त्यांच्या ध्येयवादाने

विकसित झाली आहे, तशीच ती त्यांच्या तत्त्वज्ञानावर परिपुष्ट झाली आहे. आपले जीवनविषयक तत्त्वचिंतन कविताबद्ध करण्याच्या मुख्य हेतूने सावरकरांनी काव्य लिहिले. पण त्या मुख्य हेतूच्या ओघाने उत्कृष्ट काव्यनिर्मिती हा प्रसंगोपात लाभ सावरकरांना झाला. म्हणूनच त्यांच्या तत्त्वचिंतनपर कवितांचा विचार करताना श्री. दा. ना. आपटे यांनी म्हटले आहे, "आपले जीवनतत्त्व व्यक्त करण्यासाठी सावरकरांनी केवळ वृत्ताचा आश्रय केला आहे. त्यात उत्तम काव्य आढळले हे त्याचे आनुषंगिक फळ आहे."

कविता व तत्त्वज्ञान यात यत्किंचितही विरोध नाही असे सावरकरांना वाटे. सौंदर्यनिर्मिती व सत्यदर्शन हा एकच हेतू दोघांचा आहे अशी त्यांची धारणा होती. 'कविता आणि तत्त्वज्ञान' या उताऱ्यातील सावरकरांचे पुढील विचार या दृष्टीने चिंतनीय आहेत. सावरकर लिहितात.–

"योगवाशिष्ठही एकदा सहज घेतले. तो त्याची गोडी इतकी लागली की, वेदान्तावर झालेल्या आमच्या अवलोकनात आलेल्या ग्रंथात असा सुंदर ग्रंथ विरळा असे वाटू लागले... तत्त्व आणि कविता यांची सांगड संस्कृत कवीच घालू शकतात. भगवद्गीतेचा विश्वदर्शनाचा अध्याय पाहा; किंवा कालिदासाच्या काव्यातील विष्णुवर्णनाचे श्लोक किंवा कुमारसंभवातील–

'स्वयं विधाता तपसा फलानाम् ।
केनापि कायेन तपश्चचार ।।'

अशी, आकाशासारख्या अनाकलनीय व्यापक अर्थाला एखाद्या सुंदर सरोवरासारख्या श्लोकात चटकन प्रतिबिंबित करणारी सरस वचने पाहा. आणि खरोखरच कवितेचा आणि तत्त्वाचा विरोध असणेच अशक्य आहे. कविता सौन्दर्यास भुललेली; आणि सौन्दर्य तेच की, जे, निरपवाद परिपूर्ण आनंद देते, तेच सत्य ! इंद्रिय, मन, बुद्धी यांच्या विरोधास लवलेश वाव न उरू देता जे शंकाकुल आत्म्यास एकाएकी निःसंशय आणि संपूर्ण समाधानात डोलविते ते सत्य, तेच समाधान– समाधीचे सौन्दर्य."

सावरकरांचे कवितेच्या सौन्दर्याबद्दलचे हे विचार वाचले की स्मरण होते आंग्ल कवी कीटस् याच्या एका उदगाराचे. कीटस्‌ने म्हटले आहे, Beauty is Truth, Truth is Beauty' पी. जे. हेले या टीकाकारानेही सत्य आणि सौन्दर्य यांचे दर्शन काव्यातून घडविणाऱ्या कवींचे वर्णन पुढील शब्दांत केले आहे– 'Poets are all who love, who feel great truths and tell them."

'**मरणोन्मुख शय्येवर**' या सावरकरांच्या कवितेची बैठकच मुळी विश्वात्मक आणि विश्वमानव्य जपणाऱ्या एका तत्त्वज्ञ कवीची आहे. 'जीवन हे जीवो जीवी समसंवेदन झालेले असते. केवळ सहानुभूतीने ते जगून पाहा,' हा

विचार सावरकरांच्या या चिंतनाचा गाभा आहे. एका तत्त्वज्ञ कविमनातून काव्य-निर्मितीच्या पार्श्वभूमीवर घडलेला तो एक मनोव्यापार आहे. काव्यनिर्मितीची ती एक वैचारिक प्रक्रिया आहे. तत्त्वज्ञ महाकवीच्या मनाचा तो एक आविष्कार आहे. कोलरिज याने श्रेष्ठ कवी आणि तत्त्वज्ञ यांच्यातील साम्य वर्णन करताना म्हटले आहे– " No man was ever yet a great poet without being at the same time a profound philosopher." सावरकरांनी 'मरणोन्मुख शय्येवरी 'ल केलेल्या चिंतनातून त्यांच्यातील कवी आणि तत्त्वज्ञ यांचे एकत्रित दर्शन घडते आणि त्यांनी केलेली साहित्यविषयक तात्त्विक चर्चा एका श्रेष्ठ तत्त्वज्ञ कवीची काव्यनिर्मितीमागील प्रक्रिया प्रकट करते.

सावरकरांच्या साहित्यविषयक चिंतनातून स्फुरलेल्या विचाराची एक दृश्य परिणती म्हणजे त्यांनी केलेल्या 'वैनायक वृत्ता'ची रचना होय. अंदमानाच्या बंदिशालेत असतानाच या नवीन वृत्तरचनेचे विचार त्यांच्या मनात स्थिर झाले होते. या वृत्ताची निर्मिती करण्यापूर्वी मोरोपंत–वामनादी कवींनी वापरलेल्या पुढील वृत्तांचा व काही इतर जातिवृत्तांचा उपयोग सावरकरांनी आपल्या अनेक कवितांतून केला होता, हरिभगिनी ( 'स्वदेशीचा फटका' ), चंद्रकांत, ( 'स्वतंत्रतेचे स्तोत्र' ), आर्या ( 'गोदावकिली' ), परिलीना ( 'शिवाजी महाराजांची आरती ), अक्रूर ( 'सागरास' ), सुंदर यादव ( जगन्नाथाचा रथोत्सव' ), भूपती ('हिंदुनृसिंह'), वसंत तिलका ('माझे मृत्युपत्र'), मंदाक्रांता ('आकांक्षा'), शार्दूल विक्रीडित ('वृषोक्ती'), 'चामर' ('आत्मबल') ही वृत्ते त्यांनी उपयोजिली होती.

–परंतु प्रतिभावान कवींना रूढ शब्द आणि रूढ वृत्ते यांची बंधने जेव्हा अडचणीची वाटू लागतात, तेव्हा नवे शब्दप्रयोग आणि नवी वृत्तरचना यांचा अवलंब ते करतात. 'अशी असावी कविता म्हणून ! तशी असावी कविता फिरून ! सांगावया कोण तुम्ही कवीला, आहांत मोठे, पुसतो तुम्हांला' ? असा बंडखोर प्रश्न हे कवी विचारू लागतात. आणि मग 'कवीस सोडा कवितेबरोबरी' अशी मुक्त स्वातंत्र्याची मागणी ते करतात.

सावरकरांच्या बाबतीत असेच घडले. त्यांना प्रथम जाणवले ते दुर्लक्षित अशा प्राचीन अनुष्टुभ छंदाचे सामर्थ्य. 'रामायण–महाभारतासारखी महाकाव्ये ज्यात गाइली जाऊ शकतात आणि गीतेसारखे तत्त्वज्ञानही सुव्यक्त होऊ शकते, त्या अनुष्टुभाची अगदी विचारपूस करणेसुद्धा सोडून देणे ही हानिकारक निर्दयता मराठीस लांछनास्पद आहे,' अशी तीव्र जाणीव त्यांना झाली. आणि यातूनच मराठीच्या वृत्तसमृद्धीचा विचार त्यांच्या मनात अधिकाधिक स्थिर होऊ लागला. अंदमानात त्यांनी जे ग्रंथ वाचले त्यांत जुन्या बंगालीतील आपल्या रामविजया-

प्रमाणे असलेल्या 'पायरा' वृत्तातील रामायण-भारतादी ग्रंथही त्यांनी वाचले. हे ग्रंथ वाचल्यावर सावरकरांच्या मनात मराठीत नवे वृत्त निर्माण करण्याची इच्छा निर्माण झाली. आपल्या मनातील याबाबतचे विचार व्यक्त करताना सावरकरांनी लिहिले आहे, "मेघनादवध कुरुक्षेत्र इत्यादी मधुसुदनदत्ताचे ग्रंथ वाचूनच इंग्रजीतील निर्यमक (Blank verse) वृत्ताप्रमाणे जसे त्याने बंगाली अमित्राक्षर वृत्त केले, तसेच मराठी वृत्ताच्या अधिक शास्त्रशुद्ध वृत्तोस जुळेल असे मराठीत एक वृत्त असावे अशी आम्हास इच्छा झाली. तोच प्रयत्न 'गोमांतक'तील 'वैनायकवृत्ता'त परिणमित झाला आहे."

सावरकरांनी 'वैनायक वृत्ता'ची रचना करून त्यातून आपल्या काव्य-सरितेचा प्रवाह वाहावा असा हेतुपूर्वक प्रयत्न का केला ? त्याचे उत्तर त्यांच्या प्रतिभेच्या स्वरूपात आहे, त्यांच्या कवितेतील आशयात आहे, काव्यरचना पद्धती-बद्दल त्यांनी केलेल्या चिंतनात आहे. 'वैनायकवृत्ता'ची जी प्रमुख लक्षणे सावर-करांनी सांगितली आहेत, ती पाहाता, सावरकरांना या वृत्ताची निर्मिती का करावी लागली, याची कल्पना येते. सावरकरांनी दिलेली कारणे थोडक्यात अशी—

(१) वैनायक वृत्तास दोन वा चार वा दहा चरणान्तीच विराम असावा असे बंधन नाही. त्यामुळे विशाल विचार संपेतो विराम लांबविता येतो. अनेक लहान उपवाक्यांनी गुंफलेली वक्तृत्वपूर्ण दीर्घ वाक्ये, त्यांची गोड गुंफण वा गंभीर प्रवाह फारसा खंड पडू न देता, त्यात साधता येतात. (२) सयमकता हा जो बहुतेक मराठी वृत्तांचा निरपवाद नियम, तो ह्या वृत्तास केवळ विकल्पाने लागू आहे... (३) हे वृत्त गेय नसून पाठ्य, वाच्य आहे. प्रवाही, भरदार, वक्तृत्वशील अशा भावभावनांच्या गुंफणीचा काव्यबंध एकसूरीपणा आणि त्रुटितपणा टाळून रचावयाची सोय या वैनायक वृत्तात त्यातल्या त्यात अधिक होत असल्यामुळे अशा वेळी यथारूची या वृत्तास अवलंबावे. (४) हे वृत्त पाठ्य असल्यामुळे गद्याप्रमाणे आवेश, उद्वेग प्रभृतीचे रसानुसारी ध्वनी इतर गेय वृत्तापेक्षा अधिक सहज त्वरेने बदलून त्या वृत्तात ताल संभाळूनही व्यक्तविता येतात. (५) या वृत्तात इतर वृत्तापेक्षा कथाप्रवाह अधिक वेगाने व डौलाने वाहात जातो व म्हणून वीररसात्मक व गंभीर प्रवचनात्मक विचारांस इतर लहान लहान वृत्तात तुटक तुटक स्वरूप मिळाल्याने जो एक त्यातील आवेगाचा व वेगाचा खंड पडतो तो पडत नसल्याने ह्या वृत्तात गद्यातील वाग्गतिवैचित्र्यास काव्यातील तालबद्धतेच्या मंजुळतेची जोड मिळते.

आपल्या या वृत्तरचनेवर मिल्टनच्या 'Blank verse'चा परिणाम झाल्याचे स्वत: सावरकरांनीच ध्वनित केले आहे. वक्तृत्वपूर्ण कथन वा वर्णन हा सावरकरी काव्याचा आत्मा असल्यामुळे ओघवती व धावती रचना ज्या वृत्तात शक्य आहे,

असे ' वैनायक ' वृत्तच सावरकरांना अनुकूल वाटले. असे हे दीर्घकाव्यातील रचनाविलास सावरकरी प्रतिभेचे खरे प्रतिनिधी होत.

' वैनायक ' वृत्ताची चाल ' धवलचंद्रिका ' या जुन्याच वृत्ताची असल्याचे मत काही टीकाकारांनी व्यक्त केले असले तरी आपल्या काव्याच्या प्रकृतीला, त्या काव्यातील आवेशपूर्ण वक्तृत्वगुणाला परिणामकारकपणे प्रवाहित करील असे वृत्त शोधण्याचे, त्याचे नवे नामकरण करण्याचे व त्याचा यशस्वी वापर करण्याचे जे कार्य सावरकरांनी केले आहे, त्याच्यामागे त्यांचे साहित्यविषयक चिंतन दिसून येते. डॉ. स. ग. मालशे यांनी म्हटल्याप्रमाणे ' वैनायक वृत्त ' हे नाव देताना व या वृत्तात कविता रचताना ' निर्यमक धवलचंद्रिका ' या जातिवृत्ताची जाणीवही सावरकरांना नव्हती. आणि म्हणूनच ' वैनायक वृत्ता 'ची रचना ही सावरकरांच्या चिंतनशीलतेचाच एक दृश्य परिपाक मानावा लागेल.

सावरकरांना ललित वाङ्मयाच्या सामर्थ्याची जाणीव पूर्णपणे होती. याच जाणिवेतून त्यांनी आपल्या धाकट्या बंधूंना– नारायणराव सावरकरांना– अंदमानमधून पाठविलेल्या एका पत्रातून लिहिले होते, " आपल्या सामाजिक चालीरीतीत ही जातिभेदाची पद्धती म्हणजे हिंदुस्थानला मिळालेला महाशाप आहे, तिच्यामुळे हिंदुजीवनाचा प्रबळ प्रवाह वाळवंटात आणि डबक्यात मुरू पाहातो आहे...शेंड्याबुडख्यासकट त्याचे उच्चाटन केले पाहिजे. हे साधावयाचा उत्तम मार्ग म्हणजे सर्व प्रकारच्या वाङ्मयातून आणि मुख्यतः नाटके आणि कादंबऱ्या ह्यांच्यातून त्यांच्यावर शस्त्र धरावे."

सावरकरांनी ज्या दोन कादंबऱ्या लिहिल्या (' काळे पाणी ' व ' मला काय त्याचे ?') त्यांत हिंदूंवरील अत्याचार, अपहृत स्त्रियांचा प्रश्न, हिंदुधर्मातील दुष्ट चालीरीती इत्यादी प्रश्न कथानकाच्या माध्यमातून त्यांनी चर्चिले आहेतच. तथापि आपल्या नाटकांतून या प्रश्नांना त्यांनी प्रभावी नाट्यरूप देण्याचा प्रयत्न केला आहे. नाटकाकडे पाहाण्याचा सावरकरांचा दृष्टिकोन ध्येयवादी स्वरूपाचा होता. नाटकांचे विषय, पात्रांचे स्वभावविशेष, पात्रांचे संवाद, कथानकातील प्रसंग इत्यादी सर्वांमधून त्यांचा हा ध्येयवादी दृष्टिकोन दिसून येतो. नाट्यवाङ्मय हे समाजाला ध्येयाकडे नेणारे एक उपयुक्त साधन आहे, हा विचार सावरकरांनी आपल्या पहिल्याच नाटकात ' उःशाप 'मध्ये– व्यक्त केला आहे. त्या नाटकातील नांदीच्या पहिल्याच प्रवेशात सूत्रधार म्हणतो, " समाजाला मंगलास्पद असणाऱ्या ध्येयाकडे प्रवृत्त करायला नाट्यकला– जर ती उदात्ताशी समरस होईल तर– एक अत्यंत उपयुक्त साधन आहे."

नाट्यवाङ्मयासंबंधी सावरकरांनी आपली मते जाहीररीत्या पुन्हा प्रकट

केली ती १९४३ मध्ये सांगली येथे भरलेल्या मराठी रंगभूमीच्या शतसांवत्सरिक महोत्सवाच्या अध्यक्षपदावरून. यावेळी केलेल्या भाषणातून नाट्यविषयक दोन प्रमुख सिद्धांत सावरकरांनी सांगितले. ते म्हणाले– “ संसार कसा असावा हेही नाटकाने दाखविले पाहिजे. केवळ आनंदनिर्मिती हे नाटकाचे कार्य नाही. स्वातंत्र्य-संपादनार्थ आज सर्व शक्ती केंद्रित झाल्या पाहिजेत. म्हणून बंदुका घेण्यास शिकविणारी नाटके लिहावीत.” सावरकरांचा नाट्यवाङ्मयाकडे पाहाण्याचा हा दृष्टिकोन कलावंतापेक्षा विचारवंताचा होता. या ध्येयवादी दृष्टिकोनामुळेच ‘संसार कसा असावा हेही नाटकाने दाखविले पाहिजे’ असे ते आग्रहाने सांगत. ‘Drama is a copy of life, a mirror of customs, a reflection of truth’ ही सिसिरो किंवा एमिल झोला यांची व्याख्या त्यांना संपूर्णपणे अमान्य होती.

काव्य, कथा-कादंबरी, नाट्य इत्यादी रसनिष्ठ (किंवा ललित) वाङ्मया-बाबत, त्या वाङ्मयाच्या हेतूबाबत, सावरकरांनी केलेले चिंतन परिस्थितीसापेक्ष होते. परतंत्र भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीचा विचार या चिंतनापासून त्यांनी कधीच वेगळा मानला नाही. स्वतंत्र भारतात ते जन्माला आले असते तर त्यांचे साहित्य-विषयक विचार सध्या आहेत त्यापेक्षा वेगळे झाले असते असे त्यांनीच एका व्याख्यानातून सूचित केले होते. १९३७ साली बडोदे साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष-पदावरून भाषण करताना ते म्हणाले होते, “ साहित्य हे राष्ट्राच्या बुद्धीचे, सामर्थ्याचे, शौर्याचे प्रतीक आहे अशी माझी भावना आहे. मी स्वतंत्र्य हिंदुस्थानात जन्माला आलो असतो किंवा पेशवाईत जन्माला आलो असतो, तर माझ्या साहित्याच्या कल्पनेचा अर्थ तुम्हांस अधिक पटवून देता आला असता.”

सावरकरांच्या वरील उद्‌गारावरून हे स्पष्ट होते की, ते साहित्याचा जो विचार करीत तो राष्ट्रजीवनाच्या व राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या संदर्भात करीत असत. केवळ आनंदनिर्मिती किंवा कलाविलास हे ध्येय त्यांना मान्य नव्हते. साहित्याचे ध्येय काय असावे याचा विचार ते मुख्यत: दोन पातळ्यांवरून करीत होते. मानवहित आणि राष्ट्रहित ह्या श्रेष्ठ साहित्याच्या कसोट्या ते मानीत होते. हिंदुत्वातीत होऊन मानवहिताच्या दृष्टीने ते जेव्हा विचार करीत, तेव्हा श्रेष्ठ साहित्याची व्याख्या ते पुढीलप्रमाणे करीत, ‘मनुष्यजातीच्या अधिकात अधिक हितास साधण्यासाठी जे झटेल तेच साहित्य श्रेष्ठ, तेच सुप्रासंगिक.’ परंतु मानवहिताचा विचार राष्ट्रीय स्वातंत्र्याशिवाय होऊ शकत नाही ही सावरकरांची भूमिका येथेही कायम होती. ‘अखिल मानवाचे परमकल्याण व्हावे म्हणून भारताला राष्ट्रीय स्वतंत्रता हवी आहे.’ ही राजकीय क्षेत्रातील सावरकरांची विचारप्रणाली साहित्यिक क्षेत्रातही सुनिश्चित होती. ‘साहित्य हे राष्ट्रीय जीवनाचे एक उपांगच असल्याने, राष्ट्राचे जे ध्येय तेच साहित्याचे ध्येय असले पाहिजे’, असे ठाम मत ते

प्रतिपादीत. मानवहिताच्या पहिल्या पातळीवरून राष्ट्रहिताच्या दुसऱ्या पातळीवर ते उतरत असत; आणि राष्ट्रहिताच्या पातळीवर उतरल्यानंतरही ते साहित्याचा विचार परिस्थितिसापेक्ष करीत. पारतंत्र्याच्या काळात साहित्याचे स्थान दुय्यम किंवा तिय्यम दर्जाचे असावे असा त्यांच्या विवेचनाचा रोख असे. 'महाराष्ट्र साहित्य संमेलना'च्या अध्यक्षपदावरून त्यांनी जे साहित्यविषयक प्रकट चिंतन केले, त्यात त्यांनी पुढील काही महत्त्वाचे विषय मतप्रतिपादनार्थ निवडले होते. १) मराठी भाषा इंग्रजी भाषेप्रमाणे संपन्न करावयाची असेल तर त्या भाषेतील क्रियापद-दारिद्र्य नाहीसे केले पाहिजे; वाक्यरचनेत आटोपशीरपणा आणला पाहिजे. तिच्यात ठसकेबाजपणा येईल अशी तिची मोडणी केली पाहिजे. २) नागरी लिपी मुद्रणक्षमतेत व शिक्षणसुलभतेत इंग्रजीहून वरचढ करावयाची असेल तर तिच्या लिपीत सुधारणा करावयास हवी. नागरी लिपी हीच राष्ट्रीय लिपी होणार असल्याने लिपिसुधारणा ही राष्ट्रीय सुधारणा म्हणून ती अमलात आणली पाहिजे. ३) मराठी भाषेवर दोन परकीय भाषांचे– उर्दूचे आणि इंग्रजीचे– आक्रमण चालू आहे. म्हणून स्वाभिमानाच्या दृष्टीने अगदी अनावश्यक परकीय शब्द तरी स्वभाषेत घुसवू नका असे सूत्र– भाषाशुद्धिवाद्यांनी स्वीकारावयास हवे.

भाषाशुद्धीच्या संदर्भात, शिवाजीमहाराजांनी सिद्ध केलेल्या 'राज्य व्यवहार कोशा'चा सावरकरांनी गौरव केला आहे. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर, कै. माधवराव पटवर्धन यांनी केलेल्या भाषाशुद्धीच्या कार्याचे महत्त्व सावरकरांनी स्पष्ट करून सांगितले आहे. तथापि कै. प्रा. श्री. के. क्षीरसागर यांनी सावरकरांना 'भाषाशुद्धीचे खरे वैरी' असे संबोधून 'शुद्धीवाल्यांनी मराठीचे सौंदर्य फार धोक्यात आणले आहे' अशी प्रखर टीका केली आहे. प्रा. क्षीरसागर यांनी बडोदे येथे झालेल्या चौदाव्या वाङ्मय परिषदेच्या अध्यक्ष स्थानावरून भाषण करताना भाषाशुद्धीच्या चळवळीच्या पुरस्कर्त्यांच्या विचारातील दोषांचे दिग्दर्शन केले होते. प्रा. क्षीरसागर यांच्या विचारांचा आशय असा होता की, भाषाशुद्धीच्या आग्रहामुळे अनधिकारी व्यक्तींनाही शब्दनिर्मितीची सनद मिळाली आहे. आणि त्यामुळे शब्दांची शुद्ध रूपे आणि शुद्ध उच्चार यांची हानी झाली आहे. प्रा. क्षीरसागरांनी घेतलेल्या आक्षेपांचे खंडन करण्यासाठी सावरकरांनी 'प्रा. क्षीरसागर आणि भाषाशुद्धी' हा लेख लिहिला आहे. या लेखात सावरकरांनी भाषाशुद्धीची जी मूलसूत्रे सांगितली आहेत, ती या विषयावरील त्यांच्या चिंतनाची उत्कृष्ट साक्ष होत. सावरकरांनी भाषाशुद्धिविषयक केलेल्या या चिंतनाला 'राष्ट्रीय स्वाभिमान व स्वभाषेची प्रतिष्ठा' यांचे अधिष्ठान होते. याच भूमिकेतून लिहिताना सावरकरांनी म्हटले आहे, "परकीयांनी तलवारीचे बळावर आमच्यावर जी परराज्ये स्थापिली त्या दुःखद आणि अवश काळात– आमच्या भाषेतही परदास्याचा परिणाम म्हणून

घुसलेल्या या दास्यशीलतेच्या सूक्ष्म रोगाणूंना, आमच्या मनोभूमीत परशत्रूंनी उभारलेल्या या आमच्या पराभवाच्या सूक्ष्म स्मारकांना, त्या अनावश्यक इंग्रजी, उर्दू शब्दांना– आज आमचाही दिवस उगवला असता, ती विधर्मीय आणि विराष्ट्रीय राज्यसत्ता आज आम्ही उखडून टाकली असता, ह्या अनावश्यक परकीय शब्दांनाही का उखडून टाकू नये ? आपले स्वकीय शब्द का वापरू नयेत ? निदान तसे कोणी वापरले तर त्यात वावगे काय आहे ?...अशाच वीरोचित भावनेने शिवछत्रपतींनी राज्यव्यवहारकोश लिहविला, त्याच वीरोचित भावनेने प्रेरित होऊन आमच्या राष्ट्रभाषेचे साहित्यमंदिर संस्कृतनिष्ठतेच्या बळकट नि पवित्र पायावर उभारावयास हवे."

सावरकर आणि क्षीरसागर यांचे भाषेकडे पाहण्याचे दृष्टिकोन भिन्न होते हे वरील विवेचनावरून ध्यानी येईल. सावरकरांच्या राष्ट्रीय वृत्तीला भाषेचा संबंध हा राष्ट्र व धर्म यांच्याशी अत्यंत एकरूपतेचा आणि स्वातंत्र्य व स्वाभिमान यांच्याशी निगडित वाटत होता. या उलट, भाषाशुद्धीचा प्रश्न हा जातिद्वेष अथवा अभिनिवेशाचा प्रश्न नसून तो 'तारतम्य, उपयुक्तता व भाषासौष्ठव' या तत्त्वांशीच प्राधान्याने संबंधित आहे, असे प्रा. क्षीरसागर यांना वाटत होते. भाषाशुद्धीच्या चळवळीकडे पाहण्याची क्षीरसागरांची दृष्टी मुख्यत: सौंदर्यनिष्ठ होती. हिंदुत्ववादी सावरकर भाषासौष्ठवापेक्षा तो शब्द स्वदेशी आहे काय आणि तोही हिंदुभाषोद्भव आहे काय, हे प्रामुख्याने पाहत होते. तथापि सावरकरांनी आपल्या या मूळच्या आग्रही भूमिकेला पुढे व्यवहारी व तडजोडीची बैठक दिली. आणि परकीय शब्दांना स्वत: सुचविलेल्या प्रतिशब्दांबद्दल त्यांनी असे म्हटले की, 'जर कोणास (आम्ही) दिलेल्या प्रतिशब्दाहून अधिक सुटसुटीत, परिचित आणि यथार्थ प्रतिशब्द सुचले, तर अर्थातच ते आम्हीही आनंदाने स्वीकारू," या उद्‌गारावरून असे दिसून येते की, सावरकरांच्या भूमिकेत स्वकीय शब्दांचा आग्रह होता; पण स्वनिर्मित शब्दांचाच दुराग्रह नव्हता.

मुंबई येथील मराठी साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षपदावरून भाषण करताना सावरकरांनी बहुचर्चित अशा काही साहित्यिक प्रश्नावरही आपले विचार व्यक्त केले आहेत. साहित्याच्या उपपत्तीबद्दल जे अनेक सिद्धान्त आज चर्चिले जात आहेत त्यांत साम्यवादी उपपत्ती व काम्यवादी उपपत्ती यांवर साहित्यसमीक्षकांत अनेक उलटसुलट विचारप्रवाह दिसून येतात. यासंबंधी सावरकरांचे मत सुस्पष्ट होते; आणि समतोलही होते. साहित्य हे केवळ अर्थशास्त्राचा वा कामशास्त्राचा प्रपंच नाही असे स्पष्ट करून सावरकरांनी सांगितले आहे– "यच्चावत साहित्याची मुळे भांडवलसत्ता नि श्रमिकसत्ता यांच्या विरोधात वा सुप्त नि जागृत कामवासनातच काय ती रुतलेली असतात असा सिद्धांत जर कोणी मांडू लागला, तर तो मात्र

एकांगी नि एककल्ली ठरल्यावाचून राहाणार नाही. मनुष्य म्हणजे काही त्याचे पोट नव्हे. त्याला अनेक इंद्रिये आहेत, एकच इंद्रिय नाही. त्या सर्व इंद्रियांची, त्यांच्या विषयांची नि त्यांच्या रसांची क्रिया-प्रतिक्रिया, विरोध, विकास मनुष्याच्या जीवनात साठविला जात आहे. तीच स्थिती त्याच कारणासाठी, त्याच्या साहित्यातही प्रतिबिंबित झाली. साऱ्या साहित्याच्या विकसनाची फोड केवळ धनवान नि निर्धन यांच्या किंवा उत्पादन साधनांच्या किंवा कामतृष्णेच्या दृष्टिकोनानेच तेवढी करता येणार नाही. यद्यपि त्या विधेयांचे (points चे) धागेदोरेही मनुष्याच्या जीवनात लांबवर विणलेले आहेत, तरी त्या एकेरी एकाच धाग्याने काही ते जीवन वा वाङमयीन व्यक्तीकरण जे साहित्य, हे विणलेले नाही."

वास्तव वाङमय आणि रसनिष्ठ वा ललित वाङमय यासंबंधी आपले विचार व्यक्त करताना सावरकरांनी पुरोगामी किंवा नवमतवादी वाङमयाचेही स्वागत केले आहे. हे स्वागत करण्यामागील आपला दृष्टिकोन स्पष्ट करताना सावरकरांनी म्हटले आहे– "कोणतीही गोष्ट केवळ नवीन आहे म्हणूनच ग्राह्य वा त्याज्य ठरत नाही. कोणतेही वाङमय नुसते पुरोगामी आहे म्हणूनच काही सत्य वा तथ्य ठरेलच, असे गृहीत धरता येत नाही. वास्तव वाङमयाचे जे साध्य ते सत्य वा तथ्य; त्याच्या कसोटीस ती नवमतवादी वा पुरोगामी मते कितपत उतरतात, कोणच्या तरी नव्या सत्यास वा तथ्यास ती आविष्कारित आहेत किंवा नाहीत, या प्रश्नावरच त्यांचा चांगुलपणा वा टाकाऊपणा ठरणारा आहे. पण ते ठरवायचे तर त्यांना त्यांचा पक्ष मांडू दिला पाहिजे... अनेक वेळा नवी मते ही उपद्व्यापक न ठरता जुन्या अपायकारक अंधारात घुसलेली प्रकाशाची नि आरोग्याची किरणेही ठरली आहेत... मागच्या अनेक अनुभवांवरून आपणां सर्वांनी हा धडा शिकला पाहिजे की, सत्यजिज्ञासेने वा तथ्य-प्रतिपादनाच्या हेतूने, जे मत कोणी प्रस्थापू पाहतो त्यास शक्य तो प्रतिबंध नसावा, लेखन वा उपदेश यांचे स्वातंत्र्य असावे."

–सावरकरांच्या साहित्यचिंतनाच्या कक्षा किती विस्तारित होत्या व पुरोगामी साहित्याबाबत ते कसे स्वागतशील होते हे त्यांच्या वरील विचारावरून ध्यानी येते.

सावरकर वृत्तीने कवी आणि कलावंत होते. महाकवी होण्याची महत्त्वाकांक्षा त्यांच्या बालसुलभ मनाने वयाच्या आठव्या-नवव्या वर्षापासून बाळगली होती. जीवनात कवितेचे मूल्य ते इतके श्रेष्ठ मानीत होते की आपणांस प्लेगने अचानक मृत्यू आल्यास आपली अंतिम इच्छा म्हणून आपल्या कविता प्रसिद्ध कराव्यात असे आपल्या वडिलांना सांगावयाचे त्यांनी ठरविले होते. अंदमानच्या कारागृहात पन्नास वर्षांची शिक्षा भोगण्यासाठी बंदिस्त झाल्यावर महाकाव्य रचण्याची सावरकरांची इच्छा पुन्हा प्रबळ झाली होती व महाकाव्य रचण्यात आयुष्याचे साफल्य

आहे असा विचार त्यांच्या मनाला धीर देऊन गेला होता. बंदिवासाच्या काळात मनाला वज्रशाली बनविण्यासाठी त्यांनी कवितेचीच कास धरली होती. ध्येयाच्या मागे धावताना सावरकरांनी क्वचित प्रसंगी कवितेचा त्याग केला– पण कवितेने– म्हणजेच त्यांच्या ठायीच्या प्रभावी काव्यवृत्तीने– त्यांचा कधीच त्याग केला नाही. म्हणूनच त्यांनी ' मूर्ती दुजी ती ' या कवितेत म्हटले होते–

' ना ! कविता निजभक्ता त्यागिना कधी
भक्त तिला त्यागो, ती त्यागिना तया.'

कवितेवर (आणि एकूणच साहित्यावर) इतके दृढ प्रेम करणारे सावरकर जेव्हा राष्ट्रीय जीवनात साहित्याला दुय्यम-तिय्यम स्थान देतात, तेव्हा त्यांचे साहित्यावरील प्रेम कमी कसाचे आहे, अशी शंका मनात येणे स्वाभाविक आहे. परंतु सावरकरांचा साहित्यविषयक ध्येयवाद हा परिस्थितीसापेक्ष होता. भारतीय पारतंत्र्याच्या संदर्भात ते स्वातंत्र्यप्राप्तीच्या प्रयत्नांना प्राधान्य देत होते. भारतीय स्वातंत्र्याच्या विचाराला त्यांनी आपल्या जीवनात अग्रक्रम दिलेला होता. स्वतंत्रता देवीचे स्तोत्र गाताना ' तुजसाठी मरण ते जनन । तुजवीण जनन ते मरण ' अशी आपली जीवनातील भूमिका स्पष्ट केली होती. म्हणून '**साहित्याचे ध्येय काय असावे ?**' या प्रश्नाला त्यांनी दिलेले उत्तर या संदर्भात अगदी सुस्पष्ट होते. सावरकरांच्या तत्संबंधीच्या विचारांचे संकलन थोडक्यात पुढीलप्रमाणे करता येईल. " सांगोपांग साहित्य हेही आपल्या आजच्या राष्ट्राच्या परिस्थितीत मला तरी दुय्यम-तिय्यम कर्तव्यच वाटत आहे... आनंद नि करमणूक ही मानवहितास काही प्रमाणात हितकारकच असल्यामुळे त्यांचाही अंतर्भाव योग्य त्या प्रमाणात (मानवहिताच्या) ध्येयात होतोच, पण केवळ करमणूक हे काही कर्तव्य नव्हे. घरात आई मरणांतिक वेदनांनी अंथरुणावर खिळली असता, जर एखादा बहक-लेला कलावंत बंगल्यात नायकिणीच्या नाचात रमू शकला तर त्यास कलावंत म्हटले तरी कुलदीपक काही म्हणता यावयाचे नाही... साहित्यासाठीसुद्धा आज साहित्याच्या पोथ्या गुंडाळून सैन्याच्या शिबिराकडे वळले पाहिजे. कारण जे राष्ट्र खुरटे, दुबळे, त्यांचे साहित्यिक खुरटे नि दुबळे असणार... युगधर्म ओळखून, शिवाजीने सरस्वतीच्या रक्षणार्थ सरस्वतीकडे काही काळ पाठ फिरवून शुंभ-निशुंभ-मर्दिनीचीच उपासना केली; लेखणी टाकून भवानी तलवार उचलली म्हणून तर आज महाराष्ट्र-सारस्वत असा काही पदार्थ जिवंत राहिला आहे... म्हणून आजच्या परिस्थितीत आमचे राष्ट्रीय साहित्य म्हणजे शस्त्रबळ, शास्त्रचर्चा नव्हे... मी आपणांस स्पष्ट सांगतो की, राष्ट्राच्या आजच्या परिस्थितीत साहित्याचे सापेक्ष महत्त्व तिय्यम आहे आणि तरुण पिढीचे पहिले कर्तव्य आहे सैनिकी शिक्षण... सरस्वतीचा एक उपासक या नात्याने मी तुम्हांला सांगतो की, आपल्या

तरुण पिढीने आता लेखणी मोडून टाकावी आणि बंदूक उचलावी."

साहित्यविषयक चिंतन करताना सावरकरांनी राष्ट्राच्या स्वातंत्र्याच्या संदर्भाला अधिक महत्त्व दिल्याने एका बाजूने त्या चिंतनाला एकारलेपणा आला आणि दुसऱ्या बाजूने त्यांच्या स्वतःच्या साहित्यनिर्मितीला मर्यादा पडल्या. साहित्य साधनेपेक्षा सामाजिक व राजकीय स्वरूपाच्या कार्यसाधनेला त्यांनी अधिक महत्त्व दिल्याने त्यांनी हाती घेतलेल्या साहित्यविषयक चळवळी जोम धरू शकल्या नाहीत; तथापि साहित्यविषयक चिंतनातून त्यांनी जो विचार दिला, जे नवीन प्रयोग केले, भाषाशुद्धी व लिपिशुद्धी यांसारख्या ज्या चळवळी उभ्या केल्या, त्या सर्वांचा मराठी सारस्वताच्या समृद्धीसाठी उपयोग झाला. 'माझ्या आठवणी' 'माझी जन्मठेप', 'पूर्वपीठिका' आणि 'शत्रूच्या शिबिरात' या त्यांनी लिहिलेल्या आत्मचरित्रपर ग्रंथांनी मराठीतील आत्मचरित्रग्रंथांचे दालन त्यातील साहित्यगुणांनी अत्यंत मनोवेधक तर झालेच, पण राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी लढलेल्या एका उभ्या पिढीचे जीवन त्यात प्रतिबिंबित झाले आहे. राष्ट्रीय उत्थानाच्या इतिहासाचा अज्ञात भाग त्यातून प्रकट झाला आहे. 'वैनायक वृत्ता'ची निर्मिती करून सावरकरांनी मराठी वृत्तरचना विचाराला एक नवी चालना दिली आहे. डॉ. ना. ग. जोशी यांना 'वैनायक वृत्त' हे नवीन वृत्त वाटण्याऐवजी सावरकर-संस्कारित वृत्त जरी वाटले, तरी सावरकरांनी 'मराठी कवितेच्या प्रांतात स्वच्छंद छंदाच्या नव्या कल्पनेचे प्रवर्तन' केले ही गोष्ट नाकारता येणार नाही. डॉ. माधवराव पटवर्धन यांनीही 'धवलचंद्रिका या वृत्ताला सावरकरांनी नवे महत्त्व प्राप्त करून दिल्याचे' मान्य केले आहे. सावरकरांची प्रतिभा महाकवीची होती हे सर्वच समीक्षकांनी मान्य केले आहे. डॉ. के. ना. वाटवे यांच्या मते तर सावरकर हे तांत्रिक व तात्त्विक या दोन्हीही गमकांची दृष्टी लक्षात घेता महाकवीच होते. महाकाव्यरचनेचा सावरकरांचा प्रयत्न जरी अपुरा असला तरी 'महाकाव्य न लिहिलेले महाकवी' असेच त्यांचे वर्णन करावयास हवे असा आपला स्पष्ट अभिप्राय श्री. वा. ना. देशपांडे यांनी दिला आहे. सावरकरांसारख्या 'प्रतिभासंपन्न महाकवीची कविताकृती श्रीमहाराष्ट्र शारदेला भूषणास्पद वाटण्यासारखीच आहे,' असे प्रा. भ. श्री. पंडित यांनी नमूद केले आहे. सावरकरांनी आपल्या आत्मचरित्रपर ग्रंथांनी व काव्याने मराठीतल्या अनुभवविश्वाची कक्षा रुंदावली आहे. मराठी कविता अनेक दृष्टींनी समृद्ध करून प्रगतीच्या दिशेने नेणारा, स्वतःच्या एका खास मार्गाने जाणारा कवी या दृष्टीने मराठी काव्यसृष्टीत सावरकरांनी स्वतंत्र स्थान मिळविले आहे.

सावरकरांनी भाषाशुद्धीचे जे आंदोलन केले, त्याचा परिणाम अल्प प्रमाणात का होईना, मराठी साहित्यावर झाल्याचे दिसून येते. भाषाशुद्धीच्या चळवळीने

भाषेची संपत्ती वाढली. भाषाशुद्धीचा अभिमान धरणारा आणि ती आचरणात आणून सोडणारा एक संघटित वर्ग लहानमोठ्या प्रमाणात महाराष्ट्रातील महत्त्वाच्या नगरांतून उत्पन्न झाला. मराठीतील जे जुने शब्द निष्कारण लुप्तप्राय होत चालले होते त्यांचे पुनरुज्जीवन करण्याचे कार्य सुरू झाले. कै. श्री. कृ. कोल्हटकर, कै. शिवरामपंत परांजपे, कै. वा. म. जोशी इत्यादी साहित्यिकांनी या चळवळीच्या परिणामाची योग्य दखल साहित्य-संमेलनाच्या व्यासपीठावरून घेतली आणि मुख्य म्हणजे चळवळीच्या यशापेक्षा या चळवळीने जी नवी दृष्टी दिली ती महत्त्वाची ठरली. ' शासन व्यवहार कोश ' हा महाराष्ट्र सरकारने प्रसिद्ध केलेला ग्रंथ भाषाशुद्धी चळवळीच्या संदर्भात अभ्यसनीय आहे.

सावरकरांच्या लिपिशुद्धीच्या आंदोलनाचे यश तर आता राजमान्य झाले आहे. पूर्वीच्या मुंबई सरकारने लिपिशुद्धीच्या प्रश्नाचे महत्त्व लक्षात घेऊन १९४९ मध्ये काकासाहेब कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली जी समिती नेमली होती तिने सावरकरांनी पुरस्कारिलेल्या लिपिसुधारणेच्या सूचनांपैकी तीन चतुर्थांश सुधारणा ग्राह्य धरल्या आहेत. लिपीमध्ये ' अ ' ची बाराखडी ही, शिक्षणसुलभता आणि मुद्रणसुलभता या दृष्टीने स्वीकारली गेली आहे.

सावरकरांनी जे साहित्यचिंतन केले, ते तात्त्विक स्वरूपात व बौद्धिक चर्चेच्या रूपाने सलगपणे असे त्यांनी कधी प्रकट केले नाही, याचे एक कारण म्हणजे अशा तात्त्विक चर्चेवर त्यांचा विश्वास नव्हता. मुंबईच्या मराठी साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना आपले साहित्यविषयक विचार तोंडी मांडणे संमेलनाच्या रीतिरिवाजाला धरून होणार नाही म्हणून त्यांनी आपले साहित्यविषयक विचार निबंधरूपाने एकत्रित गुंफले. बडोदे व नागपूर येथील साहित्यसंमेलनांतून त्यांनी आयत्या वेळाची भाषणेच केली होती– परंतु मुंबईच्या साहित्यसंमेलनाच्या वेळी त्यांना आपल्या साहित्यविचाराला निबंधात ग्रंथित करावे लागले. म्हणून त्यांचे साहित्यविषयक विचार आज त्रोटक स्वरूपात का होईना, पण उपलब्ध आहेत. हे विचार तात्त्विक स्वरूपात आपण यापूर्वी का व्यक्त केले नाहीत याचे कारणही सावरकरांनी सांगितले आहे. सावरकर लिहितात, "साहित्याविषयीही तात्त्विक चर्चेचा उपयोग आहेच आहे, यासंबंधी माझे दुमत नाही. साहित्यविषयक तात्त्विक प्रश्नासंबंधी माझीही काही मते आहेत. अशी केवळ बौद्धिक करमणूक मलाही आवडते. परंतु, केवळ अशा तात्त्विक नि केवळ बौद्धिक काथ्याकुटीत रुतून बसल्यामुळेच आपण क्रियादुर्बल होऊन पडलो आहोत, आपली भौतिक राज्ये गमावून बसलो आहोत, याचे शल्य माझ्या हृदयात सारखे बोचत आहे..." सावरकरांनी आपल्या या सर्व विवेचनात– अकबर, औरंगजेब, अल्लाउदिन व मलिकंबर यांनी आपल्या राष्ट्रावर आक्रमण केले तेव्हा तत्त्वचर्चा कमी पडली म्हणून आपण पराभूत झालो

नाही, तर आपली कृतिप्रवणता, आपली कार्यशक्ती दुबळी ठरली म्हणून आपण जिंकले गेलो असे सांगितले आहे; आणि शेवटी निष्कर्षरूपाने असे म्हटले आहे की, 'आपल्या लोकांत एकंदरीत मुरलेली ही कृतिदुर्बलता आणि केवळ बौद्धिक चर्वितचर्वणाचे व्यसन नाहीसे झाल्यावाचून, आपल्या राष्ट्रीय पुनरुत्थानार्थ अवश्य असलेल्या कार्याचा उठाव होणार नाही अशी माझी कटुतम अनुभवाने निश्चिती पटलेली आहे."

सावरकरांच्या या भूमिकेमुळे त्यांनी साहित्यविषयक म्हणून जी तात्त्विक चर्चा केली, तिचा पाया राष्ट्रीय पुनरुत्थान हाच होता. परंतु त्या चर्चेच्या अनुषंगाने त्यांनी जे साहित्यचिंतन केले ते किती विविध स्वरूपाचे होते याची कल्पना आतापर्यंतच्या विवेचनावरून येईल. खरे पाहता त्यांच्या ठायी सृजनशील साहित्यिकाचे अनेक गुण असूनही त्यांनी आपली सर्व लेखनकला प्रचारासाठी राबविली. 'सध्याच्या हिंदुस्थानच्या परिस्थितीत माझे साहित्य हे केवळ प्रचारात्मक स्वरूपाचे आहे,' असे जेव्हा ते म्हणत, तेव्हा त्यांनी साहित्याच्या हेतूबद्दलची, प्रयोजनाबद्दलची आपली भूमिका सुस्पष्ट केली होती. साहित्याचे ध्येय केवळ रसिकांचे मनोरंजन करणे, त्यांना 'सविकल्प समाधी'चा आनंद प्राप्त करून देणे, त्यांना पुनःप्रत्ययाचा लाभ करून देणे एवढेच मर्यादित नसून, देशाच्या प्राप्त परिस्थितीत त्यांच्या ठायीची स्वातंत्र्यलालसा जागृत करून, राष्ट्रीय पुनरुत्थानाला त्यांना प्रवृत्त करणे, हे होय, असे त्यांचे सुनिश्चित मत होते. साहित्याच्या इतिहासात साहित्याच्या ध्येयाबद्दल अशी एका टोकाची, अत्याग्रहाची वाटणारी भूमिका घेणारे साहित्यकोविद निर्माण झाले नाहीत असे नाही. संतकवींच्या काळात तर साहित्यनिर्मितीच्या प्रमुख प्रेरणा आणि साहित्याचे प्रयोजन हरिकथानिरूपण हेच मानले जात होते. 'हरिविण अलवण कविता' असा संकेत सर्वत्र मान्य होता. ग्रंथनिर्मितीचा प्रधान हेतू 'अंती दावावा मुख्यार्थ' असाच होता. 'वाटे चरित्र त्यांचे आपण काही तरावया गावे' असा एकमेव पारमार्थिक हेतू दृष्टीसमोर ठेवून काव्यरचना केली जात होती. 'भक्तिवीण कवित्व ते जाणावे ठोंबे मत' असा निर्वाळा संतकवी देत होते. कवित्वाला व रसिकत्वाला परतत्त्वाचा स्पर्श झाल्याशिवाय काव्याला काव्यपण मिळूच शकत नव्हते. सावरकरांनी या अधिभौतिक प्रयोजनाला भौतिक ध्येयाची जोड परिस्थितपरत्वे दिली. त्यांच्या या भूमिकेबद्दल मतभेद जरूर असतील, पण त्यांनी साहित्याचे हे ध्येय साहित्यिकांपुढे ठेवून विचाराला चालना देण्याचे कार्य निश्चितपणे केले यात तरी दुमत नसावे. सावरकर संस्कृत साहित्यशास्त्राचे व अभिजात वाङमयाचे अभ्यासक होते. पण त्यांनी केलेली साहित्यचर्चा संस्कृत साहित्यशास्त्राच्या अभ्यासातून निर्माण झालेली नाही. साहित्यातील रसव्यवस्थेचा त्यांनी विचार केलेला नाही. वास्तव वा वस्तुनिष्ठ साहित्य

आणि रसनिष्ठ साहित्य असे साहित्याचे दोनच प्रमुख भाग ते करतात. वाङ्मया-नंद मीमांसा करण्यासाठी कोणत्याही उपपत्तींचे विवेचन त्यांनी केलेले नाही. आनंद नि करमणूक यांचा अंतर्भाव साहित्यात योग्य त्या प्रमाणात असावा, केवळ आनंद-निर्मिती हे साहित्याचे ध्येय असू नये असे ते आवर्जून सांगतात. कर्तव्यपूर्तीनंतर, देशासाठी शौर्य गाजविल्यानंतर फुरसतीच्या, सवडीच्या, स्वास्थ्याच्या वेळात आनंदप्राप्तीसाठी कलेचा आस्वाद घेण्याइतपतच मानवी जीवनात कलेचे स्थान असावे अशी त्यांची धारणा होती. समाजाला मंगलास्पद ध्येयाकडे नेण्याचे महत्त्वाचे कार्य करण्याची जबाबदारी कलेवर आहे, व त्या कार्यासाठी ती कला उदात्ताशी समरस झाली पाहिजे असे नाटयकलेच्या संदर्भात त्यांनी सांगितले आहे. कलावंत हा कलानिर्मितीचे नियम वा तंत्र समोर ठेवून कलानिर्मिती करीत नाही, तर त्याच्या सहजकृतीतून कला आकार घेत असते अशी विचारशलाका मधूनच त्यांच्या विवेचनात चमकते. या संदर्भात ते एकदा म्हणाले होते, "मी माझी. लेखणी लाठीसारखी फिरविली. लोकांना त्यात कला दिसली." तेव्हा कलेचा जन्म हा असा नेणिवेतून होतो, ती प्रयत्नसाध्य नसते असाही विचार ते क्वचित व्यक्त करीत.

अतएव, सावरकरांच्या सर्वच साहित्यचर्चेला सुगंध येत आहे तो स्वातंत्र्य-पुष्पाचा ! त्यांनी आपलं तनुतंतुवाद्य ज्या एकाच सुरात बांधले आहे, तो सूर आहे स्वतंत्रतेचा– जिच्या भोवती उत्तम, उदात्त, उन्नत, महन्मधुर असे जे जे सर्व सहचारी झाले आहे, अशा स्वतंत्रतेचा !

**प्र. ल. गावडे**

# लेखसंहिता

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३०३४
दा. क्र. २०९९३
निबंध जाधव
ग्रंथ, शाखा (स्थळ प्रत)

# १ : आत्मचरित्राचा साहित्यिक संदर्भ

(सावरकरांनी आत्मचरित्रपर चार ग्रंथ लिहिले. १० मे १९४९ रोजी 'माझ्या आठवणी' हा त्यांचा आत्मचरित्रपर ग्रंथ प्रसिद्धीच्या प्रकाशात आला. वीस वर्षांपूर्वी या ग्रंथाची काही प्रकरणे 'श्रद्धानंद' साप्ताहिकात प्रसिद्ध झाली होती. परंतु ब्रिटिश सरकारच्या वक्रदृष्टीमुळे पुढील प्रकरणे प्रकाशित होऊ शकली नाहीत. 'माझ्या आठवणी' या आत्मचरित्रात सावरकरांनी आपल्या जन्मापासून ते १९०२ पर्यंतच्या आठवणी समाविष्ट केल्या आहेत. 'माझी जन्मठेप' या ग्रंथात १९१० ते १९२४ पर्यंतचा अदमान, रत्नागिरी व येरवडा येथील कारावासाचा वृत्तान्त दिला आहे. १९५७ साली 'पूर्वपीठिका' या नावाने सावरकरांनी आत्मवृत्ताचा एक खंड प्रसिद्ध केला. १९६५ साली प्रसिद्ध झालेल्या 'शत्रूच्या शिबिरात' या आत्मचरित्रामध्ये सावरकरांनी इंग्लंडमधील निवास व त्यांच्या तेथील राजकीय चळवळी आणि वाचन–लेखन यांचे वर्णन केले आहे. 'माझ्या आठवणी' या ग्रंथाला सावरकरांनी लिहिलेली सखोल प्रस्तावना आत्मचरित्रपर लेखनामागील त्यांची वाङ्मयीन जाण किती समृद्ध होती, याची कल्पना करून देते.)

लिहू का ? हे जे सगळे इष्टमित्र आणि देशबंधू सांगताहेत आणि माझे मनही मधूनमधून जे लिहिण्याचा लकडा माझ्या मागे लावीत असते, त्या माझ्या आठवणी, ती माझी जीवनस्मृती लिहून टाकू का एकदाची ?

मनुष्यास किंवा समाजास स्मृती ही उपयुक्त असतेच असते. पण वास्तविक पाहता स्मृतीप्रमाणे विस्मृती हीही देवाची एक देणगीच आहे. मनुष्यास किंवा समाजास काही आठवणी स्मरत राहण्यापेक्षा विसरणेच हितावह असते. कित्येकांना या जन्माच्या आठवणी स्मरून पुरेसे न वाटल्यामुळे ते पूर्वजन्माच्या आठवणीही स्मराव्यात म्हणून योगसिद्धी साधण्यात गर्क झालेले असतात. परंतु खरे पाहता नुसत्या साऱ्या या जन्मातील झाडून आठवणी जरी आपल्याला सारख्या आठवत राहिल्या, तरी देखील तो बोजा झेपणे संज्ञ मनास (Conscious mind) दुःसह झाल्याविना राहणार नाही. मग असंज्ञ मनाच्या (Subconscious mind) सात वा सत्तर पूर्वजन्मांच्या स्मृती जर सतत दाटी करीत राहिल्या तर प्राणाचा कोण कोंडमारा होईल ! त्या सत्तर जन्मांतील सत्तर सख्ख्या आयांचे लाड, सावत्र आयांचे चोरचिमटे, खेळांतील वा संसारातील भंगलेल्या भातुकली वा हरवलेल्या बाहुल्या, पंतोजीच्या छड्या, डसलेले विंचू, फसलेल्या आशा, ते रोग, ते भोग, ते अपमान, ते मनोभंग, ती चिडचीड, त्या आठवणी पुन्हा पुन्हा आठवणे, विगत दुःखांचा कोळसा सारखा उगाळीत बसणे ! ! उपलब्ध साहित्यात आपल्या शेपन्नास पूर्वजन्मांच्या थोड्याबहुत जीवनस्मृती एका बुद्ध भगवानाने काय त्या टिपून ठेवल्या आहेत. तेवढ्या त्या त्रोटक जातकांचाच केवढा विस्तार झाला आहे ! मग जर बुद्ध भगवानांकरवी आपल्या यच्चयावत पूर्वजन्माच्या आठवणी तशाच लिहून ठेवण्याची कृपा करण्यात आली असती, तर त्या ग्रंथास या उभ्या पृथ्वीचेच एक ग्रंथालय केले असते तरीही ते सामावण्यास समर्थ होते ना, कारण कोणाच्याही पूर्वजन्माची संख्या अगण्य असल्यामुळे त्याच्या आठवणीचे खंडही असंख्यच असणार ! !

ही गोष्ट झाली एका बुद्ध भगवानाची. पण जर का जन्मास आलेल्या प्रत्येक मनुष्यास, आमच्या काही थिऑसॉफिस्ट मित्रांना आठवल्याशा वाटतात, तशा जन्मजन्मांतरीच्या झाडून सगळ्या स्मृती आठवू लागल्या आणि दुर्दैवाने तो प्रत्येक-जण त्या लिहून प्रसिद्ध करण्याच्या मोहासही बळी पडत गेला, तर मनुष्यजातीच्या नुसत्या या पिढीच्या सरासरी दीडशे कोटी लोकांची ती प्रत्येकी असंख्य जातके ! –

त्यांच्या वाचनांची तर ती गोष्टच दूर, पण त्यांच्या नुसत्या संख्येच्या कल्पनेनेसुद्धा कोणासही घेरी आल्यावाचून राहणार नाही. पौराणिक परंपरेने बोलायचे, तर रक्तवीज राक्षसाप्रमाणे कालाच्या शरीरातून जो जो क्षणाचा रक्तबिंदू गळतो, त्यातून त्यातून आठवणीचा एक नवा नवा राक्षस उत्पन्न होतो. पौराणिक परिभाषेत बोलायचे तर स्मृतीच्या याच अत्याचारापासून ह्या लोकांचे परित्राण करण्यासाठी तो क्षणाचा रक्तबिंदू पडतापडताच गिळून नाहीसा करणाऱ्या देवी विस्मृतीचा अवतार झाला म्हणून बरे. खरोखर स्मृतीप्रमाणे विस्तृती हीही देवाची देणगीच आहे.

प्राचीन इतिहास म्हणजेच समाजाच्या ज्या जन्मार्जित आठवणी, त्यांची गोष्ट अशीच आहे. प्राचीन इतिहास सापडत नाही, म्हणून आपणास केव्हा केव्हा फार तळमळ लागते. पण एका अर्थी आपणास त्यातील काही भागांचे साफ विस्मरण पडले आहे हेही बरेच नाही का ? कारण आज रावणाची लंका कोणती हे जर ऐतिहासिक निश्चिततेने सांगता आले, तर त्या देशातील लोकांच्या मनात आम्हां आर्यांविषयी थोडाफार तरी द्वेष उत्पन्न होऊन नव्या भांडणास जुन्या भांडणाच्या सहाणेवर घासून धार लावली जाणारच नाही असे कोण सांगू शकेल ? ही अगदी कल्पनाच नाही. त्याच रामायण कथेच्या स्मृतीमुळे आम्ही आर्य अजूनपर्यंत माकडांचे लाड करतो; त्यास प्रसंगी माणसांनाही सुखनैव त्रास देऊ देतो. आताच एका ठिकाणी घडले, तसे माकडाला सोडविण्यासाठी दंगा करून माणसांनादेखील ठार मारतो, आणि अशा प्रकारे एका अर्थी सुग्रीव-हनुमंतादिकी रामचंद्राशी केलेल्या पौराणिक संधीस अजूनपर्यंत पाळू पाहतो. उत्तर ध्रुवावरून आर्य हिंदुस्थानात आले ही उपपत्ती ऐकताच स्वतःस अनार्य कल्पिणाऱ्यांनी आजच्या तथाकथित आर्य मानल्या जाणाऱ्या जातींना 'पश्चात हिंदू' लेखले आणि आपणास 'आदि द्रविड' 'आदि हिंदू' म्हणविण्यास आरंभ केलाच की नाही ! मग जर त्या प्राचीन काळाची माहिती पौराणिक सावळागोंधळाचे सोंग उतरून आपल्या अगदी खऱ्या ऐतिहासिक स्वरूपात प्रकट झाली आणि कोण मूळचा अनार्य, कोण आर्य, कोण असुर, कोण दनुज, कोण हूण, कोण शक, कोण द्रविड यांची निर्भेळ वंशावळ घरोघर अकस्मात प्रकट झाली, तर आज केवढा गोंधळ माजेल ! कित्येक ब्राह्मण जातीही शुद्धीकृत 'शक' वा मघ ठरतील, क्षत्रिय हूण ठरतील ! सासरचे लोक आर्य तर माहेरचे नागवंशी वा पैशाच्च ! फार काय, अगदी सय्यद म्हणून गाजणाऱ्या अरबी मुल्ला-मौलवीनांही, 'अरबी' वा 'आर्यावर्ती' ब्राह्मणाच्या गोतात गोवावे लागेल !

'जे झाले ते झाले ! ते विसरून जाऊ या !!!' हे वाक्य मनापासून उच्चारताच आजवर किती तुटलेले स्नेह पुन्हा जुळले आहेत, किती अनुतप्त प्रणय पुन्हा अनुरक्त झालेले आहेत ! खरोखरच स्मृतीप्रमाणे विस्मृती हीही देवाची एक

देणगीच आहे.

देवाने दिलेल्या या परस्परविरुद्ध दोन्ही देणग्यांचा मनुष्याने तारतम्याने उपयोग केला तर त्या दोन्हीही त्याच्या जीवनास उपयुक्त झाल्यावाचून राहत नाहीत. पण जर आपण सगळेचजण सर्वच काळ मागच्या गोष्टी आठवीत राहिलो, किंवा विसरत राहिलो तर आपले जीवन अधिक दुःसह किंबहुना असह्य होऊन जाईल.

या तारतम्याने पाहिले असता माझ्या आठवणी सार्वजनिकरीत्या ग्रथन करून ठेवणे सार्वजनिक हिताचे आहे का, हा प्रश्न व्यक्तीपुरता नाही. कारण व्यक्तीला ज्या आठवणी सुखावह किंवा हितावह वाटतात, त्या ती व्यक्ती स्वतः-पुरती आठवीत राहण्यास, जोवर त्याचा दुसऱ्यांना काही उपसर्ग पोहोचत नाही तोवर तरी स्वतंत्र आहेच; तिने आपल्यापुरत्या आठविल्या काय, त्याचा जनिक साहित्याशी संबंध नाही. व्यक्तीपुरत्या ज्या आठवल्या जातात त्या आठवणी सोडल्या तर कुटुंब, कुल वा वंश यांचा संबंध पोचतो अशा आठवणींचा प्रश्न उद्‌भवतो. चीन देशात अशी रीत असल्याचे सांगतात की, प्रत्येक कुटुंबात श्राद्ध-दिनासारख्या एका संस्कारप्रसंगी त्या कुळातील एका विगत पुरुषाचा, आपल्या श्राद्ध-पद्धतीसारखा नुसता नामोच्चार करून न थांबता त्याच्या चरित्राची त्रोटक कथा वाचण्यात येते आणि सर्व कुटुंब ती ऐकते. हे लिखाण म्हणजे कौटुंबिक इतिहास होत. परंतु त्यांतील बहुतेक भाग कुटुंबापुरताच महत्त्वाचा असल्यामुळे त्यांच्या छपाईचा आणि वाचनाचा भार जनिक साहित्याच्या वा वाचकवर्गाच्या बोकांडी बसविण्यात काही अर्थ नाही. कारण अगदी सर्वसाधारण जीवनक्रमातील सहस्रावधी माणसांची चरित्रे बहुधा एकठशीच असतात. जन्म, रोग, लग्न, मुले, मृत्यू– त्या विषयीच्या क्षुधा, शांती, भावभावना, सगळ्या ठराविक. अशा एकाच्या चरित्राची पोथी, म्हणजे विशेष नावे तेवढी बदलली, तर तशा दुसऱ्या कोणच्याही चरित्राची बहुतांशीची यथावत् प्रतच. अशी चरित्रे कौटुंबिक हितार्थ कुटुंबापुरती राहोत, त्यांतील काहींचा क्वचित प्रसंगी अनुवंशविज्ञानाच्या अभ्यासकांना काही उपयोग झाला तर होतो. एवढाच त्यांचा जनिक उपयोग.

वैयक्तिक व कौटुंबिक क्षेत्रापुरताच ज्यांचा असा व्याप असतो, त्यांची गोष्ट सोडली असता, ज्यांच्या जीवनाशी एखाद्या राष्ट्राचे किंवा मनुष्यजातीच्याच जीवनाचे धागेदोरे निगडीत झालेले असतात अशा सार्वजनिक व्यक्तीच्या चरित्राचा आणि आठवणींचा प्रश्न येतो, अशांचे जीवन म्हणजे लाखो व्यक्तींच्या जीवनाचे संकलित सारच असते. केव्हा केव्हा तसे एक जीवन म्हणजेच त्या उभ्या पिढीचा इतिहास होतो. बुद्ध भगवान किंवा आल्फ्रेड दी ग्रेटचे चरित्र वगळले तर त्या पिढीच्या इतिहासाचे ते पानचे पानच फाडून टाकावे लागेल. अशांच्या स्मृती आणि

अशांच्या आठवणी या मात्र जनिक प्रसिद्धीस पात्र आणि जनिक हितार्थच चिरस्मरणीय ठरतात. यास्तव राष्ट्रांच्या आणि मानुषकांच्या सामाईक साहित्यांत यथा-प्रमाण स्थान प्राप्त होण्याचा त्यांना अधिकार आहे. अशा व्यक्तींपैकी काहींनी जीवनस्मृती किंवा आत्मचरित्रे सार्वजनिक हितार्थ ग्रथित करून प्रसिद्ध केली तर लोकजिज्ञासेच्या आणि वाङमयाच्या सहनशीलतेचा गैरवाजवी लाभ घेतल्याच्या दोषाचे ते भागी होणारे नसून उलट आपल्या आकांक्षा आणि ध्येय, प्रयत्न आणि पराक्रम, न्यूनता आणि सांगता यांच्या माहितीची ठेव पुढील पिढीच्या हितार्थ त्यांच्या हाती सोपवून देण्यात ते त्याच्या सार्वजनिक आयुष्याचे शेवटचे श्रेयस्कर कर्तव्यच करीत असतात.

माझ्या आठवणी, जीवनस्मृती, या वरील तीन वर्गांपैकी ह्या शेवटच्या वर्गांत पडत असतील तरच त्यांना वैयक्तिक मरणाबरोबरच विस्मृतीच्या राखेत नाहीशा न करता जनिकस्मृतीच्या संग्रहालयांत राखून ठेवण्याचा यत्न करणे उचित होणारे आहे. मग त्या तशा ह्या वर्गांत पडताहेत का ?

मनुष्यमात्राच्या मनास आपली कर्मकथा– विशेषत: स्वत:च्या प्रौढीला अनुकूल असेल तेवढी तरी– भेटेल त्याला सांगत सुटण्याचा मोह सहसा आवरत नसतो. तो मोह शक्य तितक्या विवेकाने दाबून ठेवून, ममत्वशून्य दृष्टीने मी माझ्या आत्म-चरित्राचे तटस्थपणे जो जो समालोचन करतो, तो तो मला असे वाटते की, माझे जीवन त्याच्या अगदी जाणत्या आरंभापासून भारतीय राष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाशी संबंद्ध झालेले आहे. इतकेच नव्हे, तर पुढेपुढे त्या राष्ट्रीय जीवनाचा, ते माझे व्यक्तिजीवन एक प्रमुख आणि परिणामकारक घटक होत आले आहे. माझ्या गुरुस्थानी असलेल्या वयस्क पिढीतील अनेक राष्ट्रीय पुढाऱ्यांचा माझ्याशी संबंध आलेला असल्याने, माझ्या समकालीन पिढीतील सहस्रावधी तरुणांच्या आयुष्याची दिशा बदलून जावी, इतका त्यांच्यावर माझ्या मतांचा, प्रयत्नांचा आणि सह-वासाचा अप्रत्यक्ष वा प्रत्यक्षपणें परिणाम झालेला असल्याने आणि माझ्या आयुष्या-तील अनेक मोठमोठ्या राष्ट्रीय उलाढालींत प्रमुख भाग घेण्याचा प्रसंग मजवर वारंवार येत गेल्याने, माझ्या चरित्राचा बनाव आणि घडाव कसा कसा होत गेला याचा माझ्या तोंडचा वृत्तांत हा त्या काळाच्या राष्ट्रीय इतिहासाच्या रचनेस उपयुक्त झाल्यावाचून राहणार नाही. माझ्या आठवणी केवळ माझ्या एकट्याचेच चरित्र सांगणाऱ्या नसून एका उभ्या पिढीचे जीवन त्यात प्रतिबिंबित होणारे आहे. आणखी असे की मी सांगितली नाही, तर बहुधा ज्यांच्या गुप्त पण उत्कट राष्ट्र-सेवेची आणि महनीय त्यागाची माहिती लोकांस कळणारी नाही, त्यांची साभार स्मृती प्रकटपणे सन्मानून त्यांच्याविषयीच्या कृतज्ञतेचे ऋण अंशत: तरी फेडण्यासही

या माझ्या आठवणी कारणीभूत होणाऱ्या आहेत. इतकेच नव्हे तर, ज्या अत्यंत जाज्वल्य आणि भव्य अशा राष्ट्रीय भवितव्यतेच्या आंदोलनात माझा विशेषत्वेकरून संबंध आलेला आहे त्या राष्ट्रीय उत्थानाच्या इतिहासाचाही बराच अंश लोकांना अज्ञातच आहे. बंगालच्या बऱ्याच देशभक्तांनी त्याचा त्यांच्यापुरता भाग जरी सांगून टाकला आहे, तरी बाकीचा कितीतरी भाग तज्ज्ञ असे काहीजण सांगावयास उरले नाहीत, काही सांगू शकले नाहीत. विपक्षीय शक्तीने तर त्या उत्थानाची आठवणदेखील साफ नाहीशी व्हावी म्हणून तोंडदाबीचा विडाच उचललेला ! अशा वेळी त्या इतिहासावर माझ्या आठवणींनी पाडवेल तितका प्रकाश पाडणे हे एक राष्ट्रीय कर्तव्यदेखील इतके अत्यजनीय आहे की केवळ तदर्थही ह्या माझ्या आठवणी माझ्याबरोबर नष्ट होऊ देणे अनुचित होईल.

त्यातही माझे चरित्र मूलतःच अशा काही आकस्मिक, काही अद्भुत, काही उत्क्षोमक विद्युत तंतूंनी विणलेले आहे आणि प्रकंपक सुखदुःखाच्या रंगीबेरंगींनी त्याची अशी सजावट झाली आहे की त्याच्या नुसत्या उद्दीपक मनोवेधकपणासाठीदेखील साहित्यात त्याची भर टाकण्यास हरकत नाही.

अशा रीतीने ज्या अर्थी माझ्या आठवणी या एक-दोन पिढ्यांना तरी उद्बोधक आणि मनोवेधक वाटल्यावाचून राहणार नाहीत, त्याअर्थी मी त्या लिहून काढण्याचे ठरवीत आहे. ह्या एकदोन पिढ्यांनंतर जर जनक साहित्यात त्याची अडगळ होऊ लागलीच, तर ती काढून टाकण्याचा प्रश्न काळ आपण होऊनच सोडवील. कारण व्यक्तीच्या आयुष्याला जशी काळाची मर्यादा असते, तशीच ती त्या व्यक्तीच्या मागे उरणाऱ्या तिच्या जीवनस्मृतीच्या आयुष्यालाही असतेच. व्यक्ती काय, व्यक्तीस्मृती काय– निर्जीव आणि निरुपयोगी जुन्याला नाहीसे करून पृथ्वीचा अवकाश नवीनाला नांदावयास काळ हा मोकळा करून देतच असतो.

सार्वजनिक उपयुक्ततेस्तव आठवणी प्रसिद्ध करावयाच्या, तर त्या मनुष्याच्या जीवनात जशा घडल्या आणि ज्या ज्या घडल्या त्या समग्र प्रसिद्ध करणे हेच प्रामाणिक लेखकाचे कर्तव्य होय. केवळ लोकांत प्रौढी वाढेल तितकाच भाग प्रसिद्ध करणे हा मिथ्याचार, ते लोकप्रियतेचे दास्य. लोकहित-तत्परतेचे खरे गमक नव्हे. कारण मनुष्याचे एकंदर शरीर हे त्याच्या सहज किंवा प्राप्त अशा सर्व रोगाभोगांच्या संक्लिष्ट संघर्षाचा ज्याप्रमाणे ऊर्वरित परिणाम असते, त्याप्रमाणे त्याचे प्रत्येक कृत्य हे त्याच्या तथाकथित गुणावगुणांच्या संक्लिष्ट संघर्षाचे, त्याच्या झाडून साऱ्या भावभावनांचे संमिश्र फलित असते. कोणास वाटणाऱ्या त्याच्या गुणांच्या उत्कर्षासच इतरांना वाटणाऱ्या त्याच्या अवगुणांचे सान्निध्य किंवा सहकार्यही कारणीभूत झालेले असते आणि त्याचे अवगुण त्याच्या गुणांच्या बीजांचीच क्वचित अपरिहार्य अशी आनुषंगिक रूपांतरे असतात. आपण

ज्यास भूस म्हणून पाखडून टाकू पाहतो, त्याच्या संरक्षणामुळेच, आपण ज्यास दाणे म्हणून टिपू पाहतो त्याची वाढ झालेली असते. टाकाऊ मळामातीचे खतही गुलाबाच्या फुलातील लोभनीय सौंदर्याचे आणि सुवासाचे एक अपरिहार्य घटक असते. जर आपणास गुलाबाच्या फुलाच्या विकासाचे समग्र रहस्य समजून घ्यायचे असेल, तर त्यास मुळापासून कळीपर्यंत खतमाती पानपाचोळा, कुसळकाटे —त्याचे अंगप्रत्यंग असलेली ही सर्व आनुषंगिक उत्पादितेही विचारात घेतली पाहिजेत. त्यांची माहिती आणि महत्त्व पण जाणले पाहिजे, त्याप्रमाणे मनुष्याच्या घडावाचीही गोष्ट आहे. त्या घडावाची घडण कशी होत गेली हे जर खरोखर समजून घ्यायचे असेल, तर त्याच्या, लोकांस थोर वाटणाऱ्या किंवा उचित भासणाऱ्या जीवनस्मृतीच प्रसिद्ध करून भागावयाचे नाही, तर तो जसा होता तशाचा तसाच नखशिखांत आपल्यापुढे उभा केला पाहिजे. छायाचित्रकांत उत्तम तोच की जो, मनुष्य असेल तशीच त्याची छाया घेतो, न अधिक सरस, न अधिक नीरस. म्हणूनच क्रॉम्वेलने आपल्या चित्रकारास निक्षून सांगितले की ‘मी आहे तसा काढ, एक सुरकुती देखील सोडू नकोस.’ कारण सूक्ष्मतः पाहिले असता क्रॉम्वेलच्या घडावात त्याच्या तजेल्याप्रमाणेच त्याच्या सुरकुत्यांचे अंग होते.

आत्मवृत्त सांगणारास त्याचे समग्र चरित्र, आपणास वा लोकांस आवडतो तोच भाग नव्हे, तर साऱ्या सांगण्यासारख्या बऱ्यावाईट आठवणी यथावत् सांगणे हेच जरी वरील कारणासाठी शास्त्रतः आणि तत्त्वतः उचित असले, तरी आजवर ज्या ज्या थोर पुरुषांनी आपली चरित्रे सांगितली, त्यांना हा नियम यथावत् पाळणे केव्हा शक्य झाले नाही, केव्हा इष्टही वाटले नाही. कारण सत्य हे परिस्थितीने असेच सापेक्षत्व पावते, मर्यादित होते. आमची आवड आमच्या सर्व सांगण्यासारख्या बऱ्यावाईट आठवणी निःसंकोचपणे आणि निर्भयपणे जशाच्या तशा सांगून टाकण्याची असताही, ज्या समाजस्थितीत आणि विशेषतः राजकीय परिस्थितीत आम्हांस हे आत्मचरित्र लिहावे लागत आहे त्यामुळे आम्हांसही ती आमची आवड अंशतः तरी बाजूस ठेवावी लागणार आहे. त्याचे एक कारण उघडच आहे की आमच्याशी ज्या व्यक्तीचा संबंध आला आहे, त्यांच्या अनुमतीवाचून त्यांच्या त्या त्या संबंधाची परिस्फुटता करणे हा त्यांच्याशी केव्हा केव्हा अगदी विश्वासघात केल्यासारखे होणारे आहे. दुष्ट-दुर्जन सज्जनांच्या प्रामाणिक सत्याचाही दुरुपयोग करण्यास जोवर कचरत नाहीत, तोवर सत्याला व्यवहाराची बेडी तोडून स्वतंत्रपणे नांदता येणे असेच दुर्घट होणार. अशा पेचात आम्ही ह्या आमच्या आठवणी लिहिण्याच्याआधी इतकीच प्रतिज्ञा करू शकतो की, आम्ही ज्या सांगू त्या आठवणी तरी अगदी जशा आठवतात तशाच सांगू; केवळ लोकच्छंदानुवर्तित्वास्तव त्यांत नसती रंगरंगोटी करणार नाही. (माझ्या आठवणी)

## २. ‘आठवणी’ मागील वाङ्मयीन दृष्टिकोन

(‘माझी जन्मठेप’ या आत्मचरित्रपर ग्रंथातून सावरकरांचा आत्मचरित्र लिहिण्यामागील वाङ्मयीन दृष्टिकोन फार चांगल्या रीतीने प्रकट झालेला आहे. ‘आक्रोश हा दुःखाचा स्वभाव’ असल्याने सावरकरांचे दुःख प्रसिद्धीचा उसासा टाकण्यास स्वाभाविकपणेच उद्युक्त झाले आहे. ती भोगलेली उत्कट सुखदुःखे सांगताना समवेदनांच्या अश्रूंनी स्निग्ध होणारा तो मधुर आनंद उपभोगण्यास ते आतुरही आहेत. त्यांना गतस्मृतींना उजळा द्यावयाचा आहे. पण तो केवळ आत्मानंदासाठी नाही, तर त्या राष्ट्रीय उत्थानाच्या अज्ञात इतिहासावर आपल्या आठवणींनी पाडवेल तेवढा प्रकाश पाडण्याच्या राष्ट्रीय कर्तव्याच्या समाधानासाठी! आपल्या जीवनवृत्तान्ताचा ‘सार्वजनिक उपयोग फार मोठा आहे’ ही जाणीवच या सर्व लेखनामागची प्रेरणा आहे.)

स्वजनस्य हि दुःखमग्रतो।
विवृतद्वारमिवोपजयाते ॥ (कालिदास)

आमचा अंदमानचा वृत्तान्त व तेथे बंदिवास कंठीत असताना भोगाव्या लागलेल्या यातना यांची कहाणी ऐकण्यासाठी महाराष्ट्रांतच नव्हे परंतु उभ्या हिंदुस्थानात आमच्या हजारो देशबांधवांनी सहानुभूतीपूर्ण औत्सुक्य आजपर्यंत अनेक समयी व्यक्त केलेले आहे. त्यांतही सुहृदांस आपण भोगिलेली उत्कट सुख-दुःखे सांगताना समवेदनांच्या अश्रूंनी स्निग्ध होणारा तो मधुर आनंद उपभोगण्यासही आमचे हृदय आमच्या सुटकेपासून साहजिकतःच कासावीस होत आले आहे.

परंतु तरीही आजपर्यंत काही केल्या अंदमानाची कथा ओठावर येत असताही ओठाबाहेर येईना. अंधकारात वाढणाऱ्या कोण्या काटेरी फुलवेलीप्रमाणे त्या अंधेऱ्या दिवसाची स्मृती उजेड दिसताच सुकून जाऊ पाही, दिपून जाई.

कधी वाटे, सांगण्यासाठी का हे सगळे भोगले ! तर मग तो सगळा अभिनयच म्हणावयाचा. कधी वाटे, आपणात भोगाव्या लागल्या त्या यातना भोगीत असतानाच जे त्या यातनांस बळी पडले त्यांना घरी परत येऊन प्रियकरांस ती सुखदुःखे सांगण्याचे समाधानही मिळाले नाही. ते सहतपी आज आपणाबरोबर नाहीत. ज्यांच्याबरोबर तपाचा उत्ताप सहन केला त्यास सोडून ह्या पारण्याच्या पंक्तींतील ही मिष्टान्ने एकटयानेच कशी खावीत ? ही त्यांची प्रतारणा तर होणार नाही ना ?

आणि आपणासारख्या कित्येक मनुष्यांवर आजपर्यंत हे खडतर, संकटांचा सामना करण्याचे प्रसंग कोसळले आहेत व अजून असले किंवा याहून भयंकर प्रसंग कोसळावयाचे आहेत. ह्या जीवनकलहाच्या नगाऱ्यांच्या घाईत आपण काय ही आपली एवढीशीशी टिमकी वाजवीत बसावे !

परंतु दुःखाच्या गळयात किंकाळीचा ढोल हा निसर्गानेच बांधिलेला आहे की तो वाजवून त्याने आपली शक्य ती करमणूक करून घ्यावी. ससाण्याने झेप घालताच विवश होऊन त्याचे चोचीतच पडलेला पक्षी सहाय्याची लेशमात्र आशा करीत नसता जो स्वाभाविक चीत्कार करतो, त्या चीत्कारापासून तो, नेपोलियनचे प्रेत सेंट हेलिनामधून पॅरिसला ज्या दिवशी परत आणले त्या दिवशी एक राष्ट्रचे राष्ट्र आपले ध्वज नमवून आपल्या सहस्र वाद्यांतून सहस्र शोकस्वर व विरहगीते गात

जो दुःखाचा हंबरडा फोडते झाले त्या हंबरण्यापर्यंत, त्या राष्ट्रीय उद्गीतापर्यंत, जितका प्राणिमात्राचा आक्रोश आहे तितका आपआपल्या दुःखांची प्रसिद्धी करण्यात चूर झालेला असतो. आक्रोश हा दुःखाचा स्वभावच आहे, तेव्हा या अनंत आकाशात जे अनेक चीत्कार उसासे टाकून आपआपल्या दुःखांचा भार कमी करीत हिंडत आहेत त्यांत माझ्या दुःखाने प्रसिद्धीचा उसासा का टाकू नये ? या अनंत आकाशात माझ्याही आक्रोशाला अवकाश असेल ! असे वाटून प्रवृत्ती केव्हा केव्हा दुःख एकदाचे ओकून टाकण्यास अगदी सज्ज होई. पण तोच परिस्थिती तिचा पाय हिसडून तिला मागे खेची.

कारण आमच्या सध्याच्या परिस्थितीत आमच्या अंदमानच्या अनुभवांत जे सांगण्यासारखे आहे तेच विशेषकरून सांगता येणारे नाही. जे सांगता येईल ते अगदी वरचेवर, उथळ वा सापेक्षतः क्षुल्लकसे वाटत असल्याने उत्साह येत नाही आणि जे सांगण्यासारखे वाटत आहे ते परिस्थिती सांगू देत नाही. अशा स्थितीत काही तरी सांगून त्या कथानकाचे चित्र रंगहीन व सत्त्वहीन करून टाकण्यापेक्षा प्रस्तुत काही सांगूच नये. कधी तसा दिवस उगवेल की ज्या दिवशी सर्व गूढ आकांक्षा व्यक्त होऊ शकतील. सर्व मूक भावना मोकळेपणाने बोलू शकतील त्या दिवशी सांगावयाचे ते यथाप्रमाण सांगू. तसा दिवस या आयुष्यात न उगवला तर नाही सांगणार. ते वृत्त जगाने ऐकले नाही म्हणून काही त्याचे महत्त्व कमी होत नाही. वा त्याची तीव्रता बोथट होत नाही किंवा ह्या जगताच्या प्रचंड रहाटीत ते सर्व अश्रुत राहिले म्हणून काही मोठा खंड पडणार आहे असेही नाही, असे वाटे.

मनाच्या अशा शोकमय स्थितीत, आजपर्यंत अंदमानाच्या आमच्या आठवणी आमच्या प्रिय बांधवांस सांगण्याचे काम तसेच राहून गेले. आमच्या मागून अंदमानास आलेल्या व आमच्यापूर्वी सुटलेल्या कित्येक राजकीय बंदींनी आपापले अनुभव व त्यांच्या यातनांची कहाणीही वेळोवेळी प्रसिद्ध केलेली आमच्या वाचनात येत गेली. परंतु अशा आत्मस्मृतिकथनास आत्मश्लाघेचा अनिवार्यपणे जो गंध तो आमचे मनास पुनः पुनः संकोचित करी आणि प्रियजनांपाशी आपली सुखदुःखे मन मोकळे करून सांगण्याची स्वाभाविक प्रवृत्ती गत व जित संकटाच्या पराभवाची कथा सांगण्याचा आनंद उपभोगण्यासाठी अत्युत्सुक झालेली असताही परिस्थिती वाटेत पुन्हा पुन्हा आडवी येई.

तथापि जे काय अर्धेमुर्धे वा अल्पस्वल्प सध्याच्या परिस्थितीत सांगता येण्यासारखे आहे ते तरी आपण सांगितलेच पाहिजे. तेही आम्हांस अत्यंत श्रवणीय वाटणारे आहे असा अगदी उत्सुक, निष्कपट व प्रेमळ आग्रह प्रसिद्ध प्रकाशन मंडळांपासून तो शाळेतील मुलांपर्यंत आम्हास अजूनही एकसारखा होत असल्याने त्या आग्रहास मान न देणे म्हणजे विनयाचा अतिरेक करून एक प्रकारचा सार्वजनिक

मनोभंग केल्यासारखे होईल असे आम्हांस वाटू लागले आहे. एतदर्थ परिस्थितीत जो काय सांगता येईल तो आमचा अंदमानामधील वृत्तान्त सांगून टाकण्याचा आम्ही निश्चय केला आहे. सुसंगत व सुस्पष्ट वृत्तान्त-कथन अशक्य आहे हे उघडच असल्याने ज्या काही त्रोटक, तुटक व संबंधविहीन आठवणी आम्हांस सांगता येतील त्यांवरच वाचकांनी प्रस्तुत प्रसंगापुरते समाधान मानून त्यांतील विसंगतपणाविषयीं वा अस्पष्ट उद्गारांविषयी तो परिस्थितीचा दोष समजून काही दिवस क्षमा केली पाहिजे.

अशा वृत्तान्ताचा सार्वजनिक उपयोग फार मोठा आहे हे आम्ही जाणन आहोत. परंतु केवळ वृत्तान्तापेक्षाही अशा दुर्घट परिस्थितीतील विचारांचा, विकारांचा व भावनांचा इतिहास हा अगदी मनोरंजकच नव्हे तर बोधप्रदही होणार असल्याने आम्ही ह्या आठवणींत त्यास अधिक महत्त्व देणार आहोत. परंतु ह्या आठवणी तुटक असल्याने व भावनांचा तो इतिहास पुसट, सूचक व अस्पष्ट असाच सांगणे अपरिहार्य झाल्याने संपूर्ण व सुसंगत कथन प्रसिद्ध होईतो आमच्या अंदमान-मधील जीवनाविषयी वाचकांनी कोणताही सामान्य सिद्धांत असा करून बसू नये. ह्या आठवणींतील सर्व वृत्त जरी सांगता आले नाही तरी जे सांगितले जाईल ते अक्षरशः व भावार्थशःही यथातथ्य सांगितले जावे ह्याविषयी शक्य ती दक्षता राखण्याचा यत्न केला जाईल.

( 'माझी जन्मठेप' –)या ग्रंथात जे विचार भावना व घटना यांचे वर्णन केले जाईल ते त्या त्या प्रसंगी उद्भवलेल्या विचारभावनादिकांचे निदर्शक असून आज ते केवळ ऐतिहासिक दृष्टीनेच वाचले जावे अशी लेखकाची अपेक्षा आहे.

('माझी जन्मठेप ')

# ३ : कविता आणि तत्त्वज्ञान

('माझी जन्मठेप' या आत्मचरित्रात सावरकरांनी अंदमानमध्ये राजबंदीवानांसाठी सुरू केलेल्या ग्रंथालयातील किती विविध ग्रंथ, विविध अशा भाषांतून समजावून घेतले याची माहिती खालील उताऱ्यात देण्यात आलेली आहे. याच ग्रंथवाचनातून त्यांना बंगालीतील 'पायरा' या वृत्ताचा परिचय झाला. सावरकरनिर्मित 'वैनायक' वृत्तांची पहिली पायरी सावरकरांना या 'पायऱ्यां'तून सापडली. योगवाशिष्ठासारखा वेदान्तपर ग्रंथ अभ्यासताना त्यांना 'कविता आणि तत्त्वज्ञान' यांतील अन्योन्यसंबंध किती निकटचे आहेत याची साक्ष पटली.)

त्या ग्रंथालयात बंगाली भाषेतील राजा राममोहन, विद्यासागर इत्यादी पुरुषांची चरित्रे, नवीनसेन राय, रवींद्रनाथ इत्यादिकांचे बहुतेक ग्रंथ, जोगेशचंद्रादिकांच्या ग्रंथावळया, उभे महाभारत, उभे रामायण योगवासिष्ठ इत्यादी उत्तमोत्तम शेकडो ग्रंथ होते. मासिके आणि विवेकानंदांची व रामकृष्णांची चरित्रे आणि ग्रंथ यांच्या तर किती प्रती होत्या ते पुसूच नये. बंगाली वाङ्मयाचा अभ्यास आम्ही तेथे यथेच्छ केला. लंडनमध्ये १८५७ च्या क्रांतियुद्धाचा इतिहास लिहिताना आम्हांस बंगाली पुस्तकांचे प्रथम दर्शन झाले. रजनी कान्तबाबूंचा 'शिपाई युद्धेर इतिहास' हा ग्रंथ, त्यात काही नवीन सापडते का म्हणून आम्ही तिथे एका बंगाली मित्राकडून वाचवून घेतला होता. आम्हाला बंगाली वाचण्यास आणि बोलण्यास येऊ लागले तरीही अक्षरे लिहिता येत नसत! याचे आम्हासही नवल वाटे. मग ती शिकलो. अजूनही बंगाली वाचता येते. दृष्टीला अक्षरे अवगत आहेत. पण लिहिताना विस्मृती होते. हातांना अक्षरओळख फारशी नाही. रामकृष्णांची लीलामृत– कथामृत इत्यादी अनेक खंडांनी पूर्ण केलेली चरित्रे, रवींद्रनाथांची जीवनस्मृती, चित्रा इत्यादी पुस्तके वाचून वाचून थकल्यावर जुन्या बंगालीतील आपल्या रामविजयाप्रमाणे असलेले तिकडच्या 'पायरा' वृत्तांतील रामायण-भारतादी ग्रंथही वाचले. या पायरावृत्तासच पुढे मधुसुदन दत्ताने अमित्राक्षरछंदांत रूपांतरित केले. मेघनाद वध, कुरुक्षेत्र इत्यादी मधुसूदनाचे ग्रंथ वाचूनच इंग्रजीतील निर्यमक Blank verse प्रमाणे जसे त्याने बंगाली अमित्राक्षर वृत्त केले तसेच मराठी वृत्ताच्या अधिक शास्त्रशुद्ध वृत्तीस जुळेल असे मराठीत एक वृत्त असावे अशी आम्हास इच्छा झाली. तोच प्रयत्न गोमांतकांतील 'वैनायकवृत्ता'त परिणमित झाला आहे.

मराठी पुस्तके आणण्याची आवश्यकता राजबंदिवानात आम्हां महाराष्ट्रीय दोघांतिघांसच काय ती होती. परंतु जुनी पुस्तके बहुधा परिचयाचीच असल्यामुळे केवळ चित्रमय जगत् आदी काही नवीन मासिके आणि नवीन प्रकाशित होणारी पुस्तके आम्ही आमच्यासाठी आणावीत. परंतु साधारण बंदिवानांत जे मराठी बंदिवान असत त्यांच्यासाठी, आणि आमचे कष्टभागी श्री. वामनराव जोशी आणि जे मराठी शिकत त्या राजबंदिवानांसाठी इतिहास, ज्ञानेश्वरीपासून मोरोपंतांपर्यंत प्रमुख कवींचे काव्यसंग्रह, क्रमिक पुस्तके, शास्त्रीय पुस्तके, समग्र महाभारत भाषांतर,

बडोद्यास प्रकाशित झालेले द्वैताद्वैत भाष्यांसह समग्र ब्रह्मसूत्रांचे भाषांतर इत्यादी दीडशे-दोनशे ग्रंथ आम्ही हळूहळू मागवून संग्रहित केले आहेत.

प्रथमतः हिंदी पुस्तके मागविण्याचा व्ययही आम्हासच करावा लागला. कारण, हिंदी ही राष्ट्रीय भाषा म्हणून प्रत्येकाने शिकावी अशी आमची खटपट चालली असता तिची पुस्तके मागविणारा कोणीच नव्हता. म्हणून काही मासिके, काही ग्रंथ, काही क्रमिक पुस्तके आम्ही आणवून ग्रंथालयात ठेवू. परंतु पुढे हिंदी आणि पंजाबी-भाषीय राजबंदी पुष्कळ आले आणि त्या दोन भाषांतील पुस्तकेही पुष्कळ येऊ लागली.

इंग्रजी पुस्तकांचा भरणा तर मुख्य भागच होता. स्पेन्सरच्या दोन्ही मीमांसा, समाजशास्त्राचे त्याचे सर्वभाग, जवळजवळ सारा हर्बर्ट स्पेन्सर, मिल, डार्विन, हक्स्ले, हेकेल, इमर्सन यांची बहुतेक पुस्तके तेथे होती. कार्लाइल, मेकॉले, गिबन यांचे इतिहास; शेक्सपीअर, मिल्टन, पोप यांचे समग्र ग्रंथ; अबाटचा नेपोलियन, बिस्मार्क, गॅरिबाल्डी, मॅझिनी इत्यादिकांची चरित्रे; इटली, इग्लंड, अमेरिका, हिंदुस्थान यांच्या इतिहासावरील प्रख्यात ग्रंथ; डिकन्स, टॉलस्टॉय, क्रोपाट्कीन यांचे बहुतेक ग्रंथ; विवेकानंदांच्या आणि रामतीर्थांच्या सर्व ग्रंथांच्या तीन-तीन प्रति; ट्रीस्क आणि निट्से यांचे राजनीतीवरील निबंध; प्लेटोंचे ‘ रिपब्लिक ’, ‘ स्टेट ’, ‘ कान्ट्रॅक्ट ’ इत्यादी शासनशास्त्रीय प्राचीन आणि अगदी नव्यातील नवीन ग्रंथ, अशी कितीतरी उत्तमोत्तम पुस्तके तिथे राजबंदिवानांनी संग्रहित केली होती. थिऑ-सफीच्या ग्रंथांचीही वाण नव्हती. प्रथम वरील ग्रंथांतील राजकीय संबंधाच्या प्रत्येक ग्रंथागणिक आम्हास भांडणे करावी लागली तेव्हा ते मिळू शकले. एका प्रगतिप्रिय पर्यवेक्षकास वगळले तर सर्व अधिकाऱ्यांच्या डोळ्यात ते ग्रंथालय सलत असे. हिंदुस्थानातून कोणी बडा अधिकारी आला म्हणजे बारी ती राजकीय पुस्तके लपवि-ण्याची व्यवस्था करी, नाही तर तो रागे भरायचा ! परंतु पुढे पुढे ते सर्व पचले. इतकेच नव्हे तर ग्रंथालयात युरोपियन अधिकारी आपली पुस्तके ठेवू लागले आणि त्यांतली आपण वाचवायास नेऊ लागले. अशाच एका अधिकाऱ्याने ॲनि-बेझंटच्या आत्मवृत्तापासून तो कृष्णमूर्तीच्या ‘ माझ्या गुरुदेवा ’पर्यंत थिऑसफीची अनेक पुस्तके दिली होती.

या सगळ्या ग्रंथांचे आम्ही अध्यवसायपूर्वक अध्ययन केले. तेथील ग्रंथ असा वाचल्यावाचून ठेवला नाही. कित्येक अनेकदा वाचले आणि राजबंदीतील अनेकां-कडून इतिहास, अर्थशास्त्र, शासनशात्र यांवरील पुस्तकांचे अध्ययन करविले. राजबंदिवानांचे विचार प्रगल्भ व्हावेत म्हणून निबंध लिहवून घ्यावेत. मागे वर्णिलेल्या रविवारच्या सभांतून त्यांची व्याख्याने करवावीत, ‘स्टेट’सारखी कठीण पुस्तके अगदी महाविद्यालयातील वर्गासारखी दहा-पाच जणांस एकत्र करून

शिकवावीत.

संस्कृत ग्रंथांपैकी आम्ही जी पुस्तके, काव्ये मागितली तेवढीच तेथे होती. बाकी एखाददुसरे पुस्तक कोणा दुसऱ्यांचे असेल नसेल. परंतु भाषांतराच्या पुस्तकांतच अनेक संस्कृत ग्रंथ मूळसुद्धा छापलेले होते. सर्व उपनिषदे, ऋग्वेद, रामायण, महाभारत, ब्रह्मसूत्रे, सांख्यसूत्रे, ईश्वरचंद्रांच्या कारिका, योगसूत्रे, इत्यादी संस्कृत ग्रंथांचे परिशीलन तेथे करता येई

बंगाली वा मराठी वा संस्कृत वा इंग्रजी वा हिंदी वा पंजाबी– नवीन पुस्तक प्रसिद्ध झालेले कळले की ते महत्त्वाचे दिसल्यास तिकडे मागविलेच गेले म्हणून समजावे. अशा रीतीने स्वदेशापासून आणि एका अर्थी जगापासून आम्ही दूर जाऊन बंद केलेले होतो तरी स्वदेशातल्या नाडीतील आंदोलने एकसारखी आमच्या हृदयात प्रतिध्वनित होत होती. जगातील प्रत्येक नवीन विचाराची लहर आम्हा जगद्बहिष्कृत निर्वासितांच्या मज्जापिठांच्या तटास स्पर्शल्याविना राहत नव्हती.

राजबंदिवानांच्या उच्च विचारास सारखी चालना देण्यासाठी, हे ग्रंथालय इतक्या मोठ्या स्वरूपास आले नव्हते तेव्हा आम्ही नाना युक्त्या योजीत असू. उदाहरणार्थ– एकदा हाच प्रश्न सर्वांसच टाकला की, पेशवाई बुडाल्यापासून हिंदुस्थानात नाव काढण्यासारखे राष्ट्रीय पुरुष असे कोण उत्पन्न झाले त्यांची नावे प्रत्येकाने सांगावीत. त्यांत ज्यास सर्वांत अधिक मते मिळतील असे शेवटी बारा निवडले जातील. एक आठवडाभर तीच चर्चा चालून शेवटी नामावल्या आल्या. पण त्यात सत्तावनच्या क्रांतिवीरांतील एकाचेही नाव कोणास सुचले नाही. राष्ट्रीय पुरुषांत सत्तावनच्या क्रांतिवीरांतील एकाने एक नाव काय ते सुचविले ! आणि ते त्या स्त्रीचे– लक्ष्मीबाईचे ! बाकीच्यांना तेही सुचले नाही. तेव्हा मग त्या इतिहासावर आम्ही अनेक वेळा बैठकीतून व्याख्याने, संवाद, व्यक्तिशः चर्चा केल्या. बंगालीत प्रसिद्ध झालेले रजनीकान्ताचे 'शिपाईयुद्ध' हे पुस्तक आणविले. त्या पुस्तकाचे नाव कसे चुकीचे आहे– ते क्रांतियुद्ध शिपायांचे युद्ध कसे नव्हतेच हे विशद करण्याचा प्रयत्न केला. पुढे प्रत्येकाचे तोंडी तात्या टोपे, नानाराव पेशवे, कुँवारसिंग, लक्ष्मीबाई इत्यादी नावे रुळलेली असत.

थॉमस एकेंम्पिसंचे 'इमिटेशन्स्' हे आमचे फार आवडते पुस्तक असे. कुराण इंग्रजी भाषांतरात प्रथम वाचले. नंतर बंगाली भाषांतर चाळले; हिंदुस्थानच्या तटास पोचल्यावर मराठी भाषांतर चाळले; त्याव्यतिरिक्त, अगदी मूळ वाचले म्हणजे त्याचा खरा स्वाद मिळेल असा माझ्या मुसलमान मित्रांचा अभिप्राय पाहून त्यांच्याकडून प्रत्येक पान त्यांच्यासारखेच शुचिर्भुत मने एकाग्र बसून वाचून आणि हिंदी भाषांतर करवून ऐकले. महंमद अल्ली (इंग्लंड) यांनी कुराणास नवीन पाश्चिमात्य ज्ञानेत्रातून पाहून केलेले अगदी आधुनिक भाषांतरही वाचले. बायबल

समग्र मागे दोनदा वाचल्याचे लिहिलेच आहे. उपनिषदे, एकदा मुख्य दशोपनिषदातील एकेक घेऊन एकेक महिना त्यावर रात्रीरात्री विचार करीत वर्षभर अभ्यासिली. योगावासिष्ठही एकदा वाचावे म्हणून सहज घेतले, तो त्याची गोडी इतकी लागली की वेदान्तावर झालेल्या आमच्या अवलोकनात आलेल्या ग्रंथांत असा सुंदर ग्रंथ विरळा असे वाटू लागले. काय ते निरपवाद सिद्धान्त– आणि काय ती सुंदर कविता की जिच्या मोहक मुखातील मधुर सुस्वरात ते सिद्धान्त श्रवणास आणि मनास तल्लीन करीत आत्म्यास परिसावयास मिळतात. तत्त्व आणि कविता यांची सांगड संस्कृत कवीच घालू शकतात. भगवद्‌गीतेचा विश्वदर्शनाचा अध्याय पहा, किंवा कालिदासाच्या काव्यांतील विष्णुवर्णनाचे श्लोक किंवा कुमारसंभवातील ' स्वयंविधाता तपसः फलानाम् केनापि कायेन तपश्चचार ! ' अशी, आकाशासारख्या अनाकलनीय व्यापक अर्थाला एखाद्या सुंदर सरोवरासारख्या श्लोकांत चटकन प्रतिबिंबित करणारी सरस वचने पहा !

आणि खरोखरच कवितेचा आणि तत्त्वाचा विरोध असणेच अशक्य आहे. कविता सौन्दर्यास भुललेली, आणि सौन्दर्य तेच की जे निरपवाद परिपूर्ण आनंद देते. तेच सत्य ! इंद्रियमनबुद्धी यांच्या विरोधाचा लवलेश वाव न उरू देता जे शंकाकुल आत्म्यास एकाएकी निःसंशय आणि संपूर्ण समाधानात डोलविते ते सत्य, तेच समाधान– समाधीचे सौन्दर्य ! – आणि म्हणूनच कविता तेथेच, " कंठे स्वयंग्राह निषिक्तबाहुः " होऊन आपल्या कामाची परम तृप्ती पावते.

( ' माझी जन्मठेप ' )

## ४. ‘ मरणोन्मुख शय्ये ’वरील चिंतन

( अंदमानात असताना सावरकरांची प्रकृती अत्यंत क्षीण झाली. मज्जातंतूंच्या क्षीणतेमुळे वाचनही करवेना. रुग्णालयात नुसते तळमळत पडावे लागले. अशा वेळी एकांतातील त्या ओसाड वेळात ‘ प्रतिप्रसव ’ विचारांनी कारागारात वाटणाऱ्या मनाच्या उद्वेगाशी आणि देहाच्या क्षीणतेशी भांडत बसण्यापलीकडे काहीही करणे अशक्य झाले. मृत्यूचे– आत्महत्त्येचे विचार मनात प्रबळ झाले. मरणानंतरच्या सर्व उपपत्तींचे विचार मनात घोळू लागले. अशा अगदी क्षीणतेच्या एका दिवशी जीवनाचा शेवटचा निरोप म्हणून ‘ मरणोन्मुख शय्येवर ’ ही कविता त्यांनी लिहिली. एका विचारघन कवितेच्या निर्मितीची ही प्रक्रिया, त्या निर्मितीमागील तत्त्वज्ञ कवीचा मनोव्यापार या कवितेत प्रतिबिंबित झाला आहे.)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
3034
दा. क्र. २७९८३
शाखा (स्थळ प्रत)

युद्धाच्या उत्तरार्धातील ह्या सार्वजनिक उलाढाली चालल्या असताच मागे उतारा दिलेल्या पत्रांत उल्लेखिल्याप्रमाणे आमची प्रकृती दिवसेंदिवस खंगत चालली. जेव्हा आमांशाचा विकार अगदीच विकोपास गेला आणि प्रत्यही शंभरपर्यंत ताप अंगात राहू लागला तेव्हा कुठे एकदाचे आम्हास जरा नीट व्यवस्थेने रुग्णालयात नेण्यात येऊन उपचार सुरू झाले. कोणत्याही बंदीवानांस रुग्णालयातील थोडा बहुत आराम आजारीपणात कारागारात येताच मिळू शके. आमचा आजार इतका विकोपास गेल्यावर आजारीपणात रुग्णालयांत शुश्रूषा केली जाण्याची ती सवलत आम्हास आठव्या वर्षी देण्यात आली. नाही तर आजारी झालो तरी कोठडीबंदी काही सुटली नव्हती.

एकदा रुग्णालयात नेले गेल्यावर मग पर्यवेक्षकाने कारागारात शक्य तितकी आमची व्यवस्था केली. अन्न वारंवार पालटून पचेल तसे देवविले. या परिवर्तनास मूळ कारण आमच्या पत्रांनी हिंदुस्थानामध्ये विधिमंडळात आणि वृत्तपत्रांत चालू झालेली चर्चा होती. परंतु ही बरी व्यवस्था इतक्या विलंबाने झाली की प्रकृती सुधारेना, अंगात ताप भरे तो उतरण्यास क्विनीन एकसारखे देण्यात येई. त्यामुळे आमांश आणि रक्ताची आव वारंवार त्रास देऊ लागली. पोर्टब्लेअर– म्हणजे अंदमान– मध्ये क्षय आणि आमांश आणि मलेरिया हे बहुधा हातात हात घालून चालत. आम्हांस आमांश व मलेरिया लागला होताच. सहा-सात महिन्यांनी क्षयाची शंका आम्हांसच नव्हे तर डॉक्टरनाही येऊ लागली हे साहजिकच होते. त्या रुग्णालयात आमच्या आजूबाजूस चांगले दृढकाय असलेले धष्टपुष्ट राजबंदी आणि बंदी क्षयास, आमांशास आणि मलेरियास बळी पडत होते. तेथे आमच्या आठ-आठ वर्षे तुरुंगाच्या विषारी छायेखाली खुरजटून गेलेल्या प्रकृतीचा काय पाड ? आमांशाच्यामुळे अन्न वर्ज्य, अन्नाभावामुळे अशक्तता वाढली. मज्जातंतू अगदी क्षीण झाले. कारागारात मन रंजविण्यास नव्हे तर आत्म्यासही समाधान देण्यास एकच काय जे साधन असे ते म्हणजे वाचन ! पण त्या तांतविक क्षीणतेने ते वाचन वा बौद्धिक संवादही झेपेनासे झाले. जरा वाचले वा बौद्धिक संवाद केला की ताप झटकन एक दोन अंशांनी वर चढे, म्हणून वाचन सोडले. पुस्तके जवळ देखील ठेवीनासा झालो. खाटेवर पडून असावे. त्यामुळे कारागारांत आधीच दुर्धर वाटणारी वेळेची लांबी अशी कंटाळवाणी दीर्घता पावावी की बोलून सोय नाही, आणि तो लांबलचक

वेळ आमांशाच्या वेदना किंवा तापाच्या भणभणीत काढावयाचा. तरी त्याही स्थितीत मागच्या प्रकरणातून वर्णिलेल्या सार्वजनिक खटपटी तसाच शक्य तो करीत राहिलो.

एखाद वेळी वाटे की कारागारात आपण आजारी पडलो म्हणून आपल्यास कारागाराचा विशिष्ट त्रास येतो आणि बाहेर असतो तर बरे असे वाटते. पण कारागारावरच सर्व दोष लादणे अन्याय्य आहे. बाहेर तरी काय ! जे बाहेर आहेत ते काय ह्या रोगांनी आजारी पडत नाहीत की काय ! मलेरिया, आमांश आणि क्षय ह्यांना राजवाड्यांतूनही मज्जाव नसतो. प्लेगच्या साथी, इन्फ्लुएन्झाचा भडिमार सुरू होतो तेव्हा मुंबईसारख्या– नाटकगृहांनी आणि विलासांनी आणि विद्युत दीपांनी झगझगलेल्या– नगरातूनही घरोघर मरणाचे कण्हणे ऐकू येत नाही का ? एकेका घरात चार चार माणसांची अंथरुणे पसरलेली नसतात काय ? मग आपण कारागारात आहोत या भावनेने जी एक दुःखाला तीव्रता प्राप्त होते ती बहुतांशी निरर्थक आहे. कारण बाहेरही ही दुःखे भोगावीच लागतात. अशा शेंकडो झोपड्या आहेत, अशी शेकडो गावे आहेत की जेथे हजारो दीन दरिद्री मनुष्य ह्याच आजारांनी तळमळत पडले असताना तुला कारागारांत जो डॉक्टर, जी शुश्रूषा, जी औषधे मिळत आहेत त्यांचा लवलेशही लाभ त्यांना मिळत नाही ! तुझ्या कारागारातील या परतंत्र दुर्दशेहूनही त्यांची ती स्वतंत्रतेची दुर्दशा अधिक असह्य आहे. मग आजाराचे दुःख तेवढे सोस ! कारागारात आहे म्हणून मी आजारी पडलो असे कुथत त्या आजाराचे दुःख कारागाराच्या कल्पनेने अगदी दुस्सह करू नकोस. कारागारात नसतो तर किती चांगले झाले असते ! ही तुझी हुरहुर इतर दृष्टींनी खरी असली तरी आजारीपणाच्या विषयात तो तितकी खरी नाही. कारण आजार आणि त्याचा सेनापती मृत्यू हा कारागारात वरचेवर भेटतो हे जरी खरे असले तरी बाहेर अगदी भेटतच नसतो असे नाही. कारागारीय जीवन बाहेरच्या जीवनाहून फारसे अगदी निरर्थकही नाही, कंटाळवाणेही नाही, शिळेही नाही, एकसारखेही नाही, हे तत्त्वतः झाले. व्यवहारात पाहिले तर जर बाहेरच्या स्वातंत्र्यादिक राष्ट्रीय चळवळी किंवा वैयक्तिक जीवनातील भातुकली सार्थ आणि गंभीर असतील तर हे कारागारीय जीवनही अगदी तसे नाहीच असे नाही. त्या राष्ट्रस्वातंत्र्याच्या महान ध्येयासाठीच हे कारागीर, हा बंदिवास, ही तपस्या तू आणि तुझे हे सहतपी आचरीत आहेत. त्या ध्येयाच्या गांभीर्याचे तेज परावर्तित होत असल्याने तुझ्या कारागारीय जीवनातील लहान सहान गोष्टीही बाहेरील मोठमोठ्या जीवनघटनांप्रमाणेच तेजस्वी आणि आदरणीय आणि महत्त्वाच्या भासणाऱ्या आहेत. रशियाच्या झारच्या किंवा एखाद्या रासपुतीनच्या विलासी व राज्यव्यापी उलाढाली लोक जितक्या उत्सुकतेने वाचतात त्याहून अधिक उत्सुकतेने आणि पूज्य बुद्धीने रशियातील एखाद्या

अलेक्झांडरला मारून सैबिरियांत सडत पडलेल्या क्रांतिकारकांच्या वैयक्तिक आणि लहान सहान हालचाली केव्हा केव्हा वाचल्या जातात. राजवाड्यावर केन्द्रित झालेले नसते इतके एकाग्रतेने सार्वजनिक लक्ष केव्हा केव्हा निर्वासितांच्या झोपडीं-वर किंवा दंडितांच्या कारागारीय अंधारकोठडीवर विद्ध झालेले असते आणि नसते तेव्हा देखील राष्ट्रीय उष:काल यावयास त्या अंधारकोठडीतील अंधाराच्या घटिका मोजीत बसणे अत्यंत अवश्यच असते आणि म्हणूनच अत्यंत महत्त्वाचे असते, मग कारागारातील जीवन केवळ कारागारीय म्हणून बाह्य आणि स्वतंत्र जीवनाहून हीनतर किंवा व्यर्थतर का वाटावे ?

स्वतंत्र जीवन ? वेड्या मना, ह्या कारागाराच्या भिंतीबाहेर का स्वातंत्र्य आहे ? ह्या दगडी भिंतीपलीकडे सृष्टीनियमांच्या भिंती आहेत ! मनाला 'इच्छेच्या क्षितिजाच्या भिंती, ' आहेत ! ह्या कारागाराच्या भिंतींनी तू जितका बद्ध झाला आहेच तितकेच ते बाहेरचे तुला स्वतंत्र वाटणारे लोकही बद्ध झाले आहेत. थोडक्यात म्हणजे जे कारागारात तेच बाहेर, हे प्रमाण अधिक-उणे असेल, पण प्रकार एकच.

आणि करमणूक ? ही काय करमणूक ! ह्या पहा ह्या पुस्तकाच्या दोन पृष्ठांत मुंग्यांनी आपली राजधानी बांधली आहे.

आजारांची जी गोष्ट तीच कंटाळ्याची. कारागारांत जीवन एकसारखे आणि निरर्थक वाटते. पण तत्त्वत: पहाता बाहेर तरी काय आहे ? तू बंदी आहेस; पण हा बंदिपाल आणि हा पर्यवेक्षक तर बंदी नाहीत ना ? पण काय फरक आहे ! तेही प्रत्यही उठतात, कार्यालयात बसतात, तेच ते लिहितात. खातात, निजतात ! पुन्हा उठतात– पुन्हा निजतात. त्यांचेही जीवन कोणाचे मोठे सार्थकत्व पावते आहे. लग्ने झाली, मुले झाली, पेन्शन मिळाले, हे सार्थक ? लहान मुलेही भातुकलीत हे खेळ खेळतात. त्या पोरखेळाहून या संसाराचा काही तरी अधिक अर्थ तुझ्या कारागारीय अन्वयाने, दृष्टीने लागतो का ? तत्त्वत: दोन्हीही खटाटोप व्यर्थ आहेत. कारण आईबापांच्या कडेवर वाढावे, मग त्यास स्मशानात पोचवून मुलाबाळांस कडेवर वाढवावे, आणि मग आपण स्मशानास पोचावे-कशासाठी ? काय मिळते ह्या सर्व खटाटोपांत ? हे चक्रही एकसारखे आणि कंटाळ-वाणेच नाही का ? आचार्यांनी विचारलेला प्रश्न 'तत:किं' हा तुझ्या कारागारीय परवश चळवळीस जितका लागू आहे, तितकाच तो बाहेरच्या महायुद्धांच्या चळवळींसही लागू नाही का ? या फ्रान्स आणि जर्मनीने कितीदा हेच युद्धाचे पोर-खेळ केलेले आहेत ? फ्रँक लोकांची गॉलवर स्वारी झाली तेव्हापासून आजपर्यंत-आज फ्रान्सने विजय मानावा की उद्या जर्मनीपुढे नाक घासून काळसुतकी वेष धारण करावा. आज नेपोलियन पहिला की उद्या नेपोलियन तिसरा; बाजीराव पहिला

की उद्यां बाजीराव दुसरा ! ह्यांत ह्या एकसारखेपणात, ह्या चूलबोळक्यांच्या मांडामांडीत आणि मोडामोडीत हा उभा संसार कोणाचा अर्थ साधीत आहे ? जिकडे तिकडे तेच ते एकसारखे. पण कंटाळा, निरर्थकता, तत्त्वतः कारागृहाचे कोठडीच्या दारावर नव्हे तर संसाराच्या प्रत्येक राजवाड्यावर, ताजमहालावर, पर्वतावर आणि समुद्रावर हीच पाटी टांगलेली असते की " ततः किं ! " मग कारागारांत आहेस म्हणून विशेष वाईट वाटून का घेतोस ! जे कारागारात तेच–

बातमी ! बातमी ! ह्या बातमीच्या लालसेची तीच स्थिती. कारागारात बातमी मिळत नाही, आणि बाहेर मिळते म्हणून कारागार असह्य वाटते ? हे पहा, कोणाच्याही बातमीने अंतिम समाधान होणार आहे का ? अगदी हिंदुस्थान स्वतंत्र झाले; तरी मना ! चिरकालिक अशी काही तरी शाश्वती मानता येईल का ? हिंदुस्थान स्वतंत्र झाले; पुन्हा वैभवाने शिथिल झाले; पुन्हा परतंत्र झाले; तो इतिहास पहा. ह्या पिढीने स्वातंत्र्यार्थ लढावे, पुढील पिढीने ते भोगावे; तिसरीने ते गमवावे, पुन्हा सहावे, लढावे, मरावे, भोगावे, गमवावे– प्रत्येक राष्ट्राचा, प्रत्येक राजकुलाचा, प्रत्येक समाजाचा उभा इतिहास, सर्व बातम्या, ह्या तीन चार वाक्यांत भरलेल्या आहेत. एवढ्या एकदा ऐकल्या की पुन्हा बातमी म्हणून उरत नाही. कारण सर्व उलाढालीतील अगदी निर्णायक, अगदी शेवटची, म्हणजे प्रलय ! ही प्रभव विश्वाची पहिली बातमी. ती आता शिळी झाली आहे. आता जी अगदी ताजी बातमी म्हणून ऐकू येणार तो प्रलय ! बस्, प्रभव ते– प्रलय, ह्यात सर्व बातम्या आल्या. आणि त्या दोन्ही तुला कळल्या आहेत. मग कारागारामध्ये बातमी नाही म्हणून विशिष्ट दुःख का मानतोस ? नुसत्या पोरखेळाच्या बातम्या भातुकलीच्या बातम्यांहून तत्त्वज्ञांस अधिक रंजनार्ह कशा वाटणार ! ह्या क्षणिक आणि उत्पत्ती, लय, अभव, प्रलय, जन्म, मृत्यू या लंबकामध्ये कुठेतरी हेलकावा खाणाऱ्या बातम्या आलेल्याच आहेत. त्या इतक्या क्षणिक आहेत की त्यांतील कोणतीही बातमी शेवटची म्हणून म्हणता न आल्याने ही बातम्यांची तृष्णा कधीही समाधान करणे नाही– मग तू कारागारात बस किंवा जगात अगदी वाऱ्यासारखा मोकळा सूट ! गेल्या महिन्याच्या बातमीसाठी कारागारांत चुटपुट लागते तर गेल्या तासाच्या बातमीविषयी अमेरिकेत चुटपुट लागते. कारण तिकडे प्रतिप्रहरी नवे पत्र निघते म्हणून गेल्या प्रहराची बातमी शिळी वाटून ताज्या प्रहराची बातमी मिळविण्यासाठी मन लोलुप आणि व्यवसायातील बाजारभावामुळे चिंतातुर होते. उद्या पृथ्वीवरील सर्व बातम्या क्षणोक्षणी कळू लागल्या तर मनुष्य मंगळावरील बातमी ऐकण्यासाठी असाच चुटपुट करीत बसेल की तू जसा या कारागारात हिंदुस्थानिक बातमी ऐकण्यासाठी बसला आहेस.

तेव्हा तत्त्वतः पाहिले तर कारागारातील तुझे जीवन बाहेर जे स्वतंत्रपणे फिरत आहेत, त्यांच्या जीवनाहून अगदीच व्यर्थ नाही. ती पहा मुंग्यांची नगरी, लोकसंख्येने अगदी पाटीलपुत्रांत नव्हती इतकी ती गजबजली आहे. ती अंडी, ती त्यांची राणी, ती त्यांची राजकन्या, त्या त्यांच्या लढाऊ मुंग्या म्हणजे खडे क्षत्रिय सैन्य पहा. मुंग्यांतही चातुर्वर्ण्य सुप्रतिष्ठित आहे. श्रम विभाग आहे. ते पलीकडे आकाशात तुझ्या डोळ्यांपुढे तरंगत फिरणारे तिळाहून दसपट सूक्ष्मतर असणाऱ्या घुंगुरटांचे राष्ट्र पहा. थवाचा थवा ज्यू लोकांच्या फिरत्या अवस्थेतील राष्ट्र प्रमाणे एकत्रित उडत प्रवास करीत चालला आहे पहा. आणि त्या घुंगुरटास यत्किंचित लेखू नकोस. येवढा तू मनुष्य पण तुला पंख नाहीत. पण त्या तिळाच्या दहाव्या तुकड्याएवढ्या त्या घुंगुरटास बघ ते पंख. त्यांतील स्नायू किती सूक्ष्म असतील पण किती कार्यक्षम! ते ईश्वरी कौशल्य निरीक्षण कर, ही काय करमणूक नाही ? मोठेमोठे शास्त्रज्ञ केवळ कृमीकीटकाचे वा पशुपक्ष्यांचे जीवनक्रमाचा अभ्यास करण्यासाठी आयुष्याचे आयुष्य एखाद्या वारुळापुढे वा मधाचे पोळ्यापुढे बसून काढतात. ते जर निरर्थक, तुच्छ नसेल तर तुझे तरी आयुष्य ह्या कारागारात निरर्थक जाते आहे म्हणून का म्हणावे ?

किंवा ही करमणूक पहा. ती मांजरे प्रत्यही उत्तररात्री आपली प्रीतिगीते गात फिरतात. इतक्यात एखादा प्रतिस्पर्धी येऊन त्या रतिगीतांचे पर्यवसान रणगीतात होऊन भयंकर रण माजते. का ? उपहास्यास्पद वाटते हे सारे ? पण मग रामायण तरी काय आहे ? या दोन मांजरांसारखीच दोन मनुष्ये कामातुरतेत प्रतिस्पर्धी झाली आणि त्यांचे भांडण जुंपले. ही मांजरे नखांनी ओरबडतात. आणि तोंडानी भयानक गर्जना करतात. ते भाला, तलवार, त्रिशूल घेऊन बोचकारीत होते आणि दुंदुभीच्या तोंडानी गर्जना करीत होते ! बाकी मनोविकारांचे तीव्रत्व आणि गंभीरत्व आणि व्याकुलत्व उभयपक्षी समान होते. मांजरास ह्या बोक्यांची लढाई आम्हांस रामरावणांची वाटली तितकीच महत्त्वाची वाटत असणार हे उघड आहे. विकासवादाच्या भाषेत बोलायचे म्हणजे हे मार्जारायणच विकास घेत घेत रामायणात परिणमित झाले आहे.

विकासवादाची गोष्टच निघाली म्हणून तेही पहा. जीवनकलह हे विकासाचे जसे विघटक साधन आहे तसे अपत्यसंगोपन हे संघटक साधन म्हणून विकासशास्त्रज्ञ म्हणतात, जीवनकलहाचे तत्त्वानुरूप त्या मार्जारायणाचाच रामायण हे विकास आहे. तसेच ह्या अपत्यसंगोपनाचे तत्त्वानुरूप ' मेरी ' चे किंवा यशोदेचे मातृप्रेम हा त्या गृहपालित मादीच्या प्रेमाचा विकास आहे. ते पहा कारागारीय डॉक्टरचे अंगण आणि त्यात आपल्या दहा-बारा पिलांस मागे पुढे घेऊन खेळवीत आणि मधूनच त्यांस कुकूचीकूचे मंजूळ पाळणे म्हणत चाललेली ती कोंबडी. पहा

त्या घारीच्या झेपेपासून कसे आपले पिल्लू वाचविले. पूतनेच्या झेपेसरशी यशोदा कळवळली असेल तसा त्या घारीची झेप आपल्या पिलांवर पडताच तिचा जीव कासावीस झाला. पहा ते सृष्टीचे कौतुक. लहान मुलांचे खेळ किंवा शाळेतील चढाओढी पाहण्यास दर्शिक (तिकीटे) काढून लोक जातात. हा ह्या लहान पिलांचा थवा. त्या त्यांच्या उडचा, ती कुलकुल किलकिल, ती दाणे टिपण्यात चढाओढ आणि त्या आट्यापाट्या, तशाच मनोरंजक नव्हेत काय ? त्यांच्या मनात तेच खेळाडू भाव आणि तोच आनंद उचंबळत आहे. जीवन हे जीवोजीवी समसंवेदन झालेले असते. केवळ सहानुभूतीने ते जगून पहा.

रुग्णालयात आणि जिथे जवळजवळ एक वर्ष काढल्यानंतर पुन्हा जेव्हा पाच क्रमांकाच्या चाळीच्या तिसऱ्या तळावर (मजल्यावर) अगदी एकान्तात आम्हांस ठेवण्यात आले तेव्हा त्या ओसाड वेळात अशा ' प्रतिप्रसव ' विचारांनी कारागारात वाटणाऱ्या मनाच्या उद्वेगाशी आणि देहाच्या क्षीणतेशी भांडत बसावे. केव्हा केव्हा प्रत्यही एक ना एक दुखणे मागे लागल्याने वाटावे की आता हे देहवस्त्र अगदी पांघरता न येण्याइतके जीर्ण झाले यात शंका नाही. पण क्वचित प्रकृती पुढे सुधारेलही. पण वाट तरी किती पहावयाची ? सहा महिने वर्ष·दीड वर्ष गेले. आज आमांश, उद्या रक्तामांश, परवा ताप, तेरवा आणखीन काही असे सोशीत राहिलो. शेवटी निश्चय केला की हे कारागार काही आम्हास सुटण्याचा संभव दिसत नाही. आणि हे कारागार सुटत नाही तोवर प्रकृती सुधारत नाही. मग पुढे उपयोगी पडेल म्हणून कसेबसे तोलून धरलेले हे शरीर– द्या ना फेकून एकदाचे. सुखासाठी सर्व खटाटोप. दुःखात रडत कुठवर बसा, असे म्हणून महिन्यातून किती दिवस देह-धारण सुसह्य असते आणि किती दिवस त्रासदायक होते ते ठरविण्याकरीता भिंतीवर गणती ठेवली. प्रत्यही आजार वा त्रास झाला किंवा दिवस बरा गेला ते भिंतीवर टिपावे असे दोन महिने गेले. नंतर घेतली बेरीज. पाहतो तो साठ दिवसात पंधरा एक दिवस प्रकृती जिवंत रहावेसे वाटावे इतकी बरी होती असे दिसले. तर मग अजून सर्वच दुःखमय नाही. पंधरा दिवस तरी हा देह सुखमय होतो. पहावे तर मग जगून आणखी थोडे !

पण अशा नुसत्या मनाच्या मनोऱ्यावर कोणास थोडेच सदोदित राहता येते? वस्तुस्थितीचा गुरुत्वमध्य खेचून त्यास खाली ओढण्यास थोडाच सोडतो ? असेच एकदा ओढले जाऊन आम्ही अगदी मरणाच्या गर्तेच्या टोकावर लोंबकळत पडलो. रुग्णालयात शरीर अत्यंत क्षीण, ९५ पौंडावर वजन आलेले, पोटात अन्न म्हणून जात नाही, क्षयाची चिन्हे, ताप नेहमी अंगात कणकणत असलेला, आपले असे जवळ कोणी नाही, शत्रूप्रमाणे लेखलेल्या आणि लेखणाऱ्याच्या बंदीत, अपमानात, निराशेत, कोणाशी प्रेमाचे शब्द बोलावयाची चोरी, थोडे खालीवर बसण्याउठण्याची

चोरी–अशा स्थितीत दोन तीन महिने प्रकृती इतकी विकोपास गेली की केव्हा मृत्यूचा हिसडा बसेल आणि जीवनाचा धागा तुटेल याचा मुळीच कोणास भरवसा वाटेना. जगावयाचे म्हटले तरी जगणे अशक्य होणार असे दिसू लागले.

तेव्हा वाटावे त्या रुग्णालयात आता मरण येणार ! मग पुढे काय ? प्रत्यही बौद्धांच्या शून्यवाद, ज्ञानवाद, विज्ञानवादापासून तो हेनकेल हर्बर्टच्या " सब्स्टन्स " आणि विकासवादापर्यंत मरणानंतरच्या सर्व उपपत्ती मनात विवंचून पहात बसावे. मीमांसेपासून मीलच्या उपयुक्ततावादापर्यंत 'धर्माच्या' म्हणजे कर्तव्यकर्माच्या स्वरूपाचा उहापोह विवरणून पहावा. अशाच अगदी क्षीणतेच्या एका दिवशी जीवनाच्या शेवटचा निरोप म्हणून ती 'मरणोन्मुख शय्येवर' ही कविता केली. ती करताना ती वाचावयास आम्ही जगू अशी खरोखरच काही आशा नव्हती.

(माझी जन्मठेप)

# ५ : वैनायक वृत्ताचा विशेष

(मराठी कवितेत यमकादी विशेष असलेली जुनी द्विचरणी व चार चरणी रसानुकूल वृत्ते असूनही व त्या वृत्तांतून दीर्घकाव्याची रचना सरसपणे केली जात असूनही आपण 'वैनायक' या नवीन वृत्ताची निर्मिती का केली याचे प्रदीर्घ विवेचन सावरकरांनी खालील निबंधात केले आहे. सावरकरांच्या कवितेतील आशय उत्तरोत्तर विचारघन होत गेला आणि त्यात 'वीररसात्मक व गंभीर प्रवचनात्मक विचारास' अधिक स्थान मिळाले. आवेश, भव्यता, गांभीर्य, तेजस्विता या गुणविशेषांनी त्याला विलक्षण घनता प्राप्त झाली. आणि सावरकरांनीच म्हटल्याप्रमाणे 'जुन्या वृत्तांच्या लहान घडीव फुलपात्राहून या वैनायकवृत्ताचे विस्तृत आणि वाहत्या महान ओघाचे हे वृत्तपात्र दीर्घकाव्यबंधाच्या प्रवाहास अधिक अनुकूल झाले. त्या जुन्या वृत्तांमध्ये स्वतःचेही काही सौंदर्य-विशेष असणाऱ्या एका नव्या वृत्ताची वांच्छनीय भर पडली.')

साधारणत: असे म्हणू या की तालसुरांचे संस्कार नसलेलं जे लिखाण वा भाषण ते गद्य. वरील संस्काराचा, निदान तालाचा संस्कार, ज्यावर झालेला आहे, ते पद्य.

आपले विचार अगदी, मनात उठतात त्या शब्दांतच स्पष्ट आणि विस्तारशः व्यक्तविण्याचे साधन म्हटले म्हणजे गद्यच होय. परंतु तेच विचार तालसुरावर, म्हणजेच पद्यांत, व्यक्तविले गेल्यास आपणांस दुहेरी समाधान होते; त्या विचारास शब्दांत व्यक्तविण्याने मनाचे आणि शब्दांस तालसुरांच्या मंजुळतेची जोड लाभल्याने श्रुतीचे. या श्रुतिमंजुलतेची जोड आपणांला इतकी हवीशी असते की अगदी नीरस वाक्येही तालसुरात म्हटली जाताच वाटतात त्याहून सरस वाटू लागतात. तिशीपाढे म्हणजे कोण रूक्ष प्रकरण; पण मुलांमुलींच्या शाळेतील वर्गचा वर्ग जोडीजोडीने जेव्हा तेच पाढे तालासुरांत म्हणू लागतो तेव्हा तो 'परवचा' अगदी ऐकावासा वाटू लागतो! त्यामुळेच अगदी निर्भेळ गद्य बोलता बोलता हरदास पुराणिक मधेच रंगात आले की तेच गद्य गळ्यावर बोलू लागतात. काही वक्तेही एक प्रकारच्या सुरात आणि ठेक्यात आपल्या भाषणातील भावनोद्दीपक गद्य वाक्ये उच्चारीत जातात. गद्यालाही गळा लावतात.

पण गळा म्हटला की कसल्यातरी सुराचे, तालाचे बंधन आलेच. नुसत्या शब्दापेक्षा तालासुराच्या श्रुतिसुखदेची गोडी असणाऱ्या शब्दांची मनुष्याला ही जी स्वाभाविकत:च अधिक आवड असते, तीतच पद्याचे मूळ आहे. त्या आवडीसाठी मनुष्य गद्यात असणारी, वाटेल तसे बोलत जाण्याची सोय आपण होऊन सोडून देतो आणि तालासुरांची बंधने हौसेने स्वीकारतो, पद्याचा आश्रय करतो.

ही गोष्ट झाली साध्या विचारांची, भावनांची. पण जेव्हा त्या भावभावना अगदी उत्कट होतात, इतक्या अधीर होतात की मुळी शब्दांच्या आटोक्यात राहूच शकत नाहीत, तिथे गद्य की पद्य ही निवड करणेच अशक्य होते. हृदयाला दुर्धर वा दुस्सह झालेल्या भावभावनांचा आवेग स्पष्ट शब्दांच्या बिंदु-बिंदूंनी व्यक्त होण्या-इतका जेव्हा असा संयतच राहू शकत नाही, तेव्हा तो स्वयमेवच सुरांच्या धारा-प्रवाहात वाहू लागतो. गद्याचे तर नव्हेच नव्हे; पण शब्दमय पद्याचे आटोक्यात न राहून गीतपद्याच्या, गाण्याच्या, तानेच्या, ओघात सहजच सापडतो. सहज शब्दांत दुःख सांगणे हे गद्य. पण शब्दांत व्यक्त होईतो ते दुःख न आवरता येऊन अकस्मात

अनावर रडे कोसळते ते पद्य, सहज गाणे. अनावर रोदन, अनावर हसू, दबते उसळणारे स्फुंदन, अकस्मात वाजवून जाणारी शीळ ही सारी सहज पद्येच होत. आपण 'गळा काढून' रडतो. 'ताला'वर हसतो, 'राहून राहून' हुंदके देतो. भावभावना, आपली शब्दांत न सामावणारी उत्कटता व्यक्तविण्यास असा 'गळ्या'चा, 'ताला'चा, पद्याचा, स्वभावतःच आश्रय घेतात. किंबहुना शोकाचे आणि आनंदाचे हे रडगाणे आणि धिंगाणे हेच मनुष्याचे पहिले उपजत गाणे, पद्याचे मूळ! आणि त्यांचे उसासे नि उद्‌गार, हुंदके नि हसू, हीच आद्यवृत्ते, उपजत छंद ! आद्य कवीचे अनुष्टुभदेखील त्यानंतरचे !

पद्याचा सूर, गीतांची 'तान', हा मनोवृत्तींच्या अशा आवेगाला संतत वेगाने वाहण्याचा पाट आहे. त्यांचा ओघ शब्दबंधाऱ्यास फोडून, ओसरेतो ताणून ज्यात वाहविला जातो तो सूर, ती तान. त्यासाठीच भावनेचा उत्कट उद्रेक स्वभावतःच पद्यांचे रूप घेतो, गद्याचे नव्हे. म्हणूनच तान, सुरेलपणा वा ताल नाही ते पद्यच नव्हे. ज्या पद्याचा ताल सुटला त्याचा ताळच सुटला. जे गीत बेसूर, तेच भेसूर ! ते केवळ गद्य.

ज्यास असे कोणचेही बंधन न पाळल्यानेच आपल्या भावभावना व्यक्तविण्याची इच्छा होते, त्यातच त्या व्यक्तविल्याचे समाधान वाटते, त्याने तशा तालतानेच्या, सूर-बेसूराच्या, 'बंधनांचा' आश्रय न घेता सुचतील त्या शब्दांत त्यांस सुखेनैव व्यक्तवाव्यात; पण त्यास गद्य म्हणावे. पद्याचा ज्यात कोणताही विशेष नाही त्यास पद्य असे नुसते म्हटल्याने कोणती विशेष शोभा येणार आहे !

काव्याचा आत्मा रस. तो गद्यातही प्रतिभावान लेखकांस पुष्कळ प्रमाणात साधता येतो. काही छंदःशास्त्रज्ञ गद्यालाही एक वृत्तच समजतात. काही गद्य काव्ये कितीतरी रसाळ असतात ! आणि रस नसल्यामुळ नुसती 'पद्य' म्हणून म्हणवून घेणाऱ्या काही कविता कितीतरी नीरस असतात ! तेव्हा पूर्ण 'बंधन' विरहित अशी काव्यरचना ज्यास करावयाची त्याने गद्याचा आश्रय करावा. फार तर ठरीव साच्याची वैय्याकरणी वाक्यरचनाही सोडून लिहिलेल्या या अशा गद्यास 'स्वैरगद्य' म्हणावे.

पण ही बंधने नसलेले असे स्वैर पद्य मात्र होऊच शकत नाही. किंबहुना पद्यात ही 'बंधने' बंधने म्हणून वाटतच नाहीत. वर दर्शविलेल्या भावभावनांच्या उद्रेकाची स्वाभाविक प्रवृत्तीच तालात, सुरात, गळ्यावर व चालीवर, व्यक्त होण्याची असल्यामुळे त्यांचे जेव्हा पद्यावाचून समाधानच होत नाही तेव्हा त्यांना ती बंधनेच, आलिंगनाच्या बंधनासारखी, गोड गोड वाटतात. हे बंधनच त्यांचा स्वैराचार असतो.

त्याच कारणासाठी यमक, अनुप्रास, ध्वनी, प्रभृती शब्दालंकारांची आणि

अर्थालंकारांची ‘ बंधनेही ’ कविता हौशीने धारण करते की जशी कामिनी सोन्याचा कंबरपट्टा, मोत्यांचा हार, रत्नाच्या अंगठ्या अंगावर घालते. ही बंधने मन मोडणारी बंधने नव्हेत तर मनास येणारी बंधने असतात. ती असणेच इष्ट वाटते. नसली तर चुकलेसे वाटते. कवितेचे लावण्य त्यांनी अधिकच खुलून दिसते. कवितेवर कवी ती बळाने लादीत नाही तर कविताच कवीपाशी ते सुवर्ण अनुप्रास-यमकादिक अलंकार ‘ मला घाला ’ म्हणून लडिवाळ छंद धरीत सारखी विनवीत असते की, “ हौशीने करा मशि गेंद छंद ! घडवा हो, बाजुबंद ! सख्या, घडवा हो बाजुबंद ! ! ”

काव्याचा आत्मा जसा रस तसा पद्याचा आत्मा ताल, चाल. पुढे तालाची शास्त्रोक्त मीमांसा होऊन मात्रांची श्रुतिशुद्ध मांडणी झाली. तिचाच पुढे निर्दोष प्रपंच वाढून आपली अनुष्टुप, उपजाति, स्रग्धरा, भुजंगप्रयात, आर्या, गीति प्रभृती अनेक मंजुळ, बांधेसूद, आणि सुरेख वृत्ते घडली गेली.

ह्या वृत्तांना यमकही किती तरी खुलून दिसतो. संस्कृतातील पूर्वीच्या वृत्तांस अनुप्रासादिकांची लेणी असत. त्यात पुढे यमकाचे लेणेही जे लाभले ते कला-विकासाचे चिन्ह होय, कलाऱ्हासाचे नव्हे. ओढून ताणून यमक साधणे हा कवीचा दोष, यमकांचा नव्हे. सुरेख यमक साधण्याची हातोटी नसल्यामुळेच निर्यमक कविता करणारांनी आपल्या भाषादारिद्र्याचे नावाने बोटे मोडावीत, यमकांच्या नावाने नव्हे !

आपली ही अनुष्टुप, आर्यागीति, श्लोक, प्रभृती दोनचरणी, चारचरणी वृत्ते सुटसुटीत, वेचक, आणि चिमुकल्या भावभावनांस व्यक्तविण्यास अतिशय रसानुकूल आहेत. एखादे सुभाषित, एखादा अर्थान्तरन्यास, एखादी उपमा, किंवा एखादे काव्य-चित्र या रेखीव वृत्तांच्या चारचरणी चौकटीत किती किती खुलून दिसते म्हणून सांगावे ! अगदी आद्य कवींचे हे सुप्रसन्न अनुष्टुप पहा :

अिदं तीर्थं समं सौम्यं सुजलं सूक्ष्म वालुकम्
रमणीयं प्रसन्नं च सज्जनानां मनोयथा ।

किंवा कालिदासीय कल्पनांच्या सोनेरी साखळीत रत्नाच्या एकाच लोलका-सारखा लटकणारा हा अर्थांतरन्यास पहा :

सरसिजमनुविद्धं शैवलेनापिरम्यं
मलिनमपि हिमांशोर्लक्ष्म लक्ष्मीं तनोति
अियमधिकमनोज्ञा वल्कलेनापि तन्वी
किमिवहि मधुराणाम् मंडनं नाकृतीनाम् ।

किंवा भवभूतीचे चिमुकले काव्यचित्र पहा :

दृष्टि स्तृणीकृत जगत्रय सत्वसारा

धीरोन्नता नमयतीव गतिर्धरित्रीम्
कौमारकेऽपि गिरिवद् गुरुताम् दधानो
वीरोरसो किमयमेत्युत दर्प अेव ।

ह्यातील मनोज्ञ प्रतिमा नुसत्या गद्याच्या ' वल्कलेनापि ' रम्य भासलीच असती. पण ह्या सुललित, श्रुतिशुद्ध नि सुमंजुल वृत्तीचे अंगास ठीकठाक होणारे हे जरीचे गुलाबी पातळ नेसल्याने त्यात तेच तिचे लावण्य किती खुलून दिसत आहे ! कल्पनेचे ते सौंदर्य, वृत्ताचे ते रेखीव सुरेलपण, तालमात्रांची ती सुपरिष्कृत श्रुती-मंजुलता ! खरोखर, कविता असावी तर अशी असावी !

अशी कविता इतक्या सुबकपणे ज्या आपल्या ह्या संस्कृतवृत्तांत विलसू शकते, त्या वृत्तांची गोडी ज्यास लागत नाही तो कसला रसिक ! ज्यास ती साधत नाहीत तो कसला कवी !

दोन किंवा चार चरणांतच संपणारी एखादी गुटसुटीत कल्पना व्यक्तविण्यास ही वृत्ते आणि यमक हीच अशी अगदी अनुरूप आणि समुचित साधने आहेत. इतकेच नव्हे, तर दीर्घकाव्यासही ती अगदीच वावडी आहेत असेही म्हणता येणार नाही. ज्या अनुष्टुपात जगातील आद्यकाव्य ते रामायण गायले गेले आणि जगातील महाकाव्य, –ते महाभारतात रचले गेले, –ते अनुष्टुप दीर्घ काव्यप्रबंधास जुळतच नाही, शोभतच नाही, असे कोणी कोणत्या तोंडाने म्हणावे ! त्या वाल्मीकीच्या पवित्र आश्रमात ज्या कोण्या प्राचीन उषःकाली " ततः प्राचेतसप्रज्ञौ रामायण-मितस्ततः । मैथिलेयौ कुशलवौ जगतुर्गुरुचोदितौ " त्या प्राचीन उषःकालापासून आज युगानुयुगे ते त्या रामायणीय अनुष्टुपांचे मंजुल छंद काळाच्या बोलघुमटांतून निनादत येत आज जे या दोन्ही गोलार्धांवरोल अवघ्या मनुजजातींस मोहून टाकीत आहेत ते काही उगाच नव्हेत !

मराठी ओवी किंवा बंगाली पायर हीही त्या अनुष्टुप छंदाचीच एक सयमक नि शिथिल अशी प्राकृत आवृत्ती आहे. ज्ञानेशाच्या ओवीची रसानुकूलता काय सांगा-वयास हवी !

हे सर्व विवेचन आरंभीच करण्याचा मुख्य हेतू इतकाच की यमक, ठरीव चरणांचे पद्यबंध, गेयचाली, प्रभृती जे विशेष आपल्या ह्या सुपरिचित जुन्या वृत्तांत आहेत त्यांपैकी काही आम्ही योजलेल्या या नव्या वैनायक वृत्तात जरी गाळले असले आणि ते गाळल्यामुळें हे वृत्त सुदीर्घकाव्यरचनेस काही प्रमाणात अधिक सोयीचे होते असे आम्हांस जरी वाटत असले, तरी त्यावरून वरील यमकादिक विशेष आणि त्यांनी युक्त असणारी द्विचरणी वा चार चरणी जुनी वृत्ते मुळी रसानुकूल नाहीतच किंवा त्यात दीर्घकाव्ये मुळीच खुलून दिसत नाहीत किंवा हे नवीन वृत्त त्या वृत्ता-हून सर्व प्रकरणी वा सर्वतोपरी अधिक सरस आहेच आहे, असे काहीतरी आम्ही

समजत आहो असे कोणास वाटू नये. वरील वृत्तांच्या लहान घडीव फुलपात्राहून या वैनायक वृत्ताचे विस्तृत आणि वाहत्या महान ओघांचे हे वृत्तपत्र दीर्घकाव्य-बंधाच्या प्रवाहास अधिक 'अनुकूल' झाल्यास होईल अशा अपेक्षेने केलेला तो एक प्रयोग आहे. जुन्या वृत्तांतही, नव्हे, निर्भेळ गद्यातही, त्यांच्या विविध आकारा-प्रकाराप्रमाणे ज्यांचे त्यांचे निराळे सौन्दर्यविशेष प्रत्येकी आहेतच. त्या वृत्तांमध्ये स्वतःचेही काही सौन्दर्यविशेष असणाऱ्या ह्या एका नव्या वृत्ताची वांच्छनीय भर पडली असता आपल्या वृत्तसंपत्तीची विविधता थोडीफार वाढणारीच आहे, इतकेच या वृत्ताच्या वतीचे म्हणणे.

गद्यपद्यकाव्यांच्या रचनेसंबंधी प्रस्तुत विषयास लागू असलेले तेवढे सामान्य विवेचन वर केल्यानंतर आता या वृत्तांचे ते विशेष गुण वा उपयोग काय आहेत ते थोडक्यात पाहू—

१) गद्याला तालयतियमकचरणसंख्या प्रभृती बंधने नसतात, परंतु त्यामुळे त्यात सुरेलपणा येत नाही. तालयति इत्यादी संस्कारांनी वाणीस सुरेलपणाची, मनोहर मंजुलपणाची जोड ज्यात देण्यात येते ते पद्य. वैनायक वृत्तावर तालयति प्रभृती संस्कार होत असल्याने त्यास मंजुळ सुरेलपणाची जोड मिळू शकते. यास्तव ते गद्य नसून पद्य होय.

२) गद्याची पुढील आणि पद्याची पहिली पायरी म्हणजे अक्षरसंख्याक वृत्त. वृत्तकलाविकासाची त्याच्याही पुढील पायरी मात्रासंख्याकवृत्त. कारण तालाच्या मात्रा ठराविक पडल्या तरच तो चांगला साधतो. पण ऱ्हस्व— दीर्घाचा भेद न करता त्या तालात नुसती संख्या मोजून अक्षरे भरली तर त्यांचा उच्चार अशुद्ध-पणे केल्यावाचून त्या तालाच्या ठराविक मात्रांत ती सामावता येत नाहीत. अभंगादी अक्षर वृत्तांत या अडचणीमुळेच पांडुरंग शब्द अनेक वेळा 'पांडूऽरंग' असा लांबवावा लागतो किंवा 'बेलाचे फूल माझ्या महादेवाला' यासारख्या ठिकाणी दीर्घअक्षरे झपकन उच्चारून आगगाडीचे डब्यात दडपून प्रवासी कोंबावेत तशी त्या तालात ती कोंबावी लागतात.

बंगालीत अक्षरवृत्तेच बहुत. परंतु त्यांतीलही अव्यवस्था रवींद्रबाबूसारख्या संस्कृत श्रुतिसंपन्न कवीला पुढे पुढे इतकी कर्कश भासू लागली की, त्यांनी आपली काही काही जुनी अक्षरसंख्याक कविता शास्त्रशुद्ध अशा मात्रासंख्याक स्वरूपात वृत्तांतरितही केली आहे. हिंदीतही आताशी मात्रासंख्याक वृत्तेच शिष्टतर समजतात. तो ताल असेल त्याच्या मोजून ठरविलेल्या मात्रा इतक्याच शास्त्रशुद्ध ऱ्हस्व—दीर्घ उच्चार केले असता ज्याच्या मात्रा भरतात तितकीच अक्षरे योजणे हेच प्रशस्त. त्यासाठीच मात्रासंख्याक वृत्ते ही अक्षरसंख्याकापेक्षा कलाविकासाची पुढची पायरी होय. वैनायक वृत्तही अक्षरसंख्याक नसून मात्रासंख्याक असल्यामुळे ते केवळ गद्या-

हूनच नव्हे, तर अक्षरसंख्याक पद्याहूनही श्रुतिशुद्ध, सुरेल आणि मंजुळ होऊ शकते. बंगालीतील 'अमित्राक्षर छंद' अक्षरसंख्याक असताही याच कारणामुळे त्याचे त्या प्रकरणी अनुकरण न करता मराठी कवितेचा शास्त्रशुद्ध असा मात्रासंख्याक संस्कारच आम्ही वैनायक वृत्तावर केला.

३) 'जुन्या वृत्तांत बहुधा चार चरणांचा वा दोन चरणांचा पद्यबंध असतो. आणि त्यांचे शेवटी विचार आणि वाक्य पूर्ण करून विसावा घ्यावा लागतो. यामुळे जो विचार त्यांच्या त्या लहान संपुष्टात सामावणारा नसतो किंवा ज्या वाक्याची झेप त्यांच्या आटोक्याबाहेर जाण्याइतकी विस्तृत असते ते विचार नि वाक्ये त्यात मावत नाहीत, त्यांची शोभा त्या वृत्तातील काव्यास लाभत नाही. या अडचणीसाठी अशी विस्तृत वाक्ये आणि विचार व्यक्तविण्याचे कार्य त्याच त्या वृत्ताची पुनरावृत्ती करून संस्कृतमध्ये कुठे कुठे साधले जाई. अशा एकाधिक श्लोक-बंधास संस्कृतमध्ये 'कुलक' असे म्हणतात. कुमारसंभवात दहा-पंधरा श्लोक मिळून झालेल्या अशा एका कुलकात कालिदासाने असे एक विस्तृत वाक्य आणि अनेक कल्पनांची गोड गुंफण असलेला विचार व्यक्तविला आहे हे प्रसिद्धच आहे.

परंतु ठराविक चालीचे तेच ते वृत्त सारखे म्हणावे लागल्याने अशा प्रबंधात लवकरच एकसुरीपणा (Monotony) येऊ लागून श्रुतीला शीण वाटू लागतो. विस्तृत काव्ये एकाच अनुष्टुप, ओवी, प्रभृती अशा लहान वृत्तांची सहस्र सहस्र-वार पुनरुक्ती करून लिहावी लागतात तेव्हा तर हा एकसुरीपणा फारच नडतो. ही अडचण टाळण्याची दुसरी युक्ती म्हणजे चंदभटाच्या प्रख्यात 'पृथ्वीराजरासो' सारख्या किंवा रघुनाथ पंडितांच्या नलदमयंती काव्याप्रमाणे विविध वृत्ते एकापाठी-मागून एक योजणे. यामुळे ही अडचण पुष्कळ अंशी दूर होते आणि एकसुरीपणाला चांगलाच आळा घालता येतो. परंतु त्या प्रत्येक वृत्तांचे पहिले चरण ज्या चालीत त्याच चालीत शेवटच्या चरणापर्यंत तरी गळा तोच धरावा लागत असल्याने भावभावनांच्या अनुरोधाने वाक्यांचा स्वर झटपट यावा तसा बदलता येत नाही हे एक आणि दुसरे वैगुण्य असे की त्या साऱ्या वृत्तांत प्रत्येकी दोन वा चार चरणान्ती विचारांचा आणि वाक्याचा अंत करून विराम देणे भाग पडत असल्यामुळे विस्तृत वाक्याची वा विचारांची अशा काव्यास शोभा येत नाही ती नाहीच. अशा रीतीने कुलक किंवा वृत्त विविधता या उपायांनी एकसुरीपणा शक्यतो टाळून, विचार वाक्याची सुविशाल झेप समविण्याची सोय या प्रत्येकी अंक चाली, लहान चरणी, शीघ्रविरामी असलेल्या गेय वृत्तात व्हावी तशी होत नाही. यावर उपाय म्हणूनच इंग्लिशमध्ये Blank Verse ची योजना करण्यात आली. यामुळे ती सोय पुष्कळ अंशी अधिक चांगल्या प्रकारे करता येऊ लागली. त्याचसाठी वैनायक वृत्तासही दोन वा चार वा दहा चरणान्तीच विराम असावा असे काही बंधन नाही. यामुळे

विशाल विचार संपेतो विराम लांबविता येतो. अनेक लहान उपवाक्यांनी गुंफलेली वक्तृत्वपूर्ण दीर्घ वाक्ये, त्यांची गोड गुंफण वा गंभीर प्रवाह फारसा खंडू न देता, त्यात साधता येतात. Paradise lost या मिल्टनच्या महाकाव्यांतील या Blank Verse च्या वृत्तात गुंफलेली सैतानाच्या राजसभेतील किंवा ईश्वराच्या देवसभेतील वक्तृत्वशाली भाषणे वाचली असता हा लाभ अशा वृत्ताने कसा साधला जातो ते चटकन ध्यानात येईल. तीच सोय वैनायक वृत्तात तशीच साधता येते.

४) सयमकता हा जो बहुतेक मराठी वृत्तांचा निरपवाद नियम तो या वृत्तास केवळ विकल्पाने लागू आहे. यमकालंकार लहान चरणी वृत्तास खुलतो. मागच्या चरणाच्या शेवटच्या अक्षराची आठवण श्रुतीत गुंगत आहे तोवर जर पुढच्या चरणांती तत्सदृश ध्वनी आला तर, अपेक्षित स्थली प्रिय मित्र अचूकपणे भेटावा, तसा श्रुतीला आणि मनाला आनंद होतो. म्हणूनच यमकाला मित्राक्षर असेही नाव आहे. आणि Blank Verse प्रमाणे मधुसूदन दत्तांनी केलेले वृत्त निर्यमक असल्यामुळेच त्यांनी त्यास 'अमित्राक्षर छंद' हे नाव दिले. पण मागच्या चरणाचा तो शब्द स्मृतीतून निघून जाईल इतक्या लांब अवधीनंतर पुढच्या कुठल्या तरी चरणात यमक आला तर त्यायोगे श्रुति मंजुलतेचा आनंद सहसा उत्पन्न होत नाही. असा दीर्घावधीनंतरचा यमक केवळ दृष्टीला दिसण्याने कशी मंजुलता येणार ? कारण मंजुलता ही श्रुतिगम्य गुण; दृष्टिगम्य नव्हे ! यास्तमव या वृत्तांत दोन-तीन चरणांतच संपेल असा विचार जर आला नि त्यायोगे अशा सन्निधच्या अंतरावरच विराम पडला तर यमक घालावयासही हरकत नाही. तो या वृत्तालाही अशा स्थली शोभतो. जसे :

शंभरदा प्रश्न उठे रानटी स्वरी
'होशी का मुसलमान ? वाचशी तरी !'
शंभरदा उत्तर दे कंप अंबरी
'हिंदू मी ! शीख आम्ही ! मरण मी वरी !'

परंतु मागच्या च्छेदकात सांगितल्याप्रमाणे या वृत्तात अनेक वेळा अनेक लहान वाक्ये गुंफलेले एखादे मोठे वाक्य दहा-पाच चरणांत प्रवाहत अर्थानुरोधाने मध्येच कुठेतरी संपते. त्यायोगे तो विसावा लांब अंतरावर एखाद्या सुदूर चरणामध्ये वा चरणांती पडल्याकारणाने सन्निध यमकाने साधणारी श्रुतिमंजुलता, तिथे मागच्या विसाव्याच्या अक्षरांची मित्राक्षरे घातली तरी, उत्पन्न होत नाही. अशा स्थली त्या दीर्घ वाक्याची आणि वक्तृत्वपूर्ण प्रवाही विचाराची शोभाच यमकाच्या दुय्यम शोभेहून अधिक रसानुकूल असल्यास यमक सोडून तीच साधणे अर्थसौन्दर्यास उपकारक होते. एतदर्थ हे वृत्त सयमक असलेच पाहिजे असे बंधन त्यास घातलेले नाही. पण म्हणून ते निर्यमकच असावे असेही नाही. यमकाची श्रुति-

मंजुलता अर्थसौन्दर्यास साधक वाटेल तिथे यमक साधता येते. नाही तेथे यमकास गाळूनही श्रुतिमंजुलता केवळ कुशल अनुप्रासाच्या योजनेने साधून अर्थसौन्दर्यही अबाधित राखता येते. याच कारणासाठी इंग्रजीतील Blank Verse आणि त्याचे बंगालीतील अनुकरण ' अमित्राक्षर छंद ' ह्यात यमक अपरिहार्य मानलेला नसतो. त्यांचेच अनुरोधे वैनायक वृत्तातही ती सोय केली आहे.

५) पण ह्या वर दिलेल्या काही सोयीसाठी त्या जुन्या वृतात असणारी ' गेय 'तेची गोडी या वृत्तास सोडावी लागते. हे वृत्त गेय नसून पाठ्य, वाच्य आहे. यास्तव ज्या कल्पना चिमुकल्या नि चटकदार किंवा जे विचार सुटसुटीत नि एकेरी असतील ते ते यथारुची त्या त्या जुन्या गेय आणि प्रासादिक वृत्तात वर्णावे. प्रवाही, भरदार, वक्तृत्वशील अशा भावभावनांच्या गुंफणीचा काव्यबंध, एकसुरीपणा आणि त्रुटितपणा टाळून रचावयाची सोय या वैनायक वृत्तात त्यांतल्या त्यात अधिक होत असल्यामुळे अशा वेळी यथारुची या वृत्तास अवलंबावे.

६) दीर्घवाक्याप्रमाणेच लघुतम वाक्येही या वृत्तात ताल यती सांभाळून कुशलपणे योजली असता योजता येतात. इतकेच नव्हे तर दुःखशोकाचे उद्‌गारही जसेचे जसे आवेशाने वा उद्‌वेगाने उच्चारता येतात. हे वृत्त पाठ्य असल्यामुळे गद्याप्रमाणे आवेश, उद्‌वेग प्रभृतीचे रसानुसारी ध्वनी इतर गेय वृत्तांपेक्षा अधिक सहज त्वरेने बदलून या वृत्तात ताल सांभाळूनही व्यक्तविता येतात. आता लहान तर लगेच विस्तृत अशा वाक्यरचनेतून, आता झुळझुळ तर आता वेगवान, आता करुण तर आता संकुल, अशा या वृत्ताच्या अखंडित प्रवाहात काव्यातील रसौघास यथारुची विविध वळणे घेत इतर वृत्तांच्या प्रवाहापेक्षा अधिक सलीलतेने वाहत जाता येते.

७) हेही येथेच सांगून टाकले पाहिजे की अद्यापि या वृत्तास अपरिहार्यपणे यमक, चरणसंख्या, गेयता इत्यादी बंधने नसल्यामुळे त्यात एकसुरीपणा आणि त्रुटितपणा सापेक्षतः पुष्कळ प्रमाणात टाळता येतो. तरीही तेही एक वृत्त, एक पद्य-प्रबंधच, असल्याने त्यास अवश्य असणाऱ्या तालयती प्रभृती बंधनाचे योगाने ह्या वृत्तांस वाचण्याची, गेय नसली तरी पाठ्य अशी पद्धत, लवचिक आणि लांब झेपेची का होईना पण एक सुरेल चालही आहेच. पण चाल, ताल, पद्धत वा सुरेलपण म्हणजेच एकसुरीपणा असे नव्हे; तर एकाच सुराची प्रमाणाबाहेर कंटाळवाणी पुनरुक्ती, आवर्तन, म्हणजे एकसुरीपणा, आणि तो टाळणे, ह्या वृत्तात असणाऱ्या वाक्याची विविध वळणे, ध्वनिपालट, चरणांची मोड, प्रभृती, वर दिलेल्या विशेष सोयींमुळे, इतर लहान, गेय आणि तुटक वृत्ताहून पुष्कळच अधिक प्रमाणात शक्य होते, इतकेच काय ते म्हणणे. Blank verse वा अमित्राक्षर छंद ह्यांचीही हीच गोष्ट. ताल वा सूर असा नावालाही नको असेल तर सुरेलपणाचा

मोह आमूलात् सोडून देऊन पद्याचा प्रश्नच न काढता, निर्भेळ गद्याकडेच वळले पाहिजे.

अर्थातच हे वृत्त वाचण्याची ही विशेष पद्धत, कोणत्याही पद्याच्या चालीप्रमाणे तिच्या नुसत्या वर्णनापेक्षा ती कशी ते म्हणून दाखवूनच सांगता येणार आहे. तोवर ते वृत्त कसेसे वाटणारच. त्यांतही नेहमीच्या परिचयाचा यमकाचा मनमिळाऊ दाखलाही त्यापाशी नसल्याने त्याची ओळख करून घेणेही उद्वेजकच भासेल. इंग्लिशमध्ये Blank verse हे निर्यमक वृत्त जेव्हा प्रथम रचले गेले तेव्हा त्याचाही ह्याच कारणासाठी जिकडे तिकडे अव्हेर झाला. ‘ ओळी तोडून छापलेले गद्य ’ असे त्यास हिणवले गेले. पण पुढे त्यात रचलेले मिल्टनचे Paradise Lsost हेच इंग्रजीतील उत्कृष्ट महाकाव्य ठरले; आणि शेक्सपियरला देखील नाटके त्यातच लिहावीशी वाटली ! बंगालमध्ये तसे वृत्त योजून मधुसूदन दत्तांनी जेव्हा ‘ मेघनादवध ’ प्रथम लिहिला तेव्हा तर अशा वृत्ताची, त्यांच्या त्या ‘ अमित्राक्षर, छंदाची,’ त्या काळच्या वाचकांनी नुसती रेवडी उडविली. त्याच्यावर कित्येक विडंबनेही लिहिली गेली. पण त्याची म्हणण्याची बिनचूक धाटणी लोकांचे तोंडी बसत गेली तशी त्याची चव लागत गेली आणि आज ते वृत्त अर्वाचीन बंगाली कवितेच्या गळ्यातील ताईत होऊन बसले आहे. रवीन्द्रबाबूंनीसुद्धा आपली नाटच-काव्येच नव्हे, तर आपली कित्येक भावगीतेही त्यांतच रचिली आहेत. हे वैनायक वृत्त हाही त्याच दिशेचा एक प्रयोग आहे. तो प्रथमच मराठीत असला तरी हिंदी बंगालीतही अशा वृत्ताची वाण असल्याने त्यांसही त्याचे काय होते ते लागू पडणारे आहे. प्रयोगच तो ! झाला यशस्वी तर ठीकच, न झाला तरीही ठीकच. कारण हा अमका प्रयोग आमच्या कारणासाठी जमत नाही हे सिद्ध होणे हेही त्या प्रयोगाचीच एक सिद्धी आहे, उपयुक्तता आहे.

( रानफुले )

# ६ : नाट्यलेखनामागील हेतू

(मराठी रंगभूमीचा शतसांवत्सरिक महोत्सव सांगली येथे १९४३ साली साजरा करण्यात आला. त्यावेळी नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षीय पदावरून स्वा. सावरकरांनी जे भाषण केले त्यातून नाट्यकलेची ध्येय, नाट्यलेखनामागील हेतू इत्यादी विषयांवर त्यांनी आपले विचार प्रकट केले. त्या विचारातून सावरकरांनी नाट्यकलेविषयी केलेले चिंतन ध्यानी येते.)

मराठी रंगभूमीचा शताब्दी महोत्सव आपण साजरा करीत आहोत ही आनंदाची गोष्ट आहे. आपण मराठी रंगभूमीच्या जन्माचा सन १८४३ हा धरला आहे. तो बरोबर आहे. पण ऐतिहासिक क्षेत्रात लागलेल्या अनेक शोधांवरून असे दिसते की, शिवाजी महाराजांच्याकाळी सन १६९० मध्ये 'लक्ष्मी स्वयंवर' हे नाटक तंजावरात झाले. तेथील ग्रंथालयावरून असे दिसते की, सन १८३२ या एका वर्षात २०–२५ नाटके लिहिली गेली. पण ती रंगभूमीवर आली असतील असे वाटत नाही.

कै. विष्णुदास भावे यांनी १८४३ साली नाटकास सुसंस्कृत स्वरूप प्राप्त करून देऊन नाटके रंगभूमीवर करून दाखविली. नाटक मंडळ्या निघाल्या, त्या हिंडू लागल्या नि आजवर अशा प्रकारे ही कला टिकली; म्हणूनच कै. भावे यांना आद्य-नाट्य प्रवर्तक म्हणून संबोधिले जाते. कै. भावे यांनी नाटकास सुसंस्कृत रूचीची जोड दिली. कै. विष्णुदास भावे यांच्यापासून मराठी नाटकांचा अखंड प्रवाह वाहात आहे. ज्या सांगलीच्या श्रीमंत अप्पासाहेबांनी कै. भावे यांना प्रोत्साहन दिले व त्यांनी नि त्यांच्याच वंशजांनी, श्रीमंत राजेसाहेब सांगली यांनी, आज कोनशिला बसवावी व तसेच ज्या कै. भावे यांनी नाट्यकलेस जन्म दिला त्यांचेच नातू राव. भावे हे आज स्वागताध्यक्ष म्हणून लाभावेत हा खरोखरच अपूर्व योगायोग आहे. कै. विष्णुदास भावे, कै. अण्णासाहेब किर्लोस्कर, श्री. फाळके या त्रयीवरून नाट्य-कलेच्या अद्यावत विकासाची कल्पना येते.

नवीन संशोधनाप्रमाणे मराठी नाटके श्रीशिवकालापासून होत असून ती रंगभूमीवरही होत असत. सर्व हिंदू किंवा आर्य नाट्यसंस्थेचा विचार केला तर ही मर्यादा २००० ते १०००० पर्यंतही जाते. कारण भरत मुनीप्रणित नाट्यशास्त्र म्हणून जो ग्रंथ हल्ली उपलब्ध आहे, त्याचा काल संशोधक विद्वानांच्या मते इ. स. पू. ७०० वर्षांच्या अलीकडे येतच नाही. मग प्रश्न असा उत्पन्न होतो की, मराठी नाटके जर तीनशे वर्षांपासूनची आहेत तर शतसांवत्सरिक महोत्सव, १८४३ हेच मराठी नाट्याचे प्रथम वर्ष धरून करण्यात स्वारस्य काय? याचे उत्तर असे की, १८४३ सालापासून कै. विष्णुदास भावे यांनी या कलेला संस्थेचे व्यवस्थित व स्थायी स्वरूप दिले व त्यामुळे पुढे तिचा उत्कर्ष शक्य झाला. त्यांनी सांगलीकर नाटक मंडळी काढून, तिचे महाराष्ट्रभर दौरे काढले. त्या. कै. भावे यांनी दिलेल्या प्रेरणेने तशा प्रकारच्या अनेक नाटक मंडळ्या मग जागोजागी निघाल्या. व त्या

कलेला लोकांचा पाठिंबा मिळत जाऊन तिला प्रतिष्ठित स्वरूप येऊ लागले. पुढे याचीच परिणतावस्था म्हणजे १८८० च्या सुमारास अनेक विद्वान नि आंग्ल विद्याविभूषित कलावंतांनी लक्ष घालून अनेक इंग्रजी नाटकांची भाषांतरे करून ही कला लोकादरास पात्र केली. त्यायोगे पूर्वी नाटकात काम करणाऱ्यांना 'नाटक्या' समजून त्यांच्याकडे अवहेलनेच्या दृष्टीने पाहण्याची जी एक प्रथा अथवा प्रघात होता, तो त्या सुशिक्षित मंडळींनी दूर केला.

पुढे अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी या कलेला संगीताची जोड देऊन काही संस्कृत नाटकांची भाषांतरे नि काही स्वकृत मराठी नाटके रंगभूमीवर आणली. आणि त्या आपल्या मंडळीला 'किर्लोस्कर संगीत मंडळी' असे नाव दिले. या मंडळीतील एकंदर रंगभूमीची, त्यावेळच्या मानाने, नवी सजावट, वेषभूषा, रंगभूषा यांच्यातील ठाकठीकपणा, नवीन नवीन पण कर्णमधुर चालींची पद्ये, नि वेषधरांचे सौंदर्य यांमुळे ही नाटके भरपूर लोकप्रिय झाली. आणि नाटक मंडळींचा सामाजिक स्तरही वाढला, यातूनच पुढे नटसम्राट बालगंधर्व यांची गंधर्व नाटक मंडळी निघाली. तिने तर रंगभूमीच्या सजावटीपायी कल्पनेबाहेर व्यय करून तिला राजवैभव प्राप्त करून दिले. नि मराठी रंगभूमीची प्रतिष्ठा सर्व समकालीन हिंदी रंगभूमीत श्रेष्ठ प्रतीची ठरविली.

पुढे बोलपटाच्या, चित्रपटाच्या वाढीमुळे ही कला अवनत झाली असा काहींचा आक्षेप आहे. पण माझे मत असे आहे की, बोलपट हा नाट्यकलेचा विकास आहे. आता दोहोत तुलनाच केली तर, दोहोतही काही दोष नि काही गुण आहेत. नाट्य हे जिवंत असते, तर बोलपट यांत्रिक. पण त्यामुळेच बोलपटांना जे चिरस्थायित्व असते ते नाटकाला नसते. नाटकातील वेषधर बिथरले की, नाटक थांबते. बंद पडते. पण बोलपटांना खर्च अवाढव्य येतो, तसेच चित्रपट्टी आदी साधनांसाठी आपल्याला सध्या तरी परदेशावर अवलंबून राहावे लागते; तितका एकदम प्राथमिक खर्च नाटकाला येत नाही. त्यामुळे बोलपट झाले तरी, नाटक मंडळ्या जिवंत राहणारच. बोलपट आपल्या पात्रांना अमरत्व प्राप्त करून देतो. तसे नाटकाचे नाही. श्री. गणपतराव जोशी आज कोठे आहेत? 'कीचकवध' नाटकाने आमच्यात स्फूर्ती निर्माण केली. त्यावेळी त्याचा बोलपट घेतला असता तर आपणांसही त्याचा उपयोग होऊन स्फूर्ती मिळाली असती. अशा प्रकारे अमरत्व निर्माण करण्याचे सामर्थ्य बोलपटात आहे.

स्त्रियांनी नाटकात जावे, त्यांनी गेलेच पाहिजे असा मी प्रचार करीत नाही. पण कोणी स्त्रिया गेल्या तर त्यांचा मी निषेध करीत नाही. नाटकात गेलेल्या स्त्रिया अकुलिन झाल्या असे मानण्याचे कारण नाही.

आपल्या घरात एखादे मोठे कार्य असले; तर घरातल्या लहान मोठ्या सर्व व्यक्तींची अंतःकरणे ते कार्य उत्तम प्रकारे पार पाडण्यासाठी, त्या एका कार्यावर केन्द्रित झाली पाहिजेत; तरच ते कार्य सुसूत्रपणे शेवटास जाते. तसे आपल्या सर्वांच्या पुढील एकच एक महाकार्य कोणते असेल तर ते देशाचे स्वातंत्र्य नि संरक्षण हे होय. म्हणून सर्व लेखक, नाटककार, नट आदी सर्वांचे लक्ष या एका ध्येयावर केन्द्रित झाले पाहिजे. आणि सर्वांची प्रत्येक कृती ह्या ध्येय साधनाला अनुलक्षून असली पाहिजे. तसेच आपण हल्ली जसे महाराणा प्रतापसिंह, राणा भीमदेव, बाजी प्रभू, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या कृतीवर नाटके लिहितो, त्याप्रमाणे पुढील पिढीच्या नाटककारांना विषयभूत होतील अशा कृती सध्याच्या तरुणांनी केल्या पाहिजेत. संसार कसा असावा हेही नाटकाने दाखविले पाहिजे. केवळ आनंदनिर्मिती हे नाटकाचे कार्य नाही.

मी शतसांवत्सरिक महोत्सवाचा अध्यक्ष झालो तेव्हा ' बोरू मोडा नि बंदुका घ्या ' या उपदेशाप्रमाणे ' पडदे फाडा ' असे सांगेन अशा काहींना भीती वाटली. मी पूर्वीचा उपदेश केला त्यावेळी राष्ट्रातील तरुण सुनीतांत नि कादंबऱ्यांत गुंतलेले दिसले. त्यावेळी राष्ट्राच्या दृष्टीने मला तरुणांचे जे आद्य कर्तव्य वाटले ते मी प्रतिपादले. गेल्या दोन वर्षांत त्याचा कितीतरी उपयोग झाला असून, कितीतरी तरुण लष्करात गेले आहेत. साहित्य मारा, हा अर्थ त्यातून अभिप्रेत नव्हता. स्वातंत्र्यसंपादनार्थ आज सर्व शक्ती केन्द्रित झाल्या पाहिजेत. (उरलेले सामर्थ्य इतरत्र केन्द्रित करा असा त्याचा अर्थ होतो.) म्हणून बंदुका घेण्यास शिकविणारी नाटके लिहावीत. आपण प्रथम तरुणांना सैनिकी शिक्षण द्या, मग त्यांस नाटकांत पाठवा.

( दै. केसरी दि. ९।११।१९४३)

(स्वा. सावरकर–अखंड हिंदुस्थान लढा पर्व १९४१ ते १९४७)

# ७ : साहित्यातील कार्यात्मक सुधारणा

(मुंबई येथे सन १९३८ मध्ये भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांनी केलेले भाषण त्यांच्या साहित्यविषयक चिंतनाचा परिपाक होय. सावरकरांचे हे अध्यक्षीय भाषण म्हणजे साहित्यविषयक केवळ तात्त्विक चर्चा नसून मराठी वाङमयात कोणकोणत्या क्रियात्मक सुधारणा होणे आवश्यक आहे याबद्दल त्यांनी या निबंधाच्या पूर्वार्धात दिग्दर्शन केले आहे.)

आपण मला महाराष्ट्र साहित्यसंमेलनाचे या वर्षाचे अध्यक्षपद देऊन जो मान अर्पिला आहात आणि जो विश्वास व्यक्तविला आहात त्याविषयी मी आपला आभारी आहे. तो मान माझ्या साहित्यविषयक योग्यतेपेक्षा आपल्या ममत्वाचाच अधिक द्योतक आहे हे मी जाणून आहे; आणि तो विश्वास अनाठायी पडल्यासारखे होऊ नये यास्तव साहित्यविषयक काय काय सुधारणा केल्या पाहिजेत ह्याचा जो कार्यक्रम मला आपल्या राष्ट्राचे हितार्थ पथ्य वाटतो तो, प्रिय असो वा अप्रिय असो– त्याची चिंता न करता, या निबंधात जितका शक्य तितका मी दिग्दर्शिणार आहे.

**तत्त्वात्मक नव्हे– कार्यात्मक !**

पण निबंध लिहू लागलो न लागलो, तो दुसरी एक सांगण्यासारखी गंमत घडली. मला पहिल्या पायीच तत्त्वाचे मांजर आडवे आले ! मी निबंधात काय लिहावे याविषयी इष्टमित्रांच्या नि अनिष्ट मित्रांच्यासुद्धा अनेक सूचनांचा माझ्यावर नुसता मारा चालू झाला. त्यात बहुतेकांनी व्यक्तविलेली आशा म्हणजे मी काहीतरी तात्त्विक ऊहापोह करावा ! आणि बहुतेकांनी व्यक्तविलेली भीती म्हणजे मी त्यात भाषाशुद्धीचाच काय तो प्रपंच थाटू नये. परंतु, या आशेला कोणतेही आश्वासन किंवा या भीतीला अभयदान मला देता आले नाही. ही गोष्ट जितक्या खेदाची तितक्याच निरुपायाची होती. साहित्यविषयीही तात्त्विक नि बौद्धिक चर्चेचा उपयोग आहेच आहे, यासंबंधी माझे दुमत नाही. साहित्यविषयक तात्त्विक प्रश्नासंबंधी माझीही काही मते आहेत. अशी केवळ बौद्धिक करमणूक मलाही आवडते. चांदण्या रात्री मांडीवर मांडी ठोकून किंवा जेठा मारून बसल्याबसल्या मनोराज्येची मनोराज्ये जिंकीत चालल्याची सुखाची सोय ह्या जगात आहे हे मला ठाऊक आहे. परंतु, केवळ अशा तात्त्विक नि केवळ बौद्धिक काथ्याकुटीत रूतून बसल्यामुळेच आपण क्रिया-दुर्बल होऊन पडलो आहोत, आपली भौतिक राज्ये गमावून बसलो आहोत, याचे शल्य माझ्या हृदयात सारखे बोचत आहे; त्याला काय करणार ?

ज्या काळी अलंकारशास्त्रावर जगन्नाथ पंडितांसारख्यांचे उत्कृष्टांतील उत्कृष्ट ग्रंथ लिहिले जात होते, त्याच वेळी आपल्या राष्ट्रमातेच्या अंगावरील मुकुटकुंड-

लादी राणीपणाचे अलंकार एकामागून एक ओरबाडून अकबर, औरंगजेब तिला बटीक बनवीत होते ! आणि ज्या काळी स्मृतींच्या समन्वयास्तव निर्णयसिंधू धर्मसिंधूसारखे प्रचंड ग्रंथ लिहीत, संध्येची पळी किती मोठी असावी त्याची तात्त्विक नि शास्त्रीय चर्चा करीत, नि गीतेच्या एकेका शब्दावर पाचपाचशे श्लोकांत आपली बुद्धी तात्त्विक विवेचन करीत बसली होती, त्याचवेळी अनेक अल्लाउद्दिन आणि मलिकंबर त्या स्मृतींच्या नि गीतेच्या लाखो अनुयायांवर अवघ्या दीड दोन हजार सैनिकांनिशी झडपा घालून त्यांना कापून काढीत होते. रामेश्वरापर्यंत आपली राज्ये पालथी घालून बसले ! ते का ? आपली तत्त्वप्रवणता किंवा बुद्धिशक्ती दुर्बल होती म्हणून नव्हे, तर आपली कृतिप्रवणता, आपली कार्यशक्ती दुबळी होती म्हणून !

त्या अलंकारशास्त्रावरील वा वेदान्तावरील ग्रंथाचा किंवा त्या आपल्या बुद्धिवैभवाचा मलाही अभिमान वाटतो. अलंकार, काव्य, कविता, तत्त्व यांची मलाही अतिशय आवड आहे. पण जी अपथ्य आवड तेच व्यसन ! आणि जे अप्रासंगिक तेच अपथ्य. हे कृतिदौर्बल्य आपल्या हाडीपेरी आजही मुरलेले आहे. राजकीय, सामाजिक वा साहित्यिक अशा ज्या कोणत्या क्षेत्रात मी काम करीत आलो, त्या प्रत्येक क्षेत्रात मला, आम्हां सर्वांचे हे कृतिदौर्बल्य पाहून अत्यंत विषाद वाटत आलेला आहे. मीही आपल्यातीलच एक ! पण मला माझे मन या दोषासाठी जसे खात आहे तसेच आपल्या सर्व राष्ट्राचे लक्षही या दोषाकडे वेधले जावे, अशी मला तळमळ लागली आहे. विशेष काही असेल तर इतकेच काय ते !

न्यायमूर्ती रानडयांच्या काळापासून ज्या सुधारणांचा काथ्याकूट सारखा चाललेला आहे, ज्या सुधारणा मनात येताच करून टाकणे बहुतांशी तरी आपल्याच हातांत आहे अशा शेकडो सुधारणा आपल्यापुढे उभ्या असता, आपण त्या तडकाफडकी आजही करून टाकीत नाही. त्यांचा अजूनही नुसता तात्त्विक नि बौद्धिक काथ्याकूटच करीत बसलो आहोत. ज्यांना त्या पटल्या नाहीत त्यांचा प्रश्न वेगळा, पण ज्या लाखो लोकांना ज्या राजकीय, सामाजिक वा साहित्यिक सुधारणा पटल्या आहेत तेही त्यांच्या नुसत्या ठरावांनाच पुनःपुन्हा करीत बसले आहेत ! त्या आचरून सोडण्याचा प्रसंग आला की मागे होतात. काही अपवाद वजा जाता, आपल्या लोकांत एकंदरीत मुरलेली ही कृतिदुर्बलता आणि केवळ बौद्धिक चर्वितचर्वणाचे तत्त्वव्यसन नाहीसे झाल्यावाचून, आपल्या राष्ट्रीय पुनरुत्थानार्थ अवश्य असलेल्या कार्याचा उठाव होणार नाही; अशी माझी कटुतम अनुभवाने निश्चिती पटल्यामुळे लहान वा मोठचा ज्या कोणत्या सार्वजनिक क्षेत्रात मला पाऊल टाकण्याचा प्रसंग येतो तेथे तेथे, ‘ केल्याने होत आहे रे ! आधी केलेचि पाहिजे ’ हा ‘ सामर्थ्य ’ डिंडिम निनादवीत काय ते पुढे पाऊल टाकावेसे वाटते. आणि

यास्तवच या लहानशा साहित्य-क्षेत्रातही पाऊल टाकताना, त्यात ज्या काही क्रियात्मक सुधारणा करणे अवश्य आहे असे मला वाटते, त्यांच्याकडेच आपले लक्ष या निबंधात मी मुख्यत्वेकरून वेधणार आहे. काही तात्त्विक चर्चा आली तरी ती असेल केवळ आनुषंगिक तेवढीच.

**मराठीचे क्रियापद-दारिद्रय :**

या क्रियात्मक भागाकडे वळताना प्रथम पदीच मला क्रियापदाची आठवण व्हावी हे नामसादृशामुळे तरी अगदी स्वाभाविक आहे. आपल्या मराठीतच नव्हे तर बंगाली, हिंदी, गुजराथी इत्यादी आपल्या सर्वच प्राकृतांत, क्रियापद-दारिद्रय पदोपदी अनुभवावे लागते. या सर्व भाषांमध्ये देणे, घेणे, असणे, करणे अशी काही मोजकी क्रियापदे तेवढी स्वतंत्रपणे रुळलेली आहेत. आणि उरलेल्या शतावधी क्रियापदांचे कार्य त्याच त्या मोजक्या क्रियापदांचे मागे भिन्न भिन्न नामे किंवा इतर शब्द लावून साधावे लागते. त्यामुळे एका शब्दाने जे काम व्हावयाचे त्यासाठी दोन तीन शब्द वापरावे लागतात. जसे संमती देणे, उत्तेजन देणे, प्रचार करणे, प्रकाशित करणे, अनुमोदन देणे, आशीर्वाद देणे, उत्तर देणे, शाप देणे, वचन देणे, आनंद होणे, दुःख होणे, शोक करणे, चिकित्सा करणे, उपहास करणे इत्यादी इत्यादी. या दुशब्दी क्रियापदांमुळे त्याच त्या देणे, करणे, असणे इ. शब्दांची कंटाळवाणी पुनरुक्ती करावी लागते. केव्हा केव्हा तर एकाच धातूची द्विरुक्ती हास्यास्पद वाटू लागते; जसे प्रतिकार करणे, स्वीकार करणे, अंगीकार करणे, धिक्कार करणे इत्यादी. अशा ठिकाणी तरी आपण प्रतिकारणे, स्वीकारणे, धिक्कारणे, अंगीकारणे इत्यादी एकेरी स्वतंत्र क्रियापदे वापरण्याची पद्धत एक वैकल्पिक पर्याय म्हणून तरी पाडावी असे मला वाटते.

इंग्लिशमध्ये अशा अर्थाची स्वतंत्र एकेरी क्रियापदे असतात. जसे to consent, to encourage, to bless, to denounce, to publish, to reply, to decide, to lecture, to second, to propose, etc. किंबहुना कोणतेही नवीन नाव प्रचलताच त्या नावाचेच एक स्वतंत्र क्रियापदही बनवून टाकण्याची इंग्लिशमध्ये रूढीच पडलेली आहे. motor हे नाम प्रचलित होताच to motor हे त्याच नामाचे क्रियापदही लगोलग प्रचलले. wire ह्या नामापासून to wire हे क्रियापदही लगेच रुळले. आपल्या भाषाशैलीत अगदी विरुद्ध न जाईल अशा बेताने आपल्यातही नामविशेषणापासून अशी एकेरी नि स्वतंत्र क्रियापदे बनविण्याची प्रवृत्ती असावी. जे जे चांगले ते ते परकीय असले तरी ग्राह्यच होय.

कोणी म्हणेल की, इंग्लिशचे हे अनुकरण तुम्हांस कसे खपते ! इंग्लिश शब्द परकी म्हणून बहिष्कारावेत अशा भाषाशुद्धीच्या तुमच्या अट्टहासास हे परकी

भाषेच्या वाक्प्रचाराचे अनुकरण विसंगत नाही का ? त्यांना आम्ही इतकेच सांगतो की आम्ही भाषाशुद्धीवादी मंडळी इंग्लिश शब्दांना जे बहिष्कारतो ते, ते केवळ परकी आहेत, म्हणूनच नव्हे ! तर ते परकी असून अनावश्यकही आहेत म्हणून. त्यापेक्षा वा तितकेच अन्वर्थक असे आपले स्वकीय शब्द असताना परकीय शब्द वापरू नयेत, आपले तदर्थक शब्द मरू देऊ नयेत असे भाषाशुद्धीचे म्हणणे. आमच्यात नसलेली वा आमच्याहून चांगली असलेली अशी कोणतीही हितकारक नि अवश्य गोष्ट– मग तो शब्द असो वा शस्त्र-अस्त्र, आचार-वाक्प्रचार, ज्ञान-विज्ञान काही का असेना, ते परदेशात जेथे आढळेल तेथून आणून आत्मसात करण्याची तर प्रतिज्ञाच आहे आमची.

परंतु क्रियापदांच्या या सुधारण्यापुरते तरी आम्हांस कोणत्याही परकी भाषेच्या तोंडाकडे पाहण्याचे काहीच कारण नाही. आमची संस्कृत भाषा इतर शब्दसंपत्ती-प्रमाणेच धातुसंपत्तीतही समृद्धतम आहे. स्वतंत्र नि एकेरी हवी तितकी क्रियापदे तिच्यात आहेत. इतकेच नव्हे तर नामादिक शब्दांपासून 'नामायते' प्रमाणे वाटेल तितकी क्रियापदे बनविण्याची सूत्रबद्ध सोय आहे. तेव्हा संस्कृत भाषेप्रमाणेच प्राकृतांतही अशी स्वतंत्र क्रियापदे आपण हळूहळू योजावीत.

त्यातही मराठी साहित्याला किंवा भाषेला ती अगदीच नवखी वा नावडती आहेत असे नाही. आजच्या मराठी गद्यालाच काय ते त्याचे वावडे आहे. परंतु जुन्या अत्यंत सम्मत अशा काव्यातून अशी क्रियापदे आग्रहाने आदरलेली आढळतात, मुक्तेश्वरादी महनीय मराठी कवीचे हे दोनचार उतारेही माझ्या म्हणण्यास समर्थितील. ।। जरासंधे, राज्यासनी अभिषेकिले सहदेवा ।। राज्य रक्षावे अतिविवेके ।। मध्यभागी कर्षिला गाढा ।।" ज्ञानेश्वर तर सर्वांत अग्रणी. " ।। ऐशी हे अवधारी ।। निरूपिती परी ।। अधिष्ठानले अंगे ।। " मोरोपंतांच्या ह्या एकाच चरणात अशा एकेरी क्रियापदामुळे किती अर्थ, किती थोड्या स्थलात सामावला आहे पहा ! '।। आलिंगुनी चुंबुनि शिर हुंगुनिया पुसुनि लोचनें पदरें ।। ' या मराठी अभिजात पद्याप्रमाणेच दुसऱ्या टोकाला खेड्यापाड्यातील मराठी जिवंत नि जातिवंत बोलीतही अशी क्रियापदे आढळतात. 'तू आंघोळलास का रे ?, शेती पाणवली, कोथिंबीर वासाळली, मका कणसाळला' अशी कितीतरी सुटसुटीत क्रियापदे कुणबाऊ किंवा ग्रामीण लोक उपयोजिताना आढळतात. तशीच शैली मराठीच्या आजच्या गद्यातही रुळवावी. उदाहरणार्थ वर्णिणे, परीक्षिणे, प्रतीक्षिणे, संतोषिणे, उपकारणे, स्वीकारणे, शापणे, अभिनंदणे, अभिवादिणे, नमस्कारणे, चुंबिणे, आलिंगणें, उपहासिणे, उल्लेखिणे, प्रकाशिणे, सपादिणे, स्वागतिणे, आनंदणे, प्रार्थिणे, निवेदणे, अर्पिणे, चर्चिणे, विवेचिणे इत्यादी क्रियापदे आजही प्रयोजू लागल्यास काही प्रत्यवाय नाही. आजच्या पद्धतीला अगदीच वावडी वाटतील अशी क्रियापदे मात्र

भरधाव योजीत जाऊ नयेत. झेपेल तितकीच हळूहळू भाषेच्या अंगवळणी पाडावीत. सवयीने जशी पद्यात तशीच गद्यात ती रुळतील ; आणि मराठीतीलच नव्हे तर साऱ्या प्राकृतातील क्रियापद-दारिद्र्य घालविण्याचा मान महाराष्ट्रास मिळेल. कारण की ही सुधारणा पद्धतशीरपणे अशी प्रथमत: महाराष्ट्रानेच पुरस्कारली आहे.

कै. हरिभाऊ आपटे यांनी आमच्या लहानपणी त्यांच्या कादंबऱ्यांतून ‘ उत्तरणे ’ हे आणि अशी दोन चार क्रियापदे वापरली तेव्हा त्यांवर पुष्कळ टीका नि विडम्बन झाले. पण ती सुधारणा मला तेव्हापासून पटत आली. हरिभाऊंनी काही फुटकळ क्रियापदे वापरली खरी, परंतु माझ्या माहितीप्रमाणे त्या प्रवृत्तीचा सोपपत्तिक असा एक प्रश्न करून त्याला वाचा अशी ‘ स्त्री ’ मासिकांतील आणि प्रतिभेतील ‘ मराठीचे क्रियापद-दारिद्र्य घालवा ’ या माझ्या सन १९३५–३६ च्या निबंधातूनच फोडली गेली. मी आपल्या लिखाणात झेपेल तितक्या प्रमाणात ती सुधारणा प्रयोजितही असतो. या विषयाची सविस्तर चर्चा जर कोणास हवी असेल तर माझ्या या दोन्ही निबंधात मिळून सापडेल.

**वाक्यरचनेचे वैचित्र्य**

नवी एकेरी नि स्वतंत्र क्रियापदे रुळविण्याच्या सुधारणेप्रमाणेच आपल्या वाक्यरचनेत अर्थानुरोधाने थोडेसे वैचित्र्य आणण्याची पद्धतही पाडावी असे मला वाटते. आपल्या वाक्यरचनेची ठराविक धाटणी म्हणजे क्रियापद घालावयाचे ते शेवटीच, आणि शेवटी क्रियापद हे असलेच पाहिजे. आजच्या गद्य लिखाणातच ही धाटणी ठराविक झाली आहे. परंतु बखरीतील मराठीत मी म्हणतो तशी क्रियापदे, अर्थात बळकटी येत नसेल तर शेवटी न घालता मध्ये घालून जो शब्दविशेष साभिप्राय असेल तोच शेवटी घातलेला आढळतो. जसे– “ आता तुमची आमची गाठ पडेल रणांगणात ! ” होय, आहे, होते इ. क्रियापदे नि एकसारखी आजच्या गद्य लिखाणात शेवटी येतात ती बखरीतील लिखाणात बहुधा साफ गाळलेलीच असतात. जसे ‘ समर्थ परम तपस्वी, निश्चयाचे केवळ मेरू. त्या युद्धास उपमा तर एका कुरुक्षेत्राचीच ! म्हणतील ते प्रमाण ! ’ इत्यादी. बंगालीमध्ये शेवटची अशी अनावश्यक क्रियापदे गद्य लिखाणातून आजही गाळतात. संस्कृतमध्ये तर अर्थानुरोध क्रियापद, कर्ता, कर्म यांची स्थाने वाक्यरचनेत पालटण्याचा आहे संप्रदायच ! त्यायोगे संस्कृत वाक्यरचना किती वैचित्र्यपूर्ण असते ते बाणाच्या कादंबरीसारख्या अभिजात ग्रंथात पदोपदी आढळते. आपल्या बोलण्यात मात्र जो विशेष साभिप्राय तोच शब्द आपण शेवटी घालतो आणि क्रियापदे मध्ये टाकतो. आपण कुठे होतो हे स्थलावर बळ देऊन सांगावयाचे तर आपण म्हणतो, ‘ त्या दिवशी होतो दिल्लीला ’, ‘ उद्या जाणार लाहोरला ’ दिवसावर बळ द्यायचे

असेल तर म्हणतो 'दिल्लीत होतो काल' 'लाहोरला जाणार आज.' तशीच घडण 'कुठे ग आहे ती माळ ?' 'आहेच तो शूर', 'गाणं गा पाहू एक छानसं!' या वाक्यांतही आहे. तेव्हा बोलण्यात वा बखरीत आपल्या गद्यामध्ये अधिक साभिप्राय तो शब्द शेवटी घालून किंवा अनावश्यक क्रियापदे गाळून वाक्यरचनेत जसा आपण आटोपसरपणा वा ठसकेबाजपणा आणतो तसे वैचित्र्य आजच्या आपल्या गद्य लिखाणातही आणावे अशी मला आहे हौस. अर्थात अशी उलटापालट केवळ टूम म्हणून करता कामा नये. वाक्याची शोभा नि अर्थाची बळकटी वाढत असेल तरच वाक्यरचनेचे वैचित्र्य उपयुक्त प्रयोजन. उदाहरणार्थ हे वाक्य पहा–'जपानला का मिळाला विजय ?' 'चीनचा का झाला पराजय !' 'काय जपानचा पक्ष न्यायाचा होता ?' आणि 'चीनचा अन्यायाचा ?' 'नाही ! पण जपानचा विजय झाला !' कारण, त्याची तलवार होती तिखट, दारू कोरडी, संघटना भक्कम, छाती निधडी ! तेव्हा जयपराजय हे न्यायान्यायावरच काय ते अवलंबून असतात, अशी जी श्रद्धा तीच मुळात आहे भ्रामक !' मानपत्राचे शेवटी आजकाल जे वाक्य लिहितात तेही वाक्यरचनेच्या अनुकरणीय वैचित्र्याचे उदाहरण म्हणून सांगता येईल. जसे 'आम्ही आहो, आपले कृतज्ञ, दिल्लीचे नागरिक !'

(मराठी साहित्य संमेलन, अध्यक्षीय भाषण)

# ८ : लिपिशुद्धी आणि भाषाशुद्धी

(हिंदी ही भारताची राष्ट्रभाषा व्हावी व नागरी लिपी ही राष्ट्रीय लिपी व्हावी हा सावरकरांच्या साहित्यविषयक चिंतनाचा एक प्रमुख विषय होता. मराठी भाषा ज्या नागरी लिपीत लिहिली जाते ती नागरी लिपी मुद्रणक्षमतेत आणि शिक्षण सुलभतेत इंग्रजीहून वरचढ व्हावी अशी त्यांची इच्छा होती.तसेच मराठी शब्द मारून अनावश्यक परकीय शब्द मराठी भाषेत शिरू नयेत म्हणून भाषाशुद्धीचा पुरस्कार आणि प्रचार सावरकरांनी पोटतिडकीने केला. भाषाशुद्धीविषयक त्यांचा दृष्टिकोन किती व्यापक, विज्ञानाधिष्ठित व क्रियात्मक स्वरूपाचा होता हे त्यांच्या खालील उताऱ्यावरून दिसून येते.)

सांस्कृतिक नि भावनिक दृष्टया महत्त्वाची असलेली भाषाशुद्धीची चळवळही आजची उद्यावर ढकलता येईल, परंतु जर आपल्या नागरी लिपीला राष्ट्रीय लिपी करून सोडावयाची असेल तर लिपिशुद्धीची सुधारणा मात्र आपल्याला शक्य तितक्या लवकर हातानिराळी करून टाकलीच पाहिजे. कारण की आपल्या आजच्या लिपीत ह्या दोन-चार लहानसहान सुधारणा करताच ती मुद्रणक्षमतेत इंग्रजीहून वरचढ ठरणारी आहे. आपली नागरी लिपी इंग्रजीहून मूळचीच शास्त्र-शुद्ध असल्यामुळे तिच्यात ज्या सुधारणा आवश्यक आहेत त्या मुळातच आहेत अगदी थोडया नि अगदी सहजसाध्य ! त्या अशा:–

१) अची बाराखडी– या सुधारणेमुळे सात-आठ अक्षरे शिकण्यात उणी होतील आणि सात-आठ टंक टंकपेटिकेत कमी लागतील.

२) सलग जोडाक्षरे – आपल्या लिपीला शिकण्यात नि छापण्यात जे अवघड रूप आलेले आहे ते मुख्यत: विक्षिप्त नि नियमबाह्य जोडाक्षरांमुळेच होय. क्त, क्क, त्र, क्का, (जसे पक्का) ल्ला, (जसे पल्ला) इत्यादी जोडाक्षरांची सध्याची रूपे स्वतंत्र टंकानेच छापावी लागतात. अशी रूपे ३०।४० तरी भरतात, पण जोडाक्षर म्हटले की काना गाळून उच्चाराप्रमाणे सरळ नि सलग लिहीत गेले की हे ४०।५० टंक टंकपेटीतून उडून जातील आणि मुलांना जोडाक्षरे अशी शिकवावीच लागणार नाहीत. एक नियम शिकवला की सारी जोडाक्षरे आपोआप लिहिता येतील. व्यंज-नाच्या मूळच्या थोडयाशा खिळयांवरच छापता येतील. जसे क्त, क्क, ल्ला, क्का, त्र

३) क, फ, र– ही तीन अक्षरे कानायुक्त करणे. आज एकटे ‘र’ हे अक्षर आपण पाच प्रकारांनी लिहितो. जसे र, ऱ्या, ट्र, प्र, या सर्वांमध्ये. परंतु ‘र’ हा कानायुक्त केला की हा घोटाळा मोडतो. तीच स्थिती ‘क’ ची व ‘फ’ ची. त्यायोगे शिक्षण सुलभ होते. दहा टंक तरी छापण्यांत उणावतात. रेफही वाचते. जसे, सऱ्प

४) शेंडीवाल्याची पायमोड– ह वर्ग, छ, ह प्रभृतींना जोडाक्षरात व्यंजनरूप द्यायचे म्हणजे त्यांना पायमोड चिन्ह लावावे ! जसे मोठ्या, ह्या इत्यादी.

झालं ! या चार अगदी सोप्या सुधारणा केल्या की, आज मराठी टंकपेटिकेत जे न्यूनात न्यून २०० टंक तरी लागतात ते उणावून अवघ्या ६० एका टंकांत संस्कृतसुद्धा सारे लिखाण शास्त्रशुद्धपणे छापता येते. लिपी शिकताना मुलांना ६०

एक अक्षरे कमी शिकावी लागून शिक्षण सुलभ तर होते. छापखान्यांत पूरणाचा (डिग्रीचा) जो एक इंग्रजीला नसलेला उपसर्ग आपल्या लिपीला असतो तोही अगदी नाहीसा होतो. या चार अगदी सोप्या सुधारणा करताच आपल्या लिपीचे मुद्रण दुप्पट सुलभ नव्हे, तर दुप्पट स्वस्तही होईल. अर्थात ही लिपिशुद्धीची सुधारणा नुसती भावनिक नाही तर हा रुपये आणि पैचा अगदी व्यावहारिक नि त्वर्य (urgent) प्रश्न आहे.

ही योजना मी काही लहरीसरशी उचलून धरली नाही. गेली पन्नास वर्षे कै. गजाननराव वैद्य, कोल्हापूरचे देवधर, श्री. शितूत प्रभृती अनेक गृहस्थांनी तिचा उपक्रम चालविला होता. उण्यापुऱ्या चाळीस पन्नास योजना पुढे आल्या होत्या. 'श्रद्धानंद' पत्रात मी त्या सर्वांचा नामोल्लेख करून, त्यांना तोलून पारखून, जे न्यूनांत न्यून पालट आजच्या रूपामध्ये करावा लागतो अशी ही योजना उचलून धरली. कै. डॉ. भांडारकर नि लोकमान्य टिळक यांनीही या योजनेस संमतीपत्रे दिली होती नी देवधरांकडे आहेत. लोकमान्य देवधरांना या प्रकरणी छेडीत– "अहो योजना आहे अगदी ठीक! पण ती व्यवहारविणारा कोण आहे तो दाखवा." आम्ही जर काही केले असेल तर हेच! त्या योजनेला स्वत: आचरून टाकले आणि महाराष्ट्राच्या मागे तिचे सारखे टुमणे लावून तिला एका संघटित आंदोलनाचे स्वरूप आणून दिले. त्यायोगे या साहित्यसंमेलनातही तिचे लोण येऊन मागेच पोचले आहे. एक समितीही साहित्याचार्य तात्याराव केळकर यांचे प्रमुखत्वाखाली नेमली गेली. तिने सर्व प्रश्न विवेचून प्रतिवृत्त लिहिले. आणि त्यात 'अ' ची बाराखडी नि सलग जोडाक्षरे ह्या दोन सुधारणा तर तात्काळ चालू कराव्यात म्हणून अनुरोध (शिफारस) केला. उरलेल्या दोनही संमतिल्या; पण हळूहळू व्यवहाराव्यात असे सुचविले. मध्यंतरी हिंदी पत्रातूनही आम्ही लेख लिहिले, हिंदी साहित्य संमेलनाचे वतीने श्री. काकाराव कालेलकर यांच्या प्रमुखत्वाखाली विचार होऊन त्यांनीही बहुतेक योजना ग्राह्य ठरविली. रत्नागिरीच्या ज्या दोघा वृत्तपत्रांनी 'श्रद्धानंदा'चे मागोमाग ह्या सुधारणांप्रमाणे छापणेही थोड्या फार प्रमाणात चालू केले ते 'बलवंत' नि 'नित्यशोधक,' 'सह्याद्री', 'केसरी', 'साहित्यपत्रिका', 'सकाळ', 'स्वराज्य', 'गोरक्षण', 'निर्भीड', 'किर्लोस्करी' मासिके प्रभृती अनेक नियतकालिकांतून 'अ' ची बाराखडी नि सलग जोडाक्षरे ह्या दोन प्रमुख सुधारणा बव्हंशी व अल्पांशी आज व्यवहारिल्या जात आहेत. आमच्या समग्र लिखाणांत नि ग्रंथांत त्याचप्रमाणे सर्वांचेआधी रत्नागिरी हिंदुसभा, किरण मंडळ, दादर हिंदुसभा, प्रभृती संस्था नि प्राध्यापक माधवराव पटवर्धनांसारखे लेखक वरील दोन मुख्य सुधारणा बव्हंशी नि इतर उपांगेही काही अंशी प्रयोजित आहेत.

**महाराष्ट्र लिपिशुद्धी मंडळ :**

आजवर ह्या लिपिशुद्धीच्या आंदोलनाला जे वर दर्शविल्याप्रमाणे बरेचसे यश आले आहे ते तिची नुसती तात्त्विक काथ्याकूटच जर आपण करीत बसतो तर आणखी पन्नास वर्षे सुद्धा आले नसते. अशा सुधारणा सर्वांची एकमुखी संमती मिळवून मग आचारू म्हणून म्हटले तर कधीच व्यवहारून टाकल्या जात नाहीत. यास्तव ज्यांना त्या पटल्या तेवढ्यांनाच सांगाती घेऊन आपण स्वत: त्या आचरिल्या पाहिजेत. तसा उपक्रम रत्नागिरी लिपिशुद्धी मंडळासारख्या संस्थेने नि व्यक्तींनी केला, म्हणूनच आज ही सुधारणा लोकांच्या दृष्टीस सवयीची होत चालली आहे. आणि सवयीची होता होता पटत चालली आह. तरी येथे असलेल्या लिपिसुधारकांनी त्या रत्नागिरी लिपिशुद्धिमंडळाचे धर्तीवर एक महाराष्ट्र लिपिशुद्धी मंडळ याच मुहूर्ती स्थापावे, त्यांच्या शाखा प्रत्येकाने आपल्या गावोगावी उघडाव्यात. 'मी आजन्म स्वत: हीच सुधारलेली लिपी वापरीन' अशी प्रतिज्ञा केलेल्या सभासदांची नोंद ठेवावी. त्या प्रत्येकाने आपल्या मुलाबाळांतून, घराघरांतून आणि आपल्या हाती असलेल्या शाळा, वृत्तपत्रे, ग्रंथप्रकाशने, प्रभृती संस्थांतून तिचाच प्रचार करावा. सर्व व्यक्तिगत पत्रव्यवहारांतून हीच लिपी प्रत्येकाने वापरली तर फार मोठा प्रचार सहजासहजी होऊ शकतो हा आमचा ठाम अनुभव आहे.

ज्यांना आज ही लिपीशुद्धी पटत आहे तितक्यांनी जरी असा संघटित नि प्रबळ प्रचार आणखी पाच वर्षे केला तरी हा लिपिसुधारणेचा एक प्रश्न आपल्या हातानिराळा करता येईल ! 'उदय', 'महाराष्ट्र' 'सावधान' प्रभृती वृत्तपत्रांच्या संपादक महाशयांनी आपण निदान 'अ' ची बाराखडी नि सलग जोडाक्षरे आपल्या वृत्तपत्रांतून वापरू असे अभिवचन आम्हांस दिले आहे. तसेच ज्यांना ही लिपिशुद्धी पटली आहे ते संपादक जरी निदान ह्या दोन सुधारणांना व्यवहारू लागतील, तरी लिपिशुद्धीची ही दोन प्रमुख उपांगे पूर्णपणे रुळून जातील, तोवर आम्ही क, फ, र ची रूपेही लोकांच्या दृष्टीस तरी सवयीची करून सोडू.

आपल्या लोकांतील कृतिदुर्बलत्वाच्या ज्या दोषांसंबंधी आम्ही या निबंधाचे प्रारंभीच खेद व्यक्तविला, त्याचेच लिपिसुधारणेचा हा प्रश्नही एक लज्जास्पद उदाहरण आहे. तुर्क लोकांमध्ये शेकडो वर्षे अरबी लिपी धर्मलिपी म्हणून घर करून बसलेली; पण ती अगदी बोजड नि मुद्रणास अक्षम अशी वाटताच तुर्कांनी एका वर्षात ती उखडून फेकून दिली. आणि अवघ्या चार-पाच अक्षरांची रूपे पालटताच आपली नागरी लिपी इंग्रजीहूनही शिक्षण–सुलभतेत, मुद्रण सुलभतेत नि स्वस्ताईत वरचढ होऊ शकते हे ज्यांना पटले, त्यांच्यातसुद्धा शेकडा

पंचाहत्तर लोक ती स्वत: वापरण्यास अळंटळं करतात ! पण जितके आम्ही कृतीचे पंगू तितकेच नुसत्या योजना आखण्यात किती पटाईत आहोत पहा ! इकडे चार अक्षरे पालटण्यास चाळीस वर्षे पुरत नाहीत ! तो तिकडे सुभाषबाबूंसारखे राष्ट्र-सभाध्यक्ष या देशात एकदम रोमन लिपीच राष्ट्रलिपी करून टाकण्याची योजना आखून मोकळे झाले आहेत !

लिपिसुधारणेची चळवळ प्रथम काढली आपल्या महाराष्ट्राने. आता ती सहज-साध्य सुधारणा व्यवहारामध्ये रुळवून नागरी ही इतर कोणत्याही लिपीपेक्षा अधिक शिक्षणसुलभ नि मुद्रणसुलभ आहे हे प्रत्यक्षपणे साऱ्या हिंदुस्थानात पटवून दिले पाहिजे—महाराष्ट्रानेच ! लिपिशुद्धी ही महाराष्ट्राची क्लृप्ती आहे. आता तिच्या प्रयोगाने आपली राष्ट्रलिपी इंग्रजीहून वरचढ करून सोडण्याचा मानही महाराष्ट्राने पटकाविला पाहिजे.

हा लिपिशुद्धीचा प्रश्न म्हणजे एका राष्ट्रीय सुधारणेचा प्रश्न ! कारण नागरी हीच राष्ट्रीय लिपी होणार ! त्यातही हा प्रश्न एका दमडीचाही व्यय न करता किंवा एका दिवसाचाही बंदिवास भोगावा न लागता, केवळ मनात आले की सुटण्यासारखा आहे. वापरीत चला की, लिपिसुधारणा रूळलीच म्हणून समजा. ही एक राष्ट्रीय सुधारणा तरी हातानिराळी झालीच म्हणून समजा !

**महाराष्ट्र-भाषाशुद्धी-मंडळ स्थापा ! :**

तीच गोष्ट भाषाशुद्धीच्या प्रकरणीही तंतोतंत लागू आहे. या विषयाचा यथा-स्थित ऊहापोह आजवर झालेला आहे. प्रचार म्हणून आणखीही होत राहील. परंतु या निबंधात तो ऊहापोह करण्याचे कारण वा स्थळही नाही. इतके सांगितले म्हणजे पुरे आहे की, भाषाशुद्धीवर येणारे शेकडा नव्वद आक्षेप तरी अशा एका गैरसमजाने आलेले असतात, की मराठीत कोणताही उर्दू वा इंग्रज़ी शब्द असा वापरावया-चाच नाही असे भाषाशुद्धीचे म्हणणे आहे ! परंतु, असे तिचे म्हणणे नाही मुळी. भाषाशुद्धीची मुख्य सूत्रे दोनच—

१) आपल्या भाषेत ज्या अर्थाचे शब्द होते, आहेत किंवा उद्‌भवणे सुसाध्य आहे अशा अर्थाचे परकीय शब्द काय ते आपण वापरू नयेत. मग ते जुने असोत वा नवे. आपले तदर्थक शब्द मारून ते परशब्द रुळतात. त्यांनी काही आपली शब्द-संपत्ती वाढत नाही.

२) परंतु ज्या अर्थाचे शब्द, त्या वस्तूच पूर्वी आपल्यांत नव्हत्या म्हणून आपल्या भाषेत मुळातच नाहीत किंवा उद्‌भवणे दुर्घट आहेत असे परकी शब्द वापर-ण्यास आडकाठी नाही. त्या परशब्दांनी मात्र आपली शब्दसंपत्ती काही अंशी वाढेल. जसे कोट, बूट, गुलाब, जाकीट, पेन्सिल इत्यादी.

ही भाषाशुद्धीची दोन मुख्य सूत्रे जर ध्यानात ठेवली तर तिच्यावर गैरसमजाने येणारे शेकडा नव्याण्णव आक्षेप गळून पडतील. ज्याच्या तोंडी जो येईल तो परशब्द– फादर, मदर, इलेक्शन, हाऊस, डोअर, मुबारक, अफ्ताब, वाईफ, मीटिंग, अिन्विटेशन प्रभृती सरसकट नि रोखठोकपणें आपल्या बोलण्यात वा साहित्यात घुसू द्यावेत असे म्हणणारा सद्गृहस्थ विरळाच ! बाकी मतभेद जे आहेत ते फुटकळ प्रकरणीच उरलेले आहेत. अमका शब्द स्वकीय वा परकीय, अमक्या शब्दांत विशेष छटा आहे की नाही, तमका नवा शब्द सुटसुटीत आहे वा बोजड, हे मतभेद मुख्य धोरणाला बाध आणीत नाहीत. एकाने काढलेला स्वकीय नवा शब्द बोजड वाटेल तर दुसऱ्याने दुसरा योजावा. जो तगेल तो जगेल. आपला शब्द मारून अनावश्यक परकीय शब्द भाषेत नि साहित्यांत घुसू देऊ नयेत या मुख्य धोरणाकडे आपण पाठ फिरवली नाही, म्हणजे झाले.

आणि त्या दृष्टीने पाहाता गेल्या दहा-बारा वर्षांतील भाषाशुद्धीच्या आंदोलनाचे कार्य कितीतरी यशस्वी झालेले आहे. आज आमच्या भाषेवर मुख्यतः दोन परकीय भाषांचे प्रबळ आक्रमण चालू आहे किंवा होऊ घातलेले आहे. या दोन परकीय भाषा म्हणजे उर्दू नि इंग्रजी. ह्यामुळे आपल्या भाषेत त्या उर्दू नि इंग्रजी परशब्दांना निष्कारण घुसडू देऊ नये, ह्यावर भाषाशुद्धीचा विशेष कटाक्ष प्रथमपासून आहे. त्याचा एक महत्त्वाचा परिणाम आज असा झाला आहे की, विवेकासाठी असो वा विडंबनासाठी, पण हा शब्द परकीय की स्वकीय, याची चालना शाळेतील मुलांपासून तो साहित्यसम्राटापर्यंत घरीदारी चालू आहे. शक्यतो अनावश्यक असा उर्दू व इंग्रजी शब्द वापरावयाचा नाही, ह्या धोरणाची छाप या वा त्या प्रमाणात मराठी लिखाणावर पडली आहे. मुसलमानी राजसत्तेच्या काळात लब्धप्रतिष्ठितांच्या परधार्जिणेपणामुळे घरीदारी उर्दू शब्द घुसून तदर्थक जे मराठी शब्द साहित्यातून नामशेषले परंतु जे जुन्या ग्रंथातून आणि विशेषतः आमच्या खेडच्यापाडच्यांतूनही आज कसेबसे जीव धरून राहिलेले आढळतात, त्यांना पुनः प्रचलविण्याकडे प्रबोधनकार श्री. ठाकरे यांच्यासारख्या लेखकाचा ओढा वाढत आहे. अशा स्वकीय, सुटसुटीत नि सकस जुन्या मराठी शब्दांची आम्हालाही नव्या बोजड शब्दापेक्षा अधिक आवड आहे. पुन्हा जे नवे स्वकीय शब्द भाषाशुद्धीच्या आंदोलनामुळे मराठीत भर टाकीत चाललेले आहेत, त्यातही अनेक संग्रहणीय असेच ठरले आहेत; मराठी साहित्यातच नव्हेत तर बोलता बोलता सर्व हिंदुस्थानभरही काही काही रूळत जात आहेत. आमच्यापुरतेच बोलायचे झाले तर आम्ही काढलेल्या वा इतरांच्या रुढविलेल्या अशा काही शब्दांचेच उदाहरण घ्या.

उपस्थित (हजर), विधिमंडळ (कायदे कौन्सिल), जुळारी (Compositor) स्तंभ (Column), दंडविधान (पिनलकोड), उपमुद्रिते (प्रूफस्), विश्वस्त (ट्रस्टी),

निक्षेप पत्र किंवा विश्वस्त पत्र (ट्रस्टडीड), परिपत्र (सर्क्युलर), व्ययसंकल्प (बजेट), प्रासिद्धके (जाहिराती), टंकलेखक (टाईपरायटर), आजीवन किंवा आजन्म (तहहयात), छेदक (पॅरिग्राफ), संचलन (ड्रिल), एकटंकक (मोनोटाईप), पंक्तिटंकक (लिनोटाईप), उच्चांक वा विक्रम (रेकॉर्ड), राजबंदी, स्थलबंदी (internment), अखंड टाक वा झरणी (फाउंटन पेन), ग्रंथविक्रेते (बुकसेलर्स), घडयाळजी (वॉचमेकर), सैनिकाभिवादन (गार्ड ऑफ ऑनर), पुनर्न्याय (अपील), क्रमांक (नंबर), गृहांक (हाऊस नंबर), गण किंवा गणसंख्या (कोरम), इच्छुक किंवा स्पर्धालू (कॅन्डिडेटस), उत्तरदायित्व वा दायित्व (जबाबदारी), इतिवृत्त (रिपोर्ट), ध्वनिक्षेपक (लाउडस्पीकर), कालादर्श किंवा मितीपट (कॅलेंडर), निश्चिती (खात्री), पूर्वसिद्धता वा पूर्वसज्जता (पूर्वतयारी), हुतात्मा (Martyr), हुतात्मता (Martyrdom), निर्बंध (कायदा), निर्बंधपंडित (कायदेपंडित), निर्बंध शास्त्र (कायदे शास्त्र), बोलपट, अद्ययावत (up–to–date) इत्यादी !

आता अशा दीडशे दोनशे नव्या शब्दांमध्ये सगळेच काही टाकावू आहेत असे म्हणवत नाही. कारण त्यांतील बहुतेक शब्द अनेक साहित्यिक प्रत्यही उपयोजित आहेत. काही हिंदुस्थानभर प्रचलिले आहेत. प्राध्यापक माधवराव पटवर्धन, श्री. आठवले, श्री. भिडे, श्री. देवधर इत्यादी भाषाशुद्धीच्या एकनिष्ठ प्रचारकांची तर आम्हांवरही कडी आहे. त्यातही आता तर सुविख्यात आणि अक्षरशः दांडगा असा प्राध्यापक अत्रे यांच्यासारखा साहित्यिक भाषाशुद्धीच्या पक्षास मिळालेला ! ज्या भाषाशुद्धीच्या पारडयात प्राध्यापक अत्रे, ते पारडे आता जड झाल्यावाचून राहात नाही हे नक्की ! महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून परशब्दांनी अकलंकित असा पहिला विशुद्ध मराठी निबंध वाचण्याचा मान पटकविला प्राध्यापक पटवर्धनांनी ! मी नव्हे ! त्यांनी आणि इतर कित्येकांनी आज आणि कै. प्रो. भानू प्रभृती विगत साहित्यिकांनी पूर्वीपासूनच, जे शतावधी स्वकीय प्रतिशब्द उद्भवून मराठी भाषा परिपुष्ट नि सुसंपन्न केली, तोही ह्या भाषाशुद्धीच्याच तत्त्वाचा विजय होय.

बहुतेक प्रकरणी स्वभावतःच प्रगतिप्रिय असणाऱ्या श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांनी स्वकीय अशा नैर्बंधिक प्रतिशब्दांचा संग्रह करणारा ‘शासनकल्पतरू’ हा प्रचंड कोश प्रसिद्धवून भाषाशुद्धीच्या कार्याला जी अमोल सहायता दिली आहे, तीविषयी आम्ही महाराजांनाही मनःपूर्वक अभिनंदितो. इतकेच नव्हे तर बडोद्यास असताना आम्हांस असे आढळून आले की, अनेक विभागांच्या (डिपार्टमेंटस्च्या) कारभारात ते स्वकीय प्रतिशब्दच रुळतही आहेत आणि त्या प्रमाणात अनावश्यक नसताही स्वभाषेत घर करून बसलेल्या परशब्दांचे उच्चाटनही होत आहे. श्री शिवाजी महाराजांनी परकीय शब्दांनी बुजबुजाटलेल्या स्वभाषेस विनि-

मुक्त करण्यास्तव पूर्वी राजव्यवहार कोश रचविला. त्यानंतर आपली नैर्बंधिक परिभाषा परशब्दांच्या ग्रहणापासून सोडविण्यास्तव इतका व्यापक कोश असा हा रचविला एक श्रीमंत सयाजीराव गांयकवाड महाराजांनीच ! इतर महाराष्ट्रीय संस्थानिकांनाही आमची अशी विनंती आहे की त्यांनीही शक्यतो स्वकीय शब्दच आपल्या राज्यात रूढ करून परकीय शब्दांच्या आक्रमणापासून मराठी भाषेचें रक्षण करावे. या कामी कुठे कुठे कशी अक्षम्य ढिलाई होत आहे याचे एक उदाहरण म्हणून ग्वाल्हेरच्या पंचसभेचे आजचे नाव दाखवता येईल. लोकसभा, विधिमंडळ, पंचसभा किंवा गुजराथी, हिंदीत म्हणतात तसे धारासभा हे स्वकीय नि सोपे शब्द आपल्या भाषेत आज असताना, प्रत्यक्ष मुसलमानांतही शेकडो लोकांना न समजणारा असा एक परकीय शब्द ग्वाल्हेरच्या विधिमंडळास योजला आहे. लोकसभेचे नाव पाळण्यातच ठेवले गेले– ' मजलिस–इ– आम !' मराठी भाषेच्या अभिमानी असलेल्या शिंदे सरकारांना आमची विनंती आहे की असले अगदी अनावश्यक नि कठीण परकीय शब्द त्यांनी आपल्या संस्थानात रुळवू नयेत; ते हिंदीस वा मराठीस सर्वस्वी विप्रकृत आहे, हानिकारक आहे, स्वाभिमानास शोभत नाही.

आयर्लंड हा इंग्रजी शब्द आयर्लंड देशामध्ये मुलाबाळांचे तोंडी दहा शतके स्वदेशाचे नाव म्हणून रुळलेला होता. पण तरीही आयर्लंडला संधी मिळताच त्यांनी तो बद्धमूल परशब्दही उखडून टाकून त्यांच्या त्यांनाही अपरिचित वाटणाऱ्या त्यांच्या मूळच्या गॅलिक भाषेतील ' आयरिन ' ह्या शब्दाने आपल्या देशाचे पुन्हा एकदा नामकरण केले. पार्लमेंट हा चिरपरिचित परकीय शब्द रद्द करून आपल्या पंचसभेस ' डेल'हा स्वकीय शब्द योजला. आणि आम्ही लोकसभा, पंचसभा धारासभा, विधिमंडळ प्रभृती स्वकीय शब्द प्रचारात असताही आमच्या प्रतिनिधीसभेस नाव देतो– ' मजलिस–ई–आम ! ' असले अगदी अनावश्यक परकीय शब्द तरी आपण होऊन स्वभाषेत घुसडू नका. आणि त्या प्रमाणात आपले तदर्थक शब्द प्रचारातून लुसवू नका ! इतके काय ते जे भाषाशुद्धीचे म्हणणे– ते अतिरेकाचे कसे म्हणता येईल !

पण भाषाशुद्धीचे मुख्य सूत्रही जर कोणास अतिरेकी वाटत असेल तर त्याच्या ह्या मतभेदाचाही आम्ही शक्य तो आदरच करू. त्याचे मत अनुकूल होईतो त्याचे प्रकरणी वाट पाहू. त्यांना तो पावेतो विनंती इतकीच की, आम्हां भाषाशुद्धीच्या अभिमान्यांनी आमच्यापुरते जर नवे नवे स्वकीय प्रतिशब्द जुळविण्याचा यत्न चालविला आणि जुन्या वा नव्या उर्दू इंग्रजी शब्दांना टाळा दिला तर भाषाशुद्धीच्या तत्त्वासही प्रतिकूल असणाऱ्यांनी आमच्यावर रागावू नये. जर आमचे नवेनवे शब्द जगण्यासारखे असतील तर टिकतील; भाषेत परकीय शब्दांचीही भर टाकून तिला

संपन्न बनविता येते, असे मत असणारांना, तिच्यात स्वकीय शब्दांची योग्य भर पडली असता त्याने मात्र तिची संपन्नता घटते असे तरी केव्हाही म्हणता येणार नाही.

भाषाशुद्धीची चळवळ तत्त्वतःच मान्य नसलेल्या माझ्या मित्रांना इतके विनविल्यानंतर भाषाशुद्धीस अनुकूल असलेल्या माझ्या मित्रांना मला असे सांगावयाचे आहे की, त्यांनी आता वैयक्तिक प्रचार करीत न राहता आपले अनुकूल असणारांचे एक स्वतंत्र महाराष्ट्र भाषाशुद्धी मंडळ स्थापावे आणि संघटित प्रचार चालू करावा. तत्काळ बहिष्कार्य अशा जुन्या तोंडी नि लेखी रूळलेल्या उर्दू शब्दांचा एक लहानसा कोश रत्नागिरीच्या भिडे B. A. B. T. यांनी प्रसिद्धीला आहे. अनेक नत्रे प्रतिशब्द इंग्रजीतील मराठीत घुसलेल्या शब्दांना उच्चाटण्यासाठी पुढे येत आहेत त्यांना साकल्याने विवेचून बहिष्कार्य उर्दू इंग्रजी शब्दांचा एक अधिकृत नि आटोपशीर असा कोश प्रसिद्धावा. प्रत्येक गावोगावी शाखा काढून " मी अनावश्यक परकीय शब्द आजन्म तोंडी वा लेखी वापरणार नाही. " अशा प्रतिज्ञा करणाऱ्या सभासदांच्या तालिका कराव्यात. अधिकृत कोशातील शब्दच आपल्याला लिखाणातून नि घराघरातून वापरावेत म्हणजे ते त्या त्या अर्थी रूढावतील. शब्द वापरता वापरता त्याला तो अर्थ वा छटा आपसूक चिकटते हे प्रमुख साधन ध्यानी धरावे. हिंदीमध्येही अशी उठावणी विशेषतः आर्यसमाजी हिंदी लेखकाकडून होत आहे. त्यांच्या नि हिंदुभाषा संघातील इतर भाषाशुद्धीवाल्यांच्याही विचारविनिमयाने शुद्ध स्वकीय शब्दांची देवाण घेवाण करीत चलावे. प्रसंगी एखादे अखिल भारतीय भाषाशुद्धी संमेलनही भरवीत चलावे. काही झाले तरी भाषाशुद्धीचे आंदोलन हे महाराष्ट्रात तरी गेल्या बारा वर्षांच्या चिकाटीच्या प्रचाराने स्थायिक झालेले आहे. आपण सर्वजण ते नेटाने नि अधिक संघटितपणे असेच रेटीत राहू तर या टोकास इतके ताणल्याने, महाराष्ट्रीय भाषेतील उच्चाटिले जावेत इतके परशब्द उच्चाटिले गेले नाहीत तरी, सध्या जी परशब्दांची बिनरोखठोक नि भरमसाट आवक वाढत आहे तिला पायबंद तरी निश्चितपणे पडेलच पडेल. घरांच्या नि दुकानावरच्या पाट्यांवरून हेगाडे मॅन्शन, Cloth Merchant सारख्या अनावश्यक परशब्दांचे उच्चाटन करता येईल.

नव्या कल्पनांना नवे स्वकीय प्रतिशब्द 'बोलपटा'सारखे प्रथमपासूनच रूळविता येतील. वापरीत चला, की, आज परकीय उर्दू इंग्रजी शब्दांना ज्या छटाबिटा चिकटल्यासे वाटत आहे, त्या झटसाऱ्या स्वकीय शब्दांसही चिकटल्यावाचून राहणार नाहीत, इतकेच नव्हे तर ऐकता ऐकता नि वाचता वाचता ते स्वकीय शब्द भाषाशुद्धीला आज मान्य नसलेल्या आपल्या मित्रांच्याही तोंडी लेखी रुळत तेही अनुकूल होतील तेव्हा ज्यांना भाषाशुद्धी मान्य त्यांना विनंती की, त्यांनी

आता तात्त्विक विचारांचा काथ्याकूट पुष्कळसा सोडून देऊन संघटितपणे व्यावहारिक आचारावरच मुख्य भर द्यावा आणि एक महाराष्ट्र भाषाशुद्धी मंडळ स्थापून या मताच्या शतावधी लोकांना एकसूत्री नि प्रत्यक्ष आचरणात्मक कार्यक्रमास गोवून घ्यावे.

**विशेषतः ' कायदा ' शब्द आजच्या आज बहिष्कारा !**

इतर सर्व शब्दांपेक्षा कायदा ह्या उर्दू शब्दाची आम्हास अत्यंत लाज वाटते. मराठीतच नव्हे तर साऱ्या भरतखंडात कायदा ह्या शब्दाला आपला स्वकीय हिंदू प्रतिशब्द असा एकही उरलेला नाही ! ज्या तत्त्वावर सुसंस्कृत समाजाची मूलभित्ती त्याच तत्त्वाला आमच्यात– ज्यांनी जगातील विविध विज्ञानावरचा अत्यंत प्राचीन असा मनुस्मृतीसारखा ग्रंथ जस्टिनियनच्या शतकोशतके आधी ग्रंथिला, ज्यांनी चंद्रगुप्ताची साम्राज्ये चालविली, चाणक्याचे अर्थशास्त्र रचले, त्या आमच्या हिंदू जगतात– प्रतिशब्द उरू नये याचा आम्हास तीव्र विषाद वाटतो ! कायद्याला निर्बंध असा शब्दच उत्तम. अटकाव याला प्रतिबंध योजावा म्हणजे कायदेशीर, कायदेपंडित-कायदेशास्त्रासारख्या धेडगुजरी कर्णकटू नि करंटचा शब्दांना निर्बंधशील, निर्बंधपंडित, निर्बंधशास्त्र, नैर्बंधिक असे श्रुतिसुखद, स्वकीय, सामासिक शब्द हवे तितके उद्भविता येतील. महाराष्ट्राने एकदा निर्बंध शब्द सुचविला की, त्याची देणगी सगळ्या भारतवर्षातील काश्मिरी ते तामिळ तेलगूपर्यंन्तच्या आपल्या हिंदू भाषासंघास देता येईल. विधिमंडळ हा शब्द जसा आता सर्व वृत्तपत्रांनी उचलला तसाच जर निर्बंध (कायदा) हा शब्द नेटाने वापरतील तर अवघ्या एका वर्षात तो बद्धमूल होईल, आणि इंग्रज व मुसलमान या देशी येई तो जणू काय आम्हास ' Law 'ची, ' कायद्या 'ची कल्पनाच नव्हती असा जो लज्जास्पद ध्वनी त्या कल्पनेस स्वतःचा प्रतिशब्द आज मुळीच नसल्याने निघतो त्याचे यापुढे तोंडच बंद होईल. भाषाशुद्धीवाल्यांनी तरी अगदी तात्काळ ' कायदा ' वा ' Law ' हे शब्द बहिष्कारून ' निर्बंध' हा शब्द वापरण्याचा कृतनिश्चय करावा ! मतभेद असेल त्यांना आमचा आग्रह नाही. त्यांनी रुचेल तोवर कायदा हा शब्द वापरावा.

**विज्ञान परिभाषेस्तव अखिल भारतीय समिती :**

भाषाशुद्धीच्या प्रश्नाविषयी आपल्यात मतभेद असला तथापि या साहित्य संमेलनातील बहुतेक सभासदांचे याविषयी तरी एकमत आहेच आहे की आपल्या भाषेतील सर्व अर्वाचीन नि कित्येक प्राचीन विज्ञानातील पारिभाषिक ते ते शब्द एकदा ठाम ठरले जावेत. रसायन, वानस्पत्य, विद्युत प्रभृती विज्ञाने (Sciences) आता आपल्या मातृभाषेतून संपूर्णतः शिकवावी लागण्याचा समय जवळ आला आहे.

अंशत: ती कोठे कोठे तशी शिकविलीही जात आहेत, अशा पारिभाषिक निश्चित शब्दांची उणीव आपल्या मराठीलाच नव्हे तर बंगाली, हिंदी ते तामिळ-तेलगूपर्यंत आपल्या सर्व प्राकृत भाषासंघास आज नडत आहे. प्रत्येक प्रगत अशा प्रांतिक भाषेत संघश:नि व्यक्तिश: काही काही शास्त्रातील परिभाषा निश्चिण्याचा यत्नही झालेला आहे. त्या यत्नामुळे पुष्कळसे सुरेख शब्द आधीच पाडले गेले आहेत. पुष्कळशा अडचणी ध्यानी आल्या आहेत. आणि अखिल भारतीय अशी संस्कृतनिष्ठ परिभाषा ठाम करण्याचे कार्य त्यामानाने आता सुसाध्य झालेले आहे. राजशक्ती मागे असती तर एक वर्षाचे आत हे कार्य पार पडते. पण आहे त्या अडचणीतही अडून बसण्याचे कारण नाही. नुसत्या वार्षिक ठरावाचे नि योजना आखण्याचे काम आता पुरे झाले. या साहित्य संमेलनाने नि आपल्या मराठी साहित्य परिषदेने हे एक कार्य अगदी आपल्याच हातून पार पडले पाहिजे अशी ईर्षा धरून कामास लागावे.

प्रथमत: काश्मीरपासून रामेश्वरपर्यंतच्या आपल्या ज्या ज्या संस्कृतनिष्ठ प्राकृत भाषा आहेत त्यांच्यात वैज्ञानिक परिभाषेचे आजवर निवालेले शब्द एकत्र करावेत. विज्ञानातही प्रथमत: केवळ तार्किक वा बौद्धिक शास्त्रे हाती घेऊ नयेत. ज्योतिष्य, तत्त्व, तर्क, काव्य प्रभृतीच्या त्या त्या परिभाषा आहेत त्यासुद्धा पुरे आहेत. प्रथमत: भौतिक अशा अर्वाचीन विज्ञानांनाच हात घालावा, व्यवहार जो आपल्या राष्ट्राचा नडला आहे, मागासला आहे तो त्यामध्येच. नंतर प्राकृत भाषांमध्ये जितक्या साहित्यसंस्था आहेत, त्यांतील वा त्यांच्या वतीने नेमलेल्या प्रमुख परिभाषा-पटू पंडितांना आमंत्रून एक अखिल भारतीय संस्कृतनिष्ठ परिभाषामंडळ स्थापावे. परिषदाही भरवाव्यात. एकंदर कार्य तीन वर्षांत संपवून भारतीय परिभाषा कोश प्रसिद्ध करावयाचाच असा निर्धार केल्यास त्याच्या साहाय्यार्थ आपली महाराष्ट्रीय संस्थाने तरी पुढे आल्यावाचून सहसा राहणार नाहीत. आपल्या संस्थानिकांचे हातून जे होत नाही त्यापुरते नुसते जळफळत राहण्यापेक्षा त्यांच्या हातून जे होण्यासारखे आहे ते ते तरी करून घेण्यात अधिक शहाणपणा आहे. इतर साहित्य-संस्था परप्रांतातून सहकार्य करतीलच. पण ते न घडले तरी एकटच्या महाराष्ट्रीय साहित्य परिषदेस नि संमेलनासही हे कार्य स्वत:चे बळावर पार पाडता आले पाहिजे. काही शब्दांविषयी जरी वैकल्पिक परिभाषा सुचवावी लागली तरी एकंदरीत सहस्रावधी पारिभाषिक शब्द ठाम ठरवून टाकता येतील. आणि निरनिराळ्या विश्वविद्यालयाच्या ठरावांनी शिक्षणातून नि ग्रंथातून तेच मुख्यत: वापरविता येतील. असे एक चिरंतन कार्य जरी साहित्य परिषदेने नि संमेलनाने केले तरी बारा वर्षांच्या केवळ काथ्याकुटीपेक्षा साहित्याची काहीतरी म्हणण्यासारखी सेवा घडेल, आपल्या साहित्य संस्थेचे स्थान अखिल भारतात उंचावेल, नाव गाजेल.

या प्रकरणी एक चेतावणी ही दिलीच पाहिजे आणि ती ही की, ही परि-

भाषा ठरविण्यासाठी केवळ संस्कृतनिष्ठ त्या त्याच भाषांचे मंडळ नेमले जावे. हिंदुस्थानातील एका उर्दूवाचून खरे पाहता यच्चयावत भाषा संस्कृतनिष्ठ आहेत. तामिळ, तेलगू, कानडी ह्याही संस्कृतोद्भव नसोत, पण संस्कृतनिष्ठ नाहीत असे कोणताही तद्भाषीय हिंदू मनुष्य तरी म्हणू शकणार नाही. वास्तविक उर्दू ही कोटयवधी मुसलमानांनासुद्धा अपरिचित, पण जर मुसलमान तिला आपली मातृभाषा समजणार असले आणि ज्या अर्थी तशी त्यांची उघड उघड प्रतिज्ञाच झाली आहे, तर नि त्या अर्थी त्यांना उर्दू भाषेची रुचेल ती परिभाषा स्वतंत्रपणे ठरवू द्यावी. त्यांचा भर अरेबी पर्शियनवर. त्यांना श्रीचासुद्धा विटाळ! मग सबंध श्रीगणेशाची तर गोष्टच सोडा! तेव्हा अखिल भारतीय या गोंडस नावाखाली फसून, त्यांची नि आपल्या परिभाषेची एकच मोट बांधण्यासाठी एकच मंडळ नेमले तर त्या कार्याचा श्रीगणेशासुद्धा आजन्मात होण्याची आशा नको. पुन्हा आपल्या यच्चयावत भाषा संस्कृतनिष्ठ, अर्थात संस्कृतनिष्ठ परिभाषाच त्यांच्या प्रकृतीस मानवणार. त्यातही नवशब्द प्रसवक्षमतेत संस्कृतचा हात धरील अशी भाषा जगात आजही दुसरी कोणतीही सापडणार नाही. लॅटिन-ग्रीकसुद्धा जिचे कालवे शोभावेत त्या संस्कृतच्या गंगौघाकडे पाठ फिरवून जर एखादा करंटा तान्हेला पाण्याच्या शोधासाठी जाणूनबुजून अरबी वाळवंटात भटकू लागला तर त्याच्या नादी आम्ही काय म्हणून लागावे? यास्तव महाराष्ट्र साहित्य परिषदेने नि संमेलनाने जे परिभाषा मंडळ नेमावयाचे ते चकचकीत अखिल भारतीय संस्कृतनिष्ठ परिभाषा मंडळ म्हणून नेमावे. असंगाशी संग करण्याच्या वेडात, परिभाषेच्याच नव्हे तर स्वभाषेच्याही प्राणाची गाठ पडेल. नागपूर प्रांतातील शिक्षणप्रधान श्री. शुक्ल यांनी विद्यामंदिराची एक योजना आखली. त्या योजनेच्या त्या विद्यामंदिर ह्या साध्या संस्कृत नावानेसुद्धा चिडून जाऊन मुसलमानांनी विधिमंडळावर चाल केली! विद्येशी अविद्येने ठाणलेले हे वैर ओळखून, विद्येची विद्येपुरतीच परिभाषा आपण आखावी हेच सद्य:परिस्थितीत उचित!

**मराठी ग्रंथाचे इंग्रजी अनुवाद**

आणखी एक साहित्यविषयक कार्य केवळ साहित्य परिषदेनेच नव्हे, तर अवघ्या महाराष्ट्र साहित्यिकांनी आजच्या आज हाती घ्यावयास हवे. साहित्य परिषद किंवा साहित्य संमेलन त्याच्या शक्तीप्रमाणे करता येईल ते प्रत्यक्ष कार्य काही करीत आहेत, अधिकही करतील. परंतु आपणा सर्वांनी हे ध्यानात ठेवले पाहिजे की, आपणा सर्वांनी हातभार जर न लावला तर त्या संस्था तरी काय करणार? बहुजन समाजाला एक मोठी वाईट खोड आजकाल आपल्या इकडे लागली आहे. तो स्वत: काहीएक करणार नाही. त्याला जणू काही स्वत: काही-

एक न करता जो कोणी थोडेबहुत करील त्याला, तू आणखी कामे का करीत नाहीस असे हिणवण्याचे काम तेवढे विधात्याने नेमून दिलेले असते. येता-जाता ‘साहित्यपरिषद यंव करीत नाही नि त्यंव करीत नाही’ म्हणून जेव्हा जेव्हा श्री. अकर्ते नि श्री. बघे हटकतात तेव्हा तेव्हा त्यांनी हे विसरू नये की, साहित्य परिषदेला अनेक मोठी मोठी कार्ये हाती घेता यावीत असे कोणते साहाय्य या लक्षावधी अकर्त्यांनी नि बघ्यांनी दिले आहे ? जर समाज पाठिंबा देईल तर संस्था काही करू शकणार! मराठीतील उत्तमोत्तम ग्रंथांची भाषांतरे इंग्रजीत प्रसिद्धवून मराठी साहित्याची योग्य ती थोरवी जगातील साहित्यात आज प्रस्थापिली जात नसेल तर तो दोष केवळ परिषदेचा नाही, संमेलनाचा नाही, तर अवघ्या महाराष्ट्राचा आहे. म्हणूनच हे कार्य हाती घेण्याचे दायित्व एकट्या परिषदेच्या माथी आहे असे मी मानीत नसून आमच्या सर्वांच्याच— आम्हां बहुजनांच्याच माथी आहे असे मी मानतो. इंग्रजी भाषेच्या सजावटीत जगाच्या प्रमुख चौकांतून प्रदर्शविली गेल्यामुळेच काय ती आपल्या इतर काही प्राकृत भाषांतील उपमोत्येही (Cultured pearls) अवाच्या सवा भावाने विकली जात असता, मराठीच्या तिजोरीतच झाकून ठेवल्यामुळे आपल्या मराठीतील कित्येक पाणीदार जातिवंत मोत्येही मातीमोल होऊन पडत आहेत. नेदर्लंडसारख्या लहान-सहान राष्ट्राचे स्वातंत्र्ययुद्धाचे इतिहास मॉट्लेसारख्या इतिहासकारांनी इंग्रजीत लिहिल्यामुळेच आज जगभर वाचले जातात. पण महाराष्ट्राने हिंदुस्वातंत्र्यार्थ जे प्रचंड धर्मयुद्ध लढविले याचे नावसुद्धा जर जगाच्या साहित्यात ऐकू येत नसेल तर त्याचे एक मुख्य कारण म्हणजे त्या इतिहासावरील मराठीतले ग्रंथ इंग्रजीत कोणी अनुवादिले नाहीत हे होय. इतिहासाप्रमाणेच इतर काही विषयांतही मराठीत असे ग्रंथ आहेत. आणि असे विद्वान ग्रंथकार आहेत की ज्यांच्या लिखाणाचा परिचय इंग्रजीतून केला गेला असता, त्यांची कीर्ती युरोपभर व्हावी! निदान त्यांना अखिल भारतीय प्रख्याती मिळाल्यावाचून राहूच नये.

**सर्वसामान्य युरोपियन विद्वानाहून वरचढ असा आमचा नवा विद्वद्वर्ग :**

जगाच्या साहित्यात नि ज्ञानात भर टाकील असा एक विद्वानांचा वर्ग आज आमच्यात उपस्थित आहे. विज्ञानाची (Science) गोष्ट सोडली तर बहुतेक विषयांतील युरोपियन सर्वसामान्य विद्वानमंडळाचे ज्ञान एकदेशी असते. कारण त्यांना आपल्याकडील माहिती नि आपल्या वाङमयाची ओळख आपल्या विद्वानां-सारखी नसते, पूर्वीच्या आपल्या पंडिताचे ज्ञान जसे आपल्याइकडील ग्रंथापुरतेच नि अनुभवापुरतेच एकदेशी असे, तशी सापेक्षतः युरोपातील सर्वसामान्य ग्रंथ-कारांची स्थिती आहे. परंतु सध्या संस्कृत वाङमयाचे नि भारतीय अनुभवाचे

प्रगाढ पंडित नि मर्मज्ञ असूनही युरोपियन वाङमयात नि अनुभवातही जे मुरलेले आहेत असे ज्ञानकोशकारांसारखे जे पंडित आपल्याकडे होतात ते सापेक्षतः युरोपियनांपेक्षा अधिक बहुश्रुत असतात, सव्यसाची असतात. तत्त्व, काव्य, तर्क, पुराविज्ञान (Archaeology), अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास प्रभृती विषयांमध्ये त्यांचे विचार पौर्वात्य नि पाश्चिमात्य वाङमय नि अनुभव या दोघांचे परिशीलन त्यांनी केलेले असल्याने पूर्वीच्या एकदेशीय पंडितांपेक्षा किंवा आजच्या एकदेशीय युरोपियनांपेक्षा अधिक तुलनात्मक अधिक बहुश्रुत नि अधिक समप्रमाण असतात. त्यायोगे ज्याप्रमाणे पूर्वो एकदा संस्कृतयुगात वा पालीयुगात त्या काळच्या जागतिक साहित्यात नि ज्ञानात आम्ही नवी नवी मोलाची भर टाकू शकलो तशीच आजही पुन्हा टाकू शकू. अशी भर टाकण्यासारखे मराठी ग्रंथही आज लिहिले जात आहेत. पण आपली भाषा, आपली संस्कृत वा पाली जशी पूर्वी एकदा जागतिक भाषा झाली होती तशी पदवी पावलेली नसल्यामुळे तशा पदवीस जी आज चढलेली आहे त्या इंग्रजी भाषेत आपले ते मराठी ग्रंथ भाषांतरिले पाहिजेत, ते विचार अशा मराठी विद्वानांनी जसे मराठीत तसेच इंग्रजीतही ग्रथिले पाहिजेत. हे काम काही अंशी ज्याचा तो करू शकेल. साहित्य परिषदेनेही वर्षाकाठी एकदोन ग्रंथ तरी इंग्रजीत भाषांतरिले पाहिजेत. परंतु हे काम मुख्यतः साऱ्या महाराष्ट्रानेच आपले समजून त्यासाठी एक स्वतंत्र नि सधन मंडळच स्थापले पाहिजे. पूर्वी इंग्रजीतून मराठीत महत्त्वाच्या ग्रंथांची भाषांतरे करण्याची जशी आवश्यकता होती, आणि ते काम करण्यासाठी श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज, कै. दाभोळकर प्रभृती कार्यकर्त्यांनी मोठमोठ्या व लहान-सहान माला काढून जे काम केले तशीच आता मराठीतील ग्रंथ इंग्रजीत अनुवादिण्याची उलटी लाट उठली पाहिजे.

(मराठी साहित्य संमेलन– अध्यक्षीय भाषणे)

# ९ : प्रा. क्षीरसागर आणि भाषाशुद्धी

(सुप्रसिद्ध समीक्षक कै. प्रा. श्री. के. क्षीरसागर यांनी बडोदे येथे चौदाव्या वाङमय परिषदेच्या अधिवेशन प्रसंगी आपल्या अध्यक्षीय भाषणात भाषाशुद्धी चळवळीविरुद्ध कडक टीका केली होती. त्या टीकेचा परामर्श घेणारे दोन लेख; सावरकरांनी १९५१ मध्ये 'केसरी' पत्रातून प्रसिद्ध केले होते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्या-नंतर भाषाशुद्धीच्या चळवळीकडे वीरोचित भावनेने कसे पाहिले पाहिजे यासंबंधी सावरकरांनी इतर राष्ट्रांच्या उदाहरणांचा संदर्भ देऊन केलेला युक्तिवाद विचारार्ह वाटावा असा आहे.)

गेल्या जानेवारीत बडोदे येथील १४ व्या वाङ्मय परिषदेचे जे अधिवेशन झाले त्याचे अध्यक्ष प्रा. क्षीरसागर हे होते. त्यांच्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी भाषाशुद्धीवर पुष्कळच कडक टीका केलेली आहे. त्याविषयी आमचे मत काय आहे ते कळावे म्हणून अनेकजणांनी नि स्वत: क्षीरसागर महाशयांनीही मनमोकळेपणे इच्छा प्रदर्शविल्यामुळे या लेखात ते कळवीत आहोत.

प्रा. क्षीरसागर हे महाराष्ट्रातील एक नामांकित समालोचक आहेत. मराठीत 'टीकाकार' या शब्दाचा सध्या 'दोष दिग्दर्शक' एवढाच जो सामान्यत: अर्थ होतो तशा अर्थी ते टीकाकार नाहीत. तर कोणत्याही विषयाचे मार्मिक, विचक्षण, दोषांप्रमाणेच गुणांचाही यथावत परामर्श घेणारे असे ते एक संभावित समालोचक आहेत. ते स्वत:च सांगतात त्याप्रमाणे त्यांचे प्रस्तुतचे भाषणही मराठी भाषेविषयी नि साहित्याविषयी त्यांना वाटणाऱ्या कळकळीचे द्योतक आहे. ह्या भाषणात त्यांनी आजच्या मराठी साहित्याच्या कित्येक पैलूंविषयी उद्बोधक ऊहापोह केलेला आहे. त्या क्षेत्रात घडणाऱ्या अनेक प्रमादांचे परिश्रमाने टिपण करून ते टाळण्याचा जो उपाय त्यांना सुचला तो सांगितला आहे. त्यांचे भाषण त्या त्या प्रकरणी मननीय आहे. तथापि कालाभावी नि स्थलाभावी त्यांच्या भाषणातील इतर भाग गाळून त्यातील भाषाशुद्धीच्या विवेचनापुरता काय तो त्याचा परामर्श ह्या लेखात आम्हांस घ्यावा लागत आहे याचा आम्हांसही खेद वाटतो. पुन्हा या विषयावर त्यांनी एखादा वैयक्तिक लेख लिहिला असता तर ती गोष्ट निराळी होती, पण हे भाषण त्यांनी एका वाङमय परिषदेच्या अध्यक्षीय पीठावरून दिले असल्याने त्याला थोडेसे स्थान-माहात्म्य आलेले आहे. ह्यामुळे त्याची अगदीच उपेक्षा करता येत नाही.

क्षीरसागर हे प्रथमपासूनच भाषाशुद्धीचे कडवे विरोधक आहेत. प्रथम प्रथम तो साहजिकच होता. सन १९२४ मध्ये हे आंदोलन संघटितपणे चालू केल्यानंतर त्या वेळच्या साहित्यरथी समजल्या गेलेल्या बहुतेक गृहस्थांनी भाषाशुद्धीविषयी विरोधकाची भूमिकाच घेतलेली होती. साहित्यसंमेलनाचे अध्यक्षपद ज्यांनी केव्हा तरी भूषविले अशा दोन-तीन प्रख्यात साहित्यिकांची उदाहरणे पुरावा म्हणून दिली तरी पुरे आहेत. कै. प्रा. माधवराव पटवर्धनांनी तर भाषाशुद्धी विरोधकांचे त्या-वेळी नेतृत्व स्वीकारले होते. परंतु आमचे लेख केसरीत सन १९२५ मध्ये आल्या-नंतर ते भाषाशुद्धीचे इतके एकनिष्ठ पुरस्कर्ते बनले की, त्यांनी आम्हांसही उर्दू शब्दां-

वरील बहिष्कारात मागे टाकले. त्यांनी ' भाषाशुद्धिविवेक ' म्हणून जे पुस्तक लिहिले आहे त्यात त्यांनी म्हटले आहे की, ( भाषाशुद्धीचे ममत्व) सावरकरांच्या लेखमालेवर विचार करीत असताना मला प्रथम कळले.'

त्या वेळचे दुसरे साहित्यरथी म्हणजे कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर. त्यांच्या विरोधी लेखांना आम्ही १६ जून १९२७ चे ' श्रद्धानंद 'चे अंकात जे उत्तर दिले ते वाचल्यावर त्यांनी प्रकटपणे प्रसिद्ध केले की, ' अनावश्यक अशा इंग्रजी शब्दांप्रमाणेच उर्दू शब्दांनाही बहिष्कारलेच पाहिजे हे भाषाशुद्धिवादाचे तत्त्व व्यवहारातही आणण्याचा मी निश्चय केला आहे.' साहित्यसम्राट तात्याराव केळकरांचीही गोष्ट तशीच. वरील पुस्तकात प्रा. पटवर्धन लिहितात, ' श्री नरसोपंत केळकर हेही (भाषाशुद्धीचे) मूळचे विरोधकच (पण) सन १९३६ च्या आसपास त्यांचा तात्त्विक विरोध मावळला. इतक्या चळवळीनंतर महाराष्ट्रातील या अग्रेसर लेखकाची भाषाशुद्धीच्या तत्त्वाला मान्यता मिळाली. श्री केळकर यांनी इतक्या वर्षांची जडलेली सवय सोडून अनावश्यक (उर्दू, इंग्रजी) शब्द शक्यतो न वापरण्याची नवी सवय लावून घेण्याचा निश्चय या वयात षष्टचद्बीपूर्तीनंतर करावा हे त्यांच्या तत्त्वनिष्ठेचे नि प्रगतिशीलतेचे द्योतक आहे.'

अशा अनेक साहित्यरथींचा विरोध मावळत गेला नि भाषाशुद्धी मंडळाच्या सक्रिय आंदोलनाने मराठीवर तिची छाप अधिकाधिक पडत गेली. तथापि त्यावेळी एक उपसाहित्यिक म्हणूनच गणले जाणाऱ्या क्षीरसागरांचा विरोध मात्र न मावळता तो अधिकच कडवा होत गेला. त्यांना वाटणारा विरोध बोलून दाखविण्याचे त्यांचे स्वातंत्र्य आम्हासही मान्य आहे. पण त्यांच्या या प्रस्तुतच्या भाषणात त्यांनी ह्या विषयाशी संबंध असलेले असे युक्तिसमंत आक्षेप कुठेही न घेता आजच्या मराठी लिखाणात, मुद्रणात, शिक्षणात, नभोवाणीत, भाषणांत त्यांना जे जे नानाप्रकारचे दोष आढळले त्यांची सरभेसळ चर्चा करीत जाऊन अध्येमध्ये नि येताजाता ते भाषाशुद्धीचे नाव अशाप्रकारे घेत गेले आहेत की जणू काय ह्या सर्व दोषांना भाषाशुद्धीचे कारण आहे. हे त्यांचे धोरण मात्र सरळ, सुसंगत नि योग्य नाही. इतर विषयांत ते जी समालोचकाची भूमिका घेतात म्हणून आम्ही वर सांगितले आहे ती त्यांची भूमिका भाषाशुद्धीचा प्रश्न निघाला की अनेकदा ढळते नि ते टीकाकाराच्या नव्हे तर अगदी वाह्यात टीकाकाराच्या खालच्या पातळीवर येतात. जर त्यांनी भाषाशुद्धीचे त्यांचे विवेचन वा आक्षेप निराळे नि एकत्र दिले असते तर त्यांचा समाचार घेणे सोपे झाले असते. भाषाशुद्धीची मूलसूत्रे आम्ही सन १९२५ पासून वारंवार सांगत आलो असताही ह्या विषयी चकार शब्द न काढता ' भाषाशुद्धीच्या नि राष्ट्रभाषेच्या अशास्त्रीय कल्पना ' या आक्षेपापासून तो ' यातच मराठीचे मरण आहे ' ह्या आक्षेपापर्यंत त्यांनी केवळ अभद्र विशेषणां-

चीच काय ती उतरण रचली आहे. त्यापेक्षा ती भाषाशुद्धीची मूलसूत्रे देऊन मग ती कशी अशास्त्रीय आहेत ते दाखविले असते तर त्यांची चर्चा शास्त्रीय युक्तिवादाला धरून झाली असती.

तथापि जरी आम्ही तेच ते सांगत बसण्यास आता कंटाळलो, तरीही ज्या अर्थी साहित्यिकांच्या नव्या पिढीला ती मूलसूत्रे किंवा त्या आक्षेपांची जुनी उत्तरे माहीत नसल्यामुळे हे आक्षेप खरे वाटण्याचा संभव आहे त्या अर्थी ती मूलसूत्रे एकदा पुढे ठेवली की त्या कसोटीवर पारखले जाताच क्षीरसागरांचे भाराभर आक्षेप आपोआप खोटे पडतात आणि ज्या अर्थी प्रचाराचा आत्माच पुनरुक्ती असल्यामुळे भाषाशुद्धीचे मर्म नव्या पिढीला सांगणे हे अपरिहार्य कर्तव्यच आहे, त्या अर्थी आम्ही ती मूलसूत्रे पुन्हा एकदा थोडक्यात खाली देत आहोत.

**भाषाशुद्धीची मूलसूत्रे :**

१) गिर्वाण भाषेतील साराच्यासारा संस्कृत शब्दसंभार आणि संस्कृतनिष्ठ अशा तामिळ, तेलगू ते आसामी, काश्मिरी, गौड, भिल्ल बोलीपर्यंत ज्या आमच्या प्रांतिक भाषा-भगिनी आहेत त्या सर्वांतील मूळचे प्रांतिक शब्द हे सर्व आमच्या राष्ट्रभाषेच्या शब्दकोशाचे मूलधन, स्वकीय शब्दांचे भांडवल होय.

२) ह्या आपल्या राष्ट्रीय शब्दभांडारात ज्या वस्तूंचे, विचारांचे वाचक शब्द होते वा आहेत वा निर्मिता येतात त्या अर्थांचे उर्दू, इंग्रजी प्रभृती परकीय शब्द वापरू नयेत, जर तसे परकीय शब्द आपल्या पूर्वीच्या ढिलाईमुळे आपल्यात घुसले असतील तर त्यांना हुडकून काढून टाकावे. अद्यतन विज्ञानाची परिभाषा नवे नवे संस्कृत प्राकृतोत्पन्न शब्द पाडून व्यक्तविली जावी.

३) परंतु ज्या परदेशी वस्तू इत्यादी आपल्याकडे नव्हत्या, त्यामुळे ज्यांना आपली स्वकीय जुने शब्द सापडत नाहीत. आणि ज्यांना त्यांच्या त्या परकीय शब्दांसारखे सुटसुटीत स्वकीय शब्द काढणे दुर्घट जाते असे परकीय शब्द मात्र आपल्या भाषेत जसेच्या तसे घेण्यास प्रत्यवाय नसावा. जसे– बूट, कोट, जाकीट, गुलाब, जिलबी, बुमरँग, टेबल, टेनिस इत्यादी. तथापि अशा नव्या वस्तू आपल्याकडे येताच त्यांना कोणी स्वकीय नावे देऊन ती रुळावून दाखवील तर उत्तमच.

४) त्याचप्रमाणे जगातील कोणत्याही परकीय भाषेत जर एखादी शैली वा प्रयोग वा मोड ही सरस वा चटकदार वाटली तर तीही आत्मसात करण्यास आडकाठी नसावी.

**निव्वळ कुभांड :**

या मूलसूत्रांवर आधारलेल्या भाषाशुद्धीच्या आंदोलनावर तात्त्विक असा

एकतरी आक्षेप क्षीरसागरांना घेता आला आहे का ? मराठी भाषेवर तिच्या झालेल्या व्यावहारिक परिणामाविषयी तरी त्यांनी त्या विषयांशी सुसंगत अशी बांधेसुद चर्चा त्या भाषणाच्या एखाद्या छेदकात केली आहे का ? जिथे तिथे त्यांनी तशी चर्चा करण्याचा देखावा उत्पन्न केला आहे तिथे तिथे जे भाषाशुद्धीचे म्हणणे नाही तेच तिचे म्हणणे आहे असा विपर्यास करूनच नाही नाही ते आरोप केलेले आहेत. भाषणाच्या पहिल्या तीन-चार पानांतच त्यांनी कोण्या वृत्त-पत्राच्या कोण्या सोलापूरच्या बातमीदाराने ' उर्वरित ' हा शब्द चुकीच्या अर्थी वापरला, एका साप्ताहिकात अंतर्मुख ह्या शब्दाचे ठायी अंतर्भूत जीवन हा शब्द वापरला अशी निनावी उदाहरणे देऊन लगेच म्हटले आहे की " माझी हाकटी अर्थशून्य नि बोजड शब्द वापरण्याच्या बौद्धिक विकृतीसंबंधी आहे. गेल्या २५ वर्षांत म्हणजेच भाषाशुद्धीच्या आग्रहामुळे अनधिकारी व्यक्तींनाही शब्दनिर्मितीची सनद मिळाल्यापासून मराठी शब्दसंग्रहात फार मोठी वाढ झालेली आहे. पण शब्दांची शुद्ध रूपे व शुद्ध उच्चार यांची हानी झाली आहे.' आता,त्यांनी दिलेल्या उदा-हरणाचा भाषाशुद्धीशी काय संबंध? भाषाशुद्धीची जी सूत्रे वर दिलेली आहेत त्यात शक्यतो स्वकीय शब्द वापरावेत एवढाच आग्रह आहे. अर्थशून्य, बोजड नि अशुद्ध शब्दच वापरले पाहिजेत असा का त्यात आग्रह धरलेला आहे ? गेल्या पंचवीस वर्षांपूर्वी (अगदी मोजून अं ! ) कोणत्याही साप्ताहिकांत किंवा कोण्याही बातमीदाराने अशुद्ध वा चुकीचा शब्द वापरलेला असा आढळत नाही, शुद्ध नि सार्थ शब्दाचे ते केवळ सत्ययुग होते आणि गेल्या २५ व्या वर्षाच्या पहिल्या दुष्ट दिवसापासून काय ते अशुद्धतेचे कलियुग चालू झाले असे का क्षीरसागरांना म्हणावयाचे आहे ! बरे; तेही गृहित धरू. तरीही त्याच दिवशी भाषाशुद्धीवादाने अनधिकारी व्यक्तीं-नाही शब्दनिर्मितीची जी ' सनद ' दिली म्हणून क्षीरसागर सांगतात ती मूळ सनद किंवा तिची निदान दुय्यम प्रत तरी ते आमच्याकडे किंवा भारत इतिहास संशोधन मंडळाच्या संग्रहालयाकडे धाडण्याची कृपा करतील काय ? त्यातल्या त्यात इतके बरे झाले की गेल्या पंचवीस वर्षांत जे भूकंप झाले, विमाने कोसळली, अतिवृष्टी झाली ते सारे ह्याच भाषाशुद्धीमुळे झाले, कारण ती ह्याच पंचवीस वर्षांत जन्मली नि बळावली, इतकेही ठासून सांगण्यास क्षीरसागर विसरले ! त्यांच्या वरील उताऱ्यातील शेवटचे वाक्य तर भाषाशुद्धीविरुद्ध त्यांनी केलेल्या कोटिक्रमाचा कळसच आहे. ते म्हणतात, ' भाषाशुद्धीच्या आग्रहामुळे...शब्दांची रूपे नि शुद्ध उच्चार यांची हानी झाली आहे ' शब्दाचे उच्चारही अशुद्ध करीत जा असे भाषा-शुद्धी म्हणाली अं ? हे ऐकून आम्हालासुद्धा तिच्या विश्वासघातकीपणाचा धाक वाटू लागला आहे. त्या भाषाशुद्धीचा नि आमचा इतकी वर्षे इतका जिव्हाळ्याचा परिचय असताही तिने ' माझा संबंध मराठी शब्दाशीच काय तो आहे.' एवढेच

काय ते आम्हास सांगितले होते. परंतु मराठी शब्दांचे उच्चारही ती विघडविणार आहे या तिच्या अंतस्थ दुष्ट हेतूचा उच्चारसुद्धा तिने आमच्यापाशी कधी केला नाही !

'विद्यार्थ्यांनो, तुम्ही यवन शब्दाचे ठायी यौवन नि यौवन शब्दाचे ठायी यवन शब्द वापरीत जा; जुळाऱ्यांनो, तुम्ही छपाईची जुळणी करताना विशेषत: क्षीरसागरांचे हे भाषण छापताना शक्य तितके मुद्रण दोष करा; नभोवाणीवरील वक्त्यांनो, तुम्ही संस्कृत शब्द अशुद्धपणे उच्चारीत जा; नभोवाणीवर अयोग्य व्यक्तींना नेमा, लोकांनो, घनश्याम शब्द घन:शाम असा नि शरच्चंद्र शब्द शरश्चंद्र असा नि दृश्य शब्द दृष्य असा पाट्यांवर लिहिण्याची चूक हटकून करीत जा, असा उपदेश भाषाशुद्धीच्या प्रवर्तकांनी कधी तरी दिलेला आहे का? परंतु साहित्य क्षेत्रात घडणाऱ्या अशा नानाविध दोषांचे परिगणन दहा-पंधरा पानांतून करीत करीत मध्येच शीणक आल्यासारखे एकदम उसळून क्षीरसागर सांगतात, 'हे सारे भाषेतील दोष करणारे लेखक एका विशिष्ट संप्रदायाचेच आहेत. तो संप्रदाय मोडून काढला पाहिजे हें माझे आजचे 'प्रतिपादन' आहे... ह्या क्षेत्रात हिंदुत्ववादी, गांधीवादी, समाजवादी आणि साम्यवादीही सारखेच अपराधी आहेत. प्रारंभ मात्र भाषाशुद्धीवादी हिंदुत्व-निष्ठांनी केला. या दृष्टीने ते या दोषाला अधिक जबाबदार आहेत एवढेच काय ते.' यावर क्षीरसागर पंतोजींना आमचे इतकेच उत्तर आहे की त्यांच्या ज्या कोण्या विद्यार्थ्याने यवन शब्दाचे ठायी यौवन शब्द वापरला तशी चूक आपणही इथे 'प्रतिपादन' हा– तर्कशुद्ध विवेचनातच काय तो शोभणारा शब्द वापरण्यात करता आहात. भाषाशुद्धीवादाशी बादरायण संबंधसुद्धा नसलेले हे भाराभर दोष तिच्याच-मुळे घडतात असे भासवणारी ही आपली एक अडाणी चपळाई आहे, निव्वळ कांगावा आहे, एक कुभांड आहे– प्रतिपादन नव्हे.

**हा म्हणे 'जातिवंत' मराठीचा अभिमान !**

"भाषाशुद्धीचा विडा हिंदुत्वनिष्ठांनीच पहिल्यानेच उचलला' हे 'दोष' दाखविण्यासाठी का होईना पण क्षीरसागरांनी मान्य करावे ह्यात हिंदुत्वनिष्ठ स्वत:चा गौरव मानतील. समाजसत्तावादी प्रभृती इतर पक्षही संस्कृतनिष्ठ शब्दांनी मराठीची संपत्ती नि शोभा वाढवीत आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. विरोध-विकास, श्रममूल्य, वर्गविग्रह, शासनसंस्था, भाववाढ, उत्पादकधन नि भोग्यधन, प्रभृती अनेक नवे अर्थपूर्ण, स्वकीय शब्द त्यांनी मार्क्सवादावरील मराठी पुस्तकां-तून योजलेले आहेत 'लोकमान्य' पत्राचे संपादक गाडगीळ यांचे आम्ही एकदा याविषयी प्रत्यक्ष अभिनंदनही केले होते. पण क्षीरसागरांच्या 'जातिवंत' मराठीस मात्र त्यामुळे मळमळून येत आहे. अरबीनिष्ठ उर्दू नि पार्लमेंट, कौन्सिलसारखे

परके शब्द घेतलेच पाहिजेत हा ज्या क्षीरसागरांचा या भाषणांत उघड उघड आग्रह आहे, ह्यालाच जे उदारपणा समजतात, तेच क्षीरसागर हिंदी, बंगाली-सारख्या आमच्या भाषा–भगिनींतून सुद्धा 'उत्तरदायित्व, हार्दिक, साहित्यिक,' असे शुद्ध संस्कृत शब्द मराठीत वापरले जातात ह्याविषयी निषेध करण्याइतके 'आकुंचित' बनतात. संस्कृत हा आमच्या सर्व प्राकृत भाषांचा समाईक शब्द–रत्नाकर आहे. हिंदीत मराठीतले 'हुतात्मा, क्रमांक, दिनांक' प्रभृती शब्द घेतले जातात. संस्कृतनिष्ठ हिंदी ही राष्ट्रभाषा झाली असता आमच्या संस्कृतनिष्ठ मराठीला काहीच भय नाही. भय आहे ते उर्दूनिष्ठ 'याने हिंदुस्थानी'चे. इतिहासाला 'तवारिख' नि शिक्षणाला 'तालीम' म्हणा हा उघड हट्ट धरणारी ही 'याने हिंदुस्थानी' राष्ट्रभाषा झाल्यास उर्दू शब्दांचा लोंढाचे लोंढा मराठीत पुन्हा घुसेल हे आहे खरे संकट. पण क्षीरसागरांनी त्या 'याने हिंदुस्थानी' विरुद्ध चकार शब्द सुद्धा काढलेला नाही. कारण त्यांच्या जातिवंत मराठीचे नि 'याने हिंदुस्थानी' चे गोत्रच मुळी एक !

यामुळेच "बौद्धिक, सामरिक, नौदल, सांसदिक, विधेयक, अवैध' यांसारखे शब्द, दैनिकांच्या रात्रपाळीत पेंगता पेंगता का वापरता" म्हणून उपसंपादकांना क्षीरसागर धमकावीत आहेत. वरीलसारखे शुद्ध, प्रौढ, अर्थपूर्ण शब्द जे उपसंपादक नि संपादक काढू शकतात तेच आज मराठीचे वैभव, शक्ती नि सोज्ज्वलता वाढवीत आहेत. जर खरोखरीच असे उत्तम शब्द कोणी उपसंपादक पेंगत असतानाही काढू शकत असेल तर त्याची ती पेंगच, 'पार्लमेंटसारखे शब्द सुद्धा परकीय भाषेतून घरात घेईन' असे म्हणणाऱ्या 'जातिवंत मराठीच्या' चवचाल जागरणापेक्षा, अधिक शुद्धीवर होती.

क्षीरसागर महाशयांनी 'अशुद्ध' म्हणून आम्ही सुचविलेला 'अद्यावत' हा शब्दही वेठीस धरला आहे. आणि सांगितले आहे की, सुमारे वीस वर्षांनंतर मुंबई सरकारने तो 'अद्ययावत' असा सुधारून दिला. ही माहिती चूक आहे. आम्ही up-to-date ह्या शब्दाला प्रथमच तीन शब्द सुचविले. अद्ययावत, अद्यावत् नि अद्यतन (प्रतिभा मासिक नोव्हेंबर १९३५) आणि तेव्हापासून हे वारंवार सांगितले आहे की, मूळ शब्द 'अद्ययावत' हा संस्कृतात शुद्ध परंतु तो प्राकृतामध्ये तिच्या मोडीप्रमाणे 'अद्यावत' असा सुटसुटीत केला तरी ते प्राकृतात अशुद्ध होणार नाही. संस्कृत शब्द प्राकृतात प्राकृत व्याकरण नि रूढी यांच्यामुळे असेच अखंड नि सुटसुटीत होतात. त्यांची उदाहरणे आम्ही प्रारंभीच दिलेली होती. की, जसे 'यच्चयावत्' हा मूळ शब्द साधारणतः प्राकृतात उच्चारताना 'यच्चावत्' असा उच्चारला जातो. तसेच 'अद्यावत्' ह्या प्राकृत रूपाविषयी समजावे. अग्न्यागाराचे प्राकृत रूप अग्यारी, ज्ञानेश्वराचे ग्यानबा तसेच हे. प्रथमच ही चर्चा आम्ही केलेली

असल्यामुळे 'वीस वर्षांनंतर' मुंबई सरकारने ही चूक सुधारली हे म्हणणे मिथ्या आहे. पण अशुद्धतेचीच अडचण असेल तर क्षीरसागरांनी शुद्ध रूप जे 'अद्ययावत्' ते वापरावे. अद्यतन हा शब्द योजावा. हे दोन्ही शुद्ध शब्दही आम्ही 'अद्यावत्' हे रूप सुचविले त्याचवेळी सुचविलेले आहेत. बरे, आम्ही सुचविले म्हणूनच ते शब्दही नको असतील तर त्यांनी त्यांचा एखादा स्वकीय शब्द सुचवावा. आम्ही चांगला असल्यास तोच वापरू. पण अपटुडेट आणि त्यांतही आजतागायतसारखा धेडगुजरी नि बाडगा शब्द जो क्षीरसागरांच्या 'जीवंत मराठीत' खपतो तो मात्र वापरू नये.

ज्यांना खेडवळ म्हटले जाते त्या मराठी लोकांत जी खणखणीत नि रोकडी बोली बोलली जाते, तीतच खरे जिवंत नि स्वकीय मराठी शब्द सापडतात. ते आम्हास अतिशय आवडतात. परंतु क्षीरसागर जिला जातिवंत मराठी म्हणतात ती कशी असते हे त्यांच्या याच भाषणातील मराठीवरून पाहू म्हणजे संपले.

**जातिवंत कसली– ही आहे पाकिस्तानी मराठी !**

मार्गातून रंगीत पाटीवर कुठे घनःशाम असा अशुद्ध शब्द लिहिलेला पाहून त्यांना चीड आली म्हणून भाषणांत ते सांगतात: ते ठीकच. परंतु त्याच मार्गा-मार्गांतून क्लॉथ मर्चंट, फ्रूट मार्केट पासून तो वॉशिंग कंपनी, हेअर कटिंग सलून पर्यन्त ज्या शेकडो पाट्या लावलेल्या असतात, त्यांची काही त्यांना चीड येत नाही. भाषणात त्या बाडग्या प्रवृत्तीविरुद्ध चकार शब्द नाही. त्यांच्या भाषणात 'त्या शिवाय' त्या खेरीज 'हे शब्द चाळीसपन्नास वेळा, कुठेतर एका वाक्यातून अनेकदा आले आहेत. पण जर त्या ऊर्दू शब्दांचे ठायी 'त्या वाचून, त्या विना' इत्यादी स्वकीय शब्द योजले असते तर मराठी काय भ्रष्ट झाली असती ? 'बद्दल' शब्द तर त्यांच्या भाषणांत नुसता बोकाळला आहे. 'त्यांचे ठायी', 'त्या विषयी', 'त्या संबंधी' 'त्या प्रकरणी' इत्यादी अनेक स्वकीय पर्याय असता त्यांना ते शिवत नाहीत. जबाबदारी, बेजबाबदार हे शब्दही ते पन्नासवेळा वापरतील पण उत्तर-दायित्व, दायित्वशून्य हे स्वकीय शब्द हिंदी, बंगालीतून घेतले म्हणून 'यातंच मराठीचे मरण आहे' असे त्यांना वाटते. 'कायदा' शब्दाला मराठीत प्रतिशब्द स्वकीय असा उरला नाही याची त्यांना खंत वाटत नाही. पण 'अवैध' शब्द ऐकताच ते 'त्रस्त' होतात. भाषाशुद्धीच्या प्रवृत्तीने शतावधी शुद्ध स्वकीय शब्द मराठीत रुळले असताही त्यांचे कौतुक न वाटता त्यांत एखादा अशुद्ध शब्द सापडतो की नाही याविषयी त्यांची लेखणी कावळ्यासारखी टपत आहे. तेही असो. पण कायदेपंडित, कायदेशास्त्र, कायद्यात्मक, कायदा असे परकी धेडगुजरी शब्द मराठीत येता जाता वापरले जात असताही त्या अशुद्धतेची घाण मात्र त्यांना येत

नाही. उलट ' विधिमंडळ ' हा शब्द मराठीत रूळला असताही ते त्यांच्या भाषणात कायदेमंडळ, हा मरू घातलेला अशुद्ध परकी शब्दच पुन्हापुन्हा वापरतात. मथळा, शीर्षक हे स्वकीय शब्द असता हेडलाईन, प्राध्यापक असता प्रोफेसर, जुळारी सोडून कंपॉझिटर असे कित्येक इंग्रजी शब्द त्यांच्या ' साहित्यिक ' भाषणात डौलाने वावरत आहेत. तऱ्हा, अंदाज, बेसुमार, मगदूर, खाजगी, खातर, लष्कर, खबरदारी, मतलब, शहर, पेश, नजर, ईलाज, खास, कायम, अजिबात, अहवाल जरूर अशा अनावश्यक अरबी-ऊर्दू शब्दांचा त्यांच्या भाषणात नुसता बुजबुजाट झालेला आहे. ह्या शब्दांना स्वकीय शब्द असताही, भाषाशुद्धीवर सूड उगविण्याचे पंचमस्तंभीय समाधान उपभोगिण्याकरिताच की काय हे अनावश्यक इंग्रजी, उर्दू शब्द ते हटकून पानोपानी वापरतात. ही आहे त्यांची जातिवंत मराठी ! राष्ट्र-भाषेत निदान ३३ टक्के तरी अरेबी उर्दू शब्द ठेवलेच पाहिजेत म्हणून उघडपणे हट्ट धरणाऱ्या काही ' याने हिंदुस्तानी ' वाल्यांप्रमाणे प्राध्यापक क्षीरसागरांनीही अशी प्रतिज्ञाच केलेली दिसते की ' भाषाशुद्धिवाद्यांनो, तुमच्या संस्कृतनिष्ठ मराठीची मी पाकिस्तानी मराठी करूनच सोडीन तरच नावाचा क्षीरसागर ! नाहीतर नाव पालटून देईन. "

तसेच असेल तर टीकाकार क्षीरसागरांना आम्ही काहीच विनंती करू इच्छीत नाही. परंतु समालोचक क्षीरसागरांविषयी आम्हांस जो यथाप्रमाण आदर आहे त्यामुळे त्यांना मात्र शेवटी एक विनंती, राष्ट्रीय स्वाभिमानापायीच नि स्वभाषेच्या प्रतिष्ठेसाटीच, करावीशी वाटते की, त्यांनी एक आठवडाभर तरी भाषाशुद्धीविरुद्ध त्यांचे जे काही पूर्वग्रह असतील ते अगदी एका बाजूस ठेवावेत. समालोचकाला शोभेल अशा शांत नि समाहित मनःस्थितीत भाषाशुद्धीची वर दिलेली मूलसूत्रे तेवढी पुढे ठेवावीत आणि स्वतःला विचारावे की परकीयांनी तलवारीच्या बळावर आमच्यावर जी परराज्ये स्थापिली त्या दुःखद नि अवश काळात आमच्या भाषेतही त्या परदास्याचा परिणाम म्हणून घुसलेल्या या दास्यशीलतेच्या सूक्ष्म रोगाणूंना आमच्या मनोभूमीत परशत्रूंनी उभारलेल्या या आमच्या पराभवाच्या सूक्ष्म स्मारकांना त्या अनावश्यक इंग्रजी, उर्दू शब्दांना आज आमचाही दिवस उगवला असता, ती विधर्मीय नि राष्ट्रीय राज्यसत्ता आज आम्ही उखडून टाकिली असता- ह्या अनावश्यक परकीय शब्दांनाही का उखडून टाकू नये ? आपले स्वकीय शब्द का वापरू नयेत ? निदान तसे ते कोणी वापरले तर त्यात वावगे काय आहे ?

अशाच भावनेने इंग्रजीला उखडून आयर्लंडने गॅलिक भाषा पुनरुज्जीवित केली, अरेबीला उखडून तुर्कांनी स्वकीय तुर्की भाषा जिवंत केली नि गेली सहस्र वर्षे अक्षरशः मृतप्राय झालेली होती ती हिब्रू भाषा गेल्या अवघ्या दहा वर्षांत

ज्यूंनी नुसती जिवंत केली नाही तर ती राष्ट्रभाषा नि राज्यभाषा करून सोडून परराष्ट्र दूतावासातही तीच वापरली पाहिजे म्हणून ठरवून टाकले ! अशाच वीरोचित भावनेने शिवछत्रपतींनी राज्यव्यवहार कोश लिहविला. त्याच वीरोचित भावनेने प्रेरित होऊन आमच्या राष्ट्रभाषेचे साहित्यमंदिर संस्कृतनिष्ठतेच्या बळकट नि पवित्र पायावर उभारावयास हवे.

(मराठी भाषेचे शुद्धिकरण)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
संद. शाखा (स्थळ प्रत)

# १० : साहित्याचे ध्येय काय असावे ?

(मुंबई येथील मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून सावरकरांनी केलेले भाषण ज्या एका संदेशामुळे साहित्यक्षेत्रात वादळ निर्माण करून गेले तो संदेश होता– 'साहित्यिकांनो, लेखण्या मोडा आणि बंदुका घ्या.' साहित्यविषयक अनेक प्रश्नांबाबत सावरकरांनी आपली मते अत्यंत परखडपणाने या भाषणातून व्यक्त केली आहेत. साहित्याचे ध्येय काय असावे, साहित्यनिर्मितीमागील प्रेरणांचा अन्वयार्थ कसा लावावयाचा, साहित्याचे प्रमुख दोन प्रकार कोणते, साहित्यासाठी जीवन आहे, की जीवनासाठी साहित्य आहे; नवमतवादी किंवा पुरोगामी साहित्याकडे पाहण्याचा कोणता दृष्टिकोण असावा, इत्यादी साहित्यक्षेत्रातील अनेक प्रश्नांवर सावरकरांनी केलेले चिंतन या निबंधातून प्रकट झाले आहे.)

कार्यात्मक असे ह्या वर्षापुरते महाराष्ट्र साहित्य संमेलनास मला जे काही सांगावयाचे होते त्याचा शक्य तितका थोडा असा हा कार्यक्रम मी येथवर सांगितला. आता आपल्या अनेक साहित्यिक मित्रांनी मला जे काही तात्त्विक किंवा मतामतांतराचे प्रश्न विचारले त्यांतील दोन-चार प्रश्नांना अगदी त्रोटक अशी उत्तरे देऊन मी माझा हा निबंध संपविणार. पुष्कळांनी विचारलेला एक मुख्य प्रश्न म्हणजे, साहित्याचे ध्येय काय असते ?' तो प्रश्न तसा न मांडता 'साहित्याचे ध्येय काय असावे ?' असा मांडला असता तर त्याचे उत्तर अधिक निश्चितपणे मला देता येईल. ध्येयाचा प्रश्न आला की त्यात लहरीच्या, हौशीच्या, वैयक्तिक आवडीच्या अंतर्भावापेक्षा कर्तव्याचाच अंतर्भाव मुख्यत: अनुस्यूत झालेला असणार, अर्थात जीवनाच्या सामूहिक कर्तव्याची जी व्याख्या तीच, त्या जीवनाचे जे एक उपांग सारस्वत, त्याचीही व्याख्या, त्याचेही ध्येय असले पाहिजे.

मानवी जीवनाच्या भौतिक ध्येयाची मला पटलेली व्याख्या ही आहे की, मनुष्यजातीचे अधिकाधिक हित ज्यायोगे साधता येते तेच मनुष्याचे ऐहिक कर्तव्य होय. तात्कालिक कर्तव्यही त्याच न्यायाने असे की प्राप्त परिस्थितीत त्या त्या काळी मनुष्यजातीचे जे अधिकात अधिक हित साधता येईल ते साधावे. या दृष्टीने साहित्याच्या परम वा तात्कालिक ध्येयाचीही व्याख्या अशीच असणार की मनुष्यजातीच्या अधिकात अधिक हितास साधण्यासाठी झटेल तेच साहित्य श्रेष्ठ, तेच सुप्रासंगिक. आनंद नि करमणूक ही मानवहितास काही प्रमाणात हितकारकच असल्यामुळे त्यांचाही अंतर्भाव योग्य त्या प्रमाणात वरील ध्येयात होतोच, पण केवळ करमणूक हे काही कर्तव्य नाही. घरात आई मरणान्तिक वेदनांनी अंथरुणाला खिळली असता जर एखादा वहकलेला कलावंत बंगल्यात नायकिणीच्या नाचात रमू शकला तर त्यास कलावंत म्हटले तरी कुलदीपक काही म्हणता यावयासे नाही ! कारण खऱ्या कलावंताला त्या वेळी ती कलाच विकल केल्यावाचून राहणार नाही ! तशा स्थितीत ती त्याला केव्हाही आनंदविणार नाही, तर उलट एखाद्या कलाहीन माणसापेक्षा अधिक उत्कटतेने व्याकुळवील.

**वास्तव वाङ्मय नि ललित वाङ्मय–**

माझ्या सोयीसाठी मी वाङमयाचे वस्तुनिष्ठ व रसनिष्ठ हे दोन भाग करतो कारण मला विचारलेल्या अनेक प्रश्नांची उत्तरे त्यात आपोआप दिली जातील.

वस्तुनिष्ठ वाङमयात तत्त्व, गणित, ज्योतिष, विद्युत, इतिहास इ. विज्ञानाचा समावेश होतो. त्यात सत्य काय तेच यथावतपणे सांगितले पाहिजे. त्यातही रस येईल, पण तो आणण्यासाठी कल्पनेस काही मुळात नसलेले कल्पित रंग भरता यावयाचे नाहीत. वस्तुनिष्ठ वाङमय हे वस्तूचे छायाचित्र– चित्र नव्हे. परंतु ललित वाङमय हे कल्पित रंग भरलेले चित्र होय. रसोत्कर्ष हा त्याचा विशेष. वस्तुनिष्ठ वाङमयात जो दोष तो, कल्पनेची मनसोक्त भरारी हा, रसनिष्ठ वाङमयाचा गुण होऊ शकेल. वस्तुस्थितीत न सापडणारी पात्रे, रंग, भूमिका यांची ने-आण रसनिष्ठ वाङमय आपल्या अभिप्रेत भावनांच्या उत्कर्षास्तव कल्पनासृष्टीतून करू शकते. ते नाटय, काव्य, कादंबरी, कथाकल्पात्मक वाङमयाचा हा प्रांत जे रसनिष्ठ तेच सारस्वत.

वास्तव वाङमयाचे मुख्य कर्तव्य सत्यकथन. वस्तुस्थिती, वैज्ञानिक परिस्थिती यांचे यथार्थ ज्ञान मनुष्याच्या हितास अत्यवश्य. यास्तव हे वाङमय साहित्याच्या आम्ही वर दिलेल्या ध्येयास सुसंगतच असणार. त्याजोगे जुन्या वा नव्या कल्पनांना आणि भावनांनासुद्धा धक्का बसला तरी चालेल. ज्या भावना वा कल्पना, मग त्या जुन्या असोत वा नव्या असोत, सत्यावर अधिष्ठित असतील त्याच टिकाऊ ठरतात. पावित्र्य विडंबनाचा प्रश्नही याच दृष्टीने परीक्षिला पाहिजे. पूर्वी कित्येक पवित्र वा धर्म्य वाटणाऱ्या गोष्टी आज सत्य परिस्थिती उमगल्यामुळे चुकीच्या ठरल्या आहेत. कुराणातील, पुराणातील वा बायबलातील पृथ्वीच्या आकाराच्या, सूर्य-चंद्राच्या रचनेच्या, गतीच्या वा ग्रहणाच्या कल्पना आणि त्यावर आधारलेल्या धार्मिक रूढी पहा ! त्या असत्य आहेत म्हणून प्रथम म्हटले त्यांचा ख्रिस्ती धर्मीयांनी पावित्र्य विडंबनाच्या नावे कसा छळ केला हे आपणास माहीत आहे. पण आज त्या असत्य आहेत हे मुलाबाळांसही त्याच युरोपात शिकविण्यात येत आहे. या प्रकारच्या मागच्या अनेक अनुभवांवरून आपणा सर्वांनाही हा धडा शिकला पाहिजे की, सत्यजिज्ञासेने वा तथ्य प्रतिपादनाचे हेतूने जे मत कोणी प्रस्थापू पाहतो त्यास शक्यतो प्रतिबंध नसावा. लेखन वा उपदेश यांचे स्वातंत्र्य असावे. त्यायोगे जर पावित्र्य विडंबन होते असे कोणास वाटले तर त्यांनी त्याचे मत कसे चुकीचे आहे हे उलट बाजूने साधार प्रतिपादन करावे, म्हणजे त्याच्या विडंबनाचीच विटंबना झाल्यावाचून राहणार नाही. त्याचे म्हणणे सत्य वा तथ्य ठरले तर आपण भलत्याच अतथ्य व असत्य गोष्टीला पावित्र्य दिले हे आपल्या लक्षात येईल. सत्याकडे नि तथ्याकडे मनुष्याची अधिक प्रगती होईल.

तीच गोष्ट आज ज्याला नवमतवाद वा पुरोगामी साहित्य इत्यादी नावे देण्यात येतात त्याविषयी लागू आहे. कोणतीही गोष्ट केवळ नवी आहे म्हणून ग्राह्य वा त्याज्य ठरत नाही. नवे मूल जन्मास आले म्हणजे आईपेक्षा अनुभवी व

बापापेक्षा शहाणे असते असे नाही. कोणतेही वाङ्मय नुसते पुरोगामी आहे म्हणूनच काही सत्य वा तथ्य ठरेलच असे गृहीत धरता येत नाही. आईपुढे दुडूदुडू धावत जाणारे पुरोगामी मूल खड्डयातही पडण्याचा संभव असतो. लक्ष्यापुढे निघून जाणारी गोळी पुरोगामी असली तरी चुकलेली ठरते. वास्तव वाङ्मयाचे जे साध्य ते तथ्य वा सत्य; त्याच्या कसोटीस ती नवमतवादी वा पुरोगामी मते कितपत उतरतात, कोणत्यातरी नव्या सत्यास वा तथ्यास ती आविष्कारित आहेत की नाहीत, या प्रश्नांवर त्यांचा चांगुलपणा वा टिकावूपणा ठरणारा आहे. पण ते ठरावयाचे तर त्यांना त्याचा पक्ष यथावत मांडू दिला पाहिजे. ती नवी वा पुरोगामी म्हणून हुरळून जाता कामा नये, किंवा जुन्याविरुद्ध वा उच्छृंखल वाटतात म्हणून त्यांची एकदम मुस्कटदाबीही करता कामा नये; जर ती अशी वाटतील तर त्यांच्यातील तो उच्छृंखलपणा वा अतथ्य उघडकीस आणणारे नि जुन्यातील सत्य प्रस्थापित करणारे विरुद्ध साहित्य प्रतिपक्षाने निर्मावे, हाच त्यावर उपाय.

साहित्यात दोघांनाही स्थान हवे. कारण अनेक वेळा नवी मते ही उपद्रव्यापक न ठरता जुन्या अपायकारक अंधेरात घुसलेली प्रकाशाची नि आरोग्याची किरणेही ठरलेली आहेत ! आज आपल्या साहित्यात नव्याने उगवलेल्या साम्यवादी वा काम्यवादी मताचेही तसेच स्वागत नि तशीच छाननी झाली पाहिजे. ही साम्यवादी वा काम्यवादी नवमते चांगली की वाईट याविषयी जे प्रश्न मला विचारण्यात आले आहेत ते साहित्यविषयक असणाऱ्या या अशा निबंधाच्या कक्षेबाहेर आहेत. तो प्रश्न अर्थ, समाज, काम नि मानस या शास्त्राचाच होय.

**साहित्याची साम्यवादी वा काम्यवादी उपपत्ती :**

त्यातील एका प्रश्नाचा मात्र साहित्याशी संबंध पोचतो. मराठी वा कोणतेही साहित्य हे केवळ अर्थशास्त्राचा वा केवळ कामशास्त्राचाच प्रपंच आहे, यच्चावत साहित्याची मुळे भांडवलसत्ता नि श्रमिक सत्ता यांच्या विरोधात वा सुप्त नि जागृत कामवासनांत काय ती रुतलेली असतात, असा सिद्धांत जर कोणी मांडू लागला तर तो मात्र एकाकी नि एककल्ली ठरल्यावाचून राहणार नाही, इतके इथे सांगितले की पुरे. मनुष्य म्हणजे काही त्याचे पोट नव्हे त्याला अनेक इंद्रिये आहेत, एकच इंद्रिय नाही. त्या सर्व इंद्रियांची, त्यांच्या विषयांची नि त्यांच्या रसांची क्रियाप्रतिक्रिया विरोध, विकास मनुष्याच्या जीवनात साठविला जात आहे. तीच स्थिती त्याच कारणासाठी, त्याच्या साहित्यातही प्रतिबिंबित झाली. साऱ्या साहित्याच्या विकसनाची फोड केवळ धनवान नि निर्धन त्यांच्या किंवा उत्पादन साधनांच्या किंवा कामतृष्णेच्या दृष्टिकोनानेच तेवढी करता येणारी नाही. यद्यपि त्या विधेयांचे (Points) धागेदोरेही मनुष्याच्या जीवनात लांबवर विणलेले आहेत,

तरी त्या एकेरी एकाच धाग्याने काही ते जीवन वा वाङ्मयीन व्यक्तीकरण जं साहित्य, हे विणलेले नाही. ज्ञानेश्वरी हा भांडवलसत्तेचा एक डाव काय तो होता किंवा बुद्धाचा राज्यत्याग हा साम्यवादाचाच काय तो पुरस्कार होता किंवा योगसूत्रे ही श्रमिकांना धनिकांचा छळ कळू नये म्हणून जाणून-बुजून खाऊ घातलेली अफूची गोळी होती किंवा शंकराचार्यांचे महाभाष्य हे त्यांच्या अतृप्त कामवासनांची एक विकृती काय ती होती, असे समजणे म्हणजे वेदकालातील अग्निपूजेच्या सर्व स्तोत्राची उपपत्ती, भाकरी भाजण्यास अग्नी उपयोगी पडतो या एकाच सत्याची काय ती जाणीव व्यक्तविते, असे समजण्यासारखे अगदी एकांगी आणि एककल्ली ठरल्यावाचून राहणार नाही. तरीसुद्धा विरोध-विकासाच्या दृष्टिकोणातून काही जुनी सत्ये नव्या मांडणीत थाटण्याच्या वा नवी सत्ये जुन्यांच्या दृष्टिपंथात आणण्याच्या कामी अशा एकांगी प्रचाराचाही उपयोग होत आहे; आणि म्हणूनच वास्तव्य साहित्यात पडणारी त्याची भर आपणा सर्वांनी प्रथम स्वागतिली पाहिजे आणि लगोलग त्यांची नीरक्षीर-विवेकाने छाननी करणारे वाङ्मयही प्रसिद्धीत राहिले पाहिजे. नुसते पावित्र्य विडंबन म्हणून त्यास शापित राहण्यात अर्थ नाही. कोणा व्यक्तीची वा समाजाची केवळ मानहानी, केवळ उपमर्द वा केवळ हानी करण्याच्याच दुष्टबुद्धीने ओंगळ वा असभ्य भाषेत जे लिहिले जाईल तेवढेच वाङ्मय काय ते अनैर्बंधिक (बेकायदेशीर) वा अप्रसिद्धेय समजले जावे, या सर्वसाधारण सूचनेपेक्षा या विषयाची अधिक फोड करण्यास येथे वाव नाही.

रसनिष्ठ वा कल्पनानिष्ठ अशा वाङ्मयाच्या दुसऱ्या भागासही, ललितवाङ्मयासही वरील चर्चांश बहुतांशी लागू ठरेल.

**समयक नि निर्यमक काव्य–**

निर्यमक काव्याविषयी ज्या मित्रांनी मला कित्येक प्रश्न विचारले आहेत त्यांना विनंती की, यासंबंधी मी माझी मते ' रानफुले ' या पुस्तकास एक विशिष्ट परिशिष्ट जोडून त्यात सविस्तर ग्रथिली आहेत, ती जिज्ञासूंनी पहावीत. मला स्वतःला अर्थास बाध न आणणाऱ्या प्रासांची नि यमकांची भारी हौस आहे. यमक हे रसाला प्रतिकूल न होईल अशा कौशल्याने जर सहजासहजीच्या ओघात योजता आले तर ते कवितेची शोभा वाढविते; रसोत्कर्षाला सहाय्यक ठरते. काव्यशैलीचा तो विकास आहे; पूर्वीच्या निर्यमक कवितेस खुलविणारा तो एक नवा अलंकार आहे. पण तरीसुद्धा काही सुविशाल गुंफणीच्या नि वक्तृत्वपूर्ण भावनांना वा विचारांना व्यक्तविण्यास Blank Verse सारखी निर्यमके वृत्तेच उपयोगी. सयमक वृत्तात येणारा एकसुरीपणा पण अशा प्रसंगी टाळता यावा यास्तव मी निर्यमक अशा वैनायक वृत्ताची घडण केली आहे; मुक्तछंदादी वृत्तेही निर्यमकाची वृत्तांतरे होत. ती

सापेक्षतः दुय्यम चर्चा करण्याची संधी मला मिळती नि आजच्या स्थितीत त्यातच गुरफटून घेणे अप्रासंगिक वाटले नसते तर मी वैनायक वृत्ताचा प्रसार करण्याची माझी हौस फेडून घेतली असती. पण आपल्या बहुमूल्य वृत्तभांडारात विशिष्ट प्रसंगांना अधिक अनुकूल अशा आणखी एका वृत्ताची भर– इतकेच काय ते मी त्या वैनायक वा मुक्तछंदादी निर्यमक वृत्ताचे महत्त्व मानीत असल्याने आणि ते कार्य मला स्वतःपुरते तरी आजच्या परिस्थितीत अगदी दुय्यम तिय्यम वाटत असल्याने त्यात येथे अधिक वेळ घालवीत नाही.

**साहित्याचें सापेक्ष महत्त्व :**

आणि आता सरतेशेवटी मला हे सांगितल्यावाचून गत्यंतर दिसत नाही की, केवळ यमक वा काव्य वा कादंबरीच नव्हे तर स्वतः सांगोपांग साहित्य हेही आपल्या आजच्या राष्ट्राच्या परिस्थितीत मला तरी दुय्यम तिय्यम कर्तव्यच वाटत आहे. साहित्यिक सज्जन हो, विज्ञहो, सुज्ञहो ! राष्ट्रातील तुम्ही विज्ञ आहात, सुज्ञ आहात म्हणून मी तुम्हांसच विचारतो, की, साहित्यासाठी जीवन आहे की जीवनासाठी साहित्य ? जर आपले राष्ट्रीय साहित्य– आणि अशा सामुदायिक संमेलनात साहित्याचा सामूहिक ऊहापोह मुख्य कर्तव्य असणार ! – जर आपले सामूहिक, आपले राष्ट्रीय साहित्य हे राष्ट्रीय जीवनाचे एक उपांगच काय ते असेल तर राष्ट्रीय जीवनाचे संरक्षण हीच आपल्या साहित्यांची आद्यचिंता, मुख्य साध्य असले पाहिजे. अगदी कलेसाठी कलेचा जो कलावंत उपासक आहे वा साहित्यासाठीच साहित्याचा जो साहित्यिकभक्त आहे त्याच्याविषयी मला आदरच वाटेल. पण असे कलेसाठीच कलेची उपासना करणारे साहित्यिक एखाद्या नाट्यगृहात नाट्य, नृत्य, संगीताच्या भर रंगात अगदी दंगले असताना सुद्धा जर त्या नाटकगृहास अकस्मात आग लागली तर कलेसाठी कलेला झिडकारून ते तत्क्षणी त्या आगीतून जीव बचावण्याच्याच मार्गास तडकाफडकी लागतील; का त्या संगीताचा तन्मय ताल धरीत तेथेच डुलत राहतील ? त्याचप्रमाणे राष्ट्राच्या प्राणावर बेतली असता, केवळ साहित्याची कथा काय ? आपल्या राष्ट्राची आजची मृत्युंजय मात्रा म्हणजे त्याचे शस्त्रबळ– साहित्य नव्हे ! जपानात प्रत्येक प्राथमिक शाळेत मुलामुलींना प्रथम सैनिकी शिक्षण सक्तीने देण्यात येते– अलंकारशास्त्राचे नंतर! आजकाल आयर्लंडात प्रत्येक दैनिकात पहिल्याच पानावर डी. व्हॅलेराच्या आज्ञेने मोठ्या मोठ्या अक्षरात प्रसिद्धके फडकत आहेत– " wanted recruits " सैनिक हवेत ! साहित्य नव्हे! ! इटलीत तर पाळण्यांतील मुलांना काय ते सैनिकी शिक्षण अद्यापि आवश्यक केलेले नाही ! बाकी बालक पायावर चालू लागले की 'बालिरत्ना' तुकड्यांतून त्याला लहान बंदूक खांद्यावर घेऊन सैनिक संचलन शिकविले जाऊ लागले, तरुणांना मशिनगन्स प्रभृतीची सैनिक तंत्रे ! लघुकथांची तंत्रे नव्हेत ! ऑस्ट्रियाची मरणाची

किंकाळी ऐकली ना गेल्या महिन्यातच? शेवटच्या प्राणत्यागपत्रांत त्याच्या शेवटच्या अध्यक्षाने शेवटचे वाक्य उच्चारले ! We yield under Germans' swords– not under German sonnets ! आणि आपण ? जपानच्या, रशियाच्या, मुस्लिम राष्ट्राच्या बॉम्बफेकीच्या वैमानिक हल्ल्याची आगलावी काळछाया ज्या मुंबईवर दाट पसरत चालली आहे त्या मुंबईत या साहित्यसंमेलनांतील नृत्यनाटयगीतांत रंगून गेलो आहोत. ज्या मुंबईत गल्लोगल्लीत जीर्ण साहित्य, नवसाहित्य, पुराण साहित्य, पुरोगामी साहित्य, सयमक मंडळे, निर्यमक मंडळे थाटून राहिलेली आहेत, लक्षावधी तरुणतरुणी एक आणा मालेपासून सोळा आणा मालेपर्यंतच्या कादंबऱ्या वाचण्यात गढून गेली आहेत– त्या मुंबईत म्हणण्यासारखा रायफल क्लब असा एकही नाही. सबंध मुंबई इलाख्यात सैनिकी कॉलेज औषधाला सुद्धा नाही ! एक हाताची गुप्ती एका काँग्रेसवाल्याजवळ सापडली म्हणून पुण्याला परवा त्याला बंदिवासाची कडक शिक्षा काँग्रेसच्या सरकारनेच दिली ! सरकार अहिंसक म्हणावे तर, सरकारी लाठीमार नि गोळीबार प्रजेवर मात्र प्रत्यही चालू आहेत ! त्यांवाचून सरकार चालू शकणार नाही असे तेच म्हणतात ! चीन मेला तो त्यात वाङमयीन साहित्य नव्हते म्हणून मेला नाही तर सैनिकी साहित्य नव्हते म्हणून ! आपले हे एवढे विस्तीर्ण भारतीय राष्ट्र आज जगतात निर्माल्यवत जे होऊन पडले आहे ते आपले साहित्य उणे म्हणून नव्हे– शस्त्रबळ उणे म्हणून ! ही गोष्ट सगळ्या आधी, साहित्यिक हो, तुमच्या लक्षात आली पाहिजे ! सगळ्यांत साहित्यिक वर्गच सुज्ञ विज्ञ असणार ! म्हणून सगळ्या आधी तुम्ही गर्जून उठा- की, आजच्या परिस्थितीत आमचे राष्ट्रीय साहित्य म्हणजे शस्त्रबळ ! – शास्त्रचर्चा नव्हे ! जे थोडे साहित्य हवे ते तुम्ही आम्ही जे चाळिशीच्या वर गेलेले लोक, ते हवे तर पुरवतील ! माझा हा साहित्यिक निबंधसुद्धा त्या, पाठीचा कणा वाकलेल्या वाक्पीठ वृद्धांपुरताच आहे. शेष जे तरुण, ज्या तरुणी, जी पाठीचा कणा ताठ असलेली पुढची पिढी त्या साऱ्यांना माझ्या या साहित्याध्यक्षपदावरून हाच निर्वाणीचा आदेश आहे की,

राष्ट्रास आज साहित्यिक नकोत ! सैनिक हवेत ! !

तरुण हो, आमच्या दुर्बळ पिढीच्या देखोदेखी सुनीते नि कादंबऱ्या लिहिण्याकरता लेखण्या सरसावू नका; तर त्या जपान, इटली, जर्मनी, इंग्रज, आयरिश तरुणांच्या देखोदेखी आधी बंदुका सरसावा ! आज राष्ट्रीय शस्त्रबळ हे मुख्य कर्तव्य, राष्ट्रीय साहित्य हे तिय्यम ! राष्ट्रसंरक्षणार्थ प्रथम रायफलक्लबात घुसा; रडगाण्यांच्या नि रडकथांच्या साहित्य संमेलनात नंतर, वेळ राहिल्यास !

साहित्यासाठीसुद्धा आज साहित्याच्या पोथ्या गुंडाळून सैन्याच्या शिबिराकडे वळले पाहिजे. कारण जे राष्ट्र खुरटे दुबळे, त्याचे साहित्यिक खुरटे नि दुबळेच

असणार. आग का लागते ते तक्षशिलेला विचारा, नालंदेला विचारा ! मुस्लिम तवारिखा ऐटीत सांगतात की खिलजी राजवटीत नालंदा विध्वंसिली गेली तेव्हा त्या प्रचंड एशियाटिक ग्रंथ भांडारास त्यांनी जी आग लावली ती तीन महिने धुमसत होती. हजारो ग्रंथ जळत होते ! उलटपक्षी, त्यांना लिहिता येत होते की नव्हते याचा पुरावा धुंडाळावा लागतो, इतके शिवराय होते एक तुच्छ साहित्यिक ! पण म्हणून जर ते युगधर्म न ओळखता सुनीते रचीत बसते किंवा नुसती रणगीते खरडते तर आज मराठी साहित्याची दुर्गती, सिंधी, पंजाबी साहित्यासारखीच होती की नाही ते ध्यानात आणा ! तिकडे जर गायत्री मंत्र-सुद्धा 'अलेपेबे 'मध्ये उलटा लिहावा किंवा वाचावा लागतो, तसा महाराष्ट्रातही वाचावा लागता. 'ज्ञानेश्वऱ्या ' ज्ञानेश्वरांच्याच भाऊबंदांनी जाळून टाकून हाती कुराणे धरली असती. नेवाशाला ज्ञानेश्वरांच्या भिंतीशी मशीद करू पाहणारे आजचे कित्येक मुसलमान पूर्वीचे हिंदूच होते हे विसरू नका! पण युगधर्म ओळखून, शिवाजीने सरस्वतीचे रक्षणार्थच सरस्वतीकडे काही काळ पाठ फिरवून शुंभ-निशुंभ मर्दिनीचीच उपासना केली; लेखणी टाकून भवानी उचलली म्हणून तर आज महाराष्ट्र सारस्वत असा काही पदार्थ जिवंत राहिला आहे !

तुमच्या डोळ्यांसमोर तुमच्या विद्यापीठातून श्रीची नि सरस्वतीची विटंबना का ? विद्यापीठाच्या दाराशी अष्टायुधधारिणी दुर्गा पहारा देत नव्हती म्हणून! सरस्वतीचा एक उपासक या नात्याने मी तुम्हांस एक सांगतो की, आपल्या तरुण पिढीनी आता लेखणी मोडून टाकावी आणि बंदूक उचलावी ! साहित्यिक बनू नये तर आधी बनावे सैनिक ! मी ज्या ज्या साहित्यसंमेलनांत अध्यक्ष म्हणून गेलो, त्या त्या ठिकाणी जाताच शरीराच्या सनकाड्या झालेली आमची तरुण मुले-मुली कोरीकरकरीत कोणती तरी कादंबरी, कथा, काव्य हातात घेऊन जेव्हा शेकड्यांनी येता-जाता मला दिसत, त्यात दिवसरात्र तन्मय होताना आढळत, तेव्हा माझ्या हृदयाला खरोखरच चरका बसत आला; अध्यक्षपदी लाजेने मान खाली घालावी लागली. वाटे, आपणही या पापाचे वाटेकरू होत आहोत ! यास्तव मी आपणास स्पष्टपणे सांगतो की, राष्ट्राच्या आजच्या परिस्थितीत साहित्याचे साक्षेप महत्त्व तिय्यम आहे. आणि तरुण पिढीचे पहिले कर्तव्य आहे– सैनिकी शिक्षण– दुसऱ्याला उपद्रव देणारे नव्हे, नसते वैमनस्य शिलगाविणारे नव्हे, पण स्वसंरक्षणाचे नैर्बंधिक (कायदेशीर) कर्तव्य बजावणारे, असलेल्या वैमनस्यास आपल्याला उपद्रव देण्याची छातीच ज्यायोगे होऊ नये असे स्वराष्ट्रसंरक्षक शस्त्रबळ आम्हांस हवे आहे. पुढील दहा वर्षांत सुनीते रचणारा एकही तरुण न निघाला तरी चालेल, प्रत्यही साहित्य-संमेलने न झाली तरी चालेल, परंतु दहा दहा हजार तरुण सैनिकांच्या वीर चमू आपल्या खांद्यावर नव्यातील नव्या रायफली टाकून, राष्ट्राच्या मार्गामार्गांतून,

शिबिराशिबिरांतून टप्‌टप् संचलन करताना दिसल्या पाहिजेत ! ग्रंथालयाइतकी तरी, बौद्धिक कॉलेजाइतकी तरी नगरांनगरांतून सैनिकी कॉलेजेस गजबजलेली आढळली पाहिजेत ! मग मधूनमधून त्यांनी एखादी कादंबरी वा प्रेमकथा वाचली वा सुनीते लिहिली तरी चालेल. नेपोलियनही रणांगणावर करमणूक म्हणून शीळ वाजवी, 'दिल्लीच्या बादशहाची दाढी जाळून' आल्यावर पहिले बाजीरावही मस्तानीच्या अंतःपुरात एखादे पान खाताना आढळत ! पण जन्मभर नुसती झाडाची पानेच चघळणाऱ्या आणि तमाशातील तबलेच झडत राहिलेल्या दुसऱ्या बाजीरावाचे एक ब्रह्मावर्तच या राष्ट्राने बनावे– हे मला पाहवत नाही.

साहित्यिक हो, आजच्यासारख्या प्रसंगी साहित्यिकांचेही प्रासंगिक कर्तव्य ते हेच होय असे मी काही म्हणत नाही, तर साहित्यिकांचा सम्राट जो व्यास तोही म्हणतो की, शास्त्रीसाहित्यिकांचा म्हणजेच जो ब्राह्मणांचा वर्ग त्या सुद्धा–

अमर्यादप्रवृत्ते च शत्रुभिस्संगरे कृते
सर्वे वर्णाश्च दृश्येयु:: शस्त्रवन्तो युधिष्ठिर ।।

कारण साहित्यापुरते पाहिले तरी हेच खरे आहे की,

शस्त्रेण रक्षिते राष्ट्रे शास्त्रचिन्ता प्रवर्तते ।।

('मराठी साहित्य संमेलन' अध्यक्षीय भाषणे)

# ११ : साधुसंतांचे बोलपट कसे पाहावेत ?

(साधुसंतांचे बोलपट पाहण्यासाठी लोटणारी प्रचंड गर्दी पाहून सावरकरांनी या बोलपटांकडे पाहण्याचा वास्तव दृष्टिकोण कसा असावा याचे विवेचन खालील निबंधात केलेले आहे. साधुसंतांचे बोलपट कसे पाहावेत हे सुचविताना साधुसंतांची चरित्रेच मुळात कशी वाचावीत हे सांगण्यावर सावरकरांनी मुख्य भर दिला आहे. आज उपलब्ध असलेली संतचरित्रे शब्दन् शब्द यथार्थ असलेले ऐतिहासिक सत्य नव्हे, फार फार तर एक ऐतिहासिक काव्य आहे असे समजून ती वाचली पाहिजेत आणि त्यांचे बोलपट तर ते एक निव्वळ ' चमत्कारिक ' नाटक आहे, त्या एकाच भावनेने पाहिले पाहिजेत, हा सावरकरांचा दृष्टिकोण त्यांनी सोदाहरण स्पष्ट केला आहे. संतचरित्रांचे लेखन करताना कोणते वाङ्मयीन निकष सावरकरांना अभिप्रेत होते याचेही सूचन या निबंधातून मिळते.)

महाराष्ट्रात साधुसंतांच्या बोलपटांचा ऋतू सदा बहरलेला असतो. त्या बोलपटांना सहस्रावधी स्त्री-पुरुषांचा समाज लोटावा हे अगदीं साहजिक आहे.

हे बोलपट पाहिले असता त्यापासून होणारे लाभ नि करमणूक पदरात पाडून घेऊनही, भलत्याच दृष्टीने ते पाहिले असता समाजाची जी अपरिमित हानी होणारी आहे, ती शक्यतो कशी टाळता येईल त्याविषयी काही सूचना दिग्दर्शनार्थ म्हणून देत आहोत.

साधुसंतांचे बोलपट आज कसे पाहावेत हे सुचविताना साधुसंतांची चरित्रेच मुळी कशी वाचावीत, ते सांगितले पाहिजे.

संतांचे बोलपट पाहताना मुख्य गोष्ट जी ध्यानात ठेवायची ती ही की, ती चरित्रे ऐतिहासिक नाहीत, तर आहेत दोन्ही अर्थी निव्वळ ' चमत्कारिक ! ' संतांची जी चरित्रे आज उपलब्ध आहेत ती आहेत तशी तरी आजपर्यंत जिवंत ठेवली हे महिपतीसारख्या संतचरित्रकारांचे उपकारच आहेत.

त्या काळच्या समाजाच्या भावभावना तरी कशा असत हा सामाजिक इतिहासाचाच एक भाग आहे. तो तरी त्यांनी म्हणूनच जिवंत ठेवला. परंतु ह्यापलीकडे त्या चरित्रात ऐतिहासिक सत्य काय ते निश्चितपणे सांगणे फारच दुर्घट झालेले आहे. इतकेच नव्हे, तर ह्या आज उपलब्ध असणाऱ्या चरित्राविषयी जर काही निश्चितपणे सांगता येत असेल तर ते हेच की ती चरित्रे भाबड्या कथांनी नि अनैतिहासिक प्रमादांनी खच्चून भरलेली आहेत. पुन्हा जुन्या ऐहिक बखरीतील वृत्त पडताळून पाहण्याची इतर साधनेही संतविजय, भक्तिविजय, प्रभृती दैविक ग्रंथांची कसोटी पाहण्यास सर्वथैव अपुरी पडतात. संत हे बहुधा स्वभावतःच व्यवहारपराङमुख. अनेक असे की ज्यांच्या हातची, साध्या घडामोडीची वा पत्रव्यवहाराची बोटभर चिठ्ठीसुद्धा बहुधा धाडलेली नसावयाची, सापडणे त्याहून विरळा.

दुसरे साधन परकीय इतिहासातील उल्लेख. परंतु आपल्या राजकारणी पुरुषांविषयी परकीय लिखाणात भरपूर उल्लेख आढळत असताही ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव, तुकारामादी संतांविषयी तर काय, पण प्रत्यक्ष रामदास, ब्रह्मेंद्राविषयीही, जे उल्लेख त्यांची चरित्रे पडताळून पाहण्यास उपयोगी पडतील, असे धुंडाळताही सापडणे कठीण जाते. त्या संतांनी अनेक वेळा मुसलमानी बादशहांना

नाकी नव आणल्याचे जे ‘ चमत्कार ’ त्यांच्या चरित्रात वर्णिलेले आढळतात, त्यांचा मागमूसही मुसलमानी वा इंग्रज, डच, फ्रेंच यांच्या समकालीन लिखाणात सापडत नाहीत. बरे, मुसलमान, युरोपियनांना ते त्यांचे– आमच्या संतांनी केलेले पराभव लज्जास्पद वाटतात म्हणून मुसलमानादिकांच्या लिखाणात आलेले नाहीत असे म्हणावे तर, मुसलमानादिकांचा अनेक संग्रामांतून हिंदू वीरांनी जो वारंवार बोजवारा उडविला, त्यांची वर्णने या वा त्या प्रकारे पण परकीय इतिहासात भरपूर सापडतात, उल्लेख असा तर सहसा टाळलेलाच नाही. तुकारामांच्या कीर्तनप्रसंगी शिवाजीराजे आले असता त्यांना पकडण्यासाठी आलेल्या मुस्लिमांनी वेढा दिला. त्या वेळी तुकारामांच्या भक्तीचा चमत्कार होऊन जिकडे तिकडे शिवाजीच, शिवाजी दिसू लागले नि त्या गोंधळात राजे निसटले– हा तुकारामांचा चमत्कार मुसलमानांनी त्यांच्या इतिहासात त्यांना अपमानकारक म्हणूनच गाळला असे म्हणावे तर तेच शिवाजीराजे औरंगजेबाच्या हातावर तुरी देऊन दिल्लीहून जे निसटले त्या मुस्लिमांच्या पराभवाची वर्णने मुस्लिमांनी दिलेली आहेत.

संतांचे चमत्कार हे संताजींच्या चमत्काराइतके परकीयांना खरेखुरे वाटले नाहीत किंवा खरेखुरे नव्हते किंवा तुच्छविले जाण्याइतके भाकड भासले, यास्तवच परकीयांनी त्यांच्या चमत्कारांचा तर काय, पण संतांच्या अस्तित्वाचासुद्धा महत्त्वपूर्वक असा उल्लेख फारसा केलेला नाही. असे म्हणा, वा म्हणू नका, पण ते उल्लेख नाहीत हे काही नाकारता येणे शक्य नाही. त्यामुळे संतांची चरित्रे पडताळून पाहण्याचे तेही साधन मुळीच उपलब्ध नाही.

संतांचे स्वतःचे ऐहिक पत्रव्यवहार वा लिखाण आणि त्यांच्याविषयीचे परकीय शत्रु-मित्रांचे उल्लेख ही दोन्ही ऐतिहासिक साधने अगदी विरळ असल्याच्या अशा अडचणीतच तिसरी अत्यंत महत्त्वाची अडचण जी त्या प्रकरणी इतिहाससंशोधकांना अडते ती त्यांच्या असलेल्या महिपतीप्रभृती चरित्रकारांच्या चरित्रांतील अंतर्गत सुसंगती– विसंगती– तुलनेची. इतर पुरुषांच्या ऐहिक दृष्टचा लिहिलेल्या चरित्रांतील पुष्कळ गोष्टी त्यांच्या वर्णनातील विसंगतीवरून केव्हा केव्हा तत्काळ खोटचाखऱ्या ठरविता येतात. समजा, एखाद्या बखरीत असे वर्णन आले की, “ चिमाजीअप्पांनी वसई घेताच थोरल्या शिवाजीमहाराजांनी त्यांना रायगडावर बोलाविले; ‘ पोर्तुगीजांचा सूड उगवलास, परशुरामक्षेत्री धर्म राखलास ! ’ असे गौरविले आणि श्रीपतराव प्रतिनिधीकडून प्रधानपद काढून चिमाजीअप्पांना दिले.”

–तर ह्या वाक्यातील विसंगती स्थलकालपात्रदृष्टचा तत्काळ सिद्ध करून देता येते. शिवाजीमहाराज म्हणजे शाहूमहाराज असावेत अशी काही चुकी काढून सुधारून त्या विसंगतीतही अंतर्गत पुराव्याच्या रूपाने जे सत्य असते ते पाखडून

काढता येते. कारण ती चरित्रे बोलूनचालून ऐहिक बुद्धिवादाचा, मानुषीय तर्काचा विषय हे सर्वांनी गृहीतच धरलेले असते. पण संत चरित्राचे मूळ गृहीत (axiomatic assumption) आध्यात्मिक, दैविक, अतिमानुष असते. जी घटना जितकी विसंगत, तितकीच त्यात संग्राह्य, 'चमत्कार' नसला तर ते संतचरित्र सांगण्यासारखेच नव्हे ! त्यामुळे त्यातील घटना दैविक वा आध्यात्मिक भाषेत तर्कातीत, म्हणजेच ऐहिक वा बौद्धिक भाषेत तर्कशून्यच असणार ! ही संतचरित्रे म्हणजे बोलून चालून असंभव अलंकाराची उदाहरणे ! समजा वर शिवाजीमहाराज चिमाजीअप्पांना भेटले वा श्रीपतरावांचे प्रधानपद चिमाजीअप्पांस दिले गेले ही जशी विपर्यस्त विधाने केली आहेत तशी एकाद्या संतचरित्रात जर विधाने आली, की श्रीधरस्वामींना ज्ञानेश्वरमहाराज भेटले नि त्यांचा पांडवप्रताप ग्रंथ ते ज्ञानेश्वर वाचीत बसले, किंवा महिपतींचे अध्याय नामदेवांनी लिहिले, तर तशी ऐतिहासिक दृष्टचा धडधडीत चुकीची ठरणारी विधानेसुद्धा चुकीची म्हणून भक्तिपंथीयांना पटवून देणे अशक्य आहे ! कारण स्थलकाल, संभवासंभव प्रभृतींवर उभारलेल्या मानुषीय तर्काची कसोटी त्यांना मुळी लागतच नाही हे तर या संतचरित्रकारांचे आद्य नि अशंकनीय गृहीत (Axiom) ! ते म्हणणार 'ज्ञानेश्वरांची योगसिद्धीच तशी होती किंवा विठ्ठलाला अशक्य ते काय ? त्याने ज्ञानदेवांची भेट श्रीधरांशी, नामदेवांची भेट– महिपतींशी करविली !' अशा प्रकारची अनेक अनैतिहासिक उदाहरणे ह्या संतचरित्रांतून सापडतातही ! 'अलौकिक सिद्धी', 'नामप्रताप' 'देवाची करणी' अशा तर्कातीत म्हणजे ऐतिहासिक भाषेत तर्कशून्य असलेल्या गृहीतांमुळे संतचरित्रातून ऐतिह्य असे ठामपणे काढणे नि पटवून देणे हे, इतिहास संशोधनाचे जे अंतर्गत पुराव्याचे तिसरे लौकिक साधन, त्याच्या साह्यानेही दुर्घट ठरते. हिंदूंचेच नव्हे तर ख्रिश्चन, मुस्लिम, यहुदीप्रभृती धर्मछाप असे जे जे संतवाङ्मय जगात आहे त्या साऱ्यालाच ही गोष्ट लागू आहे !

अनेक चमत्कार, लाक्षणिक भाषा शब्दशः खरी समजल्यानेच काय ते चमत्कार बनून तोंडीतोंडी वाढत गेलेले असतात. कोणत्याची ऐतिह्यसंशोधनाच्या साधनांनी पडताळून न पाहता येणारी, ही आज उपलब्ध असलेली सारी संतचरित्रे ऐतिहासिकदृष्टचा केव्हाही जशीच्या तशी खरी मानता येणारी नाहीत. हीच गोष्ट आणखी एका पुराव्यानेही लक्षात येऊ शकते. ह्या चमत्कारात अनेक 'चमत्कार', केवळ लाक्षणिक वर्णने शब्दशः खरी समजणाऱ्या भक्तमंडळींच्या कल्पनेचे प्रपंच आहेत. संतांची भावना सर्व काही भगवान करवितात ही ! त्यांची वृत्ती निरहंकारी. जे स्वतः करावयाचे ते स्वतः केले म्हणून न सांगता भगवंताने केले अशी भाषा त्या भावनेच्या लाक्षणिक अर्थी वापरण्याचा त्यांचा प्रघात. श्रीधरस्वामी– रामविजयादी

ग्रंथ लिहिताना किंवा महिपती भक्तिविजय लिहिताना वारंवार म्हणतात–

'मी मंदमति, ग्रंथ कसा रचणार ? पण पांडुरंगानं लेखणी हाती दिली. नि म्हटलं लिही, लिहविता तो ! तो सांगेल तसं लिहलं ! इ.'

संताच्या अभंगांत, ओव्यांत, ग्रंथांत ही भाषा वरील लाक्षणिक अर्थी येई. पण त्यांच्यापुढील भक्तगण ती भाषा शब्दशःच वस्तुस्थिती समजून प्रत्यक्ष पांडुरंग अवतरले, लेखणी वस्तुतःच उचलून त्यांनी संताच्या हाती दिली, किंवा संत कीर्तन करीत, नि हनुमंत मागे साथ देत स्वतःच प्रत्यक्षपणे उभे राहत, अशी वर्णने संत-चरित्रांतून घालीत चालले. पिढीमागे पिढी, कीर्तनकारामागून कीर्तनकार त्या वर्णनात अधिकाधिक भडक रंग भरीत चालले. लक्षावधी भक्तजन तो 'चमत्कार' अक्षरशः घडला असे प्रामाणिकपणे समजत चालले. संतजन म्हणत 'सोने आणि माती । आम्हां समान दो हातीं ।।' किंवा 'वैराग्याचा परीस माझ्या हाती आला, आता दगड देखील सोने झाले, सोनेसुद्धा दगड झाले !' रामकृष्णांची एक साधना अशी होती, की, एका हातात सोने घ्यावे, एकात माती, आणि त्या वस्तू ह्या हाता-तून त्या हातात वाटेल तशा चाळवीत सोनेमाती मातीसोने असे उलटसुलट तोवर म्हणत बसावे की जोवर कशात माती नि कशात सोने ते ध्यानातही येऊ नये,– सोन्याला माती शब्द लागावा, मातीला सोने ! पण अशा प्रखर वैराग्याच्या लाक्षणिक शब्दांना संत जे उच्चारीत, ते पुढेपुढे तोंडोतोंडी संतचरित्रलेखक, भक्तगण नि कीर्तनकार शब्दशः खरे समजून नि तीत मन मानेल तसे रंग भरून त्याचे अनेक 'चमत्कार' करून सोडीत. खऱ्या खऱ्या मातीचे अमक्या संताने खरे खरे सोने केले किंवा श्रीनामदेवांनी दगड उचलविले ते परीस झाले. परीस म्हणून ज्यांनी हपापून ते घेतले त्यांचे दगड झाले इत्यादी चमत्कारही ह्या वर्गातीलच होत.

उलटपक्षी, शब्दशः खरी घडलेली घटना लाक्षणिक अर्थी सांगताच चमत्कार बने, हा दुसरा वर्ग. तुकारामाच्या जाड पुठ्ठयांच्या वाणीछाप वह्या पाण्यात बुडविल्या त्या फुगून वर आल्या– ही घटना खरी पण साधी. तुकोबासारख्या परम श्रद्धाळू नि निरहंकार भगवद्भक्ताने साहजिकपणे म्हटले, 'विठ्ठलाने माझी अभंगवाणी परत दिली !' तीच भावना वळावून, त्याच्या लाक्षणिक रंगात ती साधी घटना रंगत रंगत आज तिची एक किती अद्‌भुत कथा होऊन बसली आहे ! साध्या घटनेचा एक दैवी चमत्कार बनला ! दामाजीपंतांच्याही कथा-नकाची अशीच फोड कागदपत्रांच्या आधारेच राजवाडयांनी केलेली आहे ! दामाजीपंतांचा दंड विठू नावाच्या महाराने भरला आणि त्यांना बंदिगृहातून सोडविले ही खरी पण साधी गोष्ट. परंतु त्या महाराचे नाव होते विठू आणि दामाजी होते संत ! त्यायोगे भाविक जनांनी विठूचा बोलताबोलता विठ्ठलच करून सोडला !

खऱ्या नावावर नुसते श्लेष करून त्यावर अद्‌भुत चमत्कारांच्या रचलेल्या ज्या निव्वळ काल्पनिक कथा तो चमत्कारांचा एक तिसरा प्रकार आहे !

जाट हे जातीचे खरे नाव. त्यावर श्लेष सुचला नि त्याची एक अद्‌भुत उत्पत्ति-कथा त्यावर रचली गेली की, 'महादेवाच्या जटेपासून ते उत्पन्न झाले म्हणून त्यांना जाट नाव पडले !' न्हाव्याचे नाव नाभिक असे कल्पून त्यावर लगेच कोटी लढविली गेली की, ते ब्रह्मदेवाच्या नाभीपासून जन्मले. ब्राह्मण मुखातून नि क्षत्रिय बाहू-पासून जन्मले या सुंदर रूपकाला अक्षरशः सत्य मानण्याच्या भाबडेपणाइतकाच न्हावी– नापिक–नाभिक हे ब्रह्मदेवाच्या नाभीपासून प्रकटले हा विश्वासही भाबडट! कर्णाच्या नावावर श्लेष झाला. लगेच त्याचा एक अद्‌भुत चमत्कार बनला की कर्ण हा कुंतीदेवीच्या कर्णातून– कानातून– जन्मला म्हणूनच त्याचे नाव कर्ण ! पुन्हा अलौकिक पुरुषांचा जन्मही अलौकिकच असला तर शोभतो ह्या खुळ्या आदरा-पायी अनेक थोर पुरुषांना ईशसंभव वा अयोनिसंभव कल्पिण्याकडे सामान्य जनांचा जगात कुठेही गेलात तरी भारी कल ! जीजस हा सुताराचा मुलगा नसून कुमारी मेरीला ईश्वरी गर्भापासून झाला ही ख्रिश्चन कथा पहा. तीच गोष्ट संत नामदेवाची. श्रीनामदेव अलौकिक संत, त्यांचा जन्मही अलौकिक असला पाहिजे ! तो शोध लावण्याचे काही साधन ? हो हो ! ते शिंपी होते ना ? अर्थात तो शिंपी शब्दच ते गूढ उकलवू शकेल ! या भावनेने शिंपी शब्दाची लगोलग फोड केली गेली. शिंपी म्हणजे शिंपेतला, शिंपेतून उद्‌भवलेला. पुराणकथा होत्याच तशा काही. त्या साच्यात ढाळताच ही कथाही एक अद्‌भुत चमत्कार होऊन बाहेर पडली. नामदेवांचा मातापितरांना एक दैविक शिंप सापडली. घरी आणून पाहतात तो तिच्यात एक अद्‌भुत बालक ! म्हणून नामदेवांना शिंपी म्हणतात !!

चमत्कारांचा एक चौथा गट आहे. त्यास स्थिरटंकीय म्हणू. सारे एकठशी काम. एका संताच्या अनुयायांनी त्याचा एक चमत्कार वर्णिला की दुसऱ्या संताच्या अनुयायांनी तोच चमत्कार आपल्याही गुरूच्या चरित्रात जसाच्या तसा ठोकून दिलाच म्हणून समजावे. नामदेवाने देऊळ फिरवले, तशीच नानकांना मशिदीतून काढून बाहेर घालविले तेव्हा मशीद फिरल्याची कथा ! तशीच इतर संतांची गोष्ट. जनाबाईपाशी पांडुरंगाचा शेला सापडला, बडव्यांनी चोरीचा आळ घातला, तिला सुळावर चढविण्याची शिक्षा झाली. तसेच अगदी चोखा मेळ्यांचे घडले. त्याच्या-पाशी पांडुरंगाचा हार सापडला, बडव्यांनी चोरीचा आळ घेतला, त्याला गाडीला बांधून ठार मारण्याची शिक्षा झाली. दोन्ही प्रकरणी पांडुरंग धावून आले, भक्तांना सोडविले. पण त्या भक्तावर जीव कासावीस करून टाकणारे नि त्यांच्या आप्तेष्टांना त्यांच्या मृत्युदंडामुळे भयंकर दुःख देऊन तळमळविणारे हे संकट पांडुरंगाने मुळातच का आणले, असल्या जीवघेण्या विचित्र लीलांची खोड पांडुरंगास लागलेली आहे हे

वर्णिण्यात दयाळू देवाला आपण किती उपद्रवी नि निर्दय बनवीत आहोत हे काही, ह्या अद्भुत कथा आळवून आळवून सांगणाऱ्या भक्तजनांच्या नि संतचरित्र-कारांच्या ध्यानी आले नाही ! !

वरील दिग्दर्शनार्थ सुचविलेल्या सर्व कारणांसाठी आज उपलब्ध असलेली संतचरित्रे शब्दन् शब्द यथार्थ असलेले ऐतिहासिक सत्य नव्हे, फारफार तर एक ऐतिहासिक काव्य आहे असे समजूनच ती वाचली पाहिजेत, त्यांचे बोलपट तर ते एक निव्वळ ' चमत्कारिक ' नाटक आहे ह्या एकाच भावनेने पाहिले पाहिजेत.

**संतचरित्रे आहेत तशींच वाचली जावींत, चित्रे नटविलीं जावींत.**

आज उपलब्ध असलेली संतचरित्रे ऐतिहासिक दृष्टीने, आणि ते अक्षर नि अक्षर सत्य आहे, अशा भाकड श्रद्धेने पाहण्याचे वा वाचण्याचे तेवढे टाळले की मग ती आहेत तशीच रंगविली जाण्यात काही विशेष धोका नाही. आम्ही तर असे म्हणू, की त्या संतचरित्राची मोडतोड करून त्यातील चमत्कारादिकांना फाटा देऊन, त्या भोळ्या नि साधुशील महात्म्यांचे यथार्थ स्वरूप लपवून त्यांच्या जुन्या भक्ति-विजयाची नि संतलीलामृताची नवी सुधारलेली आवृत्ती काढणे हे अगदी चुकीचे, लुच्चेगिरीचे नि अरसिकपणाचेच द्योतक होईल. त्यांच्या त्या भोळ्या भावाच्या, अद्भुत चमत्कारांच्या, टाळचिपळ्यांच्या वातावरणातच ही आमची संतमंडळी खुलून दिसतात. त्यांना अद्यावत बनविणे हे एक असह्य विडंबन होईल. नामदेव, तुकारामांच्या त्या वंदनीय नि लोभनीय मूर्ती त्या पागोट्यांत, त्या नामघोषांत, त्या तुळशीमाळांत, त्या बुक्क्यात, त्या अंगरख्यांतच शोभतात. नामदेवांना आजच्या दुचाकीवर बसविणे किंवा तुकोबारायांना आजच्या सुटाबुटात जखडणे हा बुद्धी-वेडाचा मूर्खपणा आहे. कारण महिपती चरित्रातून त्या काळचे जे वातावरण नि भावभावना होत्या त्या जशा यथावत् व्यक्तविल्या जातात. तशा त्यात आम्हांस हवी तशी गाळागाळ केल्याने केव्हाही व्यक्तविल्या जाणार नाहीत. त्या काळचे समाजदर्शन यथावत घडविणे हेही इतिहासाचेच एक कर्तव्य आहे. आणि महिपती-प्रभृती कवींचे काव्य हाही ह्या अर्थी एक इतिहासच आहे.

दुसरे असे की, संताच्या ह्या बोलपटातून वा चरित्रातून त्या चमत्कारादिकांच्या वातावरणानेच अद्भुत रसाचा उत्कृष्ट परिपोष होऊ शकतो. आणि अद्भुत रस हा एक अत्यंत आस्वाद्य रस आहे. त्या रसासाठी जशा आपण कादंबऱ्या वा अरेबियन नाईटस् वाचतो केवळ तशाच दृष्टीने ते चमत्कार पाहावेत.

तिसरी गोष्ट अशी की संतचरित्रातील बहुतेक चमत्कार जरी लाक्षणिक किंवा अविश्वसनीय किंवा बनावट असेच असले तरीही त्यामुळे त्या साधुपुरुषांच्या

खऱ्या थोरवीस काहीच बाधा येत नाही. कारण– संतांची खरी थोरवी ही चमत्कारात नसून त्यांच्या पवित्र वाणीत, ग्रंथात आणि परोपकारी नि उदात्त चारित्र्यातच साठविलेली आहे.

जोवर ती ज्ञानेश्वरी, ते तुकयाचे अभंग, ते एकनाथनामदेवादिकांचे अत्युदार चारित्र्य आपल्या डोळ्यासमोर आहे तोवर त्यांच्याविषयी वाटणारा आदर नि पूज्यता ही उणावण्याची भीतीच नको. पण जर तो आदर नि पूज्यता बुद्धिपूर्वक नि यथाप्रमाण वाटावयास हवी असेल, तर, त्याची ती जुनी चरित्रे आहेत तशीच राहू देणे अवश्य आहे.

या सर्व कारणांसाठी सध्याच्या बोलपटात संतचरित्रे आहेत तशीच नि त्यांच्या काळच्या बऱ्यावाईट पण खऱ्याखुऱ्या वातावरणातच चित्रपटविली जावीत.

पण संत म्हटला की तो सर्वज्ञ किंवा सर्वशक्तिमान किंवा देव ज्याच्या अर्ध्या वचनात आहे असा असलाच पाहिजे ही समजूत मात्र खोटी नि खुळचट आहे, हे तेवढे प्रेक्षकांनी, वा वाचकांनी केव्हाही विसरता कामा नये. भक्तीचा आनंद आध्यात्मिक आहे. त्यायोगे व्यावहारिक अशी कोणतीही विशेष योग्यता वा सृष्टीनियमांचे ज्ञान किंवा राष्ट्राच्या ऐहिक उत्कर्षाला उपयोगी पडेल अशी कोणतीही गोष्ट विशेष शक्ती वा युक्ती संतांच्या, योग्यांच्या वा भक्तांच्या अंगी येत नाही. कित्येक संत अगदी निरक्षर होते. नामाच्या महिम्याने ' त्यांना श्रीगणेशादेखील आपण होऊन आला नाही मग सर्वज्ञतेचे नावच नको ! कित्येक अगदी भोळे, जगाचा तर काय पण देशाचा भूगोल माहीत नाही, इतिहास नाही, राजकारण नाही, त्यांच्या प्रत्येक संकटी देव पावे ही गोष्ट तर त्यांची आहेत तीच चरित्रे खोटी पाडतात. चोख्याला सनातन्यांनी जोखडास बांधले. तेव्हा पांडुरंग येऊन त्याचा प्राण वाचविते झाले; पण त्या चोखामेळा संताला जेव्हा मुसलमानी बादशाहने वेठीस धरून नेले नि नगराची वेस बांधण्यास जुंपले, तेव्हा पांडुरंग तिकडे फिरकलेसुद्धा नाहीत. तीच वेस बांधता बांधता कोसळली. आणि त्याखाली तो संत चोखामेळा चिरडून मेला, हे संतचरित्रेच सांगतात ! मग तेव्हा पांडुरंग का धावले नाहीत ? नामदेव, तुकारामादिकांच्या घरी बायकामुले अन्न अन्न करून मेली, ' स्त्री अंकी अन्नान्न करून मेली !' हा तुकारामांचाच बोल आहे ! ' नामाचा महिमा ' एक प्रकारचा आध्यात्मिक आनंद त्या व्यक्तीला देऊ शकला तरी त्या व्यक्तीच्या वा राष्ट्राच्या व्यवहारात त्या नामाच्या महिम्याची कवडीची पत नाही, हे आम्ही स्पष्टपणे ध्यानी ठेवावे.

संत त्यांच्या इतर गुणांनीच थोर आहेत. त्यांचा किंवा भक्तिपंथाचा असा नुसता बडेजाव केल्यानेच त्यांच्या चरित्रांचा बोजवारा उडालेला आहे. ते कसे हे

पहावयाचे असल्यास एक उदाहरण म्हणून अजागळ भक्तांनी गायिलेला आणि संत नामदेव महाराजांच्या नावावर छापलेला हा खुळचट चमत्कार पहा !

जुन्या महिपतीने नव्हे, तर अगदी आजच्या आजगावकरांसारख्या लेखकाने श्रद्धापूर्वक 'निर्भीड'च्या फेब्रुवारीच्या अंकातून वर्णिला आहे तो थोडक्यात असा ! एका ब्राह्मणाने नामदेवांना बेदरास नेण्याचा आग्रह केला, नामदेव जाईनात तेव्हा पांडुरंगाने आज्ञापिले– जा. (साधी गोष्ट म्हणजे नामदेवांना जावेसे वाटले, पण कर्ता करविता देव ! त्या तात्त्विक भाषेच्या साच्यात ती गोष्ट सांगताच तेच अक्षरशः सत्य समजून चमत्कार झाला; 'प्रत्यक्ष पांडुरंगाने सांगितले– जा !') ब्राह्मणांचा मोठा तांडा घेऊन भजनाचा घोष करीत, नामदेव बेदर नगरात प्रवेशू लागले. इकडे बेदरचा सुलतान महालाच्या गच्चीवर बसला होता. त्याने तो दिङ्यांपताकांचा मेळा पाहुन आपले प्रधान काशीपंत ह्यांकडे वळून म्हटले,

'हे कोणाचे सैन्य ? कोणाचे ? कुठं चाललं आहे ? इकडे येण्यात उद्देश काय त्यांचा शोध करा.'

'त्याप्रमाणे बरेच पठाण सैन्य घेऊन सेनापती वेशीकडे गेला नि नामदेवाच्या भजनी मंडळास वेढा दिला. ब्राह्मण भयभीत झाले. पांडुरंगाचा धावा केला. नामदेव पुढे होऊन येऊन सेनापतीस म्हणाले,

"त्रैलोक्यनाथ जो पंढरपूरचा पांडुरंग त्याचा मी सेवक. हे ब्राह्मण याचक उत्सवार्थ इथे आले. पण हा उन्मत्त बादशहा, यात्रेकरू नि लढावू सैन्य यांतला भेद त्यास कळेनासा झाला ! तुम्ही वेढा उठवा. मार्ग द्या !" त्यासरशी सेनापतीने वेढा उठविला. (पाहिलेत ना वर्णन ! सारा अरेबियन नाईटस्‌चा खाक्या. बादशहा गच्चीवरून बघेतो 'हे मोठे सैन्य' येत असल्याची बातमी न लागण्याइतकी सुलतानी राज्याची व्यवस्था त्या वेळी ढिली नव्हती ! नामदेवासांगाती फार फार तर दोनशे-तीनशे ब्राह्मणदिक मंडळी होती ! हे कथेतच स्पष्टपणे सांगितले आहे ! पंचापागोटी पताकांचा तो मूठभर गबाळ समाज बादशहाला दिसला. पण खड्ग, बंदुका, तोफा, असा काही प्रकार न दिसताही ते त्याला मोठे सैन्य भासले! बरे, काशीपंत प्रधानालाही पत्ता नाही. अशा प्रकरणी चौकशी करणे तर कोतवालाला बोलवतात का एकदम सेनापतीला ? तो सेनापतीही इतका गबाळ की त्यालाही 'हे मोठे सैन्य आल्याचा सुगावा गच्चीवरून बादशहा बघेतो नाही ! सेनापती काही गच्चीवर कधी बसत नव्हता वाटते ! पुन्हा, सगळ्यात आश्चर्य हे, की सेनापती पठाणांचे दुसरे मोठे सैन्य घेऊन गेला, तेव्हा समक्ष पाहात असताही एकसुद्धा खड्ग, बंदूक, तोफ, नसलेल्या, पंचापागोटीपताकांचा भजनकर्ता तो मेळावा त्याला मोठे 'सैन्यच' वाटतो ! सेनापती डोळ्यांवर नि कानांवर पट्ट्या बांधून गेला होता की काय ? पुढे तो वेढा देतो तेव्हा ब्राह्मणादिक वारकरी भयाने थरथर

कापतात ! 'पांडुरंग त्रैलोक्याच्या नाथाने आधी त्या 'उन्मत्त' बादशहाचाच कान पिळून त्याला गच्चीवरच का सांगितले नाही की हे वारकरी आहेत, सैन्य नव्हे म्हणून ! बिचाऱ्या वारकऱ्यांना भयाने घाबरगुंडी उडेतो पांडुरंगाने उपद्रव का होऊ दिला ? नामदेवाने 'वेढा उठव' असे सांगताच म्हणे सेनापतीने वेढा उठविला ! किती भाबडेपणाची कथा ही ! सेनापती बादशहाचा बंदा होता. बादशहाची आज्ञा येईतो थांबता, का नामदेवांच्या आज्ञेसरशी एवढा घातलेला सशस्त्र वेढा उठवता ? )

सेनापतीने बादशहाकडे येऊन ते वृत्त सांगितले. बादशहा रागावला. नामदेवांना मंडळींसह पकडून आणले. ती सारी ब्राह्मण मंडळी दोनशे होती. त्यांना गारद्यांकडून मारवीत मारवीत बेदरच्या बाजारातून चालविले. हिंदू लोक हळहळू जमू लागले. परंतु बादशहाच्या जुलुमास आळा घालण्याचे त्यांना सामर्थ्य कोठे होते?

(हा प्रश्न विचारणारे आजगावकर स्वतःला दुसरा प्रश्न का विचारीत नाहीत की, त्या नामदेवाचे धनी जे 'त्रैलोक्याचे नाथ' ते ह्या त्याच्या बिचाऱ्या शेकडो भक्तांची अशी मारहाण नि पायमल्ली चालली असताना नुसती पाहत बसण्याइतके कठोर वा अनाथ कसे झाले ? पांडुरंगानेच त्या ब्राह्मणांसह नामदेवांना 'जा' म्हणून सांगितले होते. मग तेव्हाच तिकडे त्या बादशहाच्याही हाता-पायात मुसक्या बांधून निदान त्या दिवसापुरते तरी त्याला कैचीत का ठेवले नव्हते ? एक तर बेदरच्या बादशहापेक्षादेखील हा आपला पांडुरंग पंगू ठरतो किंवा शक्य असताही स्वतःच्या संतांची पायमल्ली नि छळ निष्कारण चालू देण्याइतका खोडसाळ तरी ठरतो ! ह्या असल्या भाकडकथा आपल्या देवाचीच अशी विटंबना करतात हे आमच्या भक्तांच्या ध्यानीमनीही नसते ! भाबडट तारतम्यशून्यतेने आजगावकर लिहितात त्याचा सारांश असा—) 'त्या सर्व भक्तांना बादशहापुढे मेंढरांसारखे उभे केले, एक गाय उठली. बादशहाने नामदेवांना साष्टांग नमस्कार घातला. भगवंताने भक्ताच्या हाकेला उडी घालून हिंदू धर्माची लाज राखली.'

(लाज राखली की लाज घेतली ? हा नामाचा महिमा की लघिमा ? जर देव आले, तर हिंदूंचा इतका छळ करणाऱ्या त्या उन्मत्त बादशहालाच खाटकाच्या हाती सोपवून सगळाचा निकाल लावायचा का एक गाय तेवढी जिवंत करावयाची आणि पुन्हापुन्हा नि प्रत्यही शतावधी गाई मारून खाण्यास नि हिंदूंना छळण्यास त्या मुसलमानी बादशहास जिवंत ठेवावयचे ? तेवढ्या बादशाह्या थोड्याच दिवसांत विजयनगरच्या रामरायाचे डोके कापणार, सहस्रावधी हिंदूंची तालिकोटास कत्तल करणार, हिंदू राजकन्यादिक महिलांना बलात्कारणार, मंदिरांवर नांगर फिरवणार, हे न कळण्याइतका तो त्रैलोक्यनाथ सर्वज्ञानी पांडुरंग राजकारणाच्या बिगरयइत्तेत होता की काय ? मग एक गाय तेवढी उठवून हिंदुधर्माची लाज ती

काय राखली ? पण भक्त जितके दुबळे, तितकेच देव दुबळे; भक्त, जितके राजकारणात भ्याड वा भाबडट तितकेच त्यांचे देव ! गाय जिवंत उठविली या घटनेला ऐतिहासिक पुरावा बळकट असा नाहीच. बरे, ते खरे समजले तरी त्यायोगे नामाचा महिमा वा संतांचे सामर्थ्य अद्‌भुत ठरत नाही. जर मेलेले जिवंत करण्याचे सामर्थ्य हटकून नामदेवांच्या अंगी वा नामाच्या महिम्यात असते, तर एक गाय तेवढी जगविण्यापेक्षा त्या पिढीत सज्जन असा मरावयास नको होता. संत चोखोबा वेशीखाली चिरडून मेले, नामदेव हळहळले, त्यांचे प्रेत शोधीत त्या ढिगाऱ्यातून त्यांची हाडे नामदेवांनीच काढली, – पण तिथे पुन्हा नामाचा गजर करून त्यांना चोख्याला जिवंत करता आले नाही ! त्या गाईपेक्षा तो संत चोखा नामदेवांना सहस्र पटीने प्यारा होता. त्याच्या मृत्यूमुळे ते अत्यंत कष्टी झाले होते. मग त्याला का जगविले नाही ?

रामदासांनी चितेवर जात असलेल्या एका प्रेतास आशीर्वाद देऊन उठविले असाही चमत्कार लिहिला आहे. चितेवरून अनेक प्रसंगी जीवनशक्तीचे यंत्र पुन्हा चालू होऊन प्रेते उठतात ही व्यवहारात केव्हा केव्हा घडणारी गोष्ट. पण रामदासांच्या बोलाफुलास गाठ पडताच तो चमत्कार ठरला इतकेच ! नाहीतर समर्थांना संजीवनीचे अचूक सामर्थ्य खरोखरीच असते तर बाजी देशपांडे पावनखिंडीत किंवा तानाजी सिंहगडी पडता आणि शिवाजीराजे विव्हळता, रामदासांच्या आशीर्वादासरशी तसले हिंदू राष्ट्राचे मोहरे तरी जिवंत केले गेले नसते का? प्रत्यक्ष शिवाजीराजे गुडघी रोगाने आसन्नमरण असलेले समर्थांना कळले. समर्थ अत्यंत हळहळले, तेव्हा शिवाजीला तरी जगवायचे होते ! शिवाजीच्या मृत्यूची समर्थांना हौस नव्हती, उलट धास्ती होती. ' राजे आम्हास सोडून गेले ' म्हणून समर्थ इतके दुःखी झाले की त्यांनी प्रायोपवेशन स्वीकारले ! एका यःकश्चित बाईसाठी तिच्या नवऱ्याला जिवंत हो म्हणताच हटकून जिवंत करण्याचे सामर्थ्य अंगी असताही बाजी, तानाजी, शिवाजीच्या पत्नींना आणि प्रत्यक्ष महाराष्ट्र राज्यलक्ष्मीला वैधव्यात लोटण्याइतके समर्थ खुळचट होते, नामदेव दुष्ट होते असे तरी म्हणा किंवा रामदासांचे वा नामदेवाचे, हे यःकश्चित गाय वा माणूस उठविण्याचे नाममहिम्याचे ' चमत्कार ' भाकड आहेत, ती बोलाफुलाची गाठ होती वा फारफार तर संशयास्पद योगायोग होता असे तरी म्हणा ! आणि काही झाले तरी नाममहिम्याने जगात वाटेल ते करता येते किंवा संतांच्या ईश्वरी अधिष्ठानावाचून काही एक यश भौतिक राजकारणात येणार नाही असली पंगू,खुळचट नि भाबडी भाषा तरी सोडा ! बरे, हिंदूंना छळणाऱ्या त्या बादशहाचा हातच छाटण्यात अनमान करणारा तो देव काही सोसाळू वा मवाळू होता अशी शंकासुद्धा घेता येत नाही. कारण आजगावकर पुढे ठासून सांगतात –)

ह्या नामदेवादिक संतांच्या छळाचे प्रायश्चित्त बेदरच्या बादशहाला लगेच भयंकर रीतीने भोगावे लागले. त्याच्या प्रजाजनांसही भोगावे लागले. कारण थोडयाच दिवसांत सुलतानाच्या वाडयात नि नगरातील घरांतून असंख्य सर्प निघाले आणि शेकडो माणसांना त्यांनी दंशिले. सर्पदंशितांना खाटेवर घेऊन शेकडो लोक राजवाडयासन्मुख आले !

काळे, पिवळे, आरक्तवर्ण । भुजगव्हाले लंबायमान ।।
भरोनि निघाले घर आंगण । सर्पे रोधिली अवघी धरित्री ।।
पाय ठेवावा कोठेतरी । हत्तीं घोडे राव लष्कर ।।
सर्पे रोधिले अवघे अंबर ।।

(ही धडधडीत कवी कल्पना आहे. सत्याचे गालबोटसुद्धा नाही तिला. सर्व पृथ्वी नि अवघे अंबर सर्पांनीच भरले असे म्हणणे त्यातल्यात्यात खरे होईल. त्या सर्पांचे रंग देखील दिलेले ! जणू काय दोन पिढयांनतर झालेल्या महिपतीने ते समक्ष पाहून नोंदले होते ! अशा कवितेच्या पुराव्यावर असे अद्भुत चमत्कार म्हणे सत्य माना, म्हणे सिद्ध होतात ! )

नंतर सुलतान घाबरले. काशीपंतांना नामदेवाकडे धाडले. 'संतमहाराज, महावैष्णवाच्या छळाचे प्रायश्चित्त आपण सुलतानाला दिलेत, आपल्या शापाने किती लोकांचे प्राण हरले ते पहा ! त्या मृतांची नि त्यांच्या बायकामुलांची आपणांस दया आली नाही, तर प्रत्यक्ष भगवानसुद्धा त्यांचे रक्षण करू शकणार नाही. तरी दया करा नि आपले सर्पास्त्र आवरून घ्या.' नामदेव यावेळी ब्रह्मानंदात रंगून गेल्यामुळे बेशुद्ध होते. पण त्यांच्या पाठीमागे असलेल्या पांडुरंगाने त्यांना सावध केले. तेव्हा ती प्रेते नि बायकामुलांचे हाहाकार पाहून ते द्रवले. 'देवा हा हाहाकार बंद करा ' म्हणून पांडुरंगास प्रार्थिले. तेव्हा ती सर्व प्रेते खाडकन् उठून बसली नि सर्पही जागच्याजागी अदृश्य झाले !

(अपराध केला सुलतानाने, पण देवाने जे सर्पास्त्र सोडले त्याने हालहाल होऊन मेले शतावधी प्रजाजन. मुस्लिमच नव्हेत तर नुसते 'प्रजाजन' म्हणजे हिंदूसुद्धा ! बायकापोरे घरोघर हाहाकार करीत राहिली. हिंदूंची–लोकांची. पण ज्या दुष्टाने अपराध केला, संताचा छळ केला, त्या सुलतानाला मात्र त्या लाखो सर्पांतून कोणी चाटूनसुद्धा गेला नाही, त्याने क्षणभर तरी भूमीवर गडबडा लोळावे इतका एक चावासुद्धा घेतला नाही. न त्याची स्वतःची बायकामुले दंशिली! संत तर ब्रह्मानंदाच्या बेशुद्धीतच होते, पण ज्याने हे सर्पास्त्र सूड घेण्यासाठी सोडले तो देवही शुद्धीवर नव्हता म्हणायचा ! त्या पांडुरंगात जर काही राम असता तर त्याने प्रथम तो रावण गाठला असता. पहिला सर्प जो सोडायचा तो हिंदु वैष्णवांचा छळ करणाऱ्या त्या सुलतानाच्या नरडीचा दात खुपसून निघावयास हवा होता !

चरे, काशीपंत एवढा राजकीय प्रधान, त्याने का येऊन सांगायचे की सर्पास्त्र मागे घ्या ! त्याने तर उलट असे सांगावयास पाहिजे होते की मुसलमानी तक्तास तोडून हा वैष्णवांचा झेंडा फडकविणारी हिंदुपदपादशाहीच स्थापा ! पण असे संत, स्वप्नातली सर्पास्त्रे नि असे प्रधान हिंदूंत, तोवर होते म्हणूनच ती बादशाही तक्तेही तशीच राहिली यात काय आश्चर्य ! आणि जेव्हा रामदास हे संत, वाघनखे, भवानी नि भाऊसाहेबी घण ही शस्त्रे आणि पहिले बाजीराव पंतप्रधान झाले, तेव्हा त्या तक्तांचा लगोलग चुराडा उडाला ह्यात तरी काय आश्चर्य !! )

वास्तविक पाहता नामदेवादिक पूज्य संतांनी त्यांच्या परिस्थितीत त्यांच्या शक्त्यनुसार नि बुद्धीनुसार जे करता येईल ते जनहित केले हेच त्यांचे उपकार, हाच त्यांचा महिमा. नामाचा महिमाही इतकाच की इहलोकातील खडतर जीवनामुळे त्रस्त झालेल्या मनाला आजूबाजूच्या परिस्थितीचा विसर पाडण्यास नि ब्रह्मानंदासारखा आनंद देण्यास या नामापासून वैयक्तिक उपयोग होतो. पण त्यापलीकडे ऐहिक सृष्टीतील घडामोडीत त्या नुसत्या नामाच्या महिम्याचा काडीचाही उपयोग नाही. ब्रह्मानंद लाभला, संत झाला, समाधी साधली की तो मनुष्य कर्तुमकर्तु समर्थ, सर्वज्ञ, सर्व प्रकरणी परमप्रमाण असा कोणी मनुष्य होतो नि त्याच्या शब्दासरशी देव वाटेल ते उलटसुलट करू लागतो, ह्या भाकड समजुतीपायीच त्या संताची नसती विटंबना होते. ती भाकड समजूत अशा बोलपटांनी अधिकच वोकाळण्याचा संभव उरू नये यास्तव तिचा असा विवेचक बुद्धीने तीव्र प्रतिकार करणे क्रमप्राप्त कर्तव्य होऊन बसते.

(समग्र सावरकर वाङ्मय– खंड तिसरा)

# परिशिष्ट
# अ, आ, इ, ई

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
3034
दा. क्र. 20953
ग्रंथ शाखा (स्थळ

# परिशिष्ट : अ

## मरणोन्मुख शय्येवर

वि. दा. सावरकर

(परिचय : १९११ ते १९२१ पर्यंत अंदमानमध्ये तुरुंगात विनायकरावांची प्रकृती एकसारखी बिघडत जाऊन क्षयावर जाते की काय अशी डॉक्टरांनादेखील भीती पडली असताना व केवळ थोड्याशा दुधावर राहून अंथरुणास महिनोगणती खिळून पडलेले असताना त्यांना मरण बरे असे वाटू लागे; इतकेच नव्हे तर ते एकदा अगदी अंथरुणाशी येऊन ठेपलेही ! त्यावेळेस मृत्यूच्या त्या गंभीर छायेखाली ही कविता त्यांनी लिहिली.)

ये मृत्यो ! ये तू ये, यावयाप्रती
निघालाचि असशिल जरि ये तरी सुखे !
कोमेजुनि जावया भित्रोत ही फुले
ही द्राक्षे रसरशीत सुकुनि जावया
भ्यावे ते का म्हणुनी तुजसि परी मी ?
माझ्या पेल्यात किती पीत राहिलो
तरि न संपतीच अशा असति आजि या
अश्रूंच्या मदिराची मात्र राहिल्या !
ये, त्या जरि नैवेद्या ससि भुकेला
आणि जरी दिवस असे अजुनि तरुण हा
तरि लहानथोर अशी असति संपली
दिवसाची कार्येही बहुतकरुनिया;
तोडजोड करुनि परी फेडली ऋणें
जन्मार्जित जो जी ती; ऋषिऋणाप्रती
श्रुतिजननीचरणतीर्थ सेवुनी कधी,

धरूनि कधी ध्रुवपदांसि संत-ततीच्या
आणि ही आचरुनी एक तप अशी
आशेच्या या स्मशानभूत तपस्या
देवऋणा, फुंकुनि रणशृंग, दुंदुभी
धडड धडड पिटुनि, आणि तो अघाडिचा
चढवुनि तैं हल्ला सहसाचि ज्या पळीं
सुटली रघुवीराची प्रथम रणाज्ञा
आणि त्याचि रणयज्ञाग्नीत पेटल्या
अस्थि अस्थि, मांस मांस, इन्धनें तशी
जळत जळत आज असे शेष राहिली
राख यौवनाची मम ! आणि म्हणुनिची
फेडाया पितृ-ऋणासि आजि अहो मीं
शास्त्रातें अनुसरोनि, दत्तविधानें,
निपुत्रिकत्व वारियलें: पुत्र अखिल हें
अभिनव भारतची मम ! जेथ जेथ कीं
पाळण्यांत विकसतसे नयन-कमल तें
तेथ तेथ मीच बघें सृष्टि–कुतुहला.
नव उन्नति शील भालपटलिं दिसत जैं
उदयोन्मुख तेज तरुण, तैं पुनःपुन्हा
माझ्याही उदयोन्मुख होति हृदीं या
आशा नव, आकांक्षा उच्च, भावि त्या
आमुचिया वंशाच्या गौरवाचिया–
भारतीय केवल ना, मानवीयही
वंशाच्या गौरवार्थ ! अखिल मानवी
यौवनांत अनुभवीन यौवनास मी
आणि पितर माझे ते प्रेमतर्पणा
येइं सुखें मृत्यो, तरि– असति हीं अशी,
तोडजोड करुनि परी फेडली ऋणें.
आणि बहुतकरुनीया असति संपलीं
दिवसाची कार्येही : यद्यपी कधीं
उगवे हा दिवस, कधीं मावळेहि वा;
कर्में वा कवण, कशीं कार्य, या दिनीं
याविषयीं पंचांगे भिन्न, भिन्नची

भट्ट आणि पण्डित हे कथिति मज कथा
तरिहि लोकसंग्रहार्थ, धारणाप्रती
मानवीय आत्यंतिक आत्महिताच्या,
सज्जनासि गमली अनुकूल तींच कीं
कार्ये म्यां धर्म्य अशीं मानिलीं, अणी
तदनुरूप एकाचा म्हणुनि जो ठरे
म्यां माझा भार असे उचलिला मुदें
यथाशक्ति यथापरिस्थिति न भंगितां
धरिलें तें व्रत कदापि किमपि ना भयें.
सत्कुल, अव्यंग देह, परम दयाळू
जनक आणि जननी ती, त्यांहुनीहि कीं
वात्सल्यें, पुण्यें, प्रतिपाळिता तसा
अग्रज, जो अग्रगण्य तापसांमध्यें;
मूर्त विनय अनुज असा; अद्वितीयसें
प्रेयांचे प्रेमपुण्य; धन्य आणि तें
ध्येय महत्, देई जें जीवनाप्रती
सार्थकत्व मनुजांच्या, काव्यमय करी
जें आयु:कालाते, पूत चरित्रा;
तप कांहीं, जप कांहीं, यश कांहीं तें,
कांहींशी मान्यताहि शारदेचिया
राजसभेमाजी कविरत्नभूषिता
चाखियले रस नाना; हुंगियले ते
शतभूजलवायुललित शतसुगंध कीं
पंचाग्नीमधिल तया प्रखर भाजत्या
उत्तापापासुनि तों प्रीतीच्या मऊ
स्निग्ध परिष्वंगापर्यन्त सर्वही
शीतल, शीतोष्ण, उष्ण अनुभवीयले
कटिबंधस्पर्श तसे; परिसिले किती
स्वरशत, शतभाषा, शतगीति नवनवा
शतमंजुल कंठांतिल– आणि मृत्यूच्या
शतकठोर कंठांतिल घोर लागल्या;
नाना जन, जानपदें, जातिविभिन्ना

देश किती दृश्ये तीं, भूमिच्या महा–
संग्रहालयांत परिभ्रमत पाहिलीं.
सुरूप तें, सुरेख तें, सुललित तें असें
पाहियलें डोळ्यांनीं किमपि तरि जया
मृत्यो ! ते डोळे हे झांक तूं सुखें !
– झांकणेंचि आवश्यक जरि गमे तरी !
की सुरेख पाहियलें– किमपि तरी तें !
प्रीती विपल : विरह चिरंतन ! नवीं वयीं,
प्रौढ धुरंधरहि न जी शकति तोलण्या,
तीच धुरा भर उन्हांत तोलणें घडे !
म्हणुनि असे अजुनी अपुरीच राहिली
खेळाची हौस हंसत चांदण्यामध्यें
या आयुष्याच्या मम ! तरिहि जाणुनी
कीं न ययातीचीहि हौस पुरेशी
झाली जरि आयुष्याचाचि सर्व तो
नृपति करी खेळ एक; आणि पाहुनी
इच्छेच्या बीजा फल भोग लागतां
इच्छेचीं बीजेंची त्यांत फिरोनी;
आणि अनुभवुनी कीं एक भुकेची
एक जेवणानें जी तृप्ती जाहली
तृप्ती सहस्राव्याही भोजनामुळें
असते कीं तितुकीची आणि तशीची;
मी दे तुज अनुमोदन संपवूं असा
हा जीवनलेख इथें; पृष्ठि या जरी
पृष्ठें जी पुढलीं तीं मागल्या तया
पृष्ठांची असली पुनरुक्तिची तरी !
म्या असता दिवस नसे व्यर्थ गमविला
दिवसास्ताचेंहि म्हणुनि दुःख ना मला.
– भीती उद्यांची ही वा ! मृत्युच्या मृता
जरि असेल त्या अंधःकार–लतेला
फुलत दुज्या दिवसाचें फूल तरीही
भीती न मज; कीं येथें पेरिलें अम्हीं
फुलत आणि फलत तेंच, कथिति ते तिथें.

आणि मी पेराया कष्टलों असें
बीजें कीं तीं जीं निवडुनी दिलीं
त्यांनींची अत्युत्तम म्हणुनिया मला
पेरूं फलाशाविरहित. " तूं तसें जरी
वर्ततील समपरिस्थितींत अन्यही;
तरि लोकोन्नति–विनाश होय ना असें
वर्त " तसेंची वर्तूं यत्न म्यां सदा
केला आबाल्य. ' जसें अन्य तुझ्याशीं
वागावें म्हणुनि तुला वाटतें तसें
तूंहि वाग अन्याशीं ' संतवचन हें
मी अनुपलि पालाया कष्टलों अणी
जरि आपद्धर्म सेव्य मानिले तरी
ते इतक्यास्तवची कीं धर्मची स्वयें
ओपुनि दे आपत्तीच्याचि मज करीं।
जैं हिरव्या गवताच्या गार गालिचा–
वरूनि दहापावलीच अंगणामध्यें
कारागारात कधी मी फिरे तधीं
आत्मौपम्यांत मुरत चित्त थिजोनी
कितिदां तरि चरण अकस्मात चालतां
स्तंभित होऊनि रहावेत घटिघटी
काही केल्याहि तया तरुण कोंबळ्या
गवताचे अंकुर दुखतील या भयें
पाय त्यांवरी नये पडूंचि कीं पुढें
हातींचा घास कधी हटूनि राहावा
हातींची, की जितुकी त्यात शिते ती
बीजेंची नव्हत काय ? खातसो अम्ही
फल तें तें भ्रूण घात ? आणि कधिकधी
मज पडलें भय कीं मज वेड लागलें !
आत्मौपम्यास जंई वर्तण्यांत हें
मन माझें अनुसरितां मज पदोपदीं
मरणासम दुःख होय पाहुनी जगीं
पूर्ण असंभवचि तया आचरूं पुरें
तरिही यत्न म्यां केला; अज्ञतेमुळें

वा अशक्यतेमुळेंच पद कधीं जरी
स्खलित जाहलें असेल तरि असेल तें
म्हणुनि भय उद्यांहि ना. स्मशानभूमिचा
परतटप्रदेश जो अनोळखी तिथें
सुखकर प्रवास करवि जें असें असे
ओळखिचें पत्र अम्हांजवळ त्या स्वयें
भगवान श्रीकृष्णाचे– श्रीमतां गृहे
शचीनां च ! वा गेहे योगिनामपि
' कश्चित् कल्याणकृच्च तात दुर्गतिम्
नहि गच्छति ' नहि गच्छति सांगती अणी
ते निरीश्वर– स्वभाव–वादिही मला;
म्हणुनि जरी सत्यचि जें वदति ते, जरी
स्वर्ग, नरक, जन्मान्तर, बंध, मुक्ति वा
निजकर्माचाची परिपाक कीं तरी
मरणाची वेस जयामाजि उघडते
त्या अदृष्ट नगरांतिल अति सुरम्य ते
राखवूनि ठेवियले असति बंगले
आधींची आम्हांस्तव भरूनिया अम्ही
कर्माच्या, धर्माच्या नियत विसारा !
परि जरि कीं स्वर्ग, जीव, बंध, कर्म वा
ऐहिक तें इन्द्रजाल मात्र, कीं जरी
संघातोत्पन्न भाव मात्र जीव हा
मृत्युपृथक्करणिं अभावांत ओसरे
तरि सर्वोत्तमचि ! मरण एक सुषुप्ति
अथवा प्रत्यक्ष मुक्ति ! पंचही असे
मिश्रित भूतांश पृथक् मुक्ति होऊनी
विहरोत स्वेच्छ नव्य मिश्रणांतुनी
वा स्वयेंचि, वा शून्यीं ! इंद्रधनु तसे
संज्ञेच्या आकाशी विपल शोभुनी
विपलांतचि हा माझा 'मी ' हि कीं जरी
विश्वाच्या अंतर्हित 'मी 'त मावळे
तरि मरणा ! मरण न तूं ! मरण मुक्तिची !

– विपलांतचि परि ! विनंति इतुकिची असे;
येणे तरि येऊनि जा झटकनी तुझा

दुर्लौकिक जो जगांत, लोक जो तुझा
द्वेष करिति, तो नचि कीं असिसि तूं स्वत:
निर्दय वा निंद्य म्हणुनि– पाहुनी तुला
आलाची कोणीही परत कीं न तो
सांगूं तू केवी ते ! – परि विशेषत:
मृत्यो तूं अप्रियसा जगति जें तुझें
सैन्य. पुरस्सर, पीडक हें हिडिस्ससें,
रोगाचें क्रुर असे, त्यामुळेंच कीं !
मीच न की परि अजातशत्रु जो जगीं,
तुल्य ज्या प्रियाप्रियादि हानि, लाभ, त्या

भगवान श्रीगौतमाप्रतीहि भासला
रोग जरा अप्रियचीः ' लाभ ना दुजा
आरोग्यासम जगतीं ' धर्मपद वदे
तरिही जे कोणी तुज नुघडतीलची
स्वच्छेनें दरवाजे, दुर्ग ते हठी
जिंकुं जीवनाचे तूं धाड धाडही
रोगांच्या सैन्याची गांजत्या तिथें.
मी तों जीं नुघडतील फोडिलीं तरी
जाणारचि, तीं दारें उघडुनी स्वयें
या माझ्या गेहाचीं, स्वागता असे

अनिवार्या सिद्ध तुझ्या ! म्हणुनि शक्य कीं
ये तरि, हे अखिल– वीर– वीर विजेत्या !
एकलाचि, अपुरस्सर, आणि अकस्मात.
परि अशक्य जरि तें तुज एकटें तसें
येणेंची, तरि त्याही क्रूर पीडका
रोगाच्या सैन्याचा क्षोभ सोसण्या
मीं असेंचि सिद्ध आजि दोन वत्सरें
पाहतची असती तूं मजसि हा असा

शरपंजरिं खिळला ! ज्या मधुर लागलें
जीवनांतलें मधु, प्रकाश चक्षुतें,
प्रीति हृदा तो मी त्या सर्व सुखांचें
मूल्य म्हणुनि मृत्यूच्या यातनाहि कीं
समजुनि कर्तव्य सहुं सिद्ध असेंची !

# परिशिष्ट आ

## सावरकर जीवनपट
## (ठळक घटना)

| | |
|---|---|
| १८८३ | मे २८ भगूर (नाशिक) येथे जन्म. |
| १८९२ | मातृवियोग. |
| १८९८ | अष्टभुजा देवीपुढे स्वातंत्र्यप्राप्तीसाठी शपथ. |
| १८९९ | वडिलांचा मृत्यू. |
| १९०० | मित्रमेळयाची स्थापना. |
| १९०१ | विवाह, मॅट्रिक उत्तीर्ण. |
| १९०२ | पुणे येथे फर्ग्युसन कॉलेजात प्रवेश. |
| १९०५ | परदेशी कपडयांची होळी, प्रभाकराचा जन्म. बी. ए. उत्तीर्ण. |
| १९०६ | शिवाजी शिष्यवृत्ती, बॅरिस्टर होण्यासाठी इंग्लंडला प्रयाण, मॅझिनी चरित्र व सत्तावन्नचे स्वातंत्र्यसमर या ग्रंथांची पूर्वतयारी. |
| १९०७ | सशस्त्र क्रांतीचे उद्योग व संघटना. |
| १९०८ | लंडन येथे शिवाजी, गुरुगोविंदसिंग यांचे उत्सव, सत्तावनी क्रांति-युद्धाचा भव्य स्मृतिदिन. वडील बंधू बाबाराव यांना भारतात अटक. |
| १९०९ | भारतात पिस्तुले धाडली, बाबारावांना जन्मठेपेची शिक्षा, धिंग्रा प्रकरण, प्रभाकराचा मृत्यू, बॅरिस्टरी उत्तीर्ण पण पदवीस नकार, गांधीजींच्या अध्यक्षतेखाली विजयादशमीस भाषण. |
| १९१० | पॅरिसला प्रयाण, लंडनला येताना अटक, भारताच्या वाटेवर मार्से-लिसनजीक सागरात उडी, मुंबई येथे खटला. |
| १९११ | इंग्रजी राजवटीविरुद्ध सशस्त्र बंडाळीच्या यत्नाबद्दल दोन जन्म-ठेपांची शिक्षा, अंदमानला रवानगी. |
| १९१९ | येसूवहिनीचे निधन. |

१९२० टिळक, गांधीजी, खापर्डे, विठ्ठलभाई पटेल प्रभृतींचे सावरकर सुटकेसाठी यत्न, कारागृहात निर्बंध सैल केले.

१९२१ सावरकर बंधूची अंदमानातून भारतात पाठवणी.

१९२२ अलीपूर व रत्नागिरी येथील बंदिवास, 'माझी जन्मठेप' आणि 'हिंदुत्व' या ग्रंथाची जुळवाजुळव, बाबारावांची सुटका.

१९२३ जम्नादास मेहता प्रभृतीकडून सुटकेचे यत्न, येरवडा कारागृहात गव्हर्नर लॉईड जॉर्ज आणि सावरकर यांची मुलाखत.

१९२४ राजकारणात भाग न घेणे व रत्नागिरी जिल्ह्यातच वास्तव्य करणे या अटीवर सुटका, नाशिकला पहिला जाहीर सत्कार व थैली.

१९२५ कन्या प्रभात हिचा जन्म, अस्पृश्यता निवारण चळवळीला व सामाजिक लेखनास आरंभ.

१९२७ रत्नागिरी येथे गांधीजी–सावरकर भेट.

१९२८ पुत्र विश्वास यांचा जन्म.

१९३० पहिले प्रकट सहभोजन.

१९३१ पतितपावन मंदिराचे उद्घाटन, अस्पृश्यतानिवारण– परिषदा.

१९३२ मुंबईला एका गोऱ्या सार्जंटावर सशस्त्र हल्ला झाला. त्या निमित्ताने संशयावरून अल्पकाळ कारावास.

१९३७ कूपर–मेहता मंत्रिमंडळाने बिनशर्त मुक्तता केली. पुणे येथे सत्कार. ठिकठिकाणी व्याख्याने, कर्णावती हिंदुमहासभा अधिवेशनाचे अध्यक्षपद.

१९३८ भारत दौरा, मुंबई येथे महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद, भागानगर नि:शस्त्र प्रतिकाराची चळवळ, नागपूर हिंदु सभा अधिवेशन, मिरवणुकीवर विमानातून पुष्पवृष्टी.

१९३९ भारत दौरा, भागानगर चळवळ स्थगित, व्हॉइसरॉयशी भेट, कलकत्ता हिंदुसभा अधिवेशन.

१९४० द. भारताचा दौरा, मदुरा हिंदुसभा अधिवेशन, सायटिकाचा आजार.

१९४१ नाशिकच्या सार्वजनिक वाचनालयाची शताब्दी, कवी गोविंदाच्या अर्धपुतळ्याचे अनावरण, भागलपूर सत्याग्रह.

१९४२ कानपूर हिंदुसभा अधिवेशन.

१९४३ पुणे येथे षष्टयब्दीपूर्तीनिमित्त भव्य सत्कार व थैली, साहित्यिका-

करून मानपत्र, अमृतसर हिंदुसभा अधिवेशनाचे अध्यक्षपद (सातव्यांदा).

१९४८-४९ गांधीवध खटल्यातून निर्दोष–निष्कलंकरीत्या सुटका.

१९५२ पुणे येथे 'अभिनव भारत' सांगता समारंभ.

१९५६ लो. टिळक जन्मशताब्दीचे अध्यक्षपद, पुणे येथे शनिवार वाड्या-पुढे भाषण.

१९५७ सत्तावनच्या स्वातंत्र्यसमराची शताब्दी, दिल्ली येथे सत्कार व भाषण.

१९५८ अमृतमहोत्सव.

१९६१ मृत्युंजय–दिनानिमित्त पुण्यात भव्य सत्कार.

१९६३ नोव्हेंबर ८ –पत्नी माई सावरकर यांचे निधन.

१९६६ फेब्रुवारी २६– सकाळी ११ वाजता दादर येथे 'सावरकर–सदना'त निधन.

१९६६ फेब्रुवारी २७– सायंकाळी प्रचंड अन्त्ययात्रा व चंदनवाडीच्या स्मशान भूमीत विद्युत्–दहन.

# परिशिष्ट इ

## संदर्भ ग्रंथ

## अ) समग्र सावरकर साहित्य

| | |
|---|---|
| १) आत्मचरित्रे | प्रकाशन काल |
| पूर्वपीठिका | १९५७ |
| सावरकर आत्मचरित्र अर्थात माझ्या आठवणी– आवृत्ती पहिली | १९४९ |
| माझी जन्मठेप-द्वितीय आवृत्ती संवत | २००३ |
| जन्मठेप : संक्षिप्तीकरण नि प्रस्तावना– प्र. के. अत्रे | १९५३ |
| शत्रूच्या शिबिरात– आवृत्ती पहिली | १९६५ |
| २) पत्रे व वार्तापत्रे | |
| लंडनची बातमीपत्रे | १९४० |
| अंदमानाच्या अंधेरीतून (मूळ इंग्रजी) | १९२४ |
| पुनर्मुद्रण | १९४१,१९४७ |
| ३) चरित्र | |
| जोसेफ मॅझिनी : आत्मचरित्र नि राजकारण | |
| दुसरी आवृत्ती | १९४६ |
| तेजस्वी तारे – पहिली आवृत्ती | १९४९ |
| ४) इतिहास | |
| ऐतिहासिक पुरुषाचे उत्सव का करावेत ? | १९४६ |
| अठराशे सत्तावनचे भारतीय स्वातंत्र्य-समर-प्रथम आवृत्ती | १९६५ |
| सत्तावनचे स्वातंत्र्य: समर-भाषांतरकार– वि. वि. पटवर्धन | १९४७ |
| The Indian war of Independence | 1947 |
| Hindu Pad-Padashahi | 1942 |
| हिंदुपदपादशाही | १९४७ |

| | |
|---|---|
| भारतीय इतिहासातील सहा सोनेरी पाने : भाग पहिला | १९५६ |
| भाग दुसरा | १९६३ |
| नेपाळी आंदोलनाचा इतिहास, स. सा. वा. खंड ६ वा | १९६४ |

५) निबंध

| | |
|---|---|
| हिंदुत्व-अनुवादक– ना. दा. सावरकर– द्वितीय आवृत्ती संवत | २००२ |
| Hindutva– Fourth Edition | 1949 |
| क्ष किरणे | १९५० |
| विज्ञाननिष्ठ निबंध | १९५० |
| जातिभेदोच्छेदक निबंध | १९५० |
| गांधी गोंधळ | १९४१ |
| हिंदुत्वाचे पंचप्राण-समग्र सावरकर वाङमय खंड ३ | १९६४ |
| रणशिंग-समग्र सावरकर वाङमय खंड २ | १९६३ |
| सावरकर साहित्य भाग १ ते ५ | – |
| मुद्रक व प्रकाशक, किर्लोस्कर प्रेस, किर्लोस्करवाडी. | |

६) काव्य

| | |
|---|---|
| चाफेकर नि रानडे यांजवर फटका-प्रथम आवृत्ती | १९४६ |
| सिंहगडचा पोवाडा– पुनरावृत्ती | १९४६ |
| बाजीप्रभूचा पोवाडा– पुनरावृत्ती | १९४६ |
| सावरकरांची कविता : संपादक, वा. गो. मायदेव | |
| पुनर्मुद्रण १४ जानेवारी | १९४७ |
| रानफुले : संकलित– आवृत्ती पहिली | १९३४ |
| कमला : तृतीयावृत्ती | १९४७ |
| गोमांतक : पहिली आवृत्ती | १९२४ |
| महासागर : समग्र सावरकर वाङ्मय खंड ७ | १९६५ |

७) नाटके

| | |
|---|---|
| संगीत उःशाप | १९२७ |
| संगीत संन्यस्त खड्ग | १९३१ |
| संगीत उत्तरक्रिया– आवृत्ती पहिली | १९३३ |
| आवृत्ती दुसरी | १९५७ |

८) कथा

| | |
|---|---|
| सावरकरांच्या गोष्टी | १९४८ |
| समाजचित्रे | १९५९ |

सा. ऐ. चि. अ. ३९

९) कादंबरी

| | | |
|---|---|---|
| काळे पाणी – प्रथम आवृत्ती | | १९३७ |
| पुनर्मुद्रण | | १९४८,१९६० |
| मला काय त्याचे ? (चौथी आवृत्ती) | | १९५६ |

१०) भाषाशुद्धी– लिपीशुद्धी

| | | |
|---|---|---|
| भाषाशुद्धी | (शके) | १८७९ |
| मराठी भाषेचे शुद्धीकरण | | १९२६ |
| नागरी लिपिशुद्धीचे आंदोलन | | १९५० |

११) भाषणे

| | | |
|---|---|---|
| हिंदूंच्या चळवळीचे ध्येय व धोरण | | १९४० |
| समग्र सावरकर वाङमय, खंड ४ था | | १९६५ |
| संघटन संजीवनी | | १९४२ |
| स्वातंत्र्यवीर सावरकरांची भाषणे– समग्र सावरकर वाङ्मय खंड ८ | | १९६५ |
| हिंदुराष्ट्र–दर्शन | | १९४७ |
| वीर सावरकरांची अभिनव भारत सांगता समयीची उत्कृष्ट भाषणे | | १९५३ |
| समग्र सावरकर वाङमय खंड १ ते ८ | | |
| समग्र सावरकर वाङमय प्रकाशन समिती | | १९६३,१९६४ |
| महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभा, पुणे | | १९६५ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
3030
दा. क्र. 27923
निबंध जाधव
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# परिशिष्ट ई

## संपादक परिचय

डॉ. प्रभाकर लक्ष्मण गावडे

जन्म १९२४. शिक्षण एम्. ए., एम्. एड., पीएच्. डी.

व्यवसाय :– निवृत्त मुख्याध्यापक, म. ए सोसायटीचे सौ. विमलाबाई गरवारे हायस्कूल, पुणे ४, कार्यवाह, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी पुणे ३०, आणि मराठीचे प्राध्यापक, पुणे विद्यापीठ, पुणे.

ग्रंथ संपादन :– १) अजिंक्यतारा (ना. ह. आपटे यांच्या कादंबरीचे संपादन) कथा कौस्तुभ (कथासंग्रह संपादन, सहकार्याने) ३) साहित्य– विहार (शालेय पाठ्यपुस्तक संपादन, सहकार्याने) ४) शालेय मराठी व्याकरण (संपादन सहकार्याने) इत्यादी

ग्रंथ लेखन :– १) कवी यशवंत (यशवंतांच्या काव्याचे समीक्षण) २) सावरकर– एक चिकित्सक अभ्यास (१९७०)

वास्तव्य :– ३१९ नवीपेठ, पुणे ३०.

REFBK-0024193

सावरकरांचे साहित्य चिंतन

जे जे उत्तम, उदात्त, उन्नत, महन्मधुर ते ते सावरकरांच्या साहित्य चिंतनाचा विषय बनले होते.

वेद कालीन उषेने ज्या ऋषींना नव्या मंगल सत्याची स्फूर्ती दिली होती त्याच द्रष्टया ऋषींनी जणू सावरकरांना साहित्य निर्मितीचा मंत्र दिला होता.

म्हणून सावरकरांचे साहित्य विषयक चिंतन मानवीजातीच्या व्यापक हिताभोवती रुंजी घालीत होते.

विश्वाच्या अंतर्हित 'मी' मध्ये माझा 'मी' मावळावा अशी उत्कट मनीषा 'मरणोन्मुख शय्ये'वरही ते बाळगून होते.

उभ्या मनुष्यजातीचे राजकीय, सात्त्विक एकीकरण हे सावरकरांचे अंतिमध्येय होते. आणि त्या ध्येयानुसारच 'मनुष्यजातीच्या अधिकात अधिक हितास साधण्यासाठी झटेल तेच साहित्य श्रेष्ठ' अशी श्रेष्ठ साहित्याची व्याख्या त्यांनी केली होती.

समाजाला मंगलास्पद असणाऱ्या ध्येयाकडे प्रवृत्त करायला साहित्य – जर ते उदात्ताशी समरस होईल तर – एक अत्यंत प्रभावी साधन आहे अशी सावरकरांची धारणा होती.

अतएव, सावरकरांचे साहित्य चिंतन म्हणजे हिंदुत्वतेला मानवतेच्या पडलेल्या स्वप्नाचे स्पंदन होते.

संजय
प्रकाशन, पुणे ४